भारत आणि जगातील शिक्षण

(तौलनिक अभ्यास)

१९७८
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. २७२९
-0022577



चंद्रक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

[चना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, से न केल्यास घटना निमय क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा र्णी भरावी लागेल.

6 NOV 1988

8861 DEC 12

21 DEC 1988

निबंध २७२८
दा.क्र. २२५७७
२७।१२।७८

भारत आणि जगातील शिक्षण

(इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, रशिया)

(तौलनिक अभ्यास)

REFBK-0022577

प्राचार्य चंद्रकुमार डांगे

एम्. ए. एम्. ई. डी.

मूल्य : पंधरा रुपये

नूतन प्रकाशन, पुणे ३०.

प्रथमावृत्ती : २७ जून १९७८

© चंद्रकुमार डांगे

प्रकाशन क्रमांक ४३

प्रकाशक : गो. के. जोगळेकर
नूतन प्रकाशन
२१८१ सदाशिव, पुणे ३०.

मुद्रक : म. शं. परभाणे
सुभाष प्रिंटिंग प्रेस
३९० क, शनिवार पेठ, पुणे ३०.



लेखा, गौरी, मृगा, दर्शन
आणि
पुष्कर
या नव्या क्षितिजांना

मित्रहो,

१९६७ च्या ऑक्टोबर महिन्यात वुईल्यम्स्बर्ग, व्हर्जिनिया येथे एक आंतरराष्ट्रीय परिषद अमेरिकेचे अध्यक्ष लिंडन बी. जॉन्सन यांच्या प्रेरणेवरून भरली होती. लिंडन जॉन्सन आणि त्यांच्या विचारांचे सहप्रवासी यांना सारखे वाटत होते की जगातील लोकांच्या आकांक्षा आणि त्या पूर्ण करण्याची शिक्षणाची क्षमता यांचे पुनः एकदा मूल्यांकन करणे फार आवश्यक आहे. या परिषदेला त्यांनी नाव दिले. '**शिक्षण क्षेत्रातील पेचप्रसंगांचा विचार करणारी आंतरराष्ट्रीय परिषद**' The international Conference on the World Crisis in Education) ५२ देशांतील १५० विचारवंत शिक्षण तज्ज्ञ परिषदेला हजर होते. हा अत्यंत अभ्यासनीय अहवाल आहे. तो तौलनिक शिक्षणाच्या दृष्टीने. या परिषदेने केलेल्या विचारमंथनातून काही निश्चित सूत्रे उपलब्ध झाली. त्या सूत्रांच्या दिशेने सर्व देशातील शिक्षण तपासणे हा नवा अभ्यास सुरू झाला. या सूत्रांची मूलभूत बैठक आहे ती म्हणजे लोकांची अधिक चांगले आणि अधिक स्वतंत्र (for a better and free life) जीवन मिळावे ही आकांक्षा. परिषदेने मान्य केलेले काही निष्कर्ष असे :

१. जगातील प्रत्येक देशात शिक्षण हा चिंतेचा विषय झाला आहे. जर शैक्षणिक नियोजन यशस्वी व्हावयाचे असेल तर प्रत्येक देशाने इतर देशांतील शिक्षण पद्धती आणि योजना यांच्या संदर्भात त्याची आखणी केली पाहिजे.

२. शिक्षणाकडे प्राथमिक, माध्यमिक, तांत्रिक अशा तुकड्या तुकड्याने न पहाता, समाजाच्या गरजा, उपलब्ध साधने यांचा विचार करून समग्रपणे (in total) पाहिले पाहिजे.

३. अपेक्षा, प्रत्यक्ष कार्य आणि क्षमता यांचा हा शिक्षण क्षेत्रातील मूलभूत संघर्ष आहे. व्यक्तीची आकांक्षा आणि समाजाच्या गरजा, शिक्षण

पद्धतीतील फरक यांत विलक्षण विसंगती सर्वत्र आढळते. प्रगत आणि विकसनशील अशा सर्व देशांत शैक्षणिक कार्यालय, आकृतिबंध, व्यवस्थापन अध्ययन-प्रक्रिया, अध्यापन पद्धती अशा अनेक अंगांत कालबाह्य, जीर्ण, निरुपयोगी परंपरा आढळतात. हे सर्व तात्काळ दूर करून नव्या सर्जनशील उपक्रमांचा प्रारंभ लगेच झाला पाहिजे. मुख्य गोष्ट अशी की ही गृहीतके सर्वांनी स्वीकारून नव्या दिशेने पाऊल टाकले पाहिजे.

वरील परिषदेला तीव्रपणे जाणवले ते हे की शिक्षणाची आकडेवारी, माहिती, बदल, प्रयोग संपूर्णपणे उपलब्ध होऊ शकत नाही हे दुर्दैव आहे. एखाद्या गुप्त अस्त्रासारखी ही माहिती लपविण्यात तर आली नाही ना अशी शंका वाटण्याइतपत ही अवस्था आहे. ही एक सामाजिक वंचना आहे. ही परिस्थिती असूनही जे शक्य आहे ते सर्व विवेचनाच्या संदर्भात मांडण्याचा कसोशीने प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांतील विद्यार्थ्यांना हे विवेचन उपयुक्त ठरेल अशी खात्री आहे. दुसरी गोष्ट म्हणजे प्रत्येक वेशातील पातळीवरील शिक्षणाचा विचार करताना भारताचा संदर्भ सतत दिलेला आहे. पाश्चिमात्त्य आणि पौर्वात्य शिक्षण परंपरांचा धावता आलेख या दृष्टीनेच मुद्दाम दिलेला आहे. ही ऐतिहासिक दृष्टी नवे प्रश्न, नवे उपाय समजण्यास उपयुक्त ठरेल.

१९७६ साली मी युरोपला युवक चळवळींचा अभ्यास करण्यासाठी गेलो होतो. त्या निमित्ताने अनेक विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा पहायला मिळाल्या. अनेक नामवंत व्यक्तींच्या भेटीची संधी मिळाली. त्या अवलोकनाचा आणि अनुभवाचा हे लेखन करताना मला फार उपयोग झाला. फ्रँकफर्ट येथे इंटर नॅशनल झू पहाण्याच्या निमित्ताने रस्ता शोधत असताना एका मुलीची गाठ पडली. जर्मन असून तिला इंग्रजी उत्तम बोलता येत होते. कितो नंबरच्या ट्रॅमने जावे, कुठे वळावे इ. ऐकल्यावर मी विचारले, 'तू काय शिकतेस?' ती म्हणाली, 'मी या समोर दिसणाऱ्या विद्यापीठात पहिल्या वर्षात शिकतेय. माझे विषय आहेत बायोकेमिस्ट्री, संगीत,

इंग्लीश लिटरेचर आणि मॅथेमॅटिक्स.' मी हे विषय ऐकून विस्मयाने. विचारले, 'असे भिन्न विषय घेता येतात ?' ती मजेदार हसून म्हणाली 'So What ? it's funny to study this way. I like it. I am very happy !'

आपल्या देशातली विद्यापीठातील विषयांची तटबंदी मला बोचत राहिली, अजूनही बोचते. त्या अनामिक विद्यार्थिनीचा निर्भर आनंद, आत्मविश्वास, जिद्द मला खूप शिकवून गेली.

या पुस्तकात केलेले विवेचन परिपूर्ण आहे असा दावा नाही. तौलनिक शिक्षणाचे क्षेत्रच असे की तेथे सतत नवी क्षितिजे समोर येतात. 'School is Dead' हे एव्हरेट रेमर (Everett Reimer) चे पुस्तक काय किंवा पॉलो फ्रेअरी (Paulo Freire) चे 'Pedagogy of the Oppressed' हे पुस्तक काय, अशी नवी विचारांची, प्रयोगांची, प्रतिमेची क्षितिजे प्रत्यही निर्माण होत आहेत. आपण अस्वस्थ होतो. पुनः विचार करायला लागतो. ही वैचारिक पुर्ननिमिती हेच तौलनिक शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट आहे. पुस्तकाच्या दुसऱ्या भागात इतर महत्त्वाच्या देशांचा विचार करण्याचे योजिले आहे. या पार्श्वभूमीवर 'नवे शिक्षण : नवी क्षितिजे' असे केवळ विमर्षात्मक पुस्तक योजिले आहे.

भारतातील शिक्षण क्षेत्र जगातील सर्व विकसनशील देशातील शिक्षण क्षेत्राप्रमाणे दीर्घकालीन पारतंत्र्य, विषमता, पूर्वग्रह, सामाजिक शक्तींचा संघर्ष, दारिद्र्य, राजकीय अप्रगल्भता आणि सांस्कृतिक अभिनिवेष यांच्या प्रभावातून मुक्त झालेले नाही. या साऱ्यांतून मुक्त होऊन राष्ट्राच्या सर्वांगीण परिवर्तनाचे प्रभावी साधन बनणे अशा रस्सोखेचीत हे क्षेत्र सापडले आहे. मानवी साधन संपत्ती आणि भौतिक सामग्री आपल्यापाशी पुरेशी नसली तरी कमी नाही. कमतरता भासते ती ध्येयवादाने, समर्पित वृत्तीने आणि या क्षेत्राशी बांधिलकी मानून काम करण्याच्या वृत्तीची.

ही वृत्ती आपण संगोपन केली तर अर्धी लढाई जिंकली. जे जगात काही ठिकाणी घडू शकले ते आपल्याला अशक्य नाही. माओने एक सुंदर सूत्र व्यापक परिवर्तनाच्या संदर्भात सांगितले आहे. ते असे : ' Believe that you can do it. '

माझे स्नेही नूतन प्रकाशनचे श्री. गो. के. जोगळेकर यांचा मी फार आभारी आहे. त्याचप्रमाणे सुभाष प्रिंटिंग प्रेसचे चालक परभाणे आणि कामगार बंधू यांचे आभार मानणे आवश्यक आहे.

तौलनिक शिक्षण विषयाचे अभ्यासक आणि शिक्षणात रस घेणाऱ्या सर्वांना हा प्रयत्न रुचेल ही आशा.

२३ जून १९७८ **चंद्रकुमार डांगे**
संकष्टी चतुर्थी
चंद्रप्रभा, पुणे ३०.

भारत आणि जगातील शिक्षण

तौलनिक शिक्षणाचा प्रारंभ :

असे म्हटले जाते की युद्धातून चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही गोष्टींचा जन्म होतो. संपूर्ण जगाला हादरे देणारे पहिले महायुद्ध १९१४ साली सुरू झाले आणि त्यातून शिक्षणाकडे पहाण्याचा एक नवा दृष्टिकोण निर्माण झाला. कोणत्याही व्यक्तीच्या गुणावगुणांची खरी कसोटी लागते ती युद्धातच हा विचार प्रबल ठरला. आणि यातूनच युद्धात गुंतलेल्या राष्ट्रांतील शिक्षणप्रणालींची तुलना सुरू झाली. बरोबर म्हणा अगर चूक म्हणा, त्या त्या राष्ट्राच्या यशापयशाचे खापर शिक्षण–प्रणालीवर फोडले जाऊ लागले. इतकेच नव्हे तर अगदी पूर्व प्राथमिक कक्षेपासून तो विद्यापीठापर्यंत संपूर्ण शिक्षणाचा समग्र विचार करण्याची वृत्ती मूळ धरू लागली. प्रत्येक राष्ट्र आपली संपूर्ण शिक्षण प्रणाली मुळापासून तपासण्याच्या कार्याला प्रवृत्त झाले. १९१७ साली व्हर्सायचा तह होण्याच्या अगोदरच सर्वत्र शिक्षणप्रणालींची पुनर्रचना सुरू झाली. शिक्षण या विषयाला राष्ट्रीय पातळीवर असाधारण महत्त्व आले. जर्मनीत शिक्षणाच्या आमूलाग्र सुधारणेचे घोषवाक्य दुमदुमले ते : Freie Bahn dem–Tuchtigen (हुशार विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण) असे आणि मागणी आली ती Einheitsschule या रूपाने. (प्राथमिकपासून उच्च शिक्षणापर्यंत एकत्र शिक्षण.)

फ्रान्समध्ये जी चळवळ निर्माण झाली ती ecole unique, Common school system, सर्वसामान्य शिक्षणप्रणालीची स्थापना, या नावाने. तर इंग्लंडमध्ये फिशर कायदा (Fisher Act) करून शिक्षणाची नवी घडी बसविण्याचा प्रयत्न सुरू झाला. अशा रीतीने प्रत्येक राष्ट्र आपल्या शिक्षणप्रणालीची तुलना दुसऱ्या राष्ट्राबरोबर करू लागले. आपल्या उणिवा कोणत्या, आपले सामर्थ्य कोणते, आपल्या संस्था कोठे कमी पडतात, असा सर्वांगीण विचार वेगाने सुरू झाला. हाच तौलनिक शिक्षणाचा प्रारंभ होय.

पहिल्या महायुद्धातून निर्माण झाला तो हाच शिक्षणाबद्दलचा विधायक विचार. शिक्षण हा विचार राष्ट्रीय स्वरूपाचा म्हणून मूलगामी ठरला.

मग पूर्वी हे घडले नाही का असा प्रश्न निर्माण होतो. तर असा शिक्षणाचा समग्र विचार पूर्वी झाला नाही. शिक्षणाचा विचार होत असे तो तुटक स्वरूपात, तुकड्या-तुकड्याने. उदाहरणार्थ युरोपात जेव्हा विद्येचे पुनरज्जीवन झाले, (Renaissance) तेव्हा केवळ माध्यमिक शिक्षणाची पुनर्घटना केली गेली. धार्मिक पुनर्घटनेची (Reformation) चळवळ झाली तेव्हा सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा विचार वेगाने होऊ लागला. शास्त्रीय शोधांचा वापर जेव्हा उद्योग आणि व्यापार क्षेत्रात होऊ लागला तेव्हा व्यावसायिक शिक्षणाचा (Vocational Education) विचार पुढे आला. परंतु या सर्व घडामोडींत संपूर्ण शिक्षणप्रणालीचा एकसंध, समग्र असा राष्ट्रीय पातळीवरून विचार झाला नाही. व्यक्तीची कर्तव्ये, अधिकार, क्षमता यांचा ती व्यक्ती ज्या देशात राहाते त्या देशाच्या गरजांतून, म्हणजेच राष्ट्रीय दृष्टीतून विचार समग्रपणे आला नाही, असा विचार हाच तौलनिक शिक्षणाचा पाया होय. तौलनिक शिक्षण (Comparative Education) या नावाची स्वतंत्र अभ्यासाची शाखा निर्माण झाली. जगातील सर्व देशातील सर्व प्रकारच्या शिक्षण पद्धतींचा, शिक्षणाच्या उद्दिष्टांचा, शिक्षणाच्या आशयाचा, व्यवस्थापनाचा, आर्थिक बाजूचा, राष्ट्रीय धोरणांचा, शिक्षणविषयक कायदेकानूंचा, संस्थात्मक कार्यपद्धतींचा, शिक्षणवास्तुशिल्पांचा, पाठ्यपुस्तकांचा, शैक्षणिक साधनांचा, अभ्यासक्रमांचा, परीक्षा पद्धतींचा, शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा, वेतनश्रेणींचा, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सोयींचा, शुल्क व्यवस्थेचा, अभ्यासानुवर्ती उपक्रमांचा, असा तौलनिक अभ्यास सुरू झाला. विविध विचारप्रणालींची, परंपरांची, इतिहासाची, सांस्कृतिक घडामोडींची, सामाजिक प्रवृत्तींची तुलना करून निष्कर्ष काढण्याची नवी परंपरा सुरू झाली. तौलनिक शिक्षणाच्या अभ्यासात काहीही वर्ज्य राहिले नाही. इतकी प्रचंड व्याप्ती या विषयाला लाभली. जगातील विद्यापीठात या विषयाची खास अध्यासने निर्माण करण्यात आली. या विषयावर ग्रंथ लेखन सुरू झाले. विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात

या विषयाचा अंतर्भाव केला गेला. आज तौलनिक शिक्षणाचा अभ्यास हे प्रत्येक राष्ट्राच्या शिक्षणप्रणालीचे महत्त्वाचे अंग झालेले आहे.

तौलनिक शिक्षणाची उद्दिष्टे :

दुसऱ्या राष्ट्रातील शिक्षणप्रणालीविषयीचे औत्सुक्य विसाव्या शतकातच निर्माण झाले असे म्हणता येणार नाही. प्राचीन ग्रीस देशातील अथेन्स शहरातील विद्यामंदिरातून इतर देशांतील विचारप्रणालींचा, परंपरांचा, पद्धतींचा थोडाफार अभ्यास सुरू होता. पण त्या काळातील हा अभ्यास केवळ जुजबी माहिती व वर्णन या स्वरूपाचा होता. व्यवस्थापन, संघटन, पद्धती इत्यादींची माहिती केवळ शिक्षणापुरतीच मर्यादित राहिल्याने खऱ्या अर्थाने तो तौलनिक अभ्यास नव्हता. अशी माहिती रंजक वाटली तरी फारशी उपयोगी ठरत नसते. एखाद्या देशातील शिक्षणप्रणाली ही कोणत्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, भौगोलिक परिस्थितीतून निर्माण झाली त्याची कारणमीमांसा हे खरे तौलनिक शिक्षणाचे अंतिम आणि मूलभूत उद्दिष्ट होय. या मीमांसेशिवाय जमा केलेली माहिती, आकडेवारी केवळ वर्णनस्वरूपाची ठरते. त्या शिक्षणप्रणालीच्या अंतर्गत घडणीचे, त्या विशिष्ट रचनेमागील हेतूंचे, कारणांचे, ध्येयवादाचे दर्शन अशा केवळ माहितीने होत नाही. कारण कोणतीही शिक्षणप्रणाली ही त्या देशाची भौगोलिक परिस्थिती, आर्थिक अवस्था, सामाजिक परंपरा, सांस्कृतिक वारसा, राष्ट्रीय ध्येय, धार्मिक विचारसरणी या व इतर अनेक घटकांचा परिपाक असतो. शिक्षणप्रणालीतून राष्ट्राच्या अंतरंगाचे समग्र दर्शन घडते असे म्हणतात त्याचा असा खोल अर्थ आहे. प्रत्येक देशाला आपली शिक्षण-प्रणाली अपूर्व, अननुकरणीय वाटते ते यामुळेच. आमची पद्धती, परंपरा इतर देशांना अनुसरता येणार नाहीत ही समजूतदेखील मग दृढ होते. हे एका अर्थाने खरे आहे. कोणत्याही देशातील शिक्षणप्रणाली तपशिलासकट दुसऱ्या देशात रुजविता येणार नाही. तौलनिक शिक्षणाच्या अभ्यासाचा जर असा अर्थ घेतला तर ते चुकीचे ठरेल. आज जगातील सर्व राष्ट्रांच्या-समोर कितीतरी समान प्रश्न उभे आहेत. असे प्रश्न सोडविताना दुसऱ्याचा

अनुभव, इतरत्र झालेले प्रयोग, केल्या गेलेल्या चुका, संघटनात्मक उणीवा, व्यवस्थापनातील कमतरता या साऱ्यांचा फार उपयोग होण्यासारखा असतो. ही अनुभवाची देवाण-घेवाण व तदनुरूप शिक्षणप्रणालीची रचना हा तौलनिक शिक्षणाच्या अभ्यासाचा गाभा होय. अखिल जगासमोर उभ्या असलेल्या सामायिक समस्या सांगता येतील. या समस्या अशा :

१. कोणत्याही शिक्षणप्रणालीचे अंतिम स्वरूप निश्चित करणारे घटक कोणते ?

२. व्यक्ती, समाज आणि शासनसंस्था यांच्यातील परस्पर संबंध कोणत्या प्रकारचे असावेत ?

३. घटनात्मक समाजरचनेत स्वातंत्र्य या संकल्पनेचा नेमका अर्थ कोणता ?

४. शिक्षण नियंत्रित करण्याचे अधिकार कोणाचे असावेत ?

५. खासगी संस्थांनी चालविलेल्या सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्थांचे स्थान कोणत्या प्रकारचे असावे ?

६. शासनसंस्था अगर समाज यांची शिक्षण देण्याची जबाबदारी किती प्रमाणात असावी ?

७. पूर्व-प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्राच्या कक्षा कोणत्या असाव्यात ?

८. सर्वसामान्य शिक्षण आणि खास प्रकारचे शिक्षण यांच्यातील संबंध कोणत्या प्रकारचे असावेत ?

९. शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे स्वरूप कोणत्या प्रकारचे असावे ? त्यांचा सामाजिक दर्जा कोणता ?

१०. शिक्षणाचे प्रशासन केंद्र-नियंत्रित असावे का विकेंद्रित ?

११. शिक्षणाचा दर्जा राखण्याचे निकष कोणते ?

१२. परीक्षा पद्धतीचे स्थान एकूण शिक्षणव्यवस्थेत काय असावे ?

१३. अभ्यासक्रम कोणी तयार करावा ?

१४. शिक्षणाची समान संधी या संकल्पनेचा नेमका अर्थ काय ?

१५. राष्ट्रवाद या संकल्पनेची व्याप्ती आणि मर्यादा कोणती ?

१६. शिक्षणप्रणाली आणि राष्ट्रवाद यांच्यातील नाते कोणते ?

१७. संस्कृती या संकल्पनेचा अर्थ काय ?

असे काही प्रश्न, समस्या प्रत्येक देशासमोर उभ्या आहेत. पहिल्या महायुद्धानंतर दुसरे महायुद्ध झाले आणि या समस्यांत नवी भर पडून प्रत्येक प्रश्न अधिक गुंतागुंतीचा झाला.

१. शिक्षणप्रणाली आणि व्यवसाय, नोकरी यांचे नाते कोणते ?

२. शास्त्राभ्यास आणि मानव्यविद्या यांच्यातील समतोल कसा राखावा?

३. शिक्षणावरील खर्चाचा भार कोणी व कसा घ्यावा ?

४. पाठ्यपुस्तकांची निर्मिती केंद्र, राज्य शासनाने करावी की खासगी व्यावसायिकांनी ?

५. शैक्षणिक नियोजनाचे स्वरूप कोणते ?

६. निरनिराळ्या विषयांचा परस्परातील अनुबंध (Inter–disciplinary studies) का व कसा राखावा ?

७. युवकांचे शिक्षण या संकल्पनेचा अर्थ काय ?

८. राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद यांच्यातील संबंध कोणत्या स्वरूपाचा असावा ?

९. अपंगांच्या शिक्षणाचे एकूण शिक्षणप्रणालीत स्थान कोणते ?

असे किती तरी नवे प्रश्न निर्माण झालेले आहेत. वरील प्रश्न शिक्षणाची प्रक्रिया किती व्यापक आणि गुंतागुंतीची झाली आहे हेच सिद्ध करतात. म्हणूनच तौलनिक शिक्षणात या प्रश्नांमागील सर्व कारणांची मीमांसा, पृथःकरण करावे लागते. निराळ्या शब्दात सांगायचे तर प्रत्यक्ष वर्गात काय चालते यापेक्षाही वर्गाबाहेरील घटनांचा, विचारप्रणालींचा, परंपरांचा, परिस्थितीचा अधिक विचार करावा लागतो. असा सर्वांगीण विचार करून पृथःकरण केले की मग त्या त्या शिक्षणप्रणालीचे प्रकट आणि अप्रकट स्वरूप ध्यानात येऊ लागते. तौलनिक शिक्षणाच्या अभ्यासाच्या कक्षेत तत्त्वज्ञान, राजकारण, अर्थकारण, धार्मिक परंपरा, इतिहास, भूगोल, असे सर्व विषय नैसर्गिकपणे शिक्षणाचा विचार करताना

येतात. या विविध धाग्यांनी कोणत्याही देशाची शिक्षण प्रणाली विणलेली असते. या शिक्षणप्रणालीचे रंग, रूप, ताणे–वाणे, मर्यादा, फलश्रुती या साऱ्यांचे समग्र दर्शन मगच घडू शकते. असे सम्यक् दर्शन घडविणे हेच तौलनिक शिक्षणाचे साध्य होय.

काही सनातन प्रश्न :

कोणत्याही क्षेत्राप्रमाणे शिक्षणाच्या क्षेत्रातदेखील काही प्रश्न कायमचे, सनातन असे असतात. असे प्रश्न मूलभूत मानून त्यांची चर्चा सतत होत राहाते. उदाहरणार्थ काही प्रश्न असे :

१. व्यक्ती आणि समाज यांच्या नात्यातील समतोल.

२. लोकशाहीत स्वातंत्र्याच्या अर्थ कोणता.

३. धर्म–शिक्षण आणि धर्मातीत शिक्षण यांचा समवाय.

४. राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद यांच्यातील समतोल.

५. मूल्यांची निवड आणि शिक्षणातील त्यांचा स्वीकार.

६. सांस्कृतिक वारसा आणि चालू घडीच्या जीवनातील गरजा यांचे संबंध.

८. विचारस्वातंत्र्याची व्याप्ती आणि मर्यादा.

अशांसारख्या प्रश्नांची चर्चा, मीमांसा आणि पृथःकरण यांच्याद्वारे करणे हे तौलनिक शिक्षणाचे मुख्य कार्य होय. पण कोणत्याही शिक्षणाशी निगडीत असलेल्या प्रश्नांची चर्चा करायची असेल तर जी तौलनिक पद्धत वापरायची तिचा गाभा कोणता ? तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र यांच्या निसरड्या आधारावर या पद्धतीला अवलंबून चालणार नाही. प्रत्यक्ष काय घडत आहे, वास्तवात कशाचा अवलंब केला जातो याचा चिकित्सक अभ्यास हाच तौलनिक पद्धतीचा पाया होय. अशा पायावर तौलनिक पद्धतीला शिक्षणाचे तत्त्वज्ञान निर्माण करता येण्याची शक्यता आहे. म्हणूनच तौलनिक शिक्षणाच्या अभ्यास–पद्धतीत आकडेवारी, प्रशासन प्रकार, शिक्षणाची विभागवार रचना, संघटना प्रकार, आर्थिक व्यवहाराचे स्वरूप इत्यादींना गौण स्थान आहे. परंपरा, संस्कृती आणि ध्येयवाद यांनी

कोणत्याही शिक्षण प्रणालीला एक प्रकारचे चैतन्य, जिवंतपणा लाभलेला असतो. या साऱ्यांचा सूक्ष्म अभ्यास केला, काळजीपूर्वक पृथःकरण केले आणि मीमांसा केली तर दोन फायदे होतात. प्रत्येक शिक्षणप्रणालीत काही तात्कालिक गरजांवर अतिरिक्त भर दिला जातो, सहाजिकच त्या शिक्षणप्रणालीवर शासनाच्या नियंत्रणाचे दडपण वाढत जाते. यामुळे निर्माण होणाऱ्या दोषांपासून शिक्षणाचे रक्षण करता येते हा एक फायदा. दुसरा फायदा असा की त्याचवेळी व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर अवास्तव भर दिला जातो त्यावरही विचारपूर्वक नियंत्रण ठेवले जाण्याची संधी निर्माण होते. दुसऱ्या शिक्षणप्रणालीबरोबर सतत तुलना केल्यामुळे, आपल्या स्वीकृत शिक्षणप्रणालीतील अर्थपूर्णता आणि उणीवा यांचेही डोळस ज्ञान मिळते. याचा खरा अर्थ असा की केवळ आकडेवारीवर विसंबून राहणे इष्ट ठरत नाही. अचूक आकडेवारी त्या त्या वर्षाची प्रत्येक देशाची मिळेलच असा भरवसा नसतो. शिवाय आंतरराष्ट्रीय आकडेवारी प्रमाणित (Standard) असेलच असेही नसते.

अर्थपूर्ण आंतरराष्ट्रीयत्व :

आशा दृष्टीने केलेल्या तौलनिक अभ्यासाचे फळ म्हणजे अर्थपूर्ण आंतरराष्ट्रीय वृत्तीची निर्मिती होय. आंतरराष्ट्रीत्वाची संकल्पना केवळ भावनाप्रधान मानून चालत नाही. प्रत्येक देश आपापल्या शिक्षणप्रणालीच्या द्वारे जगाचे कल्याण साधीत असतो. प्रत्येक देशाच्या शिक्षणप्रणालीकडे या भावनेने, वृत्तीने पाहिले तर योग्य समंजसपणा निर्माण होतो. हे सामंजस्य हाच आंतरराष्ट्रीयत्वाचा महाप्राण आहे. देशातील शिक्षणसंस्थांच्याद्वारे प्रत्येक शासनसंस्था आपल्या उगवत्या पिढीत काही चांगल्या गोष्टी रुजवीत असते. त्यासाठी विशिष्ट ध्येयवाद, कार्यपद्धतीही स्वीकारली जाते. या साऱ्या घडामोडींचे आस्तिक्य बुद्धीने, समंजसपणाने चिंतन केले तर शिक्षणाच्या मूलभूत संज्ञेलाही एक नवा अर्थ प्राप्त होतो. शास्त्रीय दृष्टीने शिक्षण म्हणजे काय या विचाराची वाढ होऊ शकते, अशा व्यापक आणि सहिष्णू वृत्तीने अभ्यास केला तर मानवी कल्याण साधण्यासाठी प्रत्येक देशाने कोणते प्रयत्न शिक्षणाद्वारे चालविले आहेत याची ओळख होते. अशा

चिंतनातून, मीमांसेतून एक व्यापक, अखिल जगाला उपयोगी पडणारी तात्त्विक भूमिका निर्माण होण्याची शक्यता निर्माण होते. विशिष्ट मानव-समूहाचे का होईना पण कल्याण, समृद्ध जीवन हाच प्रत्येक देशाच्या शिक्षण-प्रणालीचा ध्रुवतारा असतो.असे तेजाचे कण जगाच्या कानाकोपऱ्यांतून गोळा करून त्यांचे रूपांतर एका दिव्य आणि स्नेहपूर्ण ज्योतीत केले गेले तर मानवी कल्याणाच्या मार्गावर एक दीपस्तंभ उभा राहू शकतो. तौलनिक पद्धतीने विचार करण्याची ही नवी वाट आता जगात रूढ झालेली आहे. या नव्या दृष्टीने भारत आणि जगातील शिक्षणपद्धती यांचा विचार करायचा आहे. पाश्चिमात्त्य आणि पौर्वात्त्य अशा देशांपुरताच हा विचार मर्यादित ठेवून चालणार नाही तर अगदी दूरवर पसरलेल्या दशदिशांतील लहान-मोठ्या देशांचाही विचार आपल्याला करावा लागेल. हा विचार करण्यापूर्वी काही पूर्वतयारी करणे अगत्याने आहे. ती म्हणजे पाश्चिमात्त्य आणि पौर्वात्य देशांतील आजवरच्या इतिहासाचा ठळक आलेख डोळ्यासमोर हवा. त्याच-बरोबर भारतातील शिक्षणविषयक घडामोडींचा आलेखही हवा. याच्या जोडीने चालू विसाव्या शतकाची वैशिष्ट्येही समोर हवीत. कारण या पूर्वमाहितीच्या अभावी त्या त्या शिक्षणप्रणालीचे अंतरंग समजू शकणार नाही. प्रमुख घटना आणि व्यक्ती यांच्या प्रभावाने शिक्षणाला कसे वळण मिळाले हे मग स्पष्ट होईल. राजकारण, तत्त्वज्ञान, अर्थकारणे, सांस्कृतिक वारसा, शास्त्रीय विकास, धर्मकारण, सामाजिक घडण, लढाया, या व इतर घटकांनी शिक्षणाचे अंतरंग कसे घडत गेले हे स्पष्ट झाले की आजचे शिक्षणक्षेत्रातील यक्षप्रश्न रेखीवपणे डोळ्यासमोर उभे राहातील. मग या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी झालेले प्रयत्न आणि नवे प्रयत्न करण्याची दिशा दिसू लागेल.

तौलनिक विचारपद्धतीचा विकास :

आज घडीला तौलनिक विचार करून निष्कर्ष काढण्याची प्रवृत्ती ज्ञानाच्या विविध क्षेत्रांत उपयोगात आणलेली दिसते. व्याकरण, भाषा, धर्म, अर्थव्यवहार, तत्त्वज्ञान, संगीत, नाट्य, मानववंशशास्त्र अशा अनेक क्षेत्रांत परस्पराशी तुलना करून त्या त्या शाखेचे स्वरूप स्पष्ट करण्याचा

प्रयत्न सर्वत्र केलेला आढळतो. १८१७ साली मार्स अॅन्टोन ज्युलियन द पॅरी (Marce– Antoine Jullien de Paris) याने प्रथम तौलनिक शिक्षणाची उद्दिष्टे व पद्धती प्रवर्तित केली. शिक्षणाला एक शास्त्र मानून त्याने विचार केला. एकोणिसाव्या शतकासंबंधीचे जे जे प्रयत्न झाले त्यावर मार्स अॅन्टोनच्या पद्धतीची दाट छाया दिसून येते. परंतु त्यावेळचे सारे लेखन वर्णनात्मक आणि माहितीच्या स्वरूपाचे होते. परक्या देशातील शिक्षणप्रणालीवर अहवाल प्रकाशित करण्याची रीत यावेळी रूढ झाली. न्यूयॉर्क येथील प्रोफेसर जॉन ग्रिस्कॉम (John Griscom) यांनी ग्रेट-ब्रिटन, फ्रान्स, इटली, हॉलंड आणि स्वित्झर्लंड येथील शिक्षण संस्थांना भेटी देऊन एक अहवाल तयार केला. A Year in Europe हे त्या अहवालाचे शीर्षक होते. १८१८–१९ या वर्षातील हे प्रकाशन. १८९१ साली फ्रान्समधील तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर व्हिक्टर कॉझीन (Victor Cousion) यांनी प्रशियाला भेट देऊन आपला विख्यात अहवाल, Report on the state of Public instruction in Prussia प्रसिद्ध केला. मॅथ्यू अर्नोल्डचा Special Reports on Educational subjects हा अहवाल सर मायकेल सॅडलर यांनी संपादन केला व तो १८९८–१९११ या कालखंडात प्रसिद्ध झाला. हेन्री बर्नार्ड यांचे The American Journal of Education हे तौलनिक शिक्षणावरचे नियतकालिक ३१ भागांत प्रकाशित झाले. सर मायकेल सॅडलर यांच्या How far can we Learn Anything of Practical Value from the study of Foreign systems of Education या १९०० साली प्रकाशित झालेल्या पुस्तकाने या विषयाला चांगली चालना दिली.

विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात या विषयाला चांगली गती व नवी दिशा मिळाली. सरगिस हेसेन (Sergius Hessen) या रशियन तत्त्वज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञाने, तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने शिक्षणप्रणालींचा तुलनात्मक अभ्यास करून १९२८ साली आपले पुस्तक प्रकाशित केले. कोणकोणत्या शिक्षणप्रणाली यशस्वी झाल्या त्यांची विविध देशांतील माहिती जमा करून सर मायकेल सॅडलर यांनी आपले पुस्तक प्रकाशित केले. आणि या

नंतर १९३३ मध्ये प्रोफेसर आय्. एल्. कँडेल यांचा जगप्रसिद्ध ग्रंथ प्रसिद्ध झाला. **Studies in Comparalive Education** हा तो ग्रंथ होय. विविध देशांतील शिक्षणप्रणालींचा अनेक बाजूंनी विचार या ग्रंथात केलेला आहे. या क्षेत्रातील हा एक अद्वितीय ग्रंथ आहे. तौलनिक अभ्यासाची उद्दिष्टे आणि पद्धती यांना नवे वळण, नवी व्यापकता या लेखनाने लाभली. राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय चारित्र्य या संकल्पनाना केंद्रबिंदू मानून कँडेल यांनी विवेचन केलेले आहे. प्रोफेसर निकोलस हॅन्स यांचे हे पुस्तकही या विषयावरचे एक प्रमाणभूत लेखन मानले जाते. यातूनच पृथःकरण आणि सीमांसा यावर भर देण्याची प्रवृत्ती वाढली आणि १९५० नंतर या दृष्टीने अनेक ग्रंथ लिहिले गेले. या लेखनात सामाजिक संस्था, परंपरा, राजकीय विचारधारा, अर्थशास्त्रीय वस्तुस्थिती अशा परिणाम करणाऱ्या घटनांचा विचार शिक्षणाच्या संदर्भात होऊ लागला. चालू घडीला तौलनिक शिक्षणाच्या क्षेत्रात मोलाची भर पडत आहे. मानववंशशास्त्र, इतिहास, संस्कृती, समाजशास्त्र यांच्या आधारे विविध शिक्षणप्रणालींचा अभ्यास केला जात आहे.

तौलनिक अभ्यासाचे घटक :

तौलनिक शिक्षणात अभ्यासात तुलना करणे हे उद्दिष्ट मूलभूत मानलेले असते. मात्र तुलनेसाठी वेगवेगळे घटक निवडण्याची प्रथा पडलेली आहे. वर्णनात्मक, आकडेवारी, राष्ट्रवाद, इतिहास, समाजशास्त्रीय दृष्टिकोन अशा अनेक घटकांचा तुलनेसाठी उपयोग केलेला असतो. पण म्हणून प्रत्येक तुलनेच्या प्रकाराला पद्धती असे म्हणणे बरोबर ठरत नाही. वर्णनात्मक पद्धती, ऐतिहासिक पद्धती असे म्हणणे अयोग्य आहे. जो घटक तुलनेसाठी निवडला जातो, त्यामुळे काही मर्यादा निर्माण होण्याची शक्यता असते. या विविध घटकांच्या कोणत्या मर्यादा आहेत, त्यात कोणता उपयुक्त भाग आहे हे पहाणे आवश्यक आहे.

१. वर्णन प्रकार :

आपण मागे पाहिले की केवळ वर्णन करून कोणत्याही शिक्षणप्रणालीचे

अंतरंग समजून येत नाही. फार तर ढोबळ स्वरूप कळते. ही या प्रकाराची फार मोठी मर्यादा होय. तौलनिक शिक्षणाच्या क्षेत्रातील एकोणिसाव्या शतकातील लेखन या स्वरूपाचे होते. सुरुवात असल्यामुळे असे लेखन होणे अपरिहार्य होते.

२. गुणात्मक आणि संख्यात्मक दृष्टिकोन :

एखाद्या देशातील शिक्षणप्रणालीला मिळालेले यश, तिची झालेली वाढ यांच्या आधारावर तुलना आधारलेली असते. एक प्रकारे गुण आणि मर्यादा यांची परस्पर देशाशी तुलना केली जाते. पण हेही एक प्रकारचे वर्णनच किंवा माहिती असते. याने फारसे हाती लागत नाही.

३. आकडेवारीला प्राधान्य :

आजच्या विसाव्या शतकात आकडेवारीला (Statistics) असाधारण महत्त्व आलेले आहे. आपण जी विधाने करतो त्यांना आकडेवारीचा आधार दिला तर मुद्दा रेखीव होऊन स्पष्ट होतो. आकडेवारीने एक प्रकारचा वजनदारपणा विवेचनाला लाभतो. याला संख्यात्मक वर्णन असेही म्हटले जाते. अमेरिकेत या पद्धतीचे फार प्राधान्य आहे. यामुळे विवेचनाला वस्तुनिष्ठता, विश्वासार्हता लाभते हे खरे आहे. पण आकडेवारी क्वचित फसवीही असू शकते. सोयिस्कर आकडे स्वीकारायचे आणि नको असलेले टाळायचे असे घडू शकते. शिवाय अधिकृत आकडेवारी उपलब्ध होईल याची शाश्वती नसते. काही वेळा तर मुद्दाम आकडेवारी जुळविली जाते. हे या प्रकारातील वैगुण्य होय. तारतम्यानेच वापर होणे अगत्याचे.

४. ऐतिहासिक दृष्टीचा वापर :

संशोधन क्षेत्रात ऐतिहासिक दृष्टीने समालोचन करणे ही प्रथा चांगली रूढ झालेली आहे. या प्रकारच्या अभ्यासाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. ते योग्य आहे. शिक्षणासारख्या जिवंत आणि जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणाऱ्या विषयात तर या प्रकारच्या अभ्यासाला असाधारण महत्त्व आहे. सामाजिक, राजकीय, औद्योगिक, सांस्कृतिक, आर्थिक अशा अनेक घडा-

मोडींचा परिणाम शिक्षणावर होत असतो. संस्था आणि व्यक्ती यांचाही वाटा शिक्षणाला दिशा दाखविण्यात होतो. या साऱ्यांची कालानुक्रमे नोंद डोळ्यासमोर स्पष्ट आणि रेखीव चित्र निर्माण करण्यास मदत करते. अनेक सामाजिक प्रवाहांचा, विविध विचारांचा ओघ कसा विकसित होत गेला व त्यांची परिणती शिक्षणाच्या रूपाने कशी व्यक्त झाली हे चांगली समजते. इतिहास कण्यासारखा विवेचनाला सूत्रबद्ध आणि बांधीव करतो. कँडेल, हॅन्स, होरेस मॅन, मायकेल सॅडलर–पॉल मन्रो, जेम्स म्यूलहर्न अशा अनेक श्रेष्ठ लेखकांनी या प्रकारचे लेखन केलेले आहे. महत्त्वाची गोष्ट अशी की अभ्यासकाला देशाच्या शिक्षणातील प्रगतीचे सूत्र, मर्मस्थाने आणि उणीवाही समजतात. ऐतिहासिक विवेचनात लेखकाचे पूर्वग्रह, माहितीचा अभाव, चुकीचा अर्थ लावण्याची शक्यता, घटनाक्रमाची अदलाबदल, वैयक्तिक भावनेचा प्रभाव असे काही दोष निर्माण होतात. अगदी शंभर टक्के वस्तुनिष्ठता विश्लेषणाला प्राप्त होत नाही. इतिहास ही संकल्पनाच अशी आहे की व्यक्तीच्या मनातील भाव-भावनांना, स्थिरवृत्तींना, कळत नकळत महत्त्व मिळून जाते व त्याचा विवेचनावर परिणाम अपरिहार्य होतो. ज्याला आपण Interpretation विवरण म्हणतो त्याला या प्रकारच्या लेखनात फार महत्त्व असते. आणि विवरण म्हटले की मतभेद आलेच. तुम्ही कशावर किती भर देता यावर घटनांचे अर्थ बदलू शकतात. पण या मर्यादा पत्करून-देखील ऐतिहासिक अवलोकनाला असाधारण महत्त्व आहे हे मान्य करावे लागते.

५. समाजशास्त्रीय विवेचन मार्ग :

एकोणीसाव्या शतकात समाजशास्त्रीय दृष्टीने पहाण्याच्या अभ्यासवृत्तीला महत्त्व आले आणि विसाव्या शतकात या दृष्टीला मूलभूत स्थान प्राप्त झालेले दिसून येते. शिक्षणाचा विचार करताना अनेक सामाजिक घटकांचा विचार करावा लागतो. या विषयाची व्याप्ती मानवी जीवनाला पुरून उरलेली आहे. शिक्षण म्हणजे नवसमाज, उद्याचा समाज, नवी पिढी निर्माण करण्याचे, सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख साधन. संस्कृती, धर्म, भाषा, परंपरा, आचारविचार, नीतिमूल्ये, रूढी, लोककथा, लोकभ्रम, सामाजिक

संस्था, सणवार, व्रतवैकल्ये अशा अनेक घटकांचा विचार समाजाच्या बांधणीचा विचार करताना करावा लागतो. या प्रक्रियेत व्यक्ती हरवून जाण्याची शक्यता असते ही काय ती उणीव. एखादी व्यक्ती आपल्या कार्याने संपूर्ण समाज तळापासून ढवळून काढू शकते हे लक्षात ठेवूनच समाजशास्त्रीय दृष्टीचा वापर करणे हिताचे.

६. मौमांसा किंवा पृथःकरण दृष्टी :

कोणत्याही पदार्थाचे, घटनेचे किंवा संकल्पनेचे सर्व घटक वेगवेगळे करून त्यांची वस्तुनिष्ठ दृष्टीने तपासणी करणे व त्या आधारे निघणारे निष्कर्ष, अनुमाने रेखीवपणे मांडणे ही शास्त्रीय कार्यपद्धत होय.

या पद्धतीने शिक्षणाची तपासणी विसाव्या शतकात होणे नैसर्गिक आहे. शिक्षणावर प्रभाव पाडणाऱ्या सर्व घटकांची, ते वेगवेगळे करून तपासणी केली जाते व नंतर तुलना करून निष्कर्ष काढले जातात. पण हे निकर्ष काढले जातात. पण हे निष्कर्ष काढण्यापूर्वी शास्त्रीय पद्धतीला अनुसरून एखादे गृहीत, उपन्यास कल्पना Hypothesis स्वीकारून मग ती उपलब्ध पृथःकरणाच्या आधारे तपासणे व निष्कर्षाप्रत येणे हे घडते. ही पद्धत महत्त्वाची आणि उपयुक्त खरीच. पण दरवेळी सर्व घटक पूर्णतया वेगवेगळे करता येतीलच असे सांगवत नाही. शिक्षण हा हा काही पदार्थ नव्हे की तो प्रयोगशाळेत विच्छेदन करता येतो. शिक्षण ही जिवंत, गतिमान, वर्धिष्णू अशी प्रक्रिया आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आर्थिक अशा अनेक घटना एकमेकात इतक्या विरून गेलेल्या असतात की कधी कधी त्यांचा एकत्रित विचार केल्याशिवाय भागत नाही. सहाजिकच वस्तुनिष्ठ, विश्वासार्ह निष्कर्षांच्या शक्य तितक्या जवळ जाणे यावरच संतोष मानावा लागतो.

७. संश्लेषण मार्ग :

संश्लेषण (Synthesis) ही प्रक्रिया पृथःकरण पद्धतीच्या विरुद्ध दिशेची आहे. सर्व जगातील शिक्षणप्रणालींचा एकत्र एक घटक मानून विचार

करायचा आणि मग एखाद्या देशातील शिक्षण प्रणालीचा त्या संदर्भात विचार करावयाचा. एडवर्ड जे किंग यांचे World Perspective in Education हे १९६२ साली प्रकाशित झालेले पुस्तक या प्रकारचे म्हणून सांगता येईल.

तौलनिक विचार करताना एकमेव असा प्रकार किंवा घटक मानून चालत नाही. अनेक घटकांचा, पद्धतींचा सरमिसळ करून वापर करावा लागतो. ज्यायोगे देशातील शिक्षण प्रणालीचे अंतर्बाह्य स्वरूप स्पष्ट होईल तो मार्ग स्वीकारणे इष्ट ठरते. शिक्षण हे सामाजिक शास्त्र आहे. ते विलक्षण प्रवाही आहे. त्याचे हुबेहूब छायाचित्र, वजन, आकार, वस्तुमान सांगणे अशक्य आहे. तुलना करताना तारतम्य ठेवणे हाच आधार मानावा लागतो. जगाच्या आजच्या विलक्षण गतिमान अवस्थेत तर फार सावधानपणे निष्कर्ष काढावे लागतात.

तौलनिक शिक्षणातील प्रधान घटक :

एखाद्या देशातील शिक्षणप्रणालीची दुसऱ्या देशातील शिक्षणप्रणालीशी तुलना करताना काही प्रधान घटकांचा विचार करावा लागतो. या घटकांची परिपूर्ण यादी कधीच सांगता येणार नाही. म्हणून महत्त्वाचे घटक व ते शिक्षणाचे रूप कसे स्पष्ट करतात याची नोंद उपयुक्त ठरेल.

१. वंशविषयक उच्च-नीचतेच्या कल्पना :

एखाद्या देशाची शिक्षणप्रणाली जेते आणि जित किंवा राज्यकर्ते आणि प्रजा यांच्या संबंधातून घडली जाते. हिटलरने ज्यूंच्याविरुद्ध केलेली मोहीम व जर्मनीतील शिक्षणप्रणालीवर त्याचा पडलेला प्रभाव हे उदाहरण प्रसिद्ध आहे. आफ्रिका खंडात गोऱ्या लोकांची एतदेशीयाकडे पहाण्याची वृत्तीही वंशश्रेष्ठत्वाच्या गंडाने पछाडलेली होती. तेथील शिक्षणप्रणालीत या वृत्तीचे पडसाद ठळकपणे उमटले. भारतातदेखील शिक्षणपद्धती रुजविताना इंग्रज राज्यकर्त्यांच्या मनात अशाच प्रकारची भावना होती.

२. भाषाविषयक प्रश्न :

व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या जीवनात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व

असते. भाषा हा एक फार मोठा सांस्कृतिक वारसा असतो. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, जपान, इटली, अमेरिका, अशा अनेक देशांत जेव्हा राष्ट्रीय भाषा हीच शिक्षणाचीही बोधभाषा असते तेव्हा नैसर्गिकपणे व्यक्ती आणि तो समाज यांचा विकास निर्बंधपणे होऊ शकतो. परंतु भारत, आफ्रिका, अरब-राष्ट्रे यांसारख्या देशांत जेव्हा परकी भाषा शिक्षणाची बोधभाषा होते तेव्हा किती गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होतात हे सर्वपरिचित आहे. आपल्या देशात तर भाषिक प्रश्न अजूनही सुटलेला नाही. त्यामुळे अनेक शैक्षणिक, सामाजिक प्रश्न निर्माण झालेले आहे. भाषिक घटक हा तौलनिक विचारातील फार महत्त्वाचा घटक आहे हे विस्ताराने स्पष्ट करण्याची गरज नाही. मातृभाषा, राष्ट्रभाषा, ज्ञानभाषा यांच्या समतोलाच्या प्रश्नासारखे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत.

३. भौगोलिक आणि आर्थिक संपन्नता :

निसर्गाने दिलेली संपन्नता आणि जाणीवपूर्वक निर्माण केलेली अर्थव्यवस्था यांचा शिक्षणावर परिणाम होत असतो. औद्योगिक क्रांतीसारख्या मानव निर्मित घटना शिक्षणाला कसे वळण देतात हे इंग्लंड, जपान, जर्मनी, अमेरिका यांसारख्या देशात दिसून येते. चीन आणि रशियासारख्या देशांत विशिष्ट औद्योगिक धोरणामुळे शिक्षणात केवढा बदल घडू शकतो हे समजून येते. असे अमेरिकेतील संपन्नता सर्वज्ञात आहे. त्याचाही परिणाम शिक्षणावर झालेला आहे. जपानमधील शिक्षणात भौगोलिक घडामोडीचे प्रतिबिंब स्पष्ट उमटलेले दिसते.

४. धर्म आणि आध्यात्मिक विचार :

धर्म, अध्यात्म, नीतिविचार यांचे शिक्षणप्रक्रियेवर होणार परिणाम अगदी प्राचीन कालापासून होत असलेले आढळतात.संस्कृतीच्या विकासाच्या प्रारंभकाळी धर्म आणि अध्यात्म विचार यांचा प्रभाव जगातील बहुतेक सर्व देशांच्या शिक्षणावर झालेला आढळतो. आजही अरब राष्ट्रे, इस्लामी राष्ट्रे काही आफ्रिकेतील देश यांच्या शिक्षणात या संकल्पनांचा प्रभाव दिसून येतो. धर्म शिक्षणासंबंधीच्या अनेक समस्या अजून डोके वर काढताना दिसतात.

५. मानवहित परायणता :

Humanism, मानवाचे हित हेच अंतिम तत्त्व मानून शिक्षण देणे ही प्रवृत्ती प्राचीन आहे. ही वृत्ती कोणत्याही विशिष्ट धर्माशी निगडित नाही. एक प्रकारची व्यापक धर्मातीत (Secular) वृत्ती आहे. धर्मसंस्था आणि धर्माज्ञा यांच्यापासून माणसाच्या मनबुद्धीला मुक्त करून, व्यक्तित्वाचा नैसर्गिक विकास घडू द्यायचा हे या दृष्टिकोनाचे वैशिष्ट्य. धर्माचे जोखड, साचेबंद विचारसरणी, कडक यमनियम यांच्याविरुद्ध थोर विचारवंतांनी बंडे केली. पाश्चात्त्य देशातील मानसशास्त्र प्रवृत्तीचा विकास या वृत्तीतून झाला. मानव विकासात नैसर्गिक विकासक्रमाला, सभोवतालच्या निसर्गाला प्राधान्य मिळावे यासाठी पेस्टॉलॉत्झी, फ्रेबेल, हर्बार्ट अशासारख्यांनी प्रचंड प्रयत्न केले. या प्रयत्नांतून शास्त्रीय प्रवृत्तीचा विकास युरोपात झाला. पुढे यातूनच समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचा विकास झाला. हा सर्व घटकांनी युरोपातीलच नव्हे तर जगातील इतर देशातील क्रांती घडवून आणली. या वृत्तीच्या तौलनिक विकासाचा अभ्यास अर्थपूर्ण ठरतो.

६. समाजवादी प्रवृत्ती :

१८ व्या शतकाच्या अखेरीस शिक्षणाच्या प्रक्रियेकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन प्रभावी झाला. शिक्षणाच्या साहाय्याने समाज जीवनाचे चक्र गतिमान ठेवणे व सामाजिक विकासावर भर देणे ही ती प्रवृत्ती होय. रॉबर्ट ओवेन याला या प्रवृत्तीचा प्रतिनिधी मानले जाते. पुढे १९१७ साली रशियात क्रांती झाली आणि या प्रवृत्तीत राजकीय रंग मिसळले. धर्मसत्ता अर्थसत्ता, राज्यसत्ता यांपासून मुक्त शोषण विरहित समाजजीवनाची निर्मिती व त्यासाठी शिक्षण हा विचार प्रभावी झाला. यातूनच जगातील शिक्षणप्रणालींना नवे रूप, नवा आशय, नवे संघटन प्राप्त झाले. शिक्षण-प्रणालींची तुलना करताना समाजवादी देशातील शिक्षण, लोकशाही व्यवस्थेतील शिक्षण, हुकुमशाहीतील शिक्षण असा विचार करणे अटळ झाले. हा घटक महत्त्वाचा ठरला ती त्याच्या विविध परिणामांच्या मुळे. यातूनच विचार स्वातंत्र्याच्या (academic freedom) प्रश्न निर्माण

झाला. राजकीय सत्तेचे नियंत्रण आणि शिक्षण यांच्या संबंधातील जटिल प्रश्न निर्माण झालेले आहेत.

७. राष्ट्रवाद :

मानवी इतिहासात राष्ट्रभावना, राष्ट्रप्रेम, राष्ट्रवाद या संकल्पना सुपरिचित आहे. धर्म, भाषा, वंश, परंपरा, महत्त्वाकांक्षा अशा एखाद्या भावनेवर सारे राष्ट्र एकजीव केले जाते. इंग्लंड, जर्मनी, तुर्कस्थान, जपान, अशा विविध देशांतील शिक्षणप्रणालींचा पाया या वृत्तीवर संगोपन केलेला दिसतो. एकांतिक राष्ट्रवादाचे परिणाम युद्धाच्या रूपाने जगाने अनुभवले आहेत. शिक्षणाच्या अंगोपांगावर केवढे प्रचंड नियंत्रण आणले जाते याचा अनुभव सर्वांना आलेला आहे. अशा या घटकाचा विचार तौलनिक शिक्षणाच्या संदर्भात करणे अगत्याचे ठरते.

८. लोकशाहीचा मार्ग :

लोकशाही जीवनमार्ग आणि शिक्षण यांचे परस्पर संबंध हा चर्चेचा विषय आजही होतो आहे. अमेरिका, इंग्लंड, भारत यांसारख्या लोकशाही-प्रधान देशातील शिक्षणप्रणाली आणि आमची पण लोकशाहीच आहे असा दावा करणारी चीन, रशिया या सारखी राष्ट्रे व त्यातील शिक्षणप्रणाली यात पुष्कळ तफावत दिसून येते. लोकशाहीची व्याप्ती आणि मर्यादा या संबंधीही लोकशाहीप्रधान देशात मतभेदाचे पुष्कळ मुद्दे आहेत. लोकशाहीचे राजकीय व सामाजिक स्वरूप या दृष्टीने या घटकाचे महत्त्व अनन्य-साधारण आहे.

तौलनिक शिक्षण विचाराची फलश्रुती :

कोणत्याही देशाची शिक्षणप्रणाली तुलनेसाठी निवडली तरी काही मूलभूत गोष्टी या विषयाच्या अभ्यासकाने सतत डोळ्यासमोर ठेवणे आवश्यक आहे. मानवी संस्कृतीच्या प्रारंभकाळी निसर्ग हाच मानवाचा शिक्षक होता. निसर्गाचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती होती. पुढे मानवी जीवन जसजसे स्थिर होऊ लागले तसतशी मुद्दाम शिक्षण देण्याची गरज

निर्माण झाली. निसर्गाच्या सानिध्यातील अनुभवावर अवलंबून राहणे शक्य नव्हते. कारण अनुभवाची विविधता जशी वाढली तसे त्याचे परिणामही गुंतागुंतीच्या स्वरूपात येऊ लागले. पुढच्या पिढीला अनुभव देणे, समाजप्रवाह गतिमान ठेवणे, विकास घडविणे यासाठी मुद्दाम रचना केली गेली त्याला शिक्षणप्रक्रिया म्हणतात. या अर्थाने शिक्षण हे कृत्रिम पण समाजधारणेला अत्यंत गरजेची गोष्ट होऊन बसली. मग अनेक गोष्टी साध्य करण्यासाठी शिक्षणाचा उपयोग करणे सुरू झाले. यातूनच उद्दिष्टे, पद्धती, शिक्षण संस्था, शिक्षक, परीक्षा, पाठ्यपुस्तके, शुल्क व्यवस्था, व्यवस्थापन अशा अनेक वावी अपरिहार्यपणे निर्माण झाल्या. विज्ञान, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, कला, अर्थशास्त्र, राजकारण अशा अनेकांगांनी जेव्हा समाजजीवन घडू लागले तेव्हा या घटकांचा परिणाम शिक्षणावर होऊ लागला. नवी पिढी कशी हवी, नवा समाज कसा हवा यासाठी शिक्षणासारखे परिवर्तनाचे अमोघ साधन मानवाला प्राप्त झाले. मग देशानुसार शिक्षण प्रणालीत फरक पडला. तो पूरक घडविणारे घटक आपण पाहिले. तेव्हा तुलना करून आपली शिक्षणप्रणाली तपासून घेण्याची वृत्ती तौलनिक अभ्यासरूपाने प्रकट झाली.

पण शिक्षणप्रक्रिया इतकी गुंतागुंतीची आहे की प्रत्येक घटक अलग करणे अशक्य आहे ही जाणीव झाली. म्हणून कोणत्याही शिक्षणप्रणालीचा समग्र (total) विचार करणे क्रमप्राप्त ठरले. आज सारे जग एकात्म झालेले आहे. अंतर, काळ, वेळ आणि गती यामुळे अखिल जग एक छोटेसे घरकुल बनले आहे. अत्यंत सामान्य घटनेचे पडसाद पापणी लवविण्याच्या आत जगभर उमटतात हा नित्याचा अनुभव झाला आहे. विचार, साधने मनुष्यबळ या साऱ्यांचा विनिमय जगात रूढ झालेला आहे. सर्व जगाचे प्रश्न अशा चमत्कारिक रीतीने एकमेकात गुंतलेले आहेत की परस्पर सहकार्य, मदत याशिवाय कोणत्याही देशाला स्वतंत्र, अलिप्त राहाता येणार नाही. असे असले तरी समाज परिवर्तनाचे प्रश्न शेवटी ज्याचे त्यालाच सोडवावे लागतात. त्यांचे स्थानिक स्वरूप बदलणे कठीण असते. जगात जे इष्ट प्रयोग झाले असतील त्यांचा अधिकाधिक उपयोग करून

आपल्या देशातील शिक्षण प्रभावी करणे हाच मार्ग श्रेयस्कर ठरतो. प्रारंभी नमूद केल्याप्रमाणे आपल्या पूर्वतयारीच्या सामग्रीचा स्पष्ट आलेख समोर ठेवू.

(२) भारतातील शिक्षण प्रणाली :

जगात ज्या काही प्राचीन संस्कृती आहेत त्यात भारतीय संस्कृतीची गणना केली जाते. प्रत्येक संस्कृतीला विकासाच्या प्राथमिक अवस्थेत निसर्गाचे रौद्रगंभीर स्वरूप, हिंसक श्वापदे, अस्थिर जीवन अशा अवस्थांतून जावे लागते. तशी भारतीय संस्कृतीही या अवस्थांतून गेली. या प्रचंड कालावधीची गणना करणे अशक्य असते. वैदिक काल सुरू होणापूर्वीचा काळ प्राक् ऐतिहासिक म्हणून मानून पुढील कालगणना चार कालखंडांत केली जाते. हे प्रमुख कालखंड विकासाचे टप्पे म्हणून सूचक मानणे इष्ट आहेत. या चार टप्प्यांत शिक्षणाचा तात्त्विक आणि प्रात्याक्षिक विकास कसा झाला, त्यावेळी कोणते प्रश्न निर्माण झाले, कोणत्या संस्था आणि परंपरा रूढ होत्या, कोणत्या महापुरूषांनी या जीवन प्रवाहाला वळण दिले, वाङ्मय, कला, शास्त्र या क्षेत्रांत काय प्रगती झाली याची ही रूपरेषा आहे. सविस्तर तपशिलवार विवेचन अभिप्रेत नाही. पण तौलनिक विचाराला उपयोगी पडेल असे महत्त्वाचे मुद्दे नमूद केले आहेत.

चार प्रमुख कालखंड :

अति प्राचीन काळापासून तो १००० ख्रिस्तपूर्व काळ, **वैदिक कालखंड** मानला जातो. १००० ते २०० ख्रिस्तपूर्व काल, **उपनिषदे, सूत्रे आणि महाकाव्ये** यांनी प्रभावित झालेला दुसरा कालखंड. २०० ख्रि. पू. ते ५०० ख्रिस्तोत्तर हा कालखंड **धर्मशास्त्र कालखंड** होय. ५००ते १२०० ख्रिस्तोत्तर हा चौथा कालखंड **पुराणकाल** म्हणून ओळखला जातो, अगदी प्रारंभीच्या काळात शिक्षणाचे स्वरूप अनुकरणात्मक असणे स्वाभाविक होते. निसर्गातील कोमल–रुद्र दर्शनाने आदिमानव स्तिमित झाला. त्याचबरोबर आत्मरक्षण ही भावना प्रबल झाली. चीन, ग्रीक या संस्कृतीही या अवस्थांतून गेल्या होत्या. हा कालखंड सर्वचेतनावाद, सर्वात्मवाद, ॲनिमिझम् (animism) या नावाने रूढ आहे. जड सृष्टी आणि

निसर्गातील दृश्यस्वरूपावर चैतन्याचा आरोप करून पहाण्याची ही मनोवृत्ती आहे. या सृष्टीच्या मुळाशी जे चैतन्यतत्त्व आहे, त्याचा साक्षात्कार सर्वत्र, जडसृष्टी व अखिल प्राणिमात्र यांच्या ठिकाणी होतो अशी ही धारणा आहे. संपूर्ण मानवी जीवनाकडे व त्याला व्यापून राहिलेल्या अखिल विश्वात हा साक्षात्कार कसा घडतो ही भारतीय दृष्टी. तर चीनमध्ये या चेतनावादाचा अर्थ, मानवाच्या या पृथ्वीवरील जीवनातील घडामोडींशी न लावता केवळ जे पूर्वी होते त्याच्याशी म्हणजे भूतकाळाचे सातत्य राखण्याकडे लावला जात असे. ग्रीसमध्ये लोककथा, लोककाव्य, यांच्याद्वारे प्रकट झालेल्या चेतनावादाचा अर्थ ऐहिक प्रश्न, अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने लावला जात असे. कोणत्याही एका धर्मप्रणालीचा किंवा धर्म ग्रंथाचा प्रभाव ग्रीक लोकांच्या सांस्कृतिक जीवनात नव्हता. म्हणूनच धर्मातीत (Secular) वृत्तीचा शिक्षणप्रणालीवर परिणाम झाला. उलट चीनमध्ये कॉन्फ्युशीअस या तत्त्वज्ञानाचा इतका प्रभाव होता की संपूर्ण सार्वजनिक आणि खासगी जीवन त्याने व्यापून टाकले. चीनचे वर्णन **People of a book** असे केले जाते ते यामुळे. भारतात मात्र पारलौकिक जीवनाचा विचार हा प्रधान ठरला. ऐहिकाला गौणस्थान दिले गेले. याचा परिणाम शिक्षणावर झाला. ग्रीसमध्ये राज्ये, राजकीय विचार, सैनिकीबाणा, राजकीय सत्ता यांचा विकास प्रामुख्याने का झाला व शिक्षणाला असे ऐहिकवृत्तीचे वळण का मिळाले याचे मूळ इथे सापडते. या तीन प्राचीन संस्कृतीतील फरक लक्षणीय ठरतो तो त्यामुळे.

वैदिक कालखंड (अज्ञात काळापासून ते १००० ख्रि. पू. काळ)

प्राचीन आर्यांचा विश्वास बुद्धीचा विकास आणि कडक आचरण (ब्रम्हचर्याश्रम) यावर भर होता. वैदिक ऋचांचे चिंतन, मनन, पठण, हा मुक्तीचा मार्ग होता. स्त्रीपुरुष असा भेद केला जात नसे. विश्ववरा, सिकता, घोषा, लोपामुद्रा, अपाला अशा काही विद्वान स्त्रिया चिंतक आणि ऋचाकार होऊन गेल्या. उपनयन संस्काराने शिक्षणाचा प्रारंभ होई. घर हेच शिक्षणाचे केंद्र होते. अर्थपूर्ण पाठांतर ही शिकण्याची पद्धती होती.

लेखनकला विकसित न झाल्यामुळे गुरूमुखातून ऐकून पाठ करणे हा मार्ग रूढ होता. बुद्धीचा विकास करणे या अंतिम उद्दिष्टामुळे, उपनयनानंतर, **मेधाजनन** हा उपचार केला जाई. सर्जनशील बौद्धिक विकास परिणामकारक होण्यास चर्चा, वादविवाद घडवून आणले जात. खगोल शास्त्राचाही अभ्यास काही करीत. विविध कला व कारागिरीचे शिक्षण मुलामुलींना देण्यात येई.

उपनिषद्-सूत्र-काल (ख्रि. पू. १२०० ते ख्रि. पू. २००)

या काळात शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट व त्यासाठी लागणारी शिस्त ही गृहीत धरली होती. पण व्याकरण, छंदःशास्त्र, भाषाशास्त्र, तत्त्वज्ञान अशा विविध शाखांचा उदय झाल्याने, घरी हे सारे शिकविणे अवघड झाले. यातूनच शिक्षकऋषींचा वर्ग निर्माण झाला. आश्रम-शिक्षण पद्धतीचा विकास झाला. लेखनकला ख्रि. पू. ८०० मध्येच परिचित झाली होती. कागदाच्या अभावी भूर्जपत्रावर ग्रंथ लेखन घडू लागले. विद्याध्ययनाचा कालखंड बारा वर्षे मानला गेला. पूर्वीची स्त्री उपनयन प्रथा काही काळ रूढ होती. सुलभा, गार्गी, मैत्रेयी प्राथितेयी, अशा विदुषींनी ज्ञान साधनेने कीर्ती मिळविली. परंतु ख्रि. पू. ५०० च्या सुमारास स्त्री शिक्षणाची उपेक्षा होऊ लागली. धंदे शिक्षण वंशपरंपरागत बनून घरीच देण्याची प्रथा बनली. या कालखंडाचे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे नव विचार पूर्ण प्रतिभाशाली वाङ्मयाची निर्मिती. उपनिषदे, बौद्ध आणि जैन ग्रंथांची निर्मिती होऊन विविज्ञ तत्त्वज्ञानाचा पाया या कालखंडात घातला गेला. तत्त्वज्ञान, व्याकरण कायदाविषयक लेखन, खगोलशास्त्र, वैद्यक, गणित अशा विविध शाखांचा विकास झाला. बौद्धिक विलासाचे मनोहर दर्शन या काळाने घडविले.

धर्मशास्त्र काल (ख्रि. पू. २०० ते ५०० ख्रिस्तोत्तर)

या काळात प्रामुख्याने शिक्षणाच्या उद्दिष्टांचा विचार सुरू झाला. जीवनाचे समग्र दर्शन घडविणारी शक्ती अशा दृष्टीने शिक्षणाचा विचार होऊ लागला. गुरुकुल पद्धती, शिस्त यावर भर देण्यात येऊ लागला. शारीरिक शिक्षा करावी असा सूरही निर्माण झाला. विद्योपासनेच्या काळात विद्यार्थ्याने पाळावयाची बंधने ठरविली गेली. शिक्षकाला अनन्यसाधारण

महत्त्व पूर्वीपासून होते ते दृढ झाले. हुषार, प्रगत विद्यार्थी नव्या विद्यार्थ्यांना शिकवू लागले. संहितापाठ, पदपाठ, क्रमपाठ, जटापाठ, घनपाठ असे अध्ययनाचे प्रकार रूढ झाले. वेदांच्या जोडीने व्याकरण, तत्त्वज्ञान यांचा अभ्यास चर्चेतून होऊ लागला. आचार्य तोंडी परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना निरोप देऊ लागले. चित्रकला, वैद्यक यांचा अभ्यास खोलवर होऊ लागला. नव्या ज्ञानाचा स्वीकार करण्याची प्रवृत्ती या कालखंडात रुजली. ग्रीकांच्या खगोलशास्त्राचा अभ्यास सुरू केला.

पुराण काल (५०० ख्रिस्तोत्तर ते १२००)

मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा ८ किंवा ९ वर्षांपर्यंत घसरत गेली आणि स्त्रीशिक्षणाची परागती वेगाने झाली. श्रीमंत आणि सुखवस्तू घराण्यातील स्त्रिया पूर्वीप्रमाणे वाङ्मय, कला विषयांचा खासगी अभ्यास करीत. व्यावसायिक शिक्षणाची वाङ्मयीन आणि सांस्कृतिक विषयापासून फारकत वाढत गेली. कारण हे विषय संस्कृत भाषेतून शिकवले जात. जनसामान्यांना ही आर्य भाषा समजत नव्हती. उच्च शिक्षणाच्या संघटित संस्था या कालात निर्माण झाल्या. ५ व्या शतकात बुद्धानुयायांनी अशा संस्था स्थापिल्या. या शतकाच्या अखेरीस बुद्ध मठांचे रूपांतर शैक्षणिक संस्थात पुष्कळ अंशी झाले. हे पाहून हिंदुधर्मीयांनी मंदिराचे रूपांतर शिक्षण संस्थात करण्यास प्रारंभ केला. हा काळ आठव्या शतकातील. नालंदा, विक्रमशीला, या विद्यापीठांनी तिबेट, चीन मध्यआशियाशी सांस्कृतिक संबंध ज्ञानक्षेत्रात स्थापन केले. समृद्ध ग्रंथालये, विद्यार्थ्यांना मुक्तद्वार, निर्वेध ज्ञानसाधना अशी या ज्ञानकेंद्राची वैशिष्ट्ये होत. हिंदू तत्त्वज्ञानातही नव निर्मितीचा कालखंड संपून भाष्ये लिहिणारे. भाष्यकार निर्माण झाले. हटवादीपणा, संकुचित दृष्टी, दुराभिमान अशा दोषांनी विकास थांबला. या मध्ययुगीन कालखंडात पूर्वेकडे आणि पश्चिमेकडील देशात एक प्रकारच्या ऱ्हासकालास प्रारंभ झाला. लोकभाषांची उपेक्षा झाली व संस्कृत बोधभाषेच्या स्वीकाराने ज्ञानप्रसार मर्यादित होऊ लागला. तक्षशिला, नालंदा, बनारस, कांची, वलभी, विक्रमशीला, कडीयूर आणि

सर्वज्ञपुरा यांसारखी अग्रहार ग्रामकेंद्रे आणि विविध मंदिरांतून चाललेली विद्यालये अशा ठिकाणी चाललेली विशुद्ध ज्ञानोपासना उतरणीला लागली.

फलश्रुती :

या प्रचंड काळातील फलश्रुतीचा विचार करू लागलो की विशुद्ध चारित्र्य आणि प्रखर बुद्धिवाद यावर आधारलेल्या व्यक्तित्वाची निर्मिती हा विशेष जाणवू लागतो. दोन हजार वर्षांहून अधिक काळ दिव्य संस्कृतीचा वारसा, अभिजात वाङ्मय आणि कला व शास्त्रे यांचे संगोपन करणे हेच अभिमानास्पद कार्य प्राचीनांनी केले. आजच्या विसाव्या शतकात भारतात जी सांस्कृतिक एकात्मता दिसते, ते अवशेष पूर्वजांची देणगी आहे. ग्रीक, अरब, मुसलमान राष्ट्रांनी, जग प्रवाशांनी भारतीय परंपरेची थोरवी मुक्तपणे मान्य केली आहे. पाचव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत अनेक दोष, मर्यादा निर्माण झाल्या. परकीयांची आक्रमणे, धर्मपीठांची व धर्मप्रचारकांची सत्ता, कडक व्रतवैकल्ये, कर्मकांडाचा अतिरेक, लोकभाषांची उपेक्षा, शिक्षणाचा मर्यादित प्रसार यांमुळे हे वैभव लयाला गेले. युरोपात प्रबोधनाच्या (Renaissance) काळात ज्ञानवंतांनी जसा ग्रीक व लॅटीन भाषांचा कैवार घेऊन युरोपीय भाषा उपेक्षिल्या तोच प्रकार येथे घडला. मुख्य जीवन प्रवाहापासून शिक्षण अलग पडले. भूगोल, गणित, शास्त्र, वैद्यक अशा अभ्यास विषयांची उपेक्षा झाली. युरोपात मात्र प्रबोधनकालाच्या उदयापासून नवी स्थित्यंतरे घडत गेली. विज्ञानाचा विकास, धर्मसुधारणा, सामाजिक शास्त्रांचा विकास, औद्योगिक क्रांती, फ्रेंच राज्यक्रांती यांचा शिक्षणावर मूलगामी परिणाम झाला. युरोपात आमूलाग्र शिक्षणविषयक क्रांती झाली. सतराव्या शतकातच भारताच्या भविष्याचे भीषण स्वरूप व्यक्त होऊ लागले. या कालप्रवाहाचा अपरिहार्य शेवट पारतंत्र्यात जखडून पडण्यात झाला.

बौद्ध, जैन आणि इस्लाम परंपरा :

वैदिक परंपरेबरोबरच बौद्ध, जैन आणि मुसलमान धर्मीयांनी आपापल्या-शिक्षण प्रणालींच्या द्वारे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. त्यांची ही ज्ञान-

प्रसाराची केंद्रे होती. सर्व जग दुःखमय असून त्याचा त्याग करणे हे बौद्धांचे मुख्य सूत्र होते. बाकी मूलभूत फरक असा वैदिक आणि बौद्ध किंवा जैन परंपरेत नव्हता. शिक्षण पद्धती एकाच स्वरूपाची होती. त्यांची ज्ञान-केंद्रे सर्वांना खुली होती. या केंद्रांचा लौकिक तत्कालीन जगात पसरलेला होता. सर्व धर्मप्रणालींचा तौलनिक अभ्यास करणे हे वैशिष्ट्य नमूद करण्यासारखे. जैनांचा भर कडक व्रताचरणावर होता. मंदिरे आणि चैत्य या केंद्राद्वारे परंपरेचे शिक्षण दिले जात असे जैन परंपरेत मोठे विचारवंत निर्माण झाले. पण त्यांनी ज्ञान केंद्रे स्थापन केली नाहीत.

मुसलमानी शिक्षण प्रणालीचा विकास ख्रिस्तोत्तर १००० ते १८०० या कालखंडात झाला. आत्मज्ञान हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट होते. कुराणाचे अध्ययन मूलभूत मानले गेले.

या परंपरेत मूर्तिपूजेला स्थान नव्हते. तद्वतच जातिनिष्ठ समाजरचनाही मान्य नव्हती. कडकडीत आचरण, पाच वेळा मशिदीत प्रार्थना, भिक्षाटन, चिंतन असे काही ठळक विशेष जोपासले गेले. मक्तब (प्राथमिक शाळा) मदरसा (उच्च शिक्षण केंद्र) यांच्या द्वारे शिक्षण प्रसार केला गेला. कारखान्यांच्याद्वारे उमेदवारी पद्धतीने कारागिरीचे शिक्षण दिले जाई. मुसलमानी परंपरेत प्रचंड वास्तूशिल्पे, उद्याने, पूल, कालवे यांची निर्मिती झाली. धर्म आणि शिक्षण यांच्यातील अभेद्य युतीमुळे कडवेपणा, एकीची भावना, निर्माण झाली. महंमद हा सर्वश्रेष्ठ महापुरुष धर्माचा प्रवर्तक होता. राजसत्तेचे पाठबळ मिळाल्याने धर्मप्रसार झाला खरा पण त्यातूनच असामाजिक प्रवृत्ती वाढीला लागल्या. मोगल राजघराण्यांनी निरनिराळ्या कला, ज्ञान केंद्रे, वाङ्मय यांना उदार आश्रय दिला. परंतु राजसत्तेचे विघटन आणि नैसर्गिक आपत्ती यांमुळे ही शिक्षणप्रणाली क्षीण होत गेली. मुसलमानी, मोगल आक्रमण, आणि वैदिक, बौद्ध आणि जैन परंपरात निर्माण झालेले दोष यांनी प्राचीन शिक्षणप्रणालीचा कणा मोडून पडला. सतराव्या शतकापासून भारतात परदेशी व्यापारी, मिशनरी यांचा प्रवेश सर्वदूर होऊ लागला. अस्थिर शासन, धार्मिक कलह, रूढीप्रियता, कर्म-कांडाने जखडलेले जीवन, संकुचित शिक्षणप्रणाली, आर्थिक दुरस्था,

विघटन झालेला समाज अशा समग्र परिस्थितीचा परिपाक जो व्हावयाचा तोच झाला. एक महान परंपरा काळाच्या पडद्याआड गेली आणि उरले ते भग्न अवशेष.

नव्या मनूचा उदय

इ. स. १६०० मध्ये इंग्लंड मध्ये स्थापन झालेल्या ईस्ट इंडिया कंपनीने व्यापार सुरू करून भारतात कामाला सुरुवात केली. थोड्या आधीपासून ख्रिश्चन मिशनऱ्यांचा प्रवेश या देशात झाला होता. भारतीय भाषांच्या आधारे मिशनरी धर्मप्रसार व शिक्षण प्रसार करीत होते. अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडमध्ये गरीब जनसामान्यांच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने घ्यावी हा विचार दृढमूल झाला. सहाजिकच भारतीयांच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्यास उत्सुक नसलेल्या या कंपनीने चार्टर ॲक्ट १८१३ च्या आधारे शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. शिक्षण कोणामार्फत द्यावयाचे व कोणत्या प्रकारचे हा वाद निर्माण झाला. त्यात मिशनऱ्यांचा विजय झाला. मिशनरी शाळांचे जाळे पसरले. पूर्वीच्या पाठशाळा, मक्तब मदरसा मंदिरविद्यालये, ज्ञान केंद्रे विस्कळित झालेली होती. कंपनीने धार्मिक तटस्थतेचे धोरण स्वीकारले. त्याच बरोबर पाझर पद्धतीने (Downward filtration theory) शिक्षण द्यावे,म्हणजे निवडक वरच्या वर्गातील लोकांना शिकवावे व त्यांना मग सामान्यांच्या शिक्षणास प्रवृत्त करावे हा विचार रुजला. याच सुमारास आंग्लविद्या की पौर्वात्त्य विद्या हा वाद उफाळला. मेकॉलेने आंग्लविद्या, इंग्रजी भाषेतून शिक्षण, या दृष्टिकोनाचा पुरस्कार केला. इथे रुजलेल्या प्राचीन संस्थांचा पाया उखडला गेला. चार्लस ग्रँट याने मेकॉलेप्रमाणे मिशनऱ्यांची बाजू घेतली. त्याचे वर्णन, 'भारतातील आधुनिक शिक्षण प्रणालीचा निर्माता' Father of Modern Educational System in India) असे केले. बंगालमधील प्रसिद्ध समाज सुधारक राजा राममोहन रॉय यांना देखील नवे उदारमतवादी (Liberal) शिक्षण हवे होते. लोकमताचा कल इंग्रजी भाषेतून देण्यात येणाऱ्या प्राश्चिमात्त्य शिक्षणाकडे झुकत होता. प्राचीन संस्थांना इंग्रजी भाषेचे वर्ग जोडण्याची प्रक्रिया वेगाने

सुरू झाली. ॲडॅम या अधिकाऱ्याने एक तपशिलवार योजना जनतेच्या शिक्षणाची मांडली होती. देशी भाषांतून विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी पुस्तके तयार करणे, जिल्हा पहाणी करून प्रयोग करणे, प्रशिक्षण शिक्षकांना देण्यासाठी नॉर्मल स्कूल्स, खेडचातील शाळांना अनुदान, शिक्षक,–विद्यार्थ्यांना पारितोषिके असे उपाय या योजनेत होते. पण लॉर्ड ऑक्लंडने ती फेटाळली. ही योजना स्वीकारली असती तर भारतातील लोकशिक्षणाचा इतिहासच वदलून गेला असता.

सर चार्लस वूडचा १८५४ चा खलिता हा विकासातील मैलाचा दगड होय. इंग्रजी व देशी भाषांना उत्तेजन, शिक्षण खात्याची निर्मिती, मुंबई, मद्रास व कलकत्ता येथे नव्या आधुनिक विद्यापीठांची निर्मिती (१८५७ मध्ये ही विद्यापीठे स्थापन झाली.) प्राथमिक, माध्यमिक शाळा व संलग्न महाविद्यालये, पाझर पद्धती संपुष्टात आणणे, माध्यमिक शिक्षण देशी भाषांतून देणे, अनुदान पद्धतीची योजना, धर्मातीत वृत्तीने शिक्षण प्रसार, इंग्लंडमधील धर्तीवर शिक्षकांचे प्रशिक्षण, औद्योगिक शाळा व महाविद्यालयांची निर्मिती, अशा अनेक सूचना खलित्यात होत्या. कै. प्रा. म. रा. परांजपे यांनी खलित्याबर सविस्तर, पुराव्यानिशी परखड टीका करून हा खलिता भारतीय शिक्षणाची मॅग्नाचार्टा कशी नाही हे प्रतिपादले. १८५५ साली शिक्षण खाते रीतसर स्थापन होऊन पुढील सुमारे २७ वर्षांत (१८५५ ते १८८२) देशभर तीन स्तरांत विभागलेली शिक्षण प्रणाली रूढ झाली. वूडच्या कितीतरी मूलभूत सूचना अव्हेरल्या गेल्या. माध्यमिक शिक्षण विस्तारले, इंग्रजीचा प्रभाव वाढला, प्राथमिक शिक्षणाची उपेक्षा होत गेली. धंदे शिक्षण गौण मानले गेले. देशभर एकसूत्री धोरण नव्हते. अशा अवस्थेत इंडियन एज्युकेशन कमिशन (हंटर कमिशन) नेमले गेले. (१८८२) प्राथमिक शिक्षण स्थानिक स्वराज्य संस्थाकडे जाणे, माध्यमिक शिक्षण खासगी संस्थाकडे जाणे, धर्म शिक्षणावर मिशनऱ्यांना बंदी, इंग्रजी भाषेचे प्रभुत्व राहाणे इ. घटना या कमिशनमुळे घडल्या. या कालखंडातच भारतात नव्या राष्ट्रीय जीवनाचा पाया घातला गेला. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, दादाभाई नवरोजी, ना. गोखले, लो. टिळक, प्रि. आगरकर,

मालाकार चिपळूणकर पिता-पुत्र, लोकहितवादी, अशी कर्तृत्ववान नवी पिढी राजकीय आणि सामाजिक क्षितिजावर आली.राष्ट्रभावना, देशाभिमान, सर्वांगीण सुधारणा इ. विचारांचा प्रभाव दिसू लागला. लॉर्ड कर्झन अधिकारावर आला व त्याला शिक्षणातील गुणात्मकता नष्ट होत असलेली जाणवले. संख्यात्मक वाढ निरोपयोगी असा त्याचा निष्कर्ष होता. लंडन येथील विद्यापीठांच्या धर्तीवर भारतीय विद्यापीठांची रचना केली गेली. सरकारी नियंत्रणे वाढली (१९०४ चा विद्यापीठ कायदा). शिक्षण विस्तारावर नियंत्रण. ना. गोखले यांचे प्राथमिक शिक्षणाचा प्रसार वाढविण्याचे निकराचे प्रयत्न १९१० च्या कायद्याने समोर आले. साक्षरता घटत गेलेली होती. १९२१ साली सोपीव खाती व राखीव खाती अशी व्दिदल राज्य पद्धती सुरू झाली. (Dyarchy). या काळात शिक्षणाचा प्रसार फार मोठ्या प्रमाणात झाला. राष्ट्रीय चळवळींना प्रारंभ होऊन लोक जागृतीचे नवे पर्व सुरू झाले. भारतीय मंत्री अधिकारपदी आले. हरटॉग कमिटीने (१९२८) पुनः एकदा मत प्रतिपादन केले की संख्यात्मक वाढीने शिक्षणातील गुणात्मकतेचा बळी घेतला. १९२७ नंतर प्रचंड आर्थिक मंदी जगावरोवर भारतालाही जाणवली. १९१७ ते १९२७ या कालखंडात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे कायदे पास झाले. राजकीय क्षेत्रातील घडामोडींमुळे प्रांतिक स्वायत्ततेचे (१९३७) नवे युग सुरू झाले. काँग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारपदावर आली. पण १९३९ साली दुसरे महायुद्ध भडकले व मंत्रिमंडळे अधिकाराहून दूर झाली. १९४२ साली भारतीय स्वातंत्र्य लढाईचे निर्वाणीचे पर्व सुरू झाले. देशी भाषा आता माध्यमिक शिक्षणाच्या बोधभाषा (Medium of instruction) बनून रुजल्या होत्या. जनआंदोलन, दुसऱ्या महायुद्धाने निर्माण केलेली परिस्थिती, जगभरची अशांतता अशा साऱ्या घटनांचा परिपाक १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र होण्यात झाला.

ब्रिटीशसत्तेच्या दीडशे वर्षांहून अधिक अशा राज्यात भारतीय शिक्षणाला कोणते स्वरूप आले, कोणता वारसा ब्रिटिश ठेवून गेले या अत्यंत गुंता-गुंतीच्या प्रश्नाची मीमांसा करून एकमेव उत्तर किंवा उत्तरे मांड अत्यंतणे

विकट काम आहे. शिक्षणाचे प्रश्न इतके जटिल असतात की त्यात राजकारण, समाजकारण, अर्थनीती, परंपरा, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादीचे धागे एकमेकात गुंतलेले असतात. ते सुटे करू म्हटले तरी करता येत नाहीत. व्यापारी म्हणून आलेल्या इंग्रजांनी राजकीय वर्चस्व मिळवून आपल्या देशाचे प्रचंड शोषण केले ही वस्तुस्थिती आहे. पण आपली स्थितीही शतशः मोडकळीस आलेली होती. शिक्षणप्रणाली आणि समाजजीवन यांचा अनुबंध तुटला होता. इंग्रजी भाषेच्याद्वारे नवे ज्ञान, विचार, कल्पना रुजून एक कर्तृत्ववान पिढी देशाला लाभली. पण जनसामान्यांचे शिक्षण उपेक्षित राहून निरक्षरता राहिली. नोकरीसाठी निवडक लोकांनी आपले सर्वस्व परसत्तेला दिले हे खरे. पण त्याचवेळी देशासाठी सर्वस्व बलिदान करणारे नेतेही निर्माण झाले. शिक्षण आणि व्यवसाय यांचे परिस्थितनुरूप योग्य नाते कधीच निर्माण झाले नाहीत. विद्यापीठे समाजापासून दुरावली. प्रसार झाला पण गुणवत्ता खालावली. विद्यालये " Coaching institions not educational Centresg"ही कर्झनची टीका कटु वाटली तरी खरी आहे. ' ज्ञान विकणारी दुकाने ' हे महाविद्यालयांचे त्याचे परीक्षण खोटे नव्हते. आर्थिक दुरवस्था हे कारण तर इंग्रजांनी पालूपदासारखे दरवेळी वापरून प्रगती रोखली, स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी समर्थपणे पेलली नाही. यात राजकारण, जातीयवाद, स्वार्थ शिरला. १९३७ साली म. गांधीजींनी वर्धा शिक्षण योजना देशासमोर मांडली. सरकारी यंत्रणा, अतिरेकी ध्येयवाद, विचारवंतांची उदासीनता, पद्धतीविषयक हट्टी आग्रह, वस्तुनिष्ठ परीक्षणाचा अभाव अशा अनेक कारणांनी ही योजना असफल झाली. माध्यमिक व उच्च शिक्षण अनुदानाच्या बेड्यात अडकून निष्प्रभ होत गेले, शासनाने प्राथमिक शिक्षणाची आर्थिक जबाबदारी घेतली ती डोईजड ठरू लागली. बोधभाषेचा (medium of instruction) आणि एकूण भाषाविषयक शिक्षणाचा प्रश्न अनिर्णित राहिला. जुनी विद्यापीठे काल बाह्य ठरत गेली तरी नवी विद्यापीठे त्याच रूपाची निर्माण झाली, दुसऱ्या महायुद्धाने सारेच प्रश्न आणखी उग्र बनले. शहरे व त्यातील संस्था वाढल्या पण खेडी उपेक्षित राहिली. पुढे खेडोपाडी शिक्षण पोचले ते शहरी

अवतार घेऊन. शिक्षण आणि नोकरी, चरितार्थ हा प्रश्न उसळून वर आला. सर्व प्रकारच्या शिक्षणावर शासनाची घट्ट पकड बसली. ज्याला आपण सर्वार्थाने शैक्षणिक प्रयोग (Experiment) म्हणतो तो अभावाने विसरला गेला. अशा अवस्थेत भारतीय शिक्षणाला समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन बनविण्याचे प्रयत्न झाले. त्या प्रयत्नांची धावती नोंद अगत्याची आहे.

भारत स्वतंत्र झाल्यावर जी घटना तयार केली गेली त्यात सार्वत्रिक, सक्तीचे आणि मोफत प्राथमिक शिक्षण अशी घटनात्मक जबाबदारी. स्वीकारली गेली. शैक्षणिक प्रश्नांचा विचार करण्यासाठी अनेक समित्या, मंडळे, आयोग नेमले गेले. संबंधित प्रश्नांचा विचार करून उपाययोजनाही सुचविली गेली. माध्यामिक पातळीची आर्थिक व कारभारविषयक पहाणी करण्यास नेमलेली समिती (१९४८), माध्यमिक शिक्षण आयोग (मुदलियार कमिशन) (१९५३), विद्यापीठ शिक्षण आयोग (राधाकृष्णन कमिशन) (१९४९), ग्रामीण उच्च शिक्षण संस्थाची पहाणी अहवाल (१९५५), सर्वसामान्य शिक्षणावर अहवाल (विद्यापीठ अनुदान मंडळ) (१९६१), तीन वर्षांचा पदवी-अभ्यासक्रम पहाणी (१९५८), तांत्रिक शिक्षण अहवाल (सरकार कमिटी) अशांचा निर्देश करता येईल. पण भारतीय शिक्षणाची समग्र पहाणी करणारा कोठारी आयोगाचा अहवाल (१९६४-६६) महत्त्वाचा मानला जाणे अपरिहार्य आहे. या अहवालात बहुतेक सर्व शिक्षणविषयक प्रश्नावर प्रकाश टाकलेला आहे. भारतीय शिक्षण क्षेत्रात न सुटलेले प्रश्न अनेक आहेत. साक्षरतेची समस्या, प्राथमिक शिक्षणाची दुरवस्था, गळती-कुचंबणा- अपव्यय सर्व थरांवर जाणवू लागला आहे हे शल्य, व्यावसायिक शिक्षण आणि माध्यमिक शिक्षण यांचा समतोल, विद्यापीठ शिक्षणाची बोधभाषा, प्रौढ शिक्षण समस्या, निरक्षर आणि अर्धवट शिक्षण सोडलेल्या युवकांचे प्रश्न, शिक्षणाची गुणवत्ता, परीक्षा पद्धती, शिक्षणाचे आधुनिकीकरण, आर्थिक दुरवस्थेत सापडलेले शिक्षण, शासनसंस्थेचे नियंत्रण आणि संस्थात्मक जीवन, विद्यापीठ आणि सामाजिक जीवन यांच्यातील अनुबंध, शिक्षकांचा दर्जा व वेतनश्रेणी, समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून शिक्षण प्रणालीचा विकास असे काही

प्रश्न आहेत. आजच्या नव्या तंत्रज्ञानाने, विज्ञानाने, सारे जग बदलून टाकले आहे. धर्मातीत लोकशाही राष्ट्र म्हणून भारताला आपले अस्तित्व राखायचे आहे. प्रचंड विस्तार, अनेक भाषा, धर्म, परंपरा, जातीयवाद, प्रांतवाद, प्रचंड निरक्षरता, अविकसित उत्पादन साधने, जागतिक सत्तास्पर्धा, देशांतर्गत राजकारण, रूढीग्रस्त समाज, बेकारी अशा अडचणींतून मार्ग काढायचा आहे. जुने काय सोडायचे व नवीन काय स्वीकारायचे हा सनातन प्रश्न उभाच राहाणार. हे सर्वंकष आव्हान आहे. भारताचे भवितव्य विद्यामंदिराच्या वर्गात घडविले जाणार असेल तर जगाच्या शिक्षणक्षेत्रातून अनुभवांचे, प्रयोगांचे कण गोळा करीत राहिले पाहिजे हे उघड आहे. तौलनिक शिक्षणाचे हेच उद्दिष्ट आहे.

० ० ०

(३) पश्चिमेकडील शिक्षण प्रणाली.

पश्चिमेकडील शिक्षणाचा इतिहास ही थक्क करून टाकणारी घटनांची उज्ज्वल मालिका आहे. एकाहून एक प्रतिभाशाली महापुरुष विविध क्षेत्रात निर्माण व्हावेत अशी नियतीची जणू इच्छा होती. युरोपच्या भूमीखेरीज अन्य कोणत्याही भूभागात असा चमत्कार घडला नाही. साऱ्या जगातील शिक्षण प्रणालींना युरोपने नवा प्रकाश दिला. संस्कृतीच्या आरंभी सर्व जड वस्तुमात्र आणि निसर्ग यामागे चैतन्य तत्त्व आहे. (animism) ही भावना ग्रीक-रोमन संस्कृतीच्या उदयापूर्वी होती. पाषाणयुग, ताम्रयुग, अग्नीचा शोध, भाषेचा शोध अशा टप्प्याने प्राचीन जीवनाची घडी स्थिर होऊ लागली. ख्रि. पू. ७७६ ते ख्रि. पू. ४७६ या काळात ग्रीसमध्ये जाणीवपूर्वक शिक्षण देण्याचे प्रयत्न सुरू झाले. होमर, सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉट्ल यांनी मानवी व्यक्तित्वाच्या विकासाचे अनेक नवे विचार मांडले. त्याकाळी संरक्षण या मुख्य समस्येभोवती सारी शिक्षणप्रणाली गुंफिली गेली. अगदी दोन टोकाच्या विचारसरणीची जणू प्रतीके म्हणून स्पार्टा आणि ॲथेन्स या नगरांचा उल्लेख करता येईल. स्पार्टात सर्वंकश नियंत्रण तर अथेन्स ही पूर्ण स्वातंत्र्याची गंगोत्री बनली. ग्रीसमधील नगर राज्ये

कधीही एकात्म बनली नाहीत. मुक्त जीवन आणि स्वातंत्र्य या कल्पना त्यामुळे वाढीला लागल्या. तत्त्वज्ञान, कला. ग्रंथालये, शास्त्र, यांची वाढ झाली व ग्रीकांना या कल्पनांच्या पायावर स्थिर संस्था निर्माण करता आल्या नाहीत. वर निर्देशिलेल्या व्यक्ती स्वयंभू विद्याकेंद्र होती. सत्य, शिव आणि सुंदर या कल्पनांचे प्रतीक म्हणजे ग्रीस संस्कृती असे इतिहासकार म्हणतात. या मूल आधारावर रोमन लोकांनी कायदेशीर राजकीय सत्तेचे प्रचंड केंद्र निर्माण केले. सत्य, शिव आणि सुंदर या त्रयीबरोबर 'उपयुक्ता' हे नवे उद्दिष्ट सुप्रतिष्ठित झाले. रोमन साम्राज्य म्हणजे एकात्म जागतिक संस्कृती आणि जागतिक साम्राज्य निर्माण करण्याचा एक प्रयत्न होता. गुलामांचे अस्तित्व अशा संस्कृतीत राहिलेच. पौर्वात्य संस्कृतीप्रमाणे येथे एखादा विशिष्ट धर्म, धर्मग्रंथ, पूज्य देवता, यांचे प्राबल्य नव्हते. परमेश्वर सर्वसाक्षी, सर्वज्ञ, सर्वनियंत्रक अशी भावना नव्हती. धर्मगुरुंचे महत्त्वही नव्हते. पूर्ण अध्यात्मिक स्वातंत्र्यात धर्मातीत वृत्तीची (Secular) वाढ होत गेली. सर्व नगरराज्यांना एका सूत्रात, एका सत्तेखाली आणण्याचा प्रयत्न म्हणजे रोमनसाम्राज्याची निर्मिती होय. या एकांतिक सत्तेतच रोमन साम्राज्याच्या विनाशाची बिजे होती. अनियंत्रित सत्ता, जुलमी कारभार, लाचलुचपत, डोईजड कर, आर्थिक दुरवस्था, विषयोपभोगात रमलेले अधिकारी, वाङ्मय, कला जीवनाचा-हास, स्वार्थी राजकारण अशा अनेक विविध कारणांनी ही पेगन (Pagan) संस्कृती कोसळून पडली. सर्वत्र असुरक्षितता वाढून वैफल्य पसरले गेले. व्यक्तीचे निर्भय स्वातंत्र्य, विचारांचा मुक्त संग्राम, सर्जनाचा अद्वितीय आनंद, ओजस्वी वक्तृत्वप्रवाह अशा विलोभनीय गोष्टी स्मृतिनष्ट झाल्या.

मध्य युगाचा प्रारंभ (ख्रि. पू. ४७६ ते १३०० ख्रिस्तोत्तर)

आर्थिक, सामाजिक, राजकीय विषमता, अन्याय, गुलामी जीवन, आपसातील यादवी, नैतिक अधःपतन, वर्गझगडे या सर्वांतून एक सर्वव्यापी अस्थिरता निर्माण झाली. बौद्धिक आणि अध्यात्मिक अस्थिरतेने माणसे भांबावून गेली. व्यक्ती आणि समाज यांचे संबंध पुनः अस्पष्ट झाले. बुद्धीवाद्यांनी सुचवलेल्या मार्गांनी पारलौकिक जीवनाच्या प्रश्नांना

समाधानकारक उत्तरे मिळत नव्हती. धर्म ही एकमेव शक्ती माणसाला तारील या विश्वासाने ख्रिश्चन मिशनरी काम करू लागले. सारी भौतिक आणि जडसृष्टी फसवी आहे, पारलौकिक जीवन हेच समाधानाचे अखेरचे आश्रयस्थान आहे. व तसे निग्रहाचे, व्रताचरणाचे शिक्षण दिले पाहिजे ही भावना दृढ होत गेली. हे धार्मिक नेतृत्व प्रभावी होत गेले आणि विश्व-संस्कृती, बंधुभाव, परमेश्वरासमोर सर्व समान या तत्त्वानुसार शिक्षण सुरू झाले. धर्माची सत्तेपासून आणि नीतिविचाराची तत्त्वज्ञानापासून फारकत झाली. जनसामान्याला या धर्मभावनेने घेरून टाकले. दैनंदिन जीवन आणि तत्त्वज्ञान यांचा अनुबंध तुटला. पूर्वीच्या रुढ शिक्षण प्रणालीचा तिरस्कार घडू लागला. व्रतवैकल्ये, कडक यमनियम, उपासतापास यांचे प्राबल्य वाढले. शुद्ध निरामय जीवन, दारिद्र्याचा स्वीकार, आज्ञापालनाची वृत्ती हा दैनंदिन जीवनाचा पाया झाला. त्रिपदी (Trivium) आणि चतुष्पदी (Quadrivium) या पद्धतीने शिक्षण विभागले गेले. यातूनच गूढवादी विचारांचा (Mysticism) उदय होऊन जीवन अधिक गुंतागुंतीचे, रुक्ष, खडतर झाले. एका अंधार युगाचा प्रारंभ होऊन कला, वाङ्मय आशावादी वृत्ती, निर्भय विचार मंथन या परंपरा बुजून गेल्या. या घडामोडीतच मध्ययुगीन विद्यापीठे उदयाला आली. अंधश्रद्धा, रूढी, कर्मठपणा यांचा जाच जनसामान्याला होऊ लागला.

प्रबोधन काल (ख्रिस्तोत्तर १३०० ते १६०३)

प्रबोधनकाळात (Renaissance) अनेक घडामोडी होऊन आधुनिक जीवनाच्या पूर्वतयारीला प्रारंभ झाला. प्राचीन ग्रीक आणि रोमनकाळातील उदारमतवादी शिक्षण, कला, वाङ्मय यांचे पुनरुज्जीवन, अभिजात ग्रीक, लॅटीन भाषांचा अभ्यास, चिकित्सक वृत्तीचा उदय यातून पांडित्यवादी दृष्टिकोण (Scholasticism) वास्तव दर्शनवाद (Realism) या विचार-धारा निर्माण झाल्या. मध्ययुगीन प्रत्येक विचार तपासण्याची वृत्ती वाढीला लागली. जड सृष्टी आणि मानवी जीवन यांचा नवा अर्थ लावण्याचे काम सुरू झाले. याच्या जोडीने सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवन नवा आकार घेऊ लागले. धर्मसुधारणेच्या (Reformation) च्या मुळाशी

व्यापारविषयक क्रांतिकारक धोरण हे कारण होते. मध्ययुगात पोपने चालविलेला धार्मिक मुक्तीचा व्यापार, (The Sale of indulgence) श्रीमंत झालेली धर्मपीठे (Church) यातून निर्माण झालेला बुद्धीचा कोंडमारा या विरुद्ध मार्टीन ल्यूथरने बंड केले. याचा फायदा राजघराण्यांनी आणि व्यापाऱ्यांनी उठवला. चर्चची अफाट मालमत्ता राजसत्तेने हिसकावून घेतली. राष्ट्रीय दृष्टीने संपत्ती आणि सत्ता यांचा वापर करण्याची नवी वृत्ती मूळ धरू लागली. धर्मसुधारणावादी मुक्त व्यापार आणि उद्योगधंदे यांचे पुरस्कर्ते बनले. तर कॅथॉलिक पंथीय शेती आणि संरजामशाहीचे समर्थक झाले. मिसेरो, इरॉसमस, रॉजर ॲश्वाम, रेबेलस, मॉन्टेन मुलकॅस्टर, फ्रान्सिस बेकन, कॅमिनस, जॉन लॉक आदींचा प्रभाव शिक्षणप्रणालीवर पडू लागला. शिक्षणाच्या प्रक्रियेला नवी तात्विक आणि शास्त्रीय बैठक लागली. शिक्षण हे व्यक्तीला घडविण्याचे हुकमी साधन म्हणून देण्यात येऊ लागले. मनाला वळण देणे हेच शिक्षणाचे उद्दिष्ट बनले.

नवे जीवन निर्माण करण्यासाठी ग्रीक आणि लॅटीन या अभिजात भाषांचा अभ्यास, व्यक्तीस्वातंत्र्याचा विकास, दैनंदिन जीवनाचे प्रश्न सोडविण्यासाठी तयारी, मानव्यविद्यांचा अभ्यास, कलाविषयक अभ्यासक्रम असा विस्तार शिक्षण प्रणालीतून व्यक्त होऊ लागला. पण या अभ्यासालाही काळाच्या ओघात (Humanistic education) साचेबंद स्वरूप आले. यातूनच १७ व्या शतकात मानव हित वास्तवता (Humanistic Realism) सामाजिक वास्तवता (Social Scalism) आणि ज्ञानेंद्रिया धिष्ठित वास्तवता (Sense Realism) असे तीन प्रवाह वाढीला लागले. या प्रवृत्तीला शैक्षणिक इतिहासकारांनी वास्तववादी प्रवृत्ती (Realistic tendency) असे म्हटले आहे. मानवी हेतूंचा अभ्यास, संस्थात्मक जीवनात मानवाचे स्थान, व्यावहारिक जीवनाचा अभ्यास, नीतिविचाराचा उपयुक्ततावादी दृष्टिकोनातून अभ्यास, ज्ञानेंद्रियांच्या शक्ती विकसित करण्यावर तर, नवी अध्ययन पद्धती, नव्या प्रकारची पाठ्यपुस्तके अशा तऱ्हेने अभ्यासक्रम विकसित होऊ लागले. यातूनच पुढील प्रवृत्ती निसर्ग प्रधान प्रवृत्ती (Naturalistic) मानसशास्त्रीय प्रवृत्ती (Psychological

शास्त्रपद्धती (Scientific) विकास पावल्या. मानवी मनाविषयी कोणत्या कल्पना रुढ होत्या. त्याचा निर्देश या ठिकाणी आवश्यक आहे. कारण या कल्पनेतूनच साचेबंदपणा निर्माण झाला. इतका की लॅटीन भाषेच्या अभ्यासाला अवास्तव महत्त्व आले. भाषा आणि वाङ्मय यांचा अभ्यास पारंपारिक बनला. पुस्तके, अभ्यासक्रम संघटना यांच्यात एक कडक शिस्त आली. पूर्वीच्या व्यापक मानव्य विद्यांच्या अभ्यासाला संकुचित स्वरूप आले. शिक्षण आणि व्यावहारिक जीवन यांचा संबंध दुरावला. यातूनच एक कल्पना विकास पावली की तुम्ही काय शिकताहे महत्त्वाचे वसून कसे शिकता , पद्धती कशी वापरता याला महत्त्व आले. अप्रत्यक्षपणे प्राचीन मध्ययुगातील पांडित्यवादाचे (Scholasticism) पुनरुज्जीवन झाले. धर्मवादी पंडितांनी या प्रकारच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. ॲरिस्टॉटलने पुरस्कृत केलेल्या शक्तिवादी मानसशास्त्राचा (Faculty theory) पाठिंबा या शिक्षणप्रणालीला मिळाला. अभजात भाषा, गणित, तर्कशास्त्र असे निवडक विषय आत्मसात केले की पुरे. स्मृतीच्या विकासावर सारा भर दिला गेला. विद्यार्थ्यांची आवडनिवड गौण ठरली.

मानवी मन एक कोरी पाटी असून त्यावर बाहेरून संस्कार करून हवे ते गुण, शक्ती, निर्माण करता येतात ही ती कल्पना होय. सवयीवर सारा भर द्यायचा.उत्तम शरीरात उत्तम मन असते, काटकपणा, आवडी-निवडीवर नियंत्रण, आरोग्यपूर्ण सवयी याने मन तयार होते, बुद्धी विकसित होते. जॉन् लॉक् या प्रवृत्तीचा प्रमुख प्रतिनिधी होता. पूर्वीच्या विचारवंतांपेक्षा तो अधिक व्यापक दृष्टीने पाहात असे. उत्कृष्ट शरीरसंपदा, लहान वयातच ज्ञानेंद्रियांना वळण देणे, आकर्षक पद्धतीचा पुरस्कार, प्रत्यक्ष अनुभव घेऊन नीतिशिक्षण मिळावे हा आग्रह या लॉकच्या प्रतिपादनामुळे निसर्गवादाची बीजे रुजली गेली.

निसर्गवाद आणि मानसशास्त्री प्रवृत्ती

या संकुचित शिक्षणप्रणालीविरुद्ध अठराव्या शतकात रूसोने बंड केले आणि त्यातून निसर्गवादी दृष्टिकोनाचा उदय झाला. मध्ययुगातील जखड-

बंद धार्मिक रूढी आणि परंपरा याविरुद्ध जे धर्मप्रवाह निर्माण झाले (जर्मनीत पायेटिझम् Pietism, फ्रान्समध्ये जॅन्सेनिझम् Jansenism इंग्लंडमध्ये प्यूरिटॅनिझम्, Puritanism) ते अवनत होऊन जखडबंद झाले, सामन्यांचे जीवन आणि शिक्षणप्रणाली साचेबंद झाली. धार्मिक चळवळीच्या पुनरज्जीवनाचे सुमारास युरोपात, इंग्लीश, फ्रेंच, जर्मन, इटालियन य भाषांचा वेगाने विकास होत गेला. या भाषांच्याद्वारे जागृतीचे नवे विचार फैलावू लागले. युरोपात फ्रान्स हे राष्ट्र वाङ्मय, कला, सत्ता या दृष्टीने आघाडीवर होते. राजकीय सत्ता आणि शिक्षण यांच्याद्वारे मने दडपून जात होती त्यावेळी या वर्चस्वाविरुद्ध बौद्धिक वैचारिक क्रांती प्रथम झाली. सामान्य माणसे आपल्या हक्कासाठी जागृत झाली. अतिरेकी सत्ता, अत्याचार, शोषण, श्रीमंत वर्गाची मिरासदारी यांच्या दबावातून फ्रेंच राज्यक्रांतीच्या ज्वाळा उफाळल्या. अठराव्या शतकाच्या आरंभापासून या नव्या जाणिवांचा उदय होऊ लागला. मानवी मनाची धर्मसत्ता, राजसत्ता, अर्थसत्ता यांपासून मुक्तता करणे व केवळ बुद्धिप्रामाण्यावर व्यक्तीला जीवन जगण्याचे स्वातंत्र्य मिळविणे हे नव्या युगाचे लक्षण झाले. व्हॉलटेअर या बौद्धिक क्रांतीचा अग्रदूत होता. रूसोने जीवन आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रांत मुक्त जीवनाचा पुरस्कार केला. शिक्षणाची प्रक्रिया निसर्गानुरूप असावी, त्यावर कृत्रिम बंधने नकोत हे त्याचे प्रतिपादन होते. मूल हे शिक्षणाचे केंद्र झाले. सभोवतालच्या निसर्गाचा शोध यातून शास्त्रीय विचारांचा, शोधाचा विकास झाला. व्यक्ती आणि समाज यांचे नवे नाते शोधण्याच्या प्रवृत्तीतून सामाजिक प्रवृत्ती विकसित झाली.

पेस्टॉलॉत्सी, फ्रोबेल, हर्बार्ट, हर्बर्ट स्पेन्सर, थॉमस् हक्सुले या साऱ्यांनी आधुनिक शिक्षणाचा पाया घातला. शिक्षणाला मानसशास्त्राची नवी बैठक मिळाली. नव्या पद्धती, नवी साधने, नवी अभ्यासक्रम रचना, नव्या प्रकारच्या संस्था, नवे शास्त्रीय संशोधन यांनी नवे युग सुरू केले.शा०ा ही सामाजिक जीवनाची प्रतिकृती ठरली. विविध क्रीडा प्रकार, विविध साधने यांचा विकास झाला. शिशुकेंद्रित शिक्षणाचा पाया घातला गेला.

१९ वे शतक उजाडले

अठराव्या शतकाच्या मध्यास यंत्रयुग, लोकशाही, मुक्त विचार (आर्थिक, राजकीय, धार्मिक, वर्चस्वापासून मुक्त) यांची सुरुवात झालेली दिसून येते. औद्योगिक क्रांतीच्या मार्गाने जीवनप्रवाह वाहू लागला. वाफेच्या इंजिनाचा शोध, शास्त्रीय संशोधन, नवी कारखानदारी याने नव्या आर्थिक, सामाजिक, राजकीय जीवनाची घडी बसू लागली.

फ्रेंच राज्यक्रांती आणि अमेरिकेतील स्वातंत्र्य युद्ध या घटनांनी नव्या सामाजिक घडणीवर दूरगामी परिणाम केला. युरोपमधील युद्ध भूमीवर राष्ट्रवादाचे नवे बीज अंकुरीत होऊ लागले. सरंजामशाही, सरदारवर्ग यांचा प्रभाव जाणवू लागला. फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड अशा राष्ट्रांतून राजेशाही, धर्मसत्ता यांचे वर्चस्व वाढू लागले. आपल्या राष्ट्राचे सामर्थ्य वाढविण्याचे प्रयत्न राष्ट्रभावनेला फुंकर घालून होऊ लागले. फ्रान्समधील नेपोलियनच्या एकतंत्री सत्तेमुळे राष्ट्रीय ऐक्य भावनेला नवे वळण मिळाले. नाही म्हटले तरी जुनी आणि नव्या काळाने समोर ठेवलेली उद्दिष्टे यांचा संघर्ष होऊ लागला. राजेशाही विरुद्ध लोकशाही, चर्च विरुद्ध शासन, धर्म विरुद्ध शास्त्रीय दृष्टिकोन, राष्ट्रवाद विरुद्ध एकांतिक श्रेष्ठतम राष्ट्रवाद अशी द्वंद्वे निर्माण होऊन त्यांचा विविध राष्ट्रांतील शिक्षणप्रणालीवर परिणाम होऊ लागला. जर्मनीतील नवा राष्ट्रीय शिक्षणाचा प्रयोग, फ्रान्स मधील सेग्यूइन (Seugin) या विचारवंताचा प्रभाव, इंग्लंडमधील व्यक्तिवाद अशी वळणे निर्माण झाली. शिक्षणप्रणालीला राष्ट्रनिर्मितीसाठी जाणीवपूर्वक राबविण्याचे प्रयत्न सुरू झाले. जर्मनी आणि फ्रान्स येथे शिक्षण प्रणालीवर संपूर्ण वर्चस्व शासनाचे आले. इंग्लंडमध्ये खासगी संस्थांच्या प्रयत्नांना वाव राहिला. जर्मनी, इटली, फ्रान्स, रशिया, चीन यांसारख्या देशांनी हुकुमशाही शासन स्वीकारून शिक्षणप्रणालींना राबवून घेतले. या राष्ट्रवादाची अंतिम, अतिरेकी परिणती विसाव्या शतकात दुसऱ्या महायुद्धाच्या रूपाने प्रकट झाली. हेगेल, फिश्टे, ओवेन, स्पेन्सर, जॅकोटाट, या युरोपातील विचारवंतांचा त्या त्या देशातील शिक्षणप्रणालीवर प्रभाव पडला. राष्ट्रीय शिक्षण पद्धती असे ज्यांचे वर्णन करावे लागेल असे वळण

या शिक्षणप्रणालींना लागले. साम्राज्य विस्तार, आर्थिकसत्ता, लष्करी सामर्थ्य या उद्दिष्टांचा आधार १९१४ साली उफाळलेल्या पहिल्या महायुद्धात झाला. बरोबर बावीस वर्षांनी याच कल्पनांचा अतिरेकी स्फोट दुसऱ्या महायुद्धात १९३९ साली झाला. संहारक अस्त्रे, जीवघेणी स्पर्धा, अटीतटीचा जीवनकलह, घातक महत्त्वाकांक्षा यांच्या स्वैर प्रसाराने मानव जातीच्या पृथ्वीवरील अस्तित्वालाच धोका निर्माण झाला. रोमन साम्राज्य कोसळले तेव्हा युरोप राखेचा ढीग बनला. अगदी तीच स्मशानकळा साऱ्या जगाला १९४५ साली दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस आली. विसाव्या शतकाचे रूपच आमूलाग्र बदलून गेले. आजच्या जगातील शिक्षणप्रणालींचे अंतरंग समजून घ्यायचे असेल तर येथवर केलेले ऐतिहासिक सिंहावलोकन आणि विसाव्या शतकाची वैशिष्ट्ये समजून घेणे अगत्याचे आहे. कोणतेही शतक हा पूर्वसूरींनी केलेल्या, आचरिलेल्या कृत्यांचा, विचारांचा परिपाक असतो. तौलनिक विचार करताना हा दृष्टिकोन उपकारक ठरतो.

० ० ०

४. विसाव्या शतकाचे दर्शन

आजच्या जगातील देशात ज्या शिक्षणप्रणाली रुढ आहेत त्यांची पाळेमुळे एका दृष्टीने इतिहासात आहेत तर दुसऱ्या दृष्टीने प्रचलित गुंतागुंतीच्या परिस्थितीत आहेत. याचा अर्थ असा की जी परिस्थिती पूर्वी होती तशी काही प्रमाणात आज निर्माण झालेली दिसते. अर्थात् शंभर टक्के एकसारखेपणा नसतो हे उघड आहे. इतिहासाची पुनरावृत्ती होते असे म्हणतात ते नेहमी स्थूलमानाने स्वीकारायचे असते.

ग्रीकांच्या काळी स्पार्टा आणि अथेन्स ही दोन नगर राज्ये दोन विरोधी प्रवृत्तींची प्रतिनिधी होती. स्पार्टात व्यक्तीवर जन्मल्यापासून नियंत्रण ते अंतापर्यंत. उलट अथेन्समध्ये व्यक्तिस्वातंत्र्य. आधुनिक लोकशाहीचा पाळणा असे अथेन्सचे वर्णन केले जाते. स्पार्टा आणि अथेन्स व इतर नगरराज्ये यांच्यासमोर संरक्षण हा यक्ष प्रश्न होता. शिक्षणाद्वारे नागरिक घडविण्याचा

प्रयत्न या हेतूने झाला. आज संरक्षणाचा प्रश्न प्रयोगशाळा सोडवीत आहेत. रशिया आणि अमेरिका ही आजची सर्वांत सामर्थ्यशाली, संपन्न राष्ट्रे. लष्करी सामर्थ्याची जीवघेणी चढाओढ दोन्ही राष्ट्रांत सुरू आहे. अणू बाँब्, हैड्रोजन बाँबू, नेपाम बाँब्, जंतुयुद्ध, रॉकेट्स, मिसाईल्स् यांची दोन्हीकडे जय्यत तयारी आहे. शीत युद्ध अनेक क्षेत्रांत सुरू आहे. प्रचार युद्धही जारी आहे. रशियात शिक्षणावर संपूर्ण नियंत्रण तर अमेरिकेत लोकशाही शिक्षण प्रणाली. युनायटेड नेशन्सच्या आमसभेत या दोन प्रवृत्तींचा झगडा नेहमी सुरू असतो. या मागे सामाजिक, आर्थिक, राजकीय संघर्ष असतो. कोणती समाजरचना मानवाच्या कल्याणाला श्रेयस्कर हा तात्विक झगडा यामागे आहे. पण आजचे जग आणि ग्रीक-रोमन लोकांचे जग यात अक्षरशः जमीन-अस्मानाचा फरक आहे. इंग्लंडमध्ये आणि जपानमध्ये लोकानुवर्ती राज्यशासन असूनही राजवंशाचे अस्तित्व आहे. चीनमध्ये एका पक्षाचे सर्वंकष नियंत्रण तर जर्मनीचे विभाजन दुसऱ्या महायुद्धानंतर झाले. पश्चिम भाग पाश्चिमात्य देशाकडे तर पूर्वभाग रशिया व्याप्त. नाझींच्या उदयानंतर जर्मनीला आलेली ही अवनत अवस्था. फ्रान्स, इटली ही राष्ट्रे अध्यक्षीय कारभार लोकानुवर्ती प्रतितिधी तर्फे पाहातात, तर युगोस्लाव्हिया एका पक्षाच्या अध्यक्षाकरवी कारभार चालवितो. आफ्रिकेतील देश अजूनही वंश, वर्ण,साम्राज्यशाही यांनी व्यस्त झालेले आहेत.अगदी थोडा भाग स्वतंत्र झालेला आहे.पाकिस्तान धार्मिक भावनेने ग्रस्त झालेला शेजारी देश.सीलोन, ऑस्ट्रेलिया लोकशाही मार्गाने धडपडणारे भूभाग. पण हे विस्तीर्ण पसरलेले जग आज एकात्म झालेले आहे. युद्धासारख्या घटनातून भय आणि द्वेष जन्माला येतात आणि या भयातून, द्वेषातून, नवी युद्धे निर्माण होतात. आर्थिक, सामाजिक आणि राजकीय शक्ती युद्धाला कारणीभूत ठरणारी मुख्य कारणे. पण त्यामागे एक विशिष्ट मनोवृत्ती घडविलेली दिसते. भीती, लालसा, दुराभिमान, वैफल्य अशा वृत्तींनी ही मनोवृत्ती अनावर झालेली दिसून येते. सामान्य जनतेचे उद्‌बोधन करण्याच्या नावाखाली जगातील राज्यकर्त्यांनी शिक्षण आणि प्रचाराची विविध साधने यांचा गेले दीड शतक वापर करून युद्धप्रवृत्तीला पोषक अशी मानसिक तयारी केली असे म्हणण

अवास्तव होणार नाही. प्रगती, शांततामय सहजीवन की सर्वनाश अशा दोन वाटा फुटणाऱ्या टोकापाशी सारे जग येऊन ठेपले आहे. 'जेट् एज्,' 'अंतराळ युग,' 'संघर्ष शतक,' अशा विविध तऱ्हेने चालू शतकाचे वर्णन केले जाते. यामागे काही प्रबल प्रेरणा आहेत. त्यांचा प्रभाव जीवनाच्या सर्वांगावर होत असतो. आपण शिक्षणाच्या दृष्टीने या निवडक प्रेरणांचे स्वरूप पाहू.

उद्योगप्रधान समाज

आजच्या समाजरचनेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे उद्योगप्रधानता होय. जगातील व्यापारी पेठा काबीज करण्याचा व आपले आर्थिक साम्राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न विकसनशील राष्ट्रे करीत आहेत. यातूनच एक जीवघेणी स्पर्धा सुरू आहे. आधुनिक यंत्र आणि तंत्र विद्येच्या साहाय्याने आधिकाधिक उत्पादन, त्याची अफाट जाहिरात आणि मालाची विक्री या उद्योगात राष्ट्रे मग्न आहेत. उत्पादन साधनावर मालकी मिळवून समाज नियंत्रण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. लोकांची अभिरूची, आवड-निवड-देखील घडविली जाते. अधिकाधिक फायदा हे एकमेव उद्दिष्ट बनले आहे. कधी शासनसंस्था तर कधी मुठभर व्यक्ती साऱ्या उद्योगधंद्याचे नियंत्रण करताना दिसतात. जशी राजकीय परिस्थिती तसे हे घडते. यातूनच आंतर राष्ट्रीय जीवघेणी चढाओढ सुरू झाली. पहिल्या महायुद्धाचे बीज इथे आहे. रशियातून भांडवलशाही गेली, पराभूत राष्ट्रे दिवाळखोर झाली, विजयी आणि पराभूत राष्ट्रे कर्जबाजारी झाली, आंतरराष्ट्रीय नाणेबाजार घसरला आणि जग आर्थिक मंदीच्या तडाख्यात सापडले. प्रत्येक राष्ट्र आर्थिक दृष्टचा स्वयंपूर्ण असावे ही कल्पना नुसती आली आणि गेली. कारण संपत्तीचे सर्व राष्ट्रांत समान वाटप कसे करायचे हा प्रश्न न सुटणारा ठरला. अत्याधुनिक उत्पादन तंत्र, रेडिओने देशादेशातील अंतर नष्ट केले, मालाची हवाई वाहतूक याने कारखान्यांची वाढ उत्पादन सामर्थ्याने होऊन, लढाई जिकण्यात त्यांचा वाटा महत्वाचा ठरला. जगावर उद्योग-शक्तीचे साम्राज्य आले. हे योग्य तऱ्हेने नियंत्रित केले गेले नाही तर माणसे

नव्या गुलामगिरीत अडकून पडतील. दुसऱ्या महायुद्धाने मानवी संस्कृती नष्ट होण्याचा धोका स्पष्ट केला आहे. या साऱ्यांतून मुक्त व्हायचे असेल तर नवे मन, नवी वृत्ती, नवी धारणा व्यक्तीत निर्माण करणे अटळ ठरले आहे. आणि हे काम शिक्षणाला करावे लागेल हे उघड आहे.

काही सामाजिक प्रश्न

पूर्वी युरोपात लोकांची जा–ये मुक्तपणे होत असे. देशांच्या सीमा मुक्त होत्या. आता पहिल्या महायुद्धाने याला बंदी घातली. याने देशांतर्गत सामाजिक झगडे आणि आंतरराष्ट्रीय ताण वाढत गेला. लोकसंख्येच्या भरमसाठ वाढीनेही आक्रमणाला उत्तेजन दिले. प्रचंड लोकसंख्येमुळे आपले जीवनमान घसरते आहे. अशा भावनेने दुसऱ्या देशावर आक्रमणे होऊ लागली. लष्करी सामर्थ्य कायम राहावे म्हणून लोकसंख्या वाढीला राष्ट्रांनी उत्तेजन दिले. जर्मनी, इटलीत हुकुमशाहीचा अवतार झाला तेव्हा लोकसंख्या वाढीला उत्तेजन दिले गेले हे सर्वश्रुत आहे. आज जगातील सर्व राष्ट्रांना भयानक लोकसंख्या वाढीने ग्रस्त केले आहे. शेतकी उत्पादन कमी पडल्याने हा प्रश्न उग्र झाला आहे. तीच गोष्ट शिक्षणाची, भरमसाठ विद्यार्थी संख्येने शिक्षणाची प्राथमिक सोय करणेदेखील मुष्कील झाले. शिक्षक, साधने, इमारती, पैसा आणि दर्जा यांचे फार गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झालेत.

संपर्क साधने आणि प्रचार मोहिमा यांनी बिकट नवे प्रश्न निर्माण केलेत. रेडिओ, टेलिव्हिजन, चित्रपट या साधनांनी एक फार मोठा प्रश्न निर्माण केला आहे तो वास्तव, सत्य परिस्थिती आणि कल्पनारम्य आभासमय सृष्टी यांनी निर्माण केलेला विसंवाद. हा अत्यंत क्लिष्ट मानसिक प्रश्न सर्व जगातील लोकांना त्रस्त करीत आहे. या साधनांनी सारे जग एक केले तरी भल्याभल्यांची समजूत अशी की प्रत्येक देश स्वतंत्रपणे आपले जीवन घडवीत आहे. तसे आता उरले नाही. प्रत्येक व्यक्ती जगाची नागरिक झाली आहे. पण या प्रचार आणि संपर्क साधनावर देशातील शासनसंस्था जेव्हा संपूर्ण नियंत्रण ठेवते तेव्हा त्या देशातील नागरिकांना जगाचे खरे

ज्ञान होणे अशक्य होते. वृत्तपत्रेही या कामी राबविली जातात. वास्तव जग आणि या साधनांनी निर्माण केलेले जग अशा दोन जगांत माणूस हिंदकळत आहे. विचारस्वातंत्र्य, सत्य समजण्याचा अधिकार, शैक्षणिक स्वातंत्र्य असे प्रश्न निर्माण झालेत. हुकुमशाही राष्ट्रांत ही साधने संपूर्ण नियंत्रित असतात तर लोकशाहीत खासगी वृत्तसंस्था, वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन इ. स्वार्थप्रेरित भावनेने जगाचे चित्र लोकांच्या समोर ठेवीत असतात. या साधनांना शिक्षणाची अनौपचारिक मानले समजले जाते. शिक्षण संस्थांतून दिले जाणारे औपचारिक शिक्षण आणि हे अनौपचारिक शिक्षण यांच्यात अनेक छोटे मोठे संघर्ष निर्माण झाले आहेत. प्रचार, नफा, प्रसिद्धी यांचा प्रभाव अनौपचारिक साधनांवर पडला की शिक्षणसंस्था, शिक्षक यांचे कार्य विकट होते. या साधनांचा आजच्या पिढीवर असलेला पगडा, आकर्षण यांनी विद्यार्थ्यांच्या मनात फार मोठा मानसिक गोंधळ निर्माण केला आहे. अपरिपक्व नव्हे तर सुजाण व्यक्तीही या साधनांच्या मोहजालात सापडलेल्या दिसतात.

राजकीय समस्या

पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस, १९१८ मध्ये, जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, टर्की, बल्गेरिया आणि रशिया या देशांत राज्य शासनविषयक वेगवेगळ्या प्रतिक्रिया निर्माण झाल्या. रशियात क्रांती होऊन श्रमजीवी (Proletariat) वर्गाची सत्ता स्थापन झाली. पण जर्मनीत मात्र १९३२ पर्यंत उदारमतवादी सरकार होते- १९३३ मध्ये नॅशनल सोशालिस्ट पार्टी अधिकारावर येऊन हिटलरचा उदय झाला. रशियाप्रमाणे आपल्या देशात श्रमजीवी लोकांची क्रांती घडू नये असे सामाजातील अनेक घटकांना वाटत होते. देशातील आर्थिक असंतोष, बेकारी, उध्वस्त जीवन, भांडवलशाहीचा पुरस्कार अशा अनेक घटकांना सावरण्याचे आश्वासन नव्या पक्षाने दिले व हिटलर सत्तेवर आला. परकीय भांडवलावर आणि ज्यू सावकार यांना विरोधचे लक्ष्य बनविण्यात त्याला यश आले. नाझी पक्षाला सत्तेवर आणण्यात विद्यापीठातून बाहेर पडलेल्या बेकार पदवीधरांचा पाठिंबा होता ही घटना

लक्षणीय आहे. अशाच प्रकारच्या अस्वस्थ सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घडामोडींतून इटलीत मुसोलिनीची हुकूमशाही रूढ झाली. प्रचलित सारी वैगुण्ये उदारमतवादीची फळे आहेत असे हिटलरचे ठाम मत होते. स्वतःच तो सत्तेचे प्रतीक बनला. पक्षोपपक्ष नष्ट करणे, बुद्धिवादाला मूठमाती, रक्तश्रेष्ठत्वाच्या अहंकाराने ज्यूंचा अपरिमित छळ, स्त्रियांना गौण स्थान, या धोरणाबरोबरच शिक्षणाचे आमूलाग्र लष्करीकरण (Regimentation) हिटलरने केले. इथे स्पार्टाची एकांतिक समाज व्यवस्था आठवते. अत्यंत कडवट विषारी प्रचाराने माथेफिरू पिढी युद्धात आहुती देण्यासाठी निर्माण केली गेली.

कम्युनिस्ट सत्तेत या वृत्तीची वेगळी बाजू दिसते. मानवहित प्रेरणा (Humanism), धर्म सुधारणा (Reformation), शास्त्रीय शोधांचा विकास (Scientific tendency), उदारमतवाद (Liberalism) सामान्य जनाला उपकारक ठरणारी लोकशाही मनोवृत्ती, औद्योगिक क्रांती या घटनांनी युरोप व अमेरिकेत नवे युग सुरू केले. पण रशिया मात्र या प्रभावापासून दूर राहिला. १९१४ मध्ये रशिया एका मध्ययुगीन अवस्थेत होता. आधुनिक जगात दिसलेला एक फार मोठा विरोधाभास. त्या काळी रशियात ७१ टक्के निरक्षरता होती. जनता घोर अज्ञान आणि दैन्य अवस्थेत जगत होती. धर्म सत्तेच्या द्वारे झारची सर्वंकश सत्ता रूढ होती. १९०५ साली क्रांतीचा उठाव झाला. पण तो अयशस्वी झाला. १९१७ मध्ये पहिल्या महायुद्धाने रशियात पुनः एकदा राजकीय चळवळींना प्रोत्साहन दिले. झार निकोलसने जुलमी विरोध चालूच ठेवला. यातूनच यशस्वी क्रांती घडून आली. १९१८ त राजराण्यातील प्रमुख व्यक्तींना फाशी देण्यात आले. लेनीन क्रांतीचा अग्रदूत झाला. पण परकी आक्रमण, अंतर्गत यादवी आणि दुष्काळ यांच्याशी क्रांतिकारी पक्षाला झगडावे लागले. सरंजामशाही काळाच्या ओघात नष्ट होऊन श्रमजीवी कामगारांची सत्ता स्थिर झाली. मध्यवर्ती समिती देशाचा कारभार पाहू लागली.

निरनिराळ्या वर्णाचे अल्पसंख्य गट आणि स्त्रिया यांच्या हितसंबंधाचे वाजवी रक्षण केले गेले. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना समान संधी व

सामाजिक दर्जा देण्यात आला. रशियन समाजव्यवस्थेत व्यक्तीचे अनिर्बंध स्थान, फुटून वेगळे होण्याचा व पक्ष स्थापण्याची संधी यांना स्थान नाही. युरोपमध्ये त्या काळी अस्तित्वात आलेले व्यापार स्वातंत्र्य इथे नाही. युवक चळवळींच्या द्वारे (Octobrists, Pioneers, Komsomols) नव्या पक्षसभासदांचे राजकीय शिक्षण केले जाई. पक्षाशी अव्यभिचारी निष्ठा प्रत्येक व्यक्तीला ठेवावीच लागते. सरदार, श्रीमंत, धर्मगुरू, मध्यमवर्ग या वर्गाविरुद्धची वृत्ती हा आणखी एक विशेष. समाजाचा वस्तुनिष्ठ, शास्त्रशुद्ध अभ्यास हे एक ढोंग मानले जाते. वर्ग लढ्याची जाणीव तीव्र करणे हे इतिहासाच्या अध्ययनाचे उद्दिष्ट मानले गेले. जीवशास्त्रीय आणि सामाजिक घटकांचे नियंत्रण करून विचारांचे नियंत्रण करता येते असा येथील मानसशास्त्रज्ञांचा दावा असती.

रशियात शासन धर्माला प्रतिष्ठा देत नाही. चर्चना देण्यात येणारी आर्थिक मदतही थांबविण्यात आली आहे. पण व्यक्तिगत जीवनात धर्मस्वीकार करण्याची मुभा आहे. अर्थात् शिक्षण आणि धर्म यांचे दुवेही तोडण्यात आलेले आहेत. अर्थात् शिक्षणावर संपूर्ण नियंत्रण शासनाचे आहे. वर्गरहित समाजव्यवस्था निर्माण करण्याचा हा प्रयत्न सर्वांच्या औत्सुक्याचा विषय बनल्यास नवल नाही. रशियाने आज जगात शक्तिशाली राष्ट्र म्हणून मिळविले आहे. अमेरिकेशी थंडी लढाई सुरूच आहे. आपल्या गटात जगातील लहान मोठे देश ओढण्याचे कार्यही सुरूच आहे.

उदार मतवादाची वाटचाल

आजच्या शतकात जेथे लोकशाही शासन आहे तेथे व्यक्तीला संपूर्ण स्वातंत्र्य आहे असे दिसत नाही. एकोणिसाव्या शतकांत मुक्त व्यापार-स्वातंत्र्य होते तेही पुढे मर्यादित केले (Laissez Faire) गेलेले आढळते. कोणत्या ना कोणत्या प्रकारचे निर्बंध निरनिराळ्या लोकशाही शासनात दिसून येतात. जनतेचे कल्याण आणि सर्वांगीण प्रगती करण्यासाठी विविध प्रकारचे सामाजिक कायदे केले गेले. आणि कायदा म्हटले की नियंत्रण आलेच. असे नियंत्रण म्हणजे लोकशाहीचा संकोच नसून ती अधिक

सामर्थ्यशाली करण्याचे प्रयत्न होत असे मानले जाते. सुजाण व्यक्ती लोकशाही समाजव्यवस्थेत स्वतः होऊन काही नियंत्रण स्वीकारते हे सुसंगतच आहे. इंग्लंड, अमेरिका येथील कामगारविषयक कायदे, शिक्षण-विषयक कायदे अशी उदाहरणे जनकल्याणाचे निदर्शक म्हणून सांगता येतील. व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि सामाजिक समता अशी दोन्हीही साध्य करायची असतील तर व्यक्तीवर काही निर्बंध अपरिहार्यपणे येणारच. व्यक्तीचे अनिर्बंध स्वातंत्र्य सामाजिक समता नष्ट करू शकते. स्वातंत्र्य ही व्यक्तीची मूलभूत गरज असली तरी समता ही समाजाचीही मूलभूत गरज असते हे विसरून चालणार नाही. लोकशाहीत अर्थव्यवस्थाही नियंत्रित ठेवावी लागते. व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि सामाजिक समता यांचा समतोल कसा राखायचा हा खरा प्रश्न आहे. जनकल्याण हे साध्य असेल तर साधनांचे समर्थन करणे शक्य होते. साधनांच्या शुचितेची कसोटी अशावेळी लागते. लोकशाहीत शिक्षणावरदेखील नियंत्रण ठेविले जाते. ते या व्यापक हेतूने प्रेरित होऊन. पण अशी उपयुक्त नियंत्रणे म्हणजे शिक्षणाचे लष्करी करण नव्हे. शिक्षणाचे क्षेत्र अत्यंत व्यापक बनले आहे ते व्यक्तीचे व्यक्तित्व आणि सामाजिक समता यांच्या विकासासाठी.

नवे संशोधन

जीवनाच्या सर्व क्षेत्रात मानवी बुद्धीने केलेला पराक्रम नुसता नोंद करणेदेखील या धावत्या आढाव्याच्या कक्षेत शक्य नाही. कॉसमॉलॉजी नव्या सूर्यमालांचा शोध, पदार्थ विज्ञान क्षेत्रात अणूचे अंतरंग शोधण्याचे यशस्वी प्रयत्न, रसायन, जीवशास्त्र, मानसशास्त्र, या शाखांतील प्रगती, अर्थशास्त्र, राजकारण, संस्कृती अशा सामाजिक शास्त्रातील नवी प्रमेये, डचूई, रसेल, कोहेन या विचारवंतांनी तात्त्विक विचारात टाकलेली भर, दैवी घटनांवरचा घसरत चाललेला विश्वास, कलेच्या क्षेत्रातील आविष्काराचे अभूतपूर्व प्रकार अशा घडामोडीने सारे विसावे शतक गजबजून गेले आहे. एका बाजूला संपत्तीचा महापूर तर दुसरीकडे दैन्य आणि दारिद्र्याचा वणवा असे चित्र प्रकट करणारे हे शतक. पूर्वी कधीही

नव्हते इतक्या प्रमाणात देशांचे परस्परावलंबित्व वाढलेले आहे. आंतरराष्ट्रीय वृत्तीची वाट कशी होईल यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

या साऱ्या घटनांचा परिणाम शिक्षणप्रणालीवर होणे अपरिहार्य आहे. एक जाणवणारा विशेष म्हणजे सारे शिक्षणक्षेत्र आर्थिक पेचप्रसंगात सापडलेले आहे. अविकसित देशात हा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा झालेला आहे. शिक्षकांचा दर्जा, विद्यार्थी संस्था, अभ्याक्रमांची विविधता, शिक्षण आणि उत्पादन असे कितीतरी प्रश्न प्रचंड रूप घेऊन भेडसावोत आहेत. युनेस्कोने नेमलेल्या इंटरनॅशनल कमिशनने आपला अहवाल १९७२ मध्ये सादर केला. आजच्या आणि उद्याच्या जगातील शिक्षण क्षेत्रातील समस्या व त्या सोडविण्याची दिशा या अहवालात स्पष्ट केली आहे. (Learning To be असे अहवालाचे शीर्षक आहे.) कमिशनच्या सूचना अशा :

१. जगातील शासनांनी आपापल्या शिक्षण प्रणालींची पुनर्रचना करणे अगत्याचे आहे. अशी मूलभूत पुनर्रचना करताना सर्वांची मिळून शिक्षण प्रक्रिया आणि प्रशिक्षण पद्धती यांचा जागतिक भूमिकेवरून पुनर्विचार केला पाहिजे. प्रचलित शिक्षणाची सारी यंत्रणा आजचे प्रश्न सोडवून, उद्याच्या जगातील निर्माण होणाऱ्या प्रश्नांना तोंड देण्यास नव्या पिढीला समर्थ बनवीत आहे काय ? या मूलभूत प्रश्नाचे उत्तर शोधले पाहिजे.

२. केवळ संख्यात्मकता आणि गुणवत्ता यांचाच विचार न करता, त्याही पलीकडे खोलात जाऊन आपापल्या समाजाच्या शैक्षणिक जीवनाचा तपास व पृथःकरण सत्ताधाऱ्यांनी केले पाहिजे. भूतकाळाच्या संदर्भात विचार करून उपयोग होणार नाही.

३. जगातील सरकारांनी दोन समांतर दिशांनी विचार करायला हवा एक म्हणजे चालू शिक्षणप्रणालीत सतत सुधारणा घडविणे. दुसरी दिशा म्हणजे सतत नवे उपक्रम, नवे पर्यायी मार्ग यांचा शोध घेणे. केवळ आत्मसंतुष्ट न राहाता शिक्षणाचा आशय आणि तो शिकविण्याची पद्धती यांचा सतत समग्रपणे विचार केला पाहिजे.

जगातील शिक्षणप्रणालींचा विचार तुलनात्मक रीतीने करताना

उद्याच्या जगातील प्रश्नांचा संदर्भ सोडता येणार नाही. असे हे विसावे शतक अत्यंत गुंतागुंतीचे, बुद्धीला आव्हान देणारे आहे. इतिहास, वर्तमान आणि भविष्य यांचा एकत्रित विचार करून प्रचलित शिक्षणप्रणालींचा अभ्यास हे तौलनिक शिक्षणाचे खरे स्वरूप आहे.

इंग्लंड

१. इतिहास व परंपरा

२. शैक्षणिक प्रशासन

३. पूर्व–प्राथमिक व प्राथमिक शिक्षण

४. माध्यमिक शिक्षण

५. विद्यापीठास उच्च शिक्षण

६. शिक्षकांचे प्रशिक्षण

७. गरजेनुरूप पुढील शिक्षण

८. पूरक शैक्षणिक सोयी

१. इतिहास व परंपरा

पार्श्वभूमी :

भारताच्या आणि इंग्लंडचा संबंध तीनशे वर्षांहून अधिक असा आहे. ब्रिटिश साम्राज्याचा अंकित म्हणून भारत दीडशे वर्षे गुलामगिरीत होता. इंग्लंडमधील शिक्षणप्रणालीचा भारतीय शिक्षणप्रणालीवर खोल ठसा उमटणे अपरिहार्य होते. आजची भारतीय शिक्षणाची रचना, प्राथमिक, माध्यमिक आणि विद्यापीठीय स्तर, ही ब्रिटिशांची देणगी. आपल्याकडे खासगी शिक्षणसंस्थानी १९ व्या शतकाच्या अखेरीस शिक्षणक्षेत्रात प्रवेश केला तोही इंग्रजांच्या परंपरेतून प्रेरणा घेऊन. आपल्या राज्याच्या सुस्थिरतेसाठी इंग्रजांनी शिक्षणप्रणाली राबविली व तिच्यातून नोकरशाहीचे प्रचंड जाळे निर्माण झाले. इंग्रजी भाषेच्या द्वारे विचाराचे, कल्पनाचे आणि संस्थाचे नवे युग देशात सुरू झाले. ज्याला आपण पांढरेपेशे शिक्षण म्हणतो हा वारसाही इंग्रजांचा. आर्थिकदृष्ट्या आपली पिळवणूक इंग्रजांनी केली व नवा मध्यमवर्ग, नोकरदार वर्ग येथे तयार झाला. बहुजनसमाज आणि नवा सुशिक्षितांचा वर्ग यांच्यात खोल दरी निर्माण झाली. हे अंतर अजूनही कमी झालेले नाही. विलक्षण परंपरावादी पण व्यक्तिस्वातंत्र्य आणि लोकशाही यांची बूज राखणारा देश म्हणून इंग्लंड ओळखले जाते. व्यक्तिस्वातंत्र्याचे नवे मूल्य या सत्तेने येथे रुजविले. इंग्लंडच्या धावत्या इतिहासातून हे स्पष्ट होते. विविध प्रकारच्या आणि विविध प्रेरणांनी काम करणाऱ्या संस्था येथे दिसतात. त्यातून शिक्षणप्रणालीला कसे वळण मिळाले हे पाहाणे उपयुक्त.

आरंभीचे शिक्षण :

सुमारे ५०,००० चौरस मैलाचे इंग्लंड हे एक बेट आहे, तेथील हवा समशीतोष्ण आहे. कोळसा, लोखंडाच्या खाणींनी समृद्धीचा पाया घातला. कापड गिरण्यांनी जगाच्या बाजारात स्थान मिळविले. हवामानाच्या वैशिष्ट्यामुळे सततोद्योग, काटकपणा, धाडस, साहसीवृत्ती आणि नैसर्गिक

भूरचनेमुळे एकीची भावना लोकांत रुजली. एकोणीसाव्या शतकापूर्वी धार्मिकसंस्था व निरनिराळचा पंथांची चर्चेस शिक्षण देत. पण राजकारणी, उमराव, श्रीमंत यांच्यासाठी खास पॅलेस स्कूल्स् (Palace schools) होती. या परंपरेतून पुढे पब्लिक स्कूल्सचा (Public schools) विकास झाला. धर्मपंथांच्या मठातूत धर्मगुरू शिक्षण देत ते मुख्यत्वेकरून धार्मिक स्वरूपाचे असे. पण बहुजनसमाजातील मुलांच्या शिक्षणाची सोय सार्वत्रिक नव्हती. चँट्री शाळा (Chantry schools) तून फावल्या वेळात मिशनरी लिहिण्या वाचण्याचे शिक्षण पंथाच्या मुलांना देत. या शाळांचा चरितार्थ एखादा श्रीमंत उमराव चालवीत असे. या देणगीदाराच्या कुटुंबियांना मरणोत्तर शांती लाभावी या भावनेने धर्मगुरूंना देणगी देण्याची प्रथा होती. Chantry याचा अर्थ हाच होय. ११६० मध्ये ऑक्सफोर्ड येथे वसाहत करून राहिलेल्या शिक्षकांनी ऑक्सफोर्ड विद्यापीठाचा पाया घातला. नेमके असेच १२०९ मध्ये केंब्रीज येथे घडले व विद्यापीठ स्थापन झाले, वसतीगृह युक्त अशी ही विद्यापीठे शासन व धर्मपीठ यांच्या प्रभावापासून अलिप्त, स्वतंत्र होती. १३८७ मध्ये विंचेस्टर येथे व १९४१ मध्ये ईटन येथे माध्यमिक शाळा निघाल्या. या शाळांना 'ग्रामर स्कूल्स्' असे म्हणत. कारण व्याकरणाच्या अभ्यासावर भर देण्यात येई. पुढे श्रूबेरी येथे सेंट् पॉल, वेस्ट मन्स्टर, रग्बी, हॅरो, चार्टर हाऊस या शाळा निघाल्या. उच्चवर्गीयांसाठी या शाळा होत्या. पुढे अठराव्या शतकात या शाळांना पब्लिक स्कूल्स् (Public schools) असे नाव मिळाले. पण नावावरून सर्वांना प्रवेश मुक्त होता असा अर्थ नाही. खास उच्चवर्गीयासाठी Preparatory, प्रिपरेटरी शाळा होत्या श्रीमंत मुलांना १३ वर्षेपर्यंत या ठिकाणी शिक्षण मिळे. ग्रामर स्कूल्सच्या धर्तीवर या शाळा चालविल्या जात. काहींचे रुपांतर पुढे पाब्लिक स्कूलमध्ये झाले. थकलेली स्त्री किंवा अपंग पुरुष शिकविण्याचे काम ज्या शाळात करीत त्यांना डेम स्कूल्स् (Dame Schools) आणि (Day Schools) म्हणत. असा हा इंग्लंडमधील माध्यमिक शिक्षणाचा प्रारंभीचा टप्पा होय.

प्राथमिक शिक्षणाची चांगली सोय असावी अशी जाणीव १८ व्या

शतकाच्या अखेरीस तीव्र झाली व त्यातून संडेस्कूल्स् (Sunday schools Movement) चळवळ निघाली. प्रगत विद्यार्थ्यांची मदत घेऊन शिकविणाऱ्या शाळा निघाल्या. मोठ्या संख्येच्या वर्गाला एकच शिक्षक शिकवी. विद्यार्थ्यांच्या मदतीने शिकविणाऱ्या शाळा (Monitorial) (मॉनिटोरियल) म्हणून प्रसिद्ध झाल्या. डॉ. बेल हा या योजनेचा प्रवर्तक. त्याला भारतातील अनुभवाने ही प्रेरणा मिळाली. ज्ञान हीच शिक्षक होण्यासाठी कसोटी होती. प्रशिक्षण नव्हते. या काळातच समाजात आर्थिक आणि सामाजिक बदल घडवून आणणारी घटना म्हणजे औद्योगिक क्रांती होय. या क्रांतीचा शिक्षणावर अंतर्बाह्य परिणाम झाला. नव्या गरजानुरूप नव्या प्रकारचे कामगार, अधिकारी, प्रशासक यांची तातडीने गरज भासू लागली. रॉबर्ट ओवेन, मेकॉले यांच्यासारख्या समाज धुरीणांनी प्राथमिक शिक्षणाचे राष्ट्रीयकरण करावे अशी जोरदार मागणी केली. १८३२ मध्ये सरकारने शाळांच्या इमारती बांधून देण्याचे ठरविले. शाळा तपासणी (Inspection) सुरू झाली. १८७० मध्ये पार्लमेंटने कायदा करून प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार केला. या कायद्यान्वये स्कूल बोर्डस् स्थापन करण्यात येऊन त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याची तरतूद करावी असे अधिकार त्यांना दिले. या बोर्डाचे कामात सुसूत्रीकरण यावे म्हणून १८९९ मध्ये सेंट्रल बोर्ड स्थापन करण्यात आले. यांना लोकल एज्युकेशन ॲथॉरिटी असे म्हणण्यात येऊ लागले. १८७० च्या कायद्याने खासगी माध्यमिक शाळांची तपासणीही होऊ लागली. याच वेळी बिनवसतीगृह संस्थांची मागणी वाढली. १८२६ मध्ये या मागणीचा परिणाम होऊन लंडन येथे कॉलेज काढण्यात आले. १८३२ मध्ये डरहॅम येथे विद्यापीठ स्थापन करण्यात आले. काही काळाने चारपाच महाविद्यालयांचे एकीकरण करून लंडन विद्यापीठ स्थापण्यात आले. वसतिगृह युक्त आणि बिन वसतिगृहाची महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्न होती. हे विद्यापीठ परीक्षा घेण्याचे कार्य करी. १९ व्या शतकाच्या अखेरीस मागणीनुसार लीड्स् शेफील्ड, बर्मिंगहॅम, लिव्हरपूल, मँचेस्टर येथे विद्यापीठे स्थापन करण्यात आली. कॉमर्स, तंत्र विज्ञान या शाखा काही विद्यापीठांत निघाल्या. गरजेनुसार

इंपीरीयल कॉलेज ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी स्वतंत्रपणे स्थापन करण्यात आले. प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय शतकाच्या अखेरीस करण्यात आली. १९ व्या शतकाच्या अखेरीस सर्व प्रकारच्या शिक्षणाचा विस्तार झाला. औद्योगिक क्रांतीने जसा नवा कामगार वर्ग निर्माण केला तसे शिक्षणाच्या आशयातही क्रांती घडवून आणली.

विसावे शतकाची पहिली वर्षे :

या शतकाच्या सुरुवातीस प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या व्यवस्थापनेत बदल करण्यात आला. १९०२ मध्ये बाल्फर कायदा (Balfour Act) करण्यात आला व तदनुसार लोकल एज्युकेशन ॲथॉरिटीच्या कक्षेत प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आले. पार्ट थर्ड ॲथॉरिटी (Part III Authority) नव्याने स्थापन करण्यात येऊन त्या अधिकाऱ्याकडे प्राथमिक शिक्षणाची अधिक कामे देण्यात आली. ग्रामीण भागातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी कौंटी कौन्सीलस् (County Councils) कडे सोपविण्यात आली. शहरातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण बरोकडे (Boroughs) देण्यात आले. ग्रामर स्कूलमध्ये विद्यार्थ्याला ११ वे वर्षी प्रवेश मिळू लागला. १९१८ साली फिशर ॲक्ट (Fisher Act) करण्यात आला. त्याने सक्तीच्या शिक्षणाची वयोमर्यादा १४ पर्यंत वाढविली. ग्रामर स्कूल्समध्ये विशिष्ट वर्गाची मुले जात. काही शाळा धार्मिक तर काही धर्मातीत (Secular) प्रवृत्तीवर भर देत. १९२६ मध्ये सुप्रसिद्ध हॅडो अहवाल (Hadow Report) प्रसिद्ध झाला व त्याने इंग्लंडमधील शिक्षणाचे रूप बदलून टाकले. एक समान राष्ट्रीय शिक्षण प्रणालीची आवश्यकता या अहवालात प्रतिपादिली गेली. या वेळेपावेतो प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणातील दृष्टिकोन शास्त्राकडे झुकणारा झाला. १९३८ मधील शैक्षणिक अहवालाने (Spen's Report ही पुनर्रचना केली. नंतरच्या १९४४ प्रसिद्ध कायद्याने सारे चित्रच बदलून टाकले. स्पेन्स अहवालात तांत्रिक शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला होता. पण १९३९ मध्ये दुसरे महायुध्द सुरू झाले व योजना स्थगित

राहिल्या. मानसशास्त्र विषयात नवे संशोधन निर्माण झाले व त्याचा अंतर्भाव शिक्षण महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात करण्यात आला. व्यापारशास्त्र, शेतीशास्त्र, तंत्रविज्ञान इ. नव्या विद्याशाखा विद्यापीठात नव्याने सुरू करण्यात आल्या. १९२५ मध्ये शिक्षणासाठी पदव्युत्तर वर्ग सुरू करण्यात आले.

१९३९ साली दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभापूर्वीची वीस वर्षे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचा विस्तार दर्शविणारी आहेत. स्पेन्स अहवालात नव्या धर्तीच्या तांत्रिक शिक्षण देणाऱ्या माध्यमिक शाळांची रूपरेखा सूचित केली होती. शाळांचे इतके विविध प्रकार अस्तित्वात आले होते की इंग्लंडमधील शिक्षणप्रणालीचे एकसंध चित्र पाहाणे कठीण होऊन बसले. संपूर्ण देशासाठी एखादी योजना अंगिकारली नसल्याने मोठा संभ्रम निर्माण होई. कारण इंग्लंडमध्ये स्थानिक स्वातंत्र्याला महत्त्व देण्यात येई. त्यामुळे विविधता वाढली पण सर्व प्रकारच्या शाळांची एखाद्या सूत्रात गुंफण केलेली नव्हती. सर्व पातळीवर सुसूत्री पणाचा अभाव होता. पब्लिक शाळांनी ज्या ध्येयांचा पुरस्कार केला व जी विशिष्ट पद्धती स्वीकारली त्यातून एक परंपरा निर्माण झाली. त्यालाच इंग्लीश लोकांची खास परंपरा म्हणतात. या परंपरेत चारित्र्यसंवर्धनाला सर्वश्रेष्ठ प्राधान्य देण्यात येई. या परंपरेत पुढील पाच घटक प्रमुख होते. १. धर्म, २. संस्कृती, ३. शिस्त, ४. शारीरिक क्रीडा प्रकार व ५. सेवावृत्ती हे ते घटक होत. कौंटी माध्यमिक शाळांच्यावर या परंपरेचा फार परिणाम झाला. हे शिक्षण सर्व माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांना मिळावे, केवळ ग्रामर स्कूलला नव्हे, ही नवी दृष्टी विकसित झाली. एलेन विल्किनसन (Ellen Wilkinson) या शिक्षण मंत्र्याने आपल्याला The New Secondary Education Pamphlet या पुस्तिकेत उत्तम विशद केले आहे. एलेनबाई म्हणतात की इंग्लंडमध्ये ही नवी जाणीव झाली आहे की आता सुसंस्कृतिक राष्ट्राला शेतकरी, कामगार, तांत्रिक कामगार, वाहतूक करणारे, खाण कामगार या श्रमजिवी वर्गावर विसंबूनच प्रगती करता येते. लोकांच्या या वर्गाकडे पहाण्याच्या दृष्टीत जो बदल झाला त्याला दोन महायुद्धांची किंमत मोजावी

लागली. कोणत्याही मुलावर, केवळ ते सामाजिकदृष्ट्या उपयुक्त आहे म्हणून, तात्त्विक (academic) शिक्षणाची सक्ती होता कामा नये. काही लोकांना ग्रामर शिक्षण परवडते म्हणून ते सर्वांवर लादणे श्रेयस्कर नाही. या पुस्तिकेतील पुढील काही ओळी अतिशय अर्थपूर्ण आणि सुंदर आहेत. म्हणून त्या ओळीच देत आहे.

" The Schools must have freedom to experiment, room to grow, variety for the sake of freshness, for the fun of it even. Laughter in the class room, self confidence growing everyday, eager interest instead of bored confirmity, this is the way to produce from our fine stock Britons who will have no need to fear the new scientific age, but will stride into it heads high, determined to master science and to serve mankind. " १९४४ चा शिक्षणाचा कायदा या वृत्तीतून निर्माण झाला. या कायद्याने इंग्लंडमधील शिक्षणाचे अंतर्बाह्य परिवर्तन झाले. बोर्ड ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष आर. ए. बटलर यांनी तो पार्लमेंटला सादर केला. बटलर एज्युकेशन ॲक्ट, १९४४ असेही या कायद्यास म्हणतात. शिक्षणाचे नवे युग इंग्लंडमध्ये सुरू झाले. अभ्यासक्रम, संघटन, टप्पे अधिकार, जबाबदाऱ्या, आर्थिक तरतूद इ. अशा सर्व बाजूंनी ही पुनर्रचना केली गेली. विसाव्या शतकाचा उत्तरार्ध आता नव्या जोमाने सुरू झाला.

बटलर शिक्षण कायदा १९४४

पार्श्वभूमी :

समाजवादी विचारसरणीवर संपूर्ण निष्ठा नसणाऱ्या सरकारने हा कायदा करून काळाची गरज ओळखली. व्यक्तिस्वातंत्र्याला सर्वश्रेष्ठ मूल्य मानणाऱ्या या राष्ट्राने व्यापक सामाजिक मूल्यांचा स्वीकार केला. राष्ट्र युद्धात गुंतलेले होते आणि नवी उभारणी अटळ आहे याची पंतप्रधान विस्टन चर्चिल यांना जाणीव होती. We must educate our masters

ही घोषणा नव्या युगाची नांदी ठरली. सामाजिक आणि आर्थिक दर्जा विचारात न घेता प्रत्येक मुलाला आणि युवकाला त्याच्या आवडीप्रमाणे, कुवतीप्रमाणे शिक्षण देण्याचे धोरण स्वीकारले गेले. रुढीप्रिय, सरंजामी समाजव्यवस्थेकडून कल्याणकारी राष्ट्र निर्मितीकडे वाटचाल सुरू झाली. इंग्लंडच्या खऱ्या इतिहासाला नवे वळण कायद्याने मिळाले.

शिक्षणाचे प्रशासन

या कायद्यापूर्वी सुविहीत असे नियंत्रण व प्रशासन नव्हते. १९०० साली स्थापन झालेल्या बोर्ड ऑफ एज्युकेशनचे रूपांतर मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन (शिक्षण मंत्रीमंडळ) मध्ये होऊन शिक्षण मंत्रीपद निर्माण केले गेले. शिक्षणाचा राष्ट्रीय दृष्टीने विकास करणाऱ्या योजना आखणे. स्थानिक संस्थांना योजना राबविण्याची सक्ती करणे, धोरण अमलात आणण्याची सक्ती असे अधिकार शिक्षण मंत्र्यास मिळाले. आपल्या खात्याचा अहवाल पार्लमेंटला सादर करणे, आर्थिक तरतुदी संमत करून घेणे, पार्लमेंटमधील शंकाचे समाधान करणे इत्यादि कर्तव्ये मंत्र्याला करावी लागू लागली. पूर्वीची एक सल्ला देणारी समिती जाऊन आता मंत्र्याला सल्ला देण्यासाठी दोन मध्यवर्ती मंडळे (सेंट्रल ॲडव्हायसरी बोर्ड) तयार करण्यात आली. एक इंग्लंडसाठी व दुसरे वेल्ससाठी.

शाळांच्यावरची दुहेरी नियंत्रण व्यवस्था या कायद्याने रद्द झाली. चर्च शाळा चालवीत व मालमत्ता त्यांची असे. आता कौन्सील स्कूलस् आणि व्हॉलंटरी शाळा असे दोन प्रकार केले गेले. व्हॉलंटरी शाळांनी नव्या पुनर्रचनेसाठी अर्धा खर्च सोसला तर उरलेला अर्धा सार्वजनिक निधीतून देण्यात येण्याची व्यवस्था झाली. या शाळांवर व्हॉलंटरी धार्मिक संस्थांचे नियंत्रण. ज्या शाळा हा खर्च करू शकत नव्हत्या त्या लोकल एज्युकेशन ॲथॉरिटीच्या नियंत्रणाखाली आल्या. ज्या व्हॉलंटरी शाळांनी १९३६ च्या कायद्याने पुनर्रचना केली त्या पूर्ण धार्मिक संस्थांच्या नियंत्रणाखाली राहिल्या. एडेड व्हॉलंटरी, कंट्रोल्ड स्कूलस् व लोकल ॲग्रीमेंट स्कूलस् असे तीन प्रकार निर्माण झाले.

शाळावरील नियंत्रणात, स्थानिक निगडीत बदल करण्यात आले. पूर्वी अॅथॉरिटी पार्ट II यांच्या नियंत्रणाखाली कौंटी कौन्सील्स व कौंटी बरो कौंल्सील्स होती. अॅथॉरिटी पार्ट III च्या नियंत्रणाखाली अर्बन कौन्सिल्स व अर्बन कौंटी कौन्सिल्स होती. या पूर्वीच्या व्यवस्थेमुळे प्रशासनात पुनरुक्तीचे, आर्थिक तरतुदींचे अनेक दोष निर्माण झाले. नव्या कायद्याने दोन प्रकार केले. १ कौंटी कौन्सील्स २ कौंटी बरो कौन्सील्स. या दोहोंसाठी जॉईंट कौन्सील्स निर्माण करण्यात येऊन अनेक स्थानिक शिक्षणाधिकारी रद्द करण्यात आले. राष्ट्रीय हित समोर ठेवून हे केल्याने प्रशासन एकमार्गी व सुकर झाले. प्रत्येक स्थानिक क्रौन्सिलशी अधिकार मर्यादा व क्षेत्रही ठरले गेले. धोरणात एकसूत्रीपणा आला. सोयीस्कर विभाग व त्यावरचे कार्यकारी अधिकारी (Divisional Executives) नेमण्यात आले. हे अधिकारी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था पाहू लागले. या कायद्याने पुढील कर्तव्ये स्थानिक अधिकारी मंडळाकडे सोपविली. (Local Authorities): १)आपल्या अधिकार क्षेत्रातील सर्व नागरिकांची अध्यात्मिक व नैतिक उन्नतीसाठी व्यवस्था २) शारीरिक, मानसिक अपंग मुलांचे शिक्षण ३) मुलांचे आरोग्य व मधल्या वेळच्या खाण्याची मोफत सोय ४) कामगार स्त्रीवर्गासाठी शिशुपालन गृहे, पाळणाघरे चालविणे ५) इमारतींच्या सांड-पाणी, स्वच्छता राखणाऱ्या स्थानिक संस्थांना, कार्यक्षमतेसाठी मदत देणे ६) प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या सोयी मुलांच्या आवडी, क्षमता, मागणी इत्यादींनुसार करणे. ७) भावी विकासाच्या शिक्षण योजना तयार करवून घेण्याचे काम शिक्षणाधिकाऱ्यांच्याकडे.

शालेय प्रशासनातील बदल :

१) कार्यक्षम कारभारासाठी रीजनल आणि व्हॉलंटरी शाळेसाठी एक व्यवस्थापक मंडळ. प्राथमिक शाळेतील मंडळास 'इन्स्ट्रुमेंट ऑफ मॅनेजमेंट' व माध्यमिक शाळेतील मंडळास 'इन्स्ट्रुमेंट ऑफ गव्हर्मेंट' अशी नावे दिली गेली. २) या मंडळास कमीत कमी सहा व्यक्ती असाव्यात.

३) प्राथमिक शाळात रूल्स ऑफ् मॅनेजमेंटप्रमाणे व माध्यमिक शाळेत आर्टिकल्स ऑफ् गव्हर्मेंटप्रमाणे या मंडळांना नियमावली करण्याचे अधिकार. या नियमांना मंत्र्यांची संमती घेऊन राबविण्याची अट. ४) या मंडळात $\frac{1}{3}$ सभासद जुन्या व्यवस्थापकांपैकी व $\frac{2}{3}$ सभासद लोकल ॲथॉरिटिजने नेमायचे.

धार्मिक शिक्षणाबाबतीत कायद्याने नवे धोरण घालून दिले, १) पूर्वीची धार्मिक शिक्षणाची सक्ती काढून टाकली. २) शाळेची सुरुवात सामुदायिक प्रार्थनेने व्हावी. पालकाने विनंती केली तर मुलास प्रार्थनेस व धार्मिक शिक्षणाच्या तासाला गैरहजर राहण्याची मुभा.

शिक्षकांचे प्रशिक्षण, पगार, सेवेच्या अटी यासंबंधी पूर्वी निश्चित तरतुदी नव्हत्या. त्या कायद्याने करण्यात आल्या. १) प्रशिक्षणाच्या सुधारित सोयी. २) बर्नहम कमिटी अहवालानुसार (Burnham Committee Report) पगार मिळण्याची हमी. ३) नेमणूक व बडतर्फी-संबंधी निश्चत नियम. ४) कौंटी शाळेतील शिक्षकांच्या नेमणुका व बडतर्फी यांचे लोकल ॲथॉरिटीजना अधिकार. खास व्यवस्थेखालील शाळांना हे नियम लागू न करण्याचा संकेत. ५) विवाहित म्हणून केवळ कोणत्याही स्त्रीला काढून न टाकण्याचा नियम.

शालेय आरोग्य व्यवस्था

या कायद्यापूर्वी आरोग्य तपासणी सक्तीची होती. पण ती प्राथमिक कक्षेपुरतीच. आता पुढील योजना अधिक शास्त्रशुद्ध पायावर केली गेली. १) प्रत्येक विद्यार्थ्याची आरोग्य तपासणी सक्तीची. २) उपचाराची मोफत व्यवस्था. ३) आरोग्यविषयक सर्व सोयींचा भरपूर फायदा घेण्यास उत्तेजन. ४) मधल्या वेळचे खाणे, दुध पुरविण्याची जबाबदारी लोकल ॲथॉरिटीजची. ५) ४ ते ५ वयोगटातील मुलांना सरकार मोफत दूध पुरविते. गरीब मुलांना कपडे व बूट पुरविले जातात. ६) ५ ते १५ वर्षांपर्यंत शिक्षण निःशुल्क करण्यात आलेले आहे.

पालकांची जबाबदारी

मुलाचे शिक्षण पालकाने केलेच पाहिजे. मुलाची आवडनिवड महत्त्वाची. अनेक दिवस मूल गैरहजर राहिले तर कायदेशीर कारवाई. खासगी शाळांत मुले पाठविण्याचे स्वातंत्र्य. पण चांगले शिक्षण मिळेल याची हमी शिक्षण खात्याला द्यावी लागते. अगदी प्रथमच कायद्याने पालकांची ही सामाजिक जबाबदारी निश्चित केली गेली. खाजगी शाळा चालविण्याचे स्वातंत्र्य. पण राष्ट्रीय शिक्षण व्यवस्थेचा भाग राहीलच. अशा शाळांची सरकारी तपासणी करण्याचे बंधन.

नवा आकृतीबंध :

(१) शिक्षण पूर्ण करण्याचे अंतिम वय १५ चे १६ करण्यात आले. अर्ध वेळ शिक्षणाची सोय १८ वर्षे वयापर्यंत. (२) वाईट अवस्थेतील शाळा सरकारने ताब्यात घेतल्या. आवश्यक तेथे मदत देऊन शाळा चालविण्याचे काम सरकारने पत्करले. (३) अकराव्या वर्षी चाचणी घेऊन निवडक मुलांना ग्रामर स्कूलमध्ये प्रवेश. हेतू असा की अपव्यय (Wastage) टाळावा व केवळ बौद्धिक शिक्षणाकडील गर्दी कमी करावी. यामुळे हुषार, होतकरू मुलांना वरच्या दर्जाचे शिक्षण घेणे सुलभ झाले. आर्थिक अडचण अडसर ठरली नाही. (४) माध्यमिक तांत्रिक अभ्यासक्रम, तेही दीर्घ मुदतीचे निर्माण केले गेले. (५) तेराव्या वर्षी, ग्रामर स्कूलमधे जे विद्यार्थी प्रगती करू शकत नाहीत, त्यांची चाचणी घेऊन, त्यांना टेक्निकल किंवा मॉडर्न स्कूल्मध्ये पाठविण्याची व्यवस्था ६) मॉडर्न स्कूलस् कायद्याने निर्माण केली व तेथे माध्यमिक शिक्षण पूर्ण करून व्यवसायात जाण्याची तयारी करून घेतली जाऊ लागली.

उच्चशिक्षण :

बटलर १९४४ च्या कायद्याचा उच्च शिक्षणाशी तसा संबंध नव्हता. पण काही उपयुक्त सूचना अर्ध-वेळ शिक्षणाच्या दृष्टीने केल्या गेल्या. १) १८ वयापूर्वी माध्यमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ध-वेळ

शिक्षण योजना. मॉर्डन स्कूलमध्ये सुट्टीत चालविण्यात येणारे निरंतर (Continuation Classes) वर्ग. किंवा विद्यापीठाद्वारे चालविण्यात येणारे विस्तार (Extension classes) वर्गाद्वारे सोय. किंवा स्वतंत्र कौंटी कॉलेजेस स्थापन करून. या कायद्यातील काही कलमांचे स्वरूप पुढील दोन कायद्यांत करण्यात आले. त्यांचा उल्लेख येथेच करणे सोयीचे आहे.

१९४६ व १९४८ चे कायदे :

२२ मे, १९४६ मध्ये शिक्षण कायदा केला गेला त्यात पुढील कलमे अंतर्भूत करण्यात आली. लोकल एज्युकेशन ॲथॉरिटीला व्हॉलंटरी शाळांना तात्पुरत्या जागा देण्याचे अधिकार. कंट्रोल्ड शाळांच्या इमारतींची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी त्यांनीच स्वीकारायची. बोर्डींग, शाळा व नर्सरी शाळा यांतील मुलांना मोफत कपडे पुरविणे. व्हॉलंटरी शाळांनी आपल्या मारतींचा काही भाग भाड्याने दिला तर ते भाडे लो. एज्यु. ॲ. कडे जमा व्हावयाचे. सामुदायिक प्रार्थना शाळेच्या आवारातच झाली पाहिजे. पण १४ दिवसांची पूर्वसूचना देऊन ती शाळेबाहेर घेता येईल.

पुढील शिक्षणविषयक कायदा ३० जून १९४८ रोजी संमत करण्यात आला. या कायद्याने प्राथमिक व माध्यमिक क्षेत्रातील मुलांची वयोमर्यादा निश्चित करण्यात आली. १० वर्षे ६ महिने हे प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याचे अंतिम वय व त्यानंतर ११ वे वर्षी माध्यमिक शिक्षण सुरू. हुषार मुलांना या वयोमर्यादेपूर्वीही पुढील शिक्षण घेण्याची मुभा.

जबाबदार भागीदार

पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, विद्यापीठीय, निरंतर शिक्षण खास योजना अशा वेगवेगळ्या विभागांचे, सामान्य प्रशासनाचे स्वरूप पाहाण्यापूर्वी आतापर्यंत केलेल्या विवेचनातून काही ठळक विशेष दिसतात त्यांची नोंद करणे व ज्याचा उल्लेख झाला आहे तो टाळून वरील विभागाचे सलग स्वरूप पाहाणे उचित ठरेल.

इंग्लंड आणि वेल्सच्या शिक्षणप्रणालीचे वर्णन एका वाक्यात करायचे

तर स्थानिक घटक सरकार यांची ती एक सामायिक भागीदारी असे करावे लागेल. जबाबदारीचे विभाजन करून या भागीदारीने लोकशाही मूल्यांचे रक्षण केलेले आहे. शिक्षण क्षेत्राची जबाबदारी स्वीकारण्यास तसे म्हटले तर या शतकात या राष्ट्राला उशीरच झाला. किंबहुना मोठ्या नाखुषीने सरकारने ही जबाबदारी स्वीकारली. विशिष्ट वर्गाची अस्मिता शिक्षण व्यवस्थेत पूर्ण प्रतिबिंबित झालेली दिसते दर्जेदार माध्यमिक शिक्षण गरिबांच्या अवाक्याबाहेरच होते. धनिक वर्गाच्या मुलांना मोठ्या नोकऱ्या मिळत. पण काळाच्या ओघात हे चित्र बदलले आणि जगातील एक पुरोगामी लोकशाही राष्ट्र म्हणून इंग्लंडला स्थान प्राप्त झाले आहे. स्कॉटलंड या प्रक्रियेत सामील होतेच. पण तेथील ऐतिहासिक पार्श्वभूमी व शिक्षणपरंपरा वेगळी आहे. त्याचा विचार वेगळा करणे आवश्यक आहे.

इंग्लंड आणि वेल्समध्ये राष्ट्रीय शिक्षणाचे धोरण सरकार आखून देते व स्थानिक पातळीवर तपशील ठरवून अमलात आणण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. हीच ती जबाबदार भागीदारी. शिक्षण मंत्रिमंडळाने पुढील वैशिष्ट्ये आवर्जून नमूद केलेली आहेत. १) राष्ट्रीय धोरण जरी शिक्षण मंत्री ठरवीत असले तरी निवडून आलेल्या स्थानिक अधिकार मंडळाची स्वायत्तता अबाधित राखली जाते. शिक्षण मंत्रालयाच्या अधिकाराखाली एकही शाळा नाही. किंवा शिक्षकाची नेमणूक ही ते करीत नाही. २) शिक्षण कारभारात स्थानिक, ऐच्छिक (Voluntary) संघटना महत्त्वाचा वाटा उचलतात. पूर्वी शिक्षणाची सोय धार्मिक संस्था व धार्मिक वृत्तीच्या संघटना करीत असत. ही परंपरा महत्त्वाची मानून तिचे आस्तित्व राखून ठेवलेले आहे. ३) मुख्याध्यापक, अभ्यासक्रम, पाठपुस्तके, पद्धती. ठरविण्यास स्वतंत्र असतो. मंत्रीमंडळ सक्ती करून काहीही लादत नाही. मार्गदर्शक पुस्तिका, पत्रके काढून, मंत्रीमंडळ शिक्षकांना साहाय्य करते. सूचना करणे हाच उद्देश असतो, विशिष्ट मार्ग सांगत नाहीत. या पार्श्वभूमीवर आता शैक्षणिक प्रशासनाचा विचार करू.

० ० ०

२. शैक्षणिक प्रशासन

त्रिस्तर प्रशासन

मध्यवर्ती शिक्षणमंत्री, कौंटी प्रशासन आणि लोकल एज्युकेशन ॲथॉरिटीज अशा तीन पातळ्यावरून इंग्लंडमधील शिक्षणाचे प्रशासन व नियंत्रण केले जाते. भारतात शिक्षण हा विषय राज्यांच्या अखत्यारीतील आहे तसा ब्रिटनमध्ये नाही. तेथील राज्यघटना संघ स्वरूपाची (Federal) नसून एकात्म (Unitary) आहे. एका दृष्टीने शिक्षणाचे विकेंद्रीकरण झालेले नाही. आपण मागे पाहिले की शिक्षण मत्री स्थानिक अधिकारी मंडळाच्या स्वायत्ततेवर अतिक्रमण करीत नाही. तो धोरण आखतो. शिवाय स्थानिक पातळीवर घेतलेले निर्णय केंद्राकडून संमत करून घ्यावे लागतात. योग्य स्वातंत्र्य आणि अपरिहार्य नियंत्रणे यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला जातो. शिक्षण प्रशासनातील लोकशाही मूल्ये जतन करण्याचा प्रयत्न कटाक्षाने केला जातो. त्रिस्तर पातळीवरची जबाबदारी थोडक्यात पाहू.

शिक्षण मंत्री

१९४४ पूर्वी बोर्ड ऑफ् एज्युकेशन अस्तित्वात होते. त्याचा अध्यक्ष शिक्षणाचे नियंत्रण करीत असे. आता पार्लमेंटचा सभासद असलेल्या व्यक्तीची नेमणूक शिक्षण मंत्री म्हणून केली जाते. शिक्षण मंत्री कॅबिनेटचा सभासद असतो. तो पार्लमेंटला जबाबदार असतो. सामुदायिक जबाबदारीने कॅबिनेट काम करते व त्यात शिक्षण मंत्रीही आलाच. (१) पार्लमेंटरी सेक्रेटरी (पार्लमेंटचा सभासद असतो), व अधिक सेक्रेटरी, अधिकारी, यांची मदतीसाठी नेमणूक करण्याचे अधिकार. अर्थखात्याच्या पूर्व संमतीने या नेमणूका होतात. निवडणुकीमुळे शिक्षण मंत्री, पार्लमेंटरी सेक्रेटरी बदलू शकतात. पण इतर सचीव व अधिकारी कायमचे नोकरीत असतात. शिक्षण मंत्रालयाची धोरणे अमलात आणणे हे त्यांचे काम. धोरणे आखणे, पार्लमेंटला उत्तरे देणे, ही कामे मंत्री सर्व अधिकाऱ्यांच्या साहाय्याने करतो.

(२) शिक्षण खात्यात 'हर मॅजेस्टीज् इन्स्पेक्टर्स' या नावाचा एक अधिकारी गट असतो. या अधिकारी वर्गात चीफ इन्स्पेक्टर, डिव्हिजनल इन्स्पेक्टर्स, स्टाफ इन्स्पेक्टर्स इ. अधिकारी असतात. त्या सर्वांचे मुख्य काम शाळांची तपासणी करणे, धोरणे कशी राबविली जातात ते पाहाणे, मार्गदर्शन करणे. अहवाल तयार करणे इ. कामे असतात. (६) शिक्षण मंत्रालयात अनेक उपविभाग असतात. स्कूल ब्रँच, फर्दर एज्युकेशन खाते, स्पेशल सर्व्हिस खाते, कायदा विभाग, अकौंटंट ब्रँच, शिक्षक खाते, इमारत खाते अशी शिक्षणाची निगडित असलेली खाती असतात. सर्व शिक्षणाचा कारभार यांच्या मार्फत चालतो. (३) टेरिटेरियल प्रिन्सिपल्स् या अधिकाऱ्यामार्फत लोकल एज्युकेशन ॲथॉरिटीजशी संपर्क राखला जातो. एक प्रिन्सिपल एका लोकल ॲथॉरिटीची व्यवस्था पाहातो. दैनंदिन अडचणी सोडविणे व मार्गदर्शन करणे हे काम. हे धोरण ठरवीत नाहीत तर अमल बजावणी पाहातात. पार्लमेंट कायदा करते व तदनुसार नित्याचे नियम तयार केले जातात.

शिक्षण मंत्रालय व लोकल एज्युकेशन ॲथॉरिटी

या दोन घटकांना सतत संपर्क ठेवून धोरणांची अंमलबजावणी करावी लागते. या दोन घटकांचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यासाठी १९५२ मध्ये एक समिती नेमण्यात आली. 'लोकल गव्हर्मेंट मॅनपॉवर कमिटी' असे नाव समितीचे होते. लोकल एज्युकेशन ॲथॉरिटीने खालील बाबतीत शिक्षण मंत्र्याची खात्री पटवली पाहिजे. या समितीच्या शिफारशी अशा. १) भरपूर प्रमाणात व विविधतापूर्ण सोयी उपलब्ध करून दिल्या जातात. २) शिक्षण व्यवस्था, शिक्षण, तदनुशंगिक सोयी चोखपणे केल्या जातात. ३) पालक, शिक्षक व इतर घटक यांचे स्वातंत्र्य रक्षिले जाते. ४) विद्यार्थ्यांचे हित संरक्षण करून काम करणाऱ्या योग्य पात्रतेचे शिक्षक व वैद्यकीय अधिकारी यांच्या नेमणुका. ५) योग्य शुल्क आकारणी, शिष्यवृत्त्या, भत्ते इत्यादींचे योग्य प्रमाण व दर्जा. ६) शिक्षणास योग्य अशा वास्तूंची देखभाल. यामुळे दोन्ही घटकांचे कार्य निश्चित होऊन कामाची गुणवत्ता वाढली.

शिक्षणाचा राष्ट्रीय आकृतीबंध

१) ११ वर्षे वयापर्यंत प्राथमिक शिक्षण. २) माध्यमिक शिक्षण ११ ते १५ वयोमान. अर्धवेळ शिक्षण घेणारे १८ वयोमर्यादेपर्यंत सवलत घेतात. ३) फर्दर एज्युकेशन सर्व आयुष्यभर गरजेप्रमाणे, त्यात उच्च शिक्षण, प्रशिक्षण इ. प्रकार येतात. ४) ५ ते १५ वयोमर्यादेपर्यंत शिक्षण सक्तीचे. ५) प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी प्रत्यक्ष शिक्षण मंत्रालयावर. ६) विद्यार्थ्यांना गरजेप्रमाणे उच्च शिक्षण उपलब्ध करून देण्याची व्यवस्था शिक्षण मंत्रालय करते. ७) प्रत्येक कौंटी व कौंटीवरोला लोकल एज्युकेशन ॲथॉरिटी असते. त्यांना कौन्सील असेही म्हटले जाते. निवडून आलेले सभासद सर्व कारभार पाहातात. एका शिक्षण समिती मार्फत कारभार पाहिला जातो. लहान क्षेत्राच्या कौंटी व कौंटी बरोसाठी जॉईट एज्युकेशन बोर्ड नेमून कारभार केला जातो. या

शिक्षण समितीची रचना व कामे :

१) $\frac{2}{3}$ सभासद कौंटी कौन्सीलचे व $\frac{1}{3}$ बाहेरील शिक्षणतज्ज्ञ २) काही ठिकाणी या समितीला विस्तृत अधिकार तर काही ठिकाणी मर्यादित. ३) लोकल एज्युकेशन ॲथॉरिटी कर गोळा करून योजनांना पैसा पुरवितात. अर्थविषयक अधिकार या समितीला नाहीत.

लोकल एज्युकेशन ॲथॉरिटीचा अधिकारी वर्ग :

१) लेखनिक २) कोषाधिकारी ३) वैद्यकीय अधिकारी. ४) पहाणी करणारे ५) वस्तूशास्त्रज्ञ ६) मुख्य शिक्षणाधिकारी. या शिक्षणाधिकाऱ्यास साहाय्य करणारे डेप्युटी चीफ एज्युकेशन अधिकारी, असिस्टंट डायरेक्टर्स, संघटक व इन्स्पेक्टर्स हे सर्व अधिकारी शैक्षणिक अनुभव असलेले असतात.

नॅशनल असोसिएशन्स ऑफ लोकल ॲथॉरिटिज : कित्येक स्थानिक अधिकार मंडळे देशातील इतर भागातले काम पहातात. या सर्वांनी मिळून ही सामूहिक संघटना निर्माण केली आहे. १) कौंटी कौन्सील्स असोसिएशन २) म्युनिसिपल कार्पोरेशन असोसिएशन्स ३) एज्युकेशन कमिटी असोसिएशन अशाही संघटना अस्तित्वात आहेत.

नॅशनल युनियन ऑफ टीचर्स

राष्ट्रीय पातळीवरची शिक्षकांची संघटना. माध्यमिक शिक्षक, मुख्याध्यापक आणि इतर शिक्षक सभासद. या संघटनेचा सल्ला घेऊन वेतनश्रेणी सेवेच्या अटी तयार केल्या जातात. शिक्षकांच्या हितसंबंधांचे सर्व प्रकारचे रक्षण संघटना करते. याच संघटनेप्रमाणे एज्युकेशन कमिटींचे ॲसोसिएशन आहे.

स्वायत्त शाळा

शिक्षण मंत्रालय व खाते यांच्या आधिकाराखाली नसलेल्या स्वतंत्र, स्वायत्त शाळा इंग्लंडमधे आहेत. इटन, हॅरो, विन्चेस्टर, रग्बी इ. पब्लिक स्कूल्स् या प्रकारात येतात. त्यांची विशिष्ट परंपरा आहे. शिक्षण मंत्रालयाकडून अनुदान घेणाऱ्या डायरेक्ट ग्रँट् स्कूल्सही आहेत. अट म्हणून स्थानिक २५% टक्के विद्यार्थी घ्यावे लागतात. या शाळाही स्वतंत्रपणे कार्य करतात.

शिक्षण आणि अर्थ व्यवस्था

शिक्षण मंत्रालय ६० टक्के व लोकल एज्युकेशन ॲथॉरिटी ४० टक्के खर्चाचा वाटा उचलतात. आपल्या शक्तीप्रमाणे व गरजेप्रमाणे ही स्थानिक अधिकारी मंडळे विविध प्रकारे शिक्षणावर खर्च करू शकतात. कर आणि मालमत्तेवरील कर या मार्गांनी स्थानिक करातून पैसा उभा केला जातो. सर्व करदात्यांवर समान भार पडावा म्हणून, ६० टक्के द्यावयाच्या अनुदानातून ३० पेनी वजा केली जाते व ६ पौंड प्रत्येक नाव घातलेल्या विद्यार्थ्यामागे दिले जातात. स्थानिक मंडळाला आलेला तोटा पूरक अनुदान देऊन (Equalisation grant) भरून काढला जातो. मधल्या वेळच्या खाण्याचा खर्च केंद्र करते. प्रत्येक वेळच्या खाण्यावरील खर्चाच्या घटकावर अनुदान दिले जाते. प्रथम केंद्रीय मंत्रालय एकूण खर्चाची तपासणी करून ही युनिट कॉस्ट मंजूर करते. ज्या भागात प्रशिक्षण महाविद्यालये असतील तेथील स्थानिक मंडळ व मंत्रालय खर्च वाटप करून उचलतात. इथेही ६० टक्के मंत्रालय व ४० टक्के स्थानिक मंडळ हेच प्रमाण आहे.

तांत्रिक शिक्षणाची जलद व परिणामकारक प्रगती व्हावी म्हणून मंत्रालय ७५ टक्के खर्च करते. ही राष्ट्रीय जबाबदारी मानली जाते.

ब्रिटनमधील शैक्षणिक प्रशासनाचे स्वरूप पाहिले म्हणजे शिक्षण, स्वातंत्र्य आणि लोकशाही यांची मूलभूत श्रेष्ठता कशी संगोपन केली जाते हे समजते. शिक्षक आणि मुख्याध्यापक यांना फार मोठे सामाजिक स्थान तेथील समाजात आहे. विचार विनिमय, चर्चा, प्रयोग, अनुभवांची देवाण-घेवाण या मार्गानी नवी पिढी सुशिक्षित केली जाते. भारताने शिक्षणाच्या प्रशासनाचा साचा ढोबळपणे स्वीकारला. पारतंत्र्यात फार साधता आले नाही हे समजण्यासारखे आहे. परंतु स्वातंत्र्यानंतर शिक्षण प्रशासनात लोकशाही आलेली दिसत नाही. विकेंद्रीकरण केले गेले पण त्याचा अनुभव चांगला नाही. प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाचा सारा तपशील सरकार ठरविते. विद्यापीठावरदेखील हे नियंत्रण काही प्रमाणात आहे. यामुळे भारतीय शिक्षण क्षेत्रात शैक्षणिक प्रयोगांची (Experiments) उणीव भासते. सरकारी लाल फितीत शिक्षणाचे सर्व घटक गुदमरून गेलेले आहेत. जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगर पालिका, कँटोनमेंट बोर्डस् यांचा शैक्षणिक कारभार दर्जेदार नाही. आर्थिक चणचण ही ब्रिटिशांच्या काळापासून चालत आलेली अडचण संपलेली नाही. आज सारे भारतीय शिक्षण विलक्षण आर्थिक भोवऱ्यात सापडलेले आहे. राजकारण आणि तेही पक्षीय राजकारण सर्व थरांतील शिक्षकांना ग्रासून टाकीत आहे. त्याचा परिणाम शिक्षक संघटनावर झालेला आहे. या साऱ्या वस्तुस्थितीचा परिपाक म्हणजे शिक्षणाच्या दर्जाबद्दल सर्वत्र असंतोष आहे. शिक्षण जर समाज परिवर्तनाचे प्रभावी हत्यार, साधन व्हावे असे वाटत असेल तर सारे प्रशासन जाचक नियंत्रणातून मुक्त करून लोकशाही स्वरूपाचे व विश्वासावर आधारलेले होणे अगत्याचे आहे. गतिमान्, प्रगत, आणि बुद्धिनिष्ठ प्रशासन निर्माण होणे ही भारताची फार मोठी गरज आहे. ते नसल्याने अनेक समित्या, आयोग नेमूनही त्यांच्या शिफारसी बासनात पडून राहिल्याचा अनुभव सतत येतो. आत्मपरीक्षण करून उणीवा दूर करणे अशक्य नाही.

३ पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षण

पूर्वेतिहास

१९ व्या शतकापूर्वी शिशू शिक्षणाची सार्वत्रिक सोय नव्हती. माईंडिंग शाळा (Minding schools) व डेम शाळा (Dame schools) मध्ये शिक्षकांच्या ताब्यात लहान मुले देऊन पालक कामाला जात. औद्योगिक क्रांतीच्या अनुषंगाने रॉबर्ट ओवेन (Robert Owen) याची कामगिरी संस्मरणीय ठरली. किंबहूना पूर्व प्राथमिक शिक्षणाचा तो आद्य पुरस्कर्ता ठरला. न्यू लॅनार्क येथे १८१६ त त्याने एक शिशुशाळा स्थापन केली. २ ते ६ वयोमानाची मुले शाळेत येत. संगीत, नृत्य, खेळ असा अभ्यासक्रम होता. सॅम्युअल वाईल्डर स्पिन (Somual Wilderspin) याने ओवेनच्या कल्पनेचा, विचारांचा पुरस्कार केला. १८३१ पावेतो बालशिक्षण चळवळीने इतकी गती घेतली की अशा शाळांच्यासाठी खास शिक्षक तयार करावेत म्हणून होम अँड कलोनियल (Home an Coldnial) संस्था स्थापन करण्यात आल्या. धार्मिक संस्थातून बाल शिक्षणाचे काम सुरू होतेच. पण त्या शिक्षणाचे स्वरूप वेगळे होते. १८६२ मध्ये सुधारीत शिक्षण कायद्याने या संस्थांना निकालाप्रमाणे अनुदान (Payment by resulls) मिळू लागले. १८७० च्या कायद्याने पूर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण कक्षेत अंतर्भूत केले गेले. १८९३ च्या जाहीरनाम्यानुसार किंडर गार्टन पद्धतीचा पुरस्कार केला गेला. १८७४ मध्ये स्थापन झालेल्या फ्रोबेल सोसायटीचा परिणाम या चळवळीवर झाला. १९०० साली मिस् रॅग (Miss Rag) यांनी बुलविच येथे शाळा स्थापन केली. १९२१ च्या शिक्षण कायद्याने बालकांना सक्तीने शाळेत पाठविण्याची कल्पना पुढे मांडली गेली. पण इंग्लंडच्या आर्थिक परिस्थितीमुळे ही कल्पना सोडावी लागली. १९११ मध्ये रॅशेल आणि कारगारेट मॅक्मिलन (Rachel and Cargeret Macmillan) या भगिनींनी डेप्टफोर्ड येथे शिशुशाळा स्थापन केली. १९१८ च्या फिशर कायद्यानुसार अशा शाळांना आर्थिक मदत देण्याचे मान्य करण्यात आले. परंतु शिशुशाळांचा प्रसार केवळ उपेक्षेमुळे

झाला नाही. १९२१ च्या शिक्षण कायद्याने या पातळीवरचे शिक्षण सक्तीचे करण्याचा प्रयत्न झाला. पण आर्थिक अडचणीमुळे हा प्रयत्न अपुरा राहिला.

विकास

आतापावेतो या प्रकारच्या शाळा समाजिक कार्य करणाऱ्या संस्था चालवीत. १ एप्रिल १९४६ रोजी या शाळा लोकल एज्युकेशन ॲथॉरिटीजकडे सोपविण्यात आल्या. पूर्व–प्राथमिक शिक्षण राष्ट्रीय शिक्षण प्रणालीचा एक भाग मानण्यात येऊ लागला. अशा रीतीने या पातळीवरचे शिक्षण मान्यता पावले. औद्योगिक क्रांतीमुळे समाजाची अर्थव्यवस्था बदलून गेली होती. रोजगारासाठी ग्रामीण भागातील लोक शहरात स्थायिक होऊ लागले. कामगार, कष्टकरी स्त्रियांची संख्या वाढू लागली. सहाजिकच लहान मुले सांभाळण्याचा प्रश्न तीव्र झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर तर परिस्थिती आणखी बिघडली. अर्धवेळ शाळा चालविण्याचा प्रयोगही करण्यात आला. फ्रोबेल या शिक्षणतज्ज्ञाच्या किंडर गार्टन चळवळीचा परिणामही इंग्लंडवर झाला. घरातील खेळावलेले वातावरण शाळेतील उत्तम सोयींनी भरपाई करून सुधारण्याचे प्रयत्न झाले. १९४४ च्या प्रसिद्ध कायद्याने पूर्व प्राथमिक शिक्षणाची सोय करण्याचे बंधन लोकल ॲथॉरिटिजवर आले. २ ते ५ वर्षांपर्यंत हे शिक्षण द्यावे असे कायद्याने सूचित केले. त्याचप्रमाणे नर्सरी स्कूल्स (स्वतंत्रपणे चालणाऱ्या शाळा) व व नर्सरी क्लासेस (प्राथमिक शाळांना जोडलेले वर्ग) असे दोन प्रकार करण्यात आले. नर्सरी इन्फट स्कूल असा तिसरा प्रकार अस्तित्वात आला. त्यात २ ते ७ वर्षेपर्यंत शिक्षणाची सोय असते. शिक्षण मंत्रालय आणि लोकल ॲथॉरिटीज या शाळांची आर्थिक जबाबदारी उचलतात.

सकाळी ९ ते दुपारी ३.४५ पर्यंत हे वर्ग चालतात. प्रार्थना, खेळ गाणी स्वत:ची कामे स्वत: करणे, बागकाम चित्रकला, संगीत इ. विषयाची सोय असते. घर आणि शाळा या दोघांचाही लाभ मुलांना मिळून त्यांच्या वाढीला साहाय्य होते. आता अनेक आधुनिक उपकरणे, खेळ, सोयी यांनी

या शाळा सुसज्ज करण्यात आल्या आहेत. या शाळांचे महत्त्व मुलाच्या विकासात महत्त्वाचे आणि मूलभूत मानले गेले आहे.

प्राथमिक शिक्षण

पूर्वेतिहास :

ज्याला आपण प्राथमिक शिक्षण समजतो तसे अठराव्या शतकापूर्वी इंग्लंडमध्ये अस्तित्वात नव्हते. १८०० ते सुमारे १८३३ पर्यंतच्या काळात धर्मादाय संस्थांनी शिक्षणाचे वर्ग चालविले होते. डेम (Dame), पॅरिश (Parish) शाळा हे काम करीत. निरक्षरता दूर करण्याच्या कार्यात चॅरिटी व संडे शाळांनी महत्त्वाचे काम केले. रॉबर्ट रेक्स (Robert Rex) याने १८०३ मध्ये या संडे शाळा (रविवारी मुलांना लेखन, वाचन शिकविणे) स्थापन केल्या. १८११ व १८१४ त नॅशनल सोसायटी फॉर प्रमोटिंग दी एज्युकेशन ऑफ-दि पुअर व ब्रिटिश फॉरेनस्कूल सोसायटी अनुक्रमे स्थापन होऊन शिक्षणाचे कार्य सुरू झाले. १८३३ मध्ये शासनाने महत्त्व जाणून या कामासाठी अनुदान दिले. १८३९ मध्ये प्रीव्ही कौन्सीलने या कार्याची पहाणी करण्यासाठी एक उपसमिती नेमली. शट्ल्वर्थ (James K. Shuttleworth) हा या समितीचा पहिला चिटणीस. १८५३ मध्ये सर जेम्स ग्रॅहॅम (James Graham) याने ठराव मांडला की कारखान्यात काम करणाऱ्या मुलांच्या शिक्षणाची सोय केली पाहिजे. सरकारने कर्ज देऊन या शिक्षणाला सर्व प्रकारे मदत केली पाहिजे असे त्याचे म्हणणे होते. १८६१ मध्ये न्यू कॅसल कमिशनने या ठरावात सुधारणा करून, योजना विस्तृत केली. १८६७ च्या कायद्याने निरक्षरांना मताचा अधिकार मिळाला. १८७० मध्ये प्राथमिक शिक्षणाचा कायदा (W. E. Forester's Act) होऊन लोकल एज्युकेशन बोर्डांना प्राथमिक शाळा उघडण्याचे आदेश दिले गेले. खासगी शाळाही कार्य करीत होत्या. चर्चेसनी भरपूर शाळा स्थापन केल्या.

१८७० मध्ये कारखान्यात काम करणाऱ्या मुलांच्या कामाच्या तासावर

बंधन घालण्यात आले. १० ते १४ वर्षांच्या मुलांना कारखान्यात काम करण्यावर बंधन आले. ५ ते १२ वर्षापर्यंत सक्तीचे प्राथमिक शिक्षण करण्यात आले. पुढे ही वयोमर्यादा १४ पर्यंत वाढविली. १८८८ क्रॉस कमिशनरने कायद्यात सुधारणा केल्या. तज्ज्ञ शिक्षक या विभागासाठी हवेत म्हणून विद्यापीठानी प्रशिक्षण महाविद्यालये काढावीत यावर भर दिला गेला. १८९१ मध्ये मोफत शिक्षण देण्यास आदेश देणारा कायदा झाला. ३ ते १५ वयापर्यंत मुलामागे १० शिलिंग मदत देण्याचे ठरले. १९०२ मध्ये स्कूल बोर्डस् जाऊन लोकल एज्युकेशन ॲथॉरिटीज आल्या. कौंटी-साठी कौंटी कौन्सील व इतर विभागासाठी कौंटीबरो कौन्सीलने प्राथमिक शिक्षणाचे कार्य पहावे असे ठरले. शारीरिक शिक्षण, भूगोल, इतिहास, शास्त्र, हस्तकला, बागकाम इ. विषयांचा समावेश झाला.

१९१८ च्या फिशर कायद्याने मोफत, सक्तीचे प्राथमिक शिक्षण करण्यात आले. सक्ती १४ वर्षापर्यंत सार्वत्रिक होती ती १५ पर्यंत वाढविण्याचे अधिकार लोकल ॲथॉरिटीजना देण्यात आले. १९२१ मध्ये हॅडोकमिशनच्या (Hadow Commission) शिफारसीनुसार ५ ते ११ वयोमर्यादेसाठी स्वयंपूर्ण प्राथमिक शाळा व ११ वयानंतर माध्यमिक शिक्षण अशी रचना केली गेली. अभ्यासक्रम विविधलक्ष्यी (Diversified) करण्यात आला. १९३८ मध्ये स्पेन्स अहवालानुसार तांत्रिक शिक्षणाच्या शाळा काढण्यात आला.

१९४४ च्या कायद्याने एलेमेंटरी ऐवजी प्रायमरी असा बदल करण्यात आला. प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टे स्पष्ट करण्यात आली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे उद्दिष्ट स्वीकारले गेले. ५ वर्षेपर्यंत शिशुविहार, ५ ते ७ बालशिक्षण (infant) ७ ते ११ प्राथमिक शिक्षण ज्युनिअर शाळा अशी रचना केली गेली. सर्व शिक्षण सक्तीचे व मोफत. शिक्षण मंत्रालय अनुदान देते. बाकी सर्व अधिकार स्थानिक मंडळाकडे गेले. शाळेच्या मुख्यावर सर्व जबाबदारी टाकण्यात आली. मुलींच्यासाठी गृहविज्ञान व गृहशास्त्र हे विषय ठेवण्यात खास व्यवस्था केली गेली. सर्व अभ्यासक्रम

कृतिप्रधान करण्यात आला. प्रत्यक्ष अनुभवाला प्राधान्य देण्यात आले. मुला–मुलींचे शिक्षण एकत्र ठेवले गेले. उत्तम इमारती, उत्कृष्ट साधने मुक्त क्रीडांगणे, वर्गसंख्या सुमारे ४० अशा रीतीने प्राथमिक शिक्षणाचा विकास साधण्यात आला. शिक्षक आणि मुख्याध्यापक यांचा सल्ला पालकांना मानावा लागतो. नवे ज्ञान आणि संशोधन यांच्या सहाय्याने शिक्षक आपले काम चोखपणे पार पाडण्याचा यत्न करतात.

४ माध्यमिक शिक्षण

पूर्वेतिहास :

विसाव्या शतकात माध्यमिक शिक्षणाचा खऱ्या अर्थाने इंग्लंडमध्ये प्रारंभ झाला. १७ व्या शतकापासून पब्लिक स्कूल्स, ग्रामर स्कूल या पातळीवर कार्य करीत होती. १८६१ ते १८६८ या काळात पब्लिक स्कूल्स कमिशन व स्कूल्स एन्क्वायरी कमिशन यांनी या पातळीवरील शिक्षणाची पहाणी केली. १८९४–९५ मध्ये ब्रासे कमिशनने (Bryce Commission) पहाणी करून या शिक्षणाची तत्त्वे व आराखडा तयार केला. याच आधारावर विसाव्या शतकात उभारणी केली गेली. नवा अभ्यासक्रम, या शाळांना मार्गदर्शन करण्याची सोय, धोरण व प्रत्यक्ष अमलबजावणी कशी होते हे पहाण्यासाठी शाळा तपासनीस, स्वतंत्र शिक्षण मंत्री नेमणे, शिक्षकांना नोकरीची शाश्वती, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणावर भर अशा काही महत्त्वाच्या शिफारशी या कमिशनने केल्या. त्याप्रमाणे एज्युकेशन कंट्रोल बोर्ड किंवा सेंट्रल एज्युकेशन बोर्ड आणि कन्सलटेटिव्ह कमिटी फॉर एज्युकेशन अशी दोन मंडळे स्थापन करण्यात आली. या मंडळांनी पुष्कळ सुधारणा घडवून आणल्या. तांत्रिक शिक्षणाची प्रगती झाली नसल्याने १९०२ मध्ये एज्युकेशन कोड तयार करण्यात आले. वरील मंडळांच्या कार्यामुळे तांत्रिक शिक्षणाचा सर्व देशात विकास झाला. कारण तांत्रिक शिक्षण ही निकडीची गरज झाली होती. १९०४ पर्यंत राष्ट्राच्या गरजाकडे

लक्ष दिले गेले नाही. अभिजात भाषांचे वर्चस्व माध्यमिक शाळांत होते. एज्युकेशन बोर्डाने सुसूत्रता आणण्याचा यत्न केला. १६ ही या शिक्षणाची अंतिम मर्यादा ठरून ४ वर्षांचा कालावधी ठरविला. विषय संख्या निश्चित करण्यात आली. गरजेनुसार अभ्यासक्रम व विषय नव्याने ठरविले गेले. इंग्रजी, अणखी एक भाषा, शास्त्र इतिहास गणित, कला इ. विषय निश्चित करण्यात आले. शारीरिक शिक्षणावर भर दिला गेला. डाल्टन प्लॅन, प्रोजेक्ट मेथड व आधुनिक साधने यांचा वापर होऊ लागला. पहिल्या महायुद्धामुळे आर्थिक स्थिती खालावली होती. त्यामुळे अनेक योजना तशाच राहून गेल्या. १९२४ साली मजूर सरकार (Labour) अधिकारावर आले. त्यावेळी माध्यमिक शिक्षणातील कच्चे दुवे जाणवू लागले होते. प्राथमिक शिक्षणानुवर्ती माध्यमिक टप्पा बनला होतो. डॉ. टॉने (Towney) याने प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची कार्यक्षेत्रे, स्वरूप, रेखीव केले. त्याच्या प्रतिपादनानुसार हॅडो कमिटी नेमण्यात आली व तिचा अहवाल १९२६ मध्ये प्रकाशीत झाला. या समितीच्या शिफारसी अशा : (१) एलेमेंटरीऐवजी प्रायमरी शिक्षण असे म्हटले जावे. (२) ११ वयोमानापर्यंत प्रायमरी, नंतर प्री सेकंडरी अथवा ज्युनियर स्कूल व नंतर सेकंडरी असे टप्पे करण्यात यावेत. पण ११ नंतरच्या टप्प्यास सेकंडरी असे संबोधावे. १५ वयोमर्यादा ठरवली जावी.

१९३६ चा शिक्षण कायदा हा पुढील टप्पा. माध्यमिक शाळांना भासणारी इमारतींची टंचाई या कायद्याने दूर करण्याचा यत्न झाला. अनुदानापैकी ७५ टक्के रक्कम इमारतीवर खर्च करण्याची मुभा दिली गेली पण याचा फायदा फार थोड्या शाळांनी घेतला. स्पेन्स अहवाल १९३८ मध्ये प्रसिद्ध झाला व १९३९ साली शिक्षणावरची श्वेतपत्रिका (white Paper) प्रकाशित झाली. स्पेन्स अहवालात पुढील गोष्टींना महत्त्व देण्यात आले. (१) व्यावहारिक गरजेप्रमाणे अभ्यासक्रम हवेत. (२) ग्रामर शाळांच्यापेक्षा तांत्रिक शिक्षणावर भर हवा कारण ही अत्यंत निकडीची गरज आहे, तीन वर्षांचा अभ्यासक्रम ज्युनियर हायस्कूल मध्ये हवा, व अशा शाळांना हायर टेक्निकल शाळा म्हणावे. (३) अनेक

मार्गी (Maltilateral) अभ्यासक्रम असलेल्या पण एका दर्जाच्या शाळा निघाव्यात. नवे विषय अंतर्भूत करण्यात आले. ज्युनियर वर्ग प्रवेशाचे वय १३ असावे. युद्धाच्या ऐन घामधुमीत १९४१ साली नॉरवूड कमिशन (Norwood Commission) नेमण्यात आले. त्या कमिशनच्या शिफारसी: (१) प्राथमिक शाळेनंतर मुलांना त्यांच्या आवडीप्रमाणे तांत्रिक किंवा दुसऱ्या माध्यमिक शाळेत प्रवेश देऊन पुढील शिक्षणाची संधी दिली पाहिजे. (२) माध्यमिक शाळा प्रवेश तेराव्या वर्षी व्हावा. (३) ११ ते १३ वयोगटातील मुलांसाठी समान अभ्यासक्रम व दर्जा असलेल्या शाळा हव्यात. (४) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील अभ्यासाबाबत मार्गदर्शन करावे. (५) कल व बुद्धिमत्ताविषयक चाचण्या घेऊन प्रवेश द्यावा. पालकांच्या इच्छेचा योग्य विचार व्हावा. (६) शिष्यवृत्त्यांची सोय असावी. परीक्षा पद्धतीविषयक व विद्यापीठ प्रवेशविषयक महत्त्वाच्या शिफारसी कमिशनने केल्या. यानंतर १९४४ चा प्रसिद्ध कायदा झाला. या कायद्याने माध्यमिक शिक्षणाचे स्वरूप रेखीव केले. कायद्याच्या शिफारसी (१) माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारने घ्यावी व ११ वर्षांवरील मुलांना ते मिळण्याची व्यवस्था. सरकारने या शिक्षणाची आर्थिक जबाबदारी स्वीकारली. (२) प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची एक व्यवस्था होती तीं दोन व्यवस्थापनात विभागली गेली. (३) लोकल ॲथॉरिटीजवर प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली. (४) शिक्षण मंत्र्याचे अधिकार क्षेत्र वाढविण्यात येऊन शिक्षण मंत्रालयाचे नियम पाळणे मंजुरीसाठी शाळांना आवश्यक झाले. (५) विश्वस्त निधीवर चालणाऱ्या शाळांना मंत्रालयाचे नियम पाळणे आवश्यक झाले. (६) शिक्षण वयोमर्यादा १५ व अपवादात्मक परिस्थितीत १६ करण्यात आली. १९४६ व १९४८ च्या कायद्यांनी काही उपसूचना, दुरस्त्या करण्यात आल्या.

माध्यमिक शिक्षण व्यवस्था

(१) सरकारी (एडेड व कंट्रोल्ड) व (२) खासगी अशा दोन व्यवस्थेद्वारे माध्यमिक शिक्षण दिले जाते. (१) कौंटी (२) व्हॉलंटरी

(३) इंडिपेंडंट अथवा पब्लिक अशी वर्गवारी नियंत्रण व प्रशासन अशा दोन्ही दृष्टीने केली जाते. कौंटी शाळा १९४४ नंतर रीजनल सेकंडरी म्हणून ओळखल्या जातात. लोकल ॲथॉरिटीज चालक त्यांच्याकडे प्रशासनाचे सर्वाधिकार. व्हॉलंटरी शाळा सरकारी नियंत्रणापासून मुक्त. चर्च किंवा इतर खासगी संस्थाचालक, कंट्रोल्ड एडेड व लोकल ॲग्रीमेंट शाळा असे त्यांचे वर्गीकरण केले जाते. कंट्रोल्ड माध्यमिक शाळा लोकल ॲथॉरिटीज एका व्यवस्थापकीय समितीच्या द्वारे (Managing Committee) पूर्ण नियंत्रीत केल्या जातात. आठवड्यातून दोन तासिका धर्मशिक्षणाची सोय. एडेड शाळा ५० टक्के खर्च करू शकतात. उरलेला अर्धा हिस्सा सरकारी अनुदान. फक्त $\frac{1}{3}$ शिक्षक लोकल ॲथॉरिटीज नेमतात. उरलेले सर्व अधिकार शाळकडे. लोकल ॲग्रीमेंट शाळा स्वतः खर्च सोसतात. लोकल ॲथॉरिटीज दर्जा व काम यावर लक्ष ठेवतात. काही स्वतंत्र माध्यमिक (Independant) शाळा आहेत. त्या नियंत्रण मुक्त. त्यांची गुणवत्ता व दर्जा शाळाच राखतात.

माध्यमिक शाळेत मूल सर्वसाधारण तेराव्या वर्षी प्रवेश करते. आवडी निवडी कल, क्षमता, बुद्धिमत्ता याच्या प्रमाणात प्रवेश मिळावा म्हणून पुढील प्रकार अस्तित्वात आहेत. (१) ग्रामर स्कूल्स् (२) मॉडर्न सेकंडरी शाळा व (३) टेक्निकल शाळा. विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण व्हाव्यात म्हणून पुढील प्रकारच्या माध्यमिक शाळा अस्तित्वात आल्या (१) काँप्रीन्हेसीव (२) बाय लॅटरल (३) मल्टिलॅटरल आणि (४) कॉमन हे ते प्रकार होत.

ग्रामर शाळात हुषार, विद्यापीठ शिक्षण घेऊ शकणारे, सुस्थित वर्गातले विद्यार्थी जातात. अभिजात (Classical) व आधुनिक (Modern) भाषावर भर. वाङ्मय, भूगोल, इतिहास, कला, सक्तीचे शारीरिक शिक्षण इ. विषय. मुलींना गृहशास्त्रविज्ञान सक्तीचे. १९४४ पासून तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाची सोय. कमी प्रतीच्या विद्यार्थ्यांसाठी. सर्वसाधारण बहुसंख्य मुले मॉडर्न शाळांतून जातात. विविधांगी अभ्यासक्रम. इंग्लीश, गणित, इतिहास, भूगोल, गृहकला, संगीत, हस्तकला, बागकाम, पशुपालन

इ. विषय. शिक्षकावर योग्य मार्गदर्शनाची जबाबदारी, टेक्निकल शाळांतून व्यवसायनिष्ठ अभ्यासक्रम. ४ ते ५ वर्षांचा अभ्यासक्रम. व्यवसायाबरोबरच वाङ्मय, कला, इतिहास, नीतिशिक्षण, शारीरिक शिक्षण दिले जाते. आभियांत्रिकी (Engineering), वास्तुशिल्प, शेती, खाणकाम इ. विषयांची सोय. तांत्रिक शिक्षण देणाऱ्या विविध पातळीवरच्या संस्था इंग्लंडमध्ये आहेत. (१) कॉलेजेस फॉर फर्दर एज्युकेशन. (लोकल ॲथॉरिटी किंवा खासगी संस्थांनी चालविलेल्या संस्था स्वतःच्या इमारती. भरपूर सोयी व संधी उपलब्ध). (२) ज्युनियर सेकंडरी टेक्निकल् स्कूल्स. (२ ते ३ वर्षांचा अभ्यासक्रम. तांत्रिक विषयावरोबर भाषा, गणित, सामाजिक शास्त्रे इ. विषयांची सोय. ह्या अभ्यासक्रमानंतर विद्यार्थी सेकंडरी टेक्निकल शाळात प्रवेश करू शकतात.) (३) इव्हिनिंग इन्स्टिट्यूट्स् ऑफ् टेक्निकल एज्युकेशन. (वाढत्या वयाचे विद्यार्थी व प्रौढासाठी. इतर विषयही शिकविले जातात.) (४) टेक्निकल डे क्लासेस. (व्यवसायात अधिक पात्रता मिळविण्यासाठी कामगारांना उपयुक्त. कारखानदार या वर्गांना जायची परवानगी देतात.) (५) आर्ट स्कूल अँड् क्लासेस. (संध्याकाळी भरणारे वर्ग. लहान मोठ्या अवधींचे अभ्यासक्रम. कला व कारागिरीचे शिक्षण.) सरकारी अनुदान, शुल्क, कर, यांद्वारे खर्च भागविला जातो. दहा हजराच्यावर अशा शाळा व सुमारे १५ लाख विद्यार्थी फायदा घेतात. शिष्यवृत्त्या, सवलती यांची सोय.

इतर प्रकार

काँप्रीहेन्सीन स्कूल्समध्ये अर्धवेळ माध्यमिक शिक्षणाची सोय. ग्रामर मॉडर्न व टेक्निकल शाळातून दिले जाणारे शिक्षण एका ठिकाणी देण्याची सोय. अनेक प्रकारच्या विषयांची सोय. या शाळांचा व्याप मोठा व गुंतागुंतीचा असतो. केवळ दोनच प्रकारांपुरते शिक्षण बायलॅटरल शाळात दिले जाते. मल्टिलॅटरल शाळांत अनेक माध्यमिक शाळातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा अंतर्भाव करून कॉमन स्कूल्स् या शाळा मॉडर्न सेकंडरी प्रमाण काम करतात.

परीक्षा पद्धती

ऑक्सफर्ड व केम्ब्रीज येथे १८७४ मध्ये एका समितीने परीक्षा घेण्यास प्रारंभ केला. १८ वयाची मुले ही परीक्षा देत. १८८४ मध्ये परीक्षा निम्न स्तरावर (Lower category) घेऊ लागण्यात आली. १५ ते १६ वयाचे विद्यार्थी परीक्षा देऊ लागले. १९०५ मध्ये स्कूल लीव्हिंग परीक्षा सुरू करण्यात आली. १९११ मध्ये जॉईंट एक्झामिनेशनने परीक्षेबाबत सूचना केल्या. दोनच परीक्षा घेण्याची शिफारस या समितीने केली. १९०७ मध्ये सेकंडरी स्कूल्स एक्झामिनेशन बोर्ड स्थापन झाले. १९२० मध्ये शिष्यवृत्त्या देण्यासाठी परीक्षा होऊ लागली. १९४३ मध्ये नॉरवूड कमिशनने परीक्षा पद्धतीत सुधारणा सुचविल्या. १९५१ पासून इंग्लंडमध्ये एकच प्रमाणपत्र परीक्षा (Certificate Examination) होते. नवे परीक्षा मंडळ स्थापण्यात आले. यात विद्यापीठ, लोकल अॅथॉरिटीज व शिक्षक यांचे प्रतिनिधी आणले गेले. अनेक वैकल्पिक विषयांची सोय. १६ वर्षांपूर्वी या परीक्षेस विद्यार्थ्यांना बसता येत नाही. अलीकडे प्रगत परीक्षेचे सर्व तंत्र अमलात आणले जाते. कसोटचा व चाचण्या यांचा भरपूर वापर. योग्य ठिकाणी तोंडी परीक्षेचा अंतर्भाव केलेला आहे. १९५९ मध्ये शाळांच्या नियमात केलेल्या बदलाप्रमाणे मुख्याध्यापकांच्या पूर्व परवानगीने १५ वयोमानापूर्वी जनरल सर्टिफिकेट परीक्षेस बसता येते. ही परीक्षा दिल्यानंतर विद्यापीठांच्या किंवा इतर संस्थांच्या पूर्वपरीक्षेस (Preliminary) बसण्याची गरज उरत नाही. १९५९ नंतर पुष्कळशा मॉडर्न शाळांचे रूपांतर बायलॅटरल किंवा काँप्रीहेन्सीव शाळात झालेले आहे.

भारतातील चित्र

भारतीय शिक्षण प्रणालीतील सर्वांत कच्चा दुवा असे माध्यमिक शिक्षणाचे केले जाणारे वर्णन खरे आहे. माध्यमिक शिक्षण संपवून विद्यार्थी जीवनाच्या संघर्षात उतरण्यास सिद्ध व्हावा हे साध्य झालेले नाही. येथील माध्यमिक शिक्षण अनेक कारणामुळे विद्यापीठानुवर्तीच राहिलेले आहे. विविधता नसणे, तांत्रिक शिक्षणाच्या अपुऱ्या सोयी, भाषांचे ओझे,अपव्यय

(Wastage) आणि कुचंबणा (Stagnaiton) शासनाचे सर्वकष नियंत्रण ग्रामीण भागातील व शहरी भागातील अपवाद वजा केले तर बहुसंख्य शाळांची दुरवस्था, विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचा अभाव, कला शिक्षण व हस्त कला याची उपेक्षा, मुलींच्या शिक्षणाची उपेक्षा, हजारोंच्या संख्येने अनुत्तीर्ण होणारी मुले असे प्रमुख दोष सर्वांना परिचित आहेत. याचा एक परिणाम असा झाला आहे प्रयोग करण्याची वृत्ती नाहीशी झाली अमून शिक्षणाबद्दलचे वैफल्य वाढीला लागले आहे. झालेली कोंडी सर्वांना जाणवते आहे. आर्थिक दुरवस्थेने साऱ्या संबंधित घटकांना वेढून टाकले आहे. युद्ध-पातळीवर, वस्तुनिष्ठ दृष्टीने हो अवस्था संपविणे अपरिहार्य झाले आहे.

५ विद्यापीठीय उच्च शिक्षण

पूर्वेतिहास

ब्रिटनमधील विद्यापीठीय शिक्षणाची परंपरा फार संपन्न आहे. पूर्वी ग्रामर शाळा आणि पब्लिक शाळा विद्यापीठ प्रवेशासाठी विद्यार्थी तयार करीत. अगदी प्रारंभापासून विद्यापीठे स्वायत्ता (autonomous) ठेवलेली असून शिक्षकांचे प्रतिनिधी व शिक्षण तज्ज्ञ यांच्यामार्फत कारभार पाहिला जातो. या उज्ज्वल परंपरेचा परिणाम जगातील विद्यापीठावर झाला. परंतु १९ व्या शतकापर्यंत या उच्च शिक्षणाचा प्रसार फार होऊ शकला नाही. या शिक्षणाची व्याप्ती विशिष्ट उच्च वर्गीयासाठीच मर्यादित राहिली. हे शिक्षण फार खर्चाचे असे हेही एक कारण होतेच. ऑक्सफोर्ड (११६०) व केम्ब्रीज (१२०९) ही सर्वात जुनी वसतिगृह युक्त विद्यापीठे. राज्यसत्ता किंवा धर्मसत्ता या दोहोंच्या प्रभावापासून ही विद्यापीठे मुक्त होती. परंतु लोकांची उच्चशिक्षणाची मागणी सतत वाढत होती. वसतिगृहाची सक्ती नसलेले विद्यापीठ हवे अशीती मागणी होती. त्याप्रमाणे १८२६ मध्ये लंडन येथे एक महाविद्यालय स्थापन करण्यात आले. १८३२ मध्ये डरहॅम येथे वसतिगृहयुक्त विद्यापीठ स्थापन करण्यात आले. काही घटक

महाविद्यालयेही या विद्यापीठाला संलग्न करण्यात आली, ज्यांना धर्म-शिक्षणाचा अभ्यास करायचा त्यांच्यासाठी लंडन येथे किंग्ज कॉलेज स्थापन करण्यात आले. कारण ही सोय ऑक्सफोर्ड, केंम्ब्रिजला नव्हती. पुढे लंडन येथील स्थानिक महाविद्यालयांच्या एकीकरणातून लंडन विद्यापीठ (१८३६) स्थापन करण्यात आले. काही वसतिगृह नसलेली महाविद्यालयेही या विद्यापीठाशी संलग्न होती. विद्यापीठ परीक्षा घेई. म्हणून लंडन विद्यापीठ संलग्न (affiliattng) प्रकारचे झाले. विद्यापीठाचे स्वरूप धर्मातील (secular) ठेवण्यावर कटाक्ष होता.

स्वायत्तता

ब्रिटिश विद्यापीठांचे वर्णन असे करतात की ती विसाव्या शतकाची निर्मिती आहे. हे वर्णन सार्थ ठरते. कारण याच शतकात विद्यापीठांचा विकास वेगाने झाला. विद्यापीठीय शिक्षणात वाणिज्य, शेती, तंत्र–विज्ञान इ. नव्या विद्याशाखा उघडण्यात आल्या. काळाच्या ओघात ब्रिस्टल, लीडस् मँचेस्टर, शेफील्ड, नॉटिंगहॅम, बर्मिंगहॅम, लिव्हरपूल, रीडींग इ. नवी विद्यापीठे स्थापन झाली. प्रत्येक विद्यापीठाचे वैशिष्टय कार्याप्रमाणे दिसून येते. हे वैशिष्टय टिकविण्याचा प्रयत्न हे ब्रिटिशांचे खास लक्षण. या विद्यापीठासंबंधी १९४८ च्या कायद्यामुळे विशेष फरक झाला नाही कारण विद्यापींठाची स्वायत्तता प्राणभूत मानली जाते. लोकल अँथॉरिटीजनी उच्च शिक्षणाची सोय करावी ही सूचना केली. विद्यापीठाचे प्रशासन स्वतंत्र असते. कोर्ट सीनेट (विधिसभा) नियम, उपनियम करून कारभार चालवितात. एक्सिक्यूटीव्ह कौन्सील, (गव्हर्निंग कौन्सील कोर्ट) कार्यकारी मंडळ अंमलबजावणी करते शासन विद्यापीठ अनुदान समिती (university Grants Committee) तर्फे आर्थिक मदत देते पण कारभारात ढवळाढवळ करू शकत नाही. फारच अव्यवस्था एखाद्या विद्यापीठात आढळली तर शासन सनद (Charter) काढून चौकशी करू शकते. पण अशी वेळ येत नाही. शुल्क, देणग्या, निधी, उत्पन्नाची साधने व सरकारी अनुदान यावर विद्यापीठाचा चरितार्थ चालतो. शिक्षण मंत्रालयाचा प्रतिनिधी विद्यापीठ अनुदान समितीवर असतो. पण तो

सल्लामसलत, चर्चा करू शकतो. इतर तज्ज्ञ सभासद अनुदानाची रक्कम ठरवितात. पूर्वीसारख्या मोठ्या देणग्या कमी होत चालल्या आहेत. साहजिकच सरकारी अनुदान हाच आधार झाला आहे. आता बहुतेक विद्यापीठांनी प्रत्यक्ष काही विषय शिकविण्यास सुरुवात केली आहे. शिकविणारी विद्यापीठे (teaching universities) हा सर्वत्र मान्यता पावलेला प्रकार चांगला रुढ झाला आहे.

ट्यूटोरिअलपद्धती (निबंध लेखन) सेमीनार, चर्चा आणि व्याख्याने या साधनांनी विषय शिकविले जातात. सुसज्ज प्रयोगशाळा, ग्रंथालये, स्वाध्याय-वर्ग ही वैशिष्ट्ये. शास्त्र आणि कला अशा दोन्ही शाखांसाठी तीन वर्षांचा विशेष प्राविण्याचा (Honours) वर्ग. अभ्यास विषयांची विपुल विविधता संशोधन कार्य व शोध–निबंध लेखन यांना प्राधान्य. प्राध्यापकांचा सुधारीत वेतनश्रेणी प्रयत्न काही अंशी सफल झाला आहे. विद्यार्थी आणि विद्यार्थिनी एकत्र शिक्षण घेतात. कोणत्यातरी एका खेळात भाग घेणे आवश्यक. सुसज्ज वसतिगृहे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिलेली आहेत.

गेल्या काही वर्षात नवीन धर्तीच्या विद्यापीठांची निर्मिती करण्यात आली. खुले विद्यापीठ (Open university) हा नवा प्रयोग केला जात आहे. व्यवसायात असलेल्या कोणत्याही व्यक्तीला आपल्या गरजेच्या किंवा आवडीच्या विषयाचा अभ्यास करून प्राविण्य मिळविता येते. पत्रव्यवहारा-द्वारे शिक्षण, बहिःशाल व्याख्यानमाला, (External lecture series) कामगारांचे विद्यापीठ असे समाजोपयोगी उपक्रम हाती घेतले आहेत. इतकी विद्यापीठे असूनही कोठेही एक साचा नाही हे वैशिष्ट्य.

भारतीय विद्यापिठे

भारतातील प्रथमच स्थापन झालेल्या विद्यापीठावर (मुंबई, मद्रास, कलकत्ता, १८५७) लंडन विद्यापीठाचा खोल ठसा उमटला. प्रशासन, पद्धती, दृष्टिकोन, रचना, अधिकारी वर्ग, इत्यादी बाबतीत अजूनही हा ठसा दिसून येतो. शिकविणारे व संलग्न अशी दुहेरी कामे करणारी बहुतेक विद्यापीठे असली तरी परीक्षेबाबतचा पुरोगामी निर्णय अजूनही घेतलेला

आढळत नाही. विद्यापीठ कोठे असावे, कुलगुरू कोण असावा, कार्यकारीणीत मताधिक्य कोणाचे, इ. गोष्टीवरच वादंग सुरू असतात. भारतात विद्यापीठे ही कायद्याने निर्माण होत असल्याने (legislative Creature) राजकीय ताण–तणाव विद्यापीठात दिसतात. विद्यापीठे स्वायत्त खऱ्या अर्थाने झालेली नाहीत. जुनी परीक्षा पद्धती, निबंध लेखन–चर्चा वैयक्तिक मार्गदर्शन यांचा अभाव, विषयांची साचेबंदी संशोधन–विन्मुखता हे दोष आजही जाणवतात. राष्ट्रातील बौद्धिक जीवनाचे नेतृत्व विद्यापीठांनी करावे ही अपेक्षा अपूर्णच राहिली आहे. इमारती, व्यवस्थापन, गुंतागुंतीचा कारभार, काल-बाह्य समारंभ अशा अनेक कारणांमुळे विलक्षण आर्थिक कोंडीत विद्यापीठे सापडलेली आहेत. माध्यमिक शिक्षणावर अप्रत्यक्षपणे विद्यापीठांचेच वर्चस्व दिसून येते. त्याच त्याच कामाची पुनरावृत्ती होत असल्याने एकाच साच्याची विद्यापीठे दिसतात. एकूण सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती-मुळे शिक्षित बेकारांचा प्रश्न तीव्र होत आहे. इथेही अपव्यय (Wastage) आणि कुचंबणा (Stagnation) जाणवू लागली आहे. युवकांच्या प्रश्नांची तड लावण्याची योग्य दिशाही सापडलेली नाही. अभ्यासक्रम, प्राध्यापकांची वेतनश्रेणी, सुट्ट्या, क्रीडा–नियोजन, छंद–संगोपन, वसतीगृहे इ. बाबतीत आशादायक वाटचाल आढळत नाही. कितीही अप्रिय असली तरी ही वस्तुस्थिती तपासून क्रांतिकारक उपायांना हा राष्ट्रीय अपव्यय थांबविला पाहिजे असेच या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे.

० ० ०

६. शिक्षकांचे प्रशिक्षण

पूर्वेतिहास

मागे केलेल्या ऐतिहासिक अवलोकनानंतर असे दिसून येईल की मुलांना शिकविण्याच्या कामाची सुरुवात धर्मगुरूंनी केली. धर्मप्रचार आणि काही विषयांचे (लिहिणे, वाचणे, सोपे अंकगणित) शिक्षण अशी दोन्ही कामे

धर्मोपदेशक करीत असत. पुढे निवृत्त, समाजकार्याची आवड असणाऱ्यांनी यात भाग ध्यायला सुरुवात केली. प्रबोधन कालापूर्वी (Renaissance) धर्माचा फार मोठा प्रभाव अध्यापनाच्या या क्षेत्रावर होता. १८ व्या शतकाच्या अखेरीस गरजेच्या पोटी अपंग, जखमी, वृद्ध अशा व्यक्तींचा उपयोग शिक्षक म्हणून करण्यात आला. १९ व्या शतकाच्या अखेरीस शिक्षकांच्या प्रशिक्षणाची गरज तीव्रतेने भासू लागली. विसाव्या शतकात मात्र मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र, शरीर विज्ञान या शास्त्रांतील प्रगती आणि संशोधनामुळे शिक्षण कार्यक्रमाला बांधीव स्वरूप येऊ लागले बुद्धी, क्षमता, आवड निवड, कल इ. अनेक प्रकारच्या चाचण्या व कसोटया निर्माण झाल्या. व्यावसायिक मार्गदर्शन करणाऱ्या कसोटयाही उपलब्ध झाल्या. अनेक प्रकारची यांत्रिक साधनेही विकसित झाली. या साऱ्यांचा उपयोग इंग्लंडमधील प्रशिक्षण व्यवस्थेत केला जातो. विविध प्रकारचे संशोधन सतत हाती घेतले जाते. अनेक शास्त्रीय नियतकालिकेही प्रसिद्ध होतात. किंबहुना शिक्षणाच्या प्रत्येक अंगाचे शास्त्र बनविण्याचा कसोशीने प्रयत्न करण्यात येत आहे. इंग्लंडमधील प्रशिक्षण या विषयावर पेस्टॉलॉत्झी फ्रोबेल, हर्बार्ट, मॉंटेसरी डचूई, सिरिल बर्ट अशा अनेक विचारवंतांचा प्रभाव पडलेला आहे. प्राथमिक आणि माध्यमिक पातळीवरच नव्हे तर विद्यापीठ पातळीवरही शिक्षकांना सतत मार्गदर्शन खास वर्ग भरवून केले जाते.

प्रशिक्षण विकास

शिक्षकांचा दर्जा सुधारण्यासाठी रॉयल सोसायटी ऑफ टीचर्स या संघटनेने फार प्रयत्न केले. १८ वे वर्षानंतर दोन वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम करून, पाच विषयात जनरल सर्टिफिकेट ऑफ एज्युकेशन मिळविल्या. शिवाय प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेत शिक्षक होता येत नाही. पदवीधरासाठी विद्यापीठाचा एक वर्षाचा प्रशिक्षण अभ्यासक्रम आवश्यक असतो. गृहविज्ञान (Home Science, कला (Arts) शारीरिक शिक्षण असे खास विषय शिकविणाऱ्यासाठी २ ते ४ वर्ष मुदतीचे प्रशिक्षण अभ्यास-

क्रम पूर्ण करावे लागतात. सक्तीचे शिक्षण पूर्ण झाल्यावर जे पुढील आवश्यक शिक्षण (Further Education) गरजेप्रमाणे व्यक्ती घेते. त्यासाठी निरनिराळ्या व्यवसायांतील व्यक्ती, तज्ज्ञतेप्रमाणे शिक्षकाचे काम करतात. त्यांना अन्य प्रशिक्षण दिले जात नाही. नॅशनल ॲडव्हायसरी कौन्सील फॉर रिक्रूटमेंट अँड ट्रेनिंग ऑफ टीचर्स ही संघटना शिक्षण मंत्रालयास या प्रश्नासंबंधी सल्ला देते. इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन ही संस्था प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम व अनुषंगिक तपशील ठरविते. सर्व प्रशिक्षण संस्था या संघटनेशी संलग्न असतात. लोकल ॲथॉरिटीज व खासगी संस्था प्रशिक्षणाचे काम करतात. खासगी प्रशिक्षण संस्थांना सरकार अर्धा खर्च देते. प्रशिक्षण शिक्षक विशेषत: स्त्रीशिक्षक यांची वाण फार भासते. त्यासाठी प्रयत्नही जोराचे सुरू आहेत. एरिया ट्रेनिंग ऑरगनायझेशनस् आपापल्या क्षेत्रातील गरजा पाहून योजना आखतात. शिक्षकांच्या नेमणुका करण्याचा अधिकार ज्या त्या संघटनांना आहेत.

वेतन श्रेणी, अन्य सवलती

वेतनाचा प्रश्न सोडविण्याची येथे खास परंपरा आहे. बर्नहॅम समिती (Burnham Committee), ॲसोसिएशन ऑफ् टीचर्स व ॲसोसिएशन ऑफ् लोकल ॲथॉरिटीज संयुक्तपणे वेतन श्रेणीविषयक प्रश्न हाताळतात. दोन महिन्यांची नोटीस व तीन महिन्यांची नोटीस अनुक्रमे शिक्षक व मुख्याध्यापकांना वर्षाखेर देऊन सेवामुक्त करता येते. गुन्हा फारच गंभीर असेल तर आरोपपत्र देणे, बचावाची पूर्ण संधी देणे, असे ठरलेले असते. शिक्षकांच्या संघटना मजबूत असून त्या शिक्षकांच्या हितसंबंधाचे रक्षण करतात. अनेक सुविधा शिक्षकांना उपलब्ध असतात. तीन महिने पूर्ण पगारी आजारीपणाची रजा, व तीन महिने अर्धपगारी मिळण्याची सोय. सर्व तंटे व मतभेद चर्चेने सोडविले जातात. १९४४ च्या कायद्यान्वये दोन समित्या निर्माण करून हे प्रश्न सोडविण्याची व्यवस्था करण्यात आली. (१) बर्नहॅम मेन कमिटी व (२) बर्नहॅम टेक्निकल कमिटी. पहिली समिती वेतन, सेवाविषयक प्रश्न हाताळते. दुसरी समिती, पुढील खास शिक्षणाशी निगडित

असलेल्याचे प्रश्न सोडविते. मेन कमिटीत २६ प्रतिनिधी ॲसोसिएशन ऑफ टीचर्सचे, आणि २६ प्रतिनिधी लोकल ॲथॉरिटीजचे. प्रत्येक घटक आपला मुख्य व चिटणीस निवडतो. शिक्षण मंत्रालय सर्व सहाय्य या समितीला करते. गेली चाळीस वर्षे या समितीचे काम निर्वेध चालू आहे. टेक्निकल कमिटीची रचना याच प्रकारची आहे. शिक्षकांच्या वेतनश्रेणी बाबत काही विशेष येथे दिसून येतात. (१) स्त्री आणि पुरुष यांना वेगवेगळी वेतनश्रेणी. (२) गुणवत्तेबरोबर पगारवाढ होते. (३) जादा कामाचे अधिक वेतन. (४) लंडन येथे काम करणाऱ्या शिक्षकांना मूळ पगार अधिक दिला जातो.

प्रशिक्षण महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतन श्रेणीची व्यवस्था पेलहॅम (Pelham Committee) समिती पहाते. शिक्षणखाते व ॲसोसिएशन ऑफ् टीचर्स ऑफ् ट्रेनिंग कॉलेजचे प्रतिनिधी असतात. लोकल ॲथॉरिटीज-नाही प्रतिनिधित्व असते. या सर्व समित्या चर्चा करून आपल्या शिफारसी शिक्षण मंत्र्याकडे धाडतात व मग वेतनश्रेणी अमलात येते. इंग्लंडमध्ये शिक्षकांचा दर्जा उत्तम प्रतीचा आढळतो कारण शिक्षकांच्या जीवनाचा सर्वांगीण विचार करून योजना राबविल्या जातात.

० ० ०

७ गरजेनुरूप पुढील शिक्षण

अर्थ व योजना

फर्दर एज्युकेशन (Further Education) याचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. १९४४ च्या कायद्याने अशा प्रकारच्या शिक्षणाची संकल्पना आणि व्याप्ती पुढीलप्रमाणे केलेली आहे. "सक्तीचे शिक्षण झाल्यानंतर कोणत्याही व्यक्तीला पूर्ण वेळ किंवा अर्ध वेळ शिक्षण घेण्याची सोय.... फावल्या वेळात, सांस्कृतिक आणि कलाविषयक शिक्षण देणाऱ्या संघटनांतून,

व्यक्तिगत आवडी–निवडीप्रमाणे, सक्तीचे शिक्षणानंतर देण्यात येणारे शिक्षण." या ठिकाणी शिक्षणाची सर्व समावेशक व्याख्या अभिप्रेत आहे. अट एकच की सक्तीचे प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर अशा संधीचा लाभ घेता येईल. यात भरपूर विविधता गृहीत धरलेली आहे. प्रत्येक व्यक्तीच्या विकासाला वाव आहे. आपले जीवन संपन्न आणि परिपूर्ण करण्याची संधी आहे. शिक्षण ही जन्मभर चालणारी प्रक्रिया आहे; ही कल्पना मान्य करून सोयी व उपक्रम हाती घेतलेले आहेत. आपल्या क्षेत्रात ज्या प्रकारच्या सोयी उपलब्ध असतील त्याप्रमाणे अशा शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी १९४४ च्या कायद्याने लोकल ॲथॉरिटीजवर टाकलेली आहे. अशा संधी उपलब्ध करून देण्याची जाणीव औद्योगिक क्रांतीनंतर नैसर्गिकपणे वाढीला लागली. कार्यक्षम व्यक्ती हा नव्या यंत्रयुगाचा महत्त्वाचा घटक बनला व १९ व्या शतकाच्या प्रारंभापासून या दिशेने प्रयत्न होऊ लागले. १९ व्या शतकाच्या मध्यास प्रौढांसाठी विविध तांत्रिक शिक्षण देणारे वर्ग निघाले. १८४२ मध्ये शेफील्ड येथे असे शिक्षण देणारे पब्लिक स्कूल स्थापन झाले. पुढील काळात विविध प्रकारचे (तांत्रिक कलाविषयक, करमणूकप्रधान, बौद्धिक) शिक्षण देणाऱ्या ६०० संघटन, निर्माण झाल्या. अनेकांनी ग्रंथालय व वाचनाची सोय केली. कामगार संघटनांनी (Trade unions) अशा संस्था मँचेस्टर, बर्मिगहॅम्, लंडन, लीडस् येथे स्थापन केल्या. १८९९ मध्ये नॅशनल कौन्सील फॉर ॲडल्ट एज्युकेशन (National Council for Adult Education, London) स्थापन करण्यात आले. विद्यापीठांनी या कार्यात मोठा वाटा उचलला. व्याख्यानमाला, बहिःशाल वर्ग, फिरती ग्रंथालये. चित्रपटाद्वारे माहिती प्रसारण असे उपक्रम हाती घेतले गेले.

१९०५ मध्ये वर्कर्स एज्युकेशनल ॲसोसिएशन स्थापन करण्यात आले. तीन–चार वर्षात या संघटनेने ५० शाखा उघडल्या. १९१४ त नॅशनल कौन्सीलचे नाव बदलून नॅशनल ॲडल्ट स्कूल युनियन असे ठेवण्यात आले. १९१९–१९२० मध्ये मिनिस्ट्री ऑफ् रिहॅबिलीटेशनने सरकारला हे शिक्षण देणाऱ्या संस्थांना अनुदान देण्यास प्रवृत्त केले. १९४४ च्या कायद्यान्वये

नॅशनल स्कीम ऑफ फर्दर एज्युकेशन या नावाने योजना आखण्यात आल्या. शिक्षण मंत्रालय सर्वोच्च व तळाशी लोकल ॲथॉरिटीज कारभार पाहू लागल्या. या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वावलंबी संस्थांचा सल्लाही घेण्याची प्रथा आवर्जून चालू ठेविली गेली. नॅशनल ॲड्व्हायसरी कौन्सील शिक्षण मंत्र्यांना याबाबत सल्ला देते. त्याचप्रमाणे रीजनल ॲड्व्हायसरी कौन्सील्स रीजनल ॲथॉरिटिजना या कामी सल्ला देतात.

स्थानिक जबाबदारी

लोकल एज्युकेशन ॲथॉरिटीजवर सर्व उपक्रमाची, साधने निर्माण करण्याची, फुरसदीच्या वेळेत मनोरंजन साधने पुरविण्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे. विद्यापीठे, कामगार संघटना इत्यादींशी सल्ला मसलत करून योजना आखण्याची प्रथा रूढ आहे. या कार्यात पुढील संघटनांनी अर्थपूर्ण सहभाग केलेला आहे. १) स्टँडिंग कॉन्फरन्स ऑफ यूथ ऑरगनायझेशन्स, (२) नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर ॲडल्ट एज्युकेशन (३) वर्कर्स एज्युकॅशनल ॲसोसिएशन.

प्रौढ शिक्षण योजना

इंग्लंडमध्ये प्रौढांना पुढे शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने सोयी उपलब्ध आहेत. उद्योग आणि व्यापार, शेती, प्रौढ उदारमतवादी शिक्षण, युवक संघटना, सांकृतिक–कला–मनोरंजन इ. अनेक संघटनांच्याद्वारे शिक्षण मिळण्याची सोय उपलब्ध आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर उद्योग आणि व्यापार या क्षेत्रात विलक्षण प्रगती व नवी तंत्रे आली. त्यासाठी अशा प्रकारच्या शिक्षणाची फार गरज निर्माण झाली. या दृष्टीने पुढील विविध संधी उपलब्ध आहेत. (१) जिल्हा सायं–शाळा– (District Evening Schools) मुलां–मुलींसाठी अर्ध वेळ वर्ग. नेहमीचे काम सांभाळून शिक्षण उद्योग–व्यवसायातील तज्ञ येथे शिकवितात. नेहमीच्या शाळांच्या इमारतीत किंवा इंजीनियरिंगसारख्या खास विषयासाठी वेगळ्या इमारतीत हे वर्ग भरतात. उद्योग–व्यापारासाठी विद्यार्थी तयार करणारी महाविद्यालयेही आहेत. येथे पूर्ण वेळ किंवा अर्ध वेळ शिक्षण घेण्याची सोय आहे. या महा-

विद्यालयांचे व्यवस्थापनात उद्योग-व्यापार क्षेत्रातील तज्ज्ञ, लोकल अॅथॉरिटीजचे प्रतिनिधी, प्राचार्यांना साहाय्य करतात. विषयांची मागणी पाहून त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीची नेमणूक केली जाते. स्थानिक निकडीच्या गरजा लक्षात घेऊन विषय शिकविले. जातात. शुल्क आणि अनुदान यांच्याद्वारे खर्च भागविला जातो. व्यावसायिक क्षेत्रातील संघटना परीक्षा घेतात. उत्तीर्ण झाल्यावर व्यक्ती त्या संघटनेची सभासद होते व मग नोकरीत प्रवेश मिळतो.

शास्त्र आणि तंत्रविज्ञान लोकांनी आत्मसात करावे म्हणून शिक्षण मंत्रालय ७५ टक्के खर्चाचा वाटा उचलते. वास्तुविद्याशास्त्र व गृहविज्ञान यासाठीही महाविद्यालये आहेत. एक लक्षात ठेवण्यासारखा विशेष म्हणजे विषयाबरोबरच लोकशाही नागरिकत्वाचे शिक्षणही दिले जाते. लोकशाही परंपरा बळकट करण्याचा हा प्रयत्न उल्लेखनीय आहे.

संस्थांचे जाळे

१९४४ च्या कायद्याने काँटी कॉलेजेस स्थापन करण्याची सोय केलेली आहे. १५ वर्षांच्या तरुण व्यक्तींना शिक्षण घेण्याची संधी मिळावी हा योजनेमागील होते. नोकरीत असताना या महाविद्यालयात वर्गात हजर राहाण्याची सवलत चालक देतात. आठवड्यातून एक दिवस शिक्षणाची सोय केली जाते. सर्व प्रकारच्या लालफितीपांसून, जाचक नियमांपासून कारभार मोकळा ठेवला जातो. तशीच व्यवस्था शेती शिक्षणाची आहे. शेती हा दुय्यम व्यवसाय असला तरी ग्रामीण भागात लोकल अॅथॉरिटीजनी फार्म इन्स्टिटचूटस् स्थापन करून पूर्ण वेळ शिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. शेती मंत्रालयही या कामात सहकार्य करते. या मंत्रालयाने शेती समित्या स्थापन केल्या आहेत. त्या मार्गदर्शनाचे काम करतात. खासगी संस्थाही या क्षेत्रात काम करतात. (१) वुइमेन्स इन्स्टिटचूटस् (२) टाऊन वुइमेन्स गिल्ड्स् व (३) यंग फार्मर्स क्लब या त्या संस्था होत. शेती, फलोत्पादन, बागकाम इ. अनेक विषयांचे शिक्षण देण्यात या संघटना मदत करतात. स्त्रियांनादेखील अशा प्रकारचे अनेकांगी शिक्षण देण्याची व्यवस्था

आहे. प्रौढ शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या अनेक संस्था आहेत. इन्स्टिटचूट फॉर ॲडल्ट एज्युकेशन, एज्युकॅशनल सेटल्मेंटस् ॲसोसिएशन, वुइमेन्स इन्स्टिटचूटस् रूरल कम्युनिटी कौन्सील्स्, नॅशनल ॲडल्ट स्कूल युनियन, युनिव्हर्सिटी एक्सटेन्शन सर्व्हिस, ब्रिटिश ड्रामालीग, व्हिलेज कॉलेज मुव्हमेंट (Village College Movement) इ. संस्था कार्य करतात. या ग्रामीण महाविद्यालयात शिशुविहारापासून सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय केली जाते. सर्वांना मुक्तद्वार प्रवेश आहे. या संस्थाही परिपूर्ण होण्याचा प्रयत्न करीत आहेत. १९३० मध्ये या प्रकारचे महाविद्यालय प्रथम स्थापन झाले. पुढील काळात अनेक स्थापन झाली.

वसतिगृहयुक्त महाविद्यालयेही या क्षेत्रात काम करतात. नोकरी करणाऱ्यांची राहाण्याची व शिक्षणाची व्यवस्था केली जाते. ऑक्सफर्ड विद्यापीठाचे रस्किन कॉलेज हे या प्रकारचे पहिले महाविद्यालय. डेन्मार्क व स्वीडनमधील पीपल्स् हायस्कूलच्या धर्तीवर, पीपल्स् कॉलेजेस्देखील अस्तित्वात आहेत.

युवक सेवा :

इंग्लंडमधील युवकांची सर्वांगीण उन्नती व्हावी म्हणून अनेक योजना हाती घेतलेल्या आहेत. विशेषत: दुसऱ्या महायुद्धानंतर अशा तऱ्हेच्या प्रयत्नांची अनेक बाजूंनी वाढ झाली. या वेळी सर्व जगातील युवकांचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे झाले होते. इथेही ती गुंतागुंत जाणवू लागली. स्वयंस्फूर्त संघटनांनी या कार्यात महत्त्वाचा वाटा उचलला. १९३९ मध्ये शिक्षण मंत्र्याला सल्ला देण्यासाठी नॅशनल यूथ कमिटी स्थापन करण्यात आली. पुढे ही समिती यूथ ॲड्व्हायझरी कौन्सील म्हणून ओळखली जाऊ लागली. पुढे वेल्श यूथ कमिटी अस्तित्वात आली. पुढील संघटनाद्वारा युवक सेवेचे काम केले जाते. बालवीर व वीरबाला संघटना, कॅडेट् मुव्हमेंट (लष्करात प्रवेश घेण्यासाठी) विविध प्रकारची मंडळी (Clabs) विविध कामे करतात. शिक्षण मंत्रालय या चळवळींचे नियंत्रण करून मार्गदर्शन करते. लोकल ॲथॉरिटीज आपापल्या क्षेत्रात प्रशासनाचे काम या संदर्भात करतात.

त्यांनी युवकसेवा संघटक नेमलेले असून त्यांच्यामार्फत हे काम चालते. चर्चेस, राजकीय पक्ष, वाय्. एम्. सी. ए., वाय् डब्लू. सी. ए. इ. अनेक संघटना या कार्याशी निगडित आहेत.

राष्ट्रीय पातळीवर शिक्षण मंत्रालय व्यवस्थापनाचा किंवा प्रारंभीचा खर्चाची सोय करते. लोकल ॲथॉरिटीज जागा उपलब्ध करून आणि खर्चाचा ५० टक्के वाटा उचलून सहाय्य करतात. नाट्यप्रयोग, उत्सव, प्रदर्शने, संगीत मेळावे, क्रीडास्पर्धा इ. अनेक उपक्रम हाती घेतले जातात. प्रौढांसाठी क्रीडांगणे, पोहण्याचे तलाव, मंडळे इ. सोयी केल्या जातात. त्याचप्रमाणे ग्रंथालये, वाचनालये इ. सोयही केली जाते. लोकल ॲथॉरिटीज याही कामात महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

अशा प्रकारच्या उपक्रमांची आपल्याकडे वाण आहे. ग्रामीण भागाच्या दृष्टीने कितीतरी उपक्रम हाती घेता येतील.

० ० ०

८ पूरक शैक्षणिक सोयी

खास सुविधा

प्रत्येक शिकू इच्छिणाऱ्या अधिकृत (Normal) मुलांची, युवकाची आणि प्रौढाची सोय इंग्लंडमध्ये करण्यात आलेली आहे त्याचप्रमाणे विकृत (Abnormal), अपंग, मानसिक दृष्ट्या दुर्बल, अनाथ, गुन्हेगार प्रवृत्तीकडे झुकलेली, अनिकेत, अशा अनेक प्रकारच्या अवस्थेत असलेल्या मुलांची सोय करण्याची पराकाष्ठा इंग्लंडमधील कल्याणकारी शासनाने केलेली आहे. शालेय वैद्यकीय आणि आरोग्य सेवा, मधल्या वेळचे खाणे, मानसोपचार व्यवस्था, युवक रोजगार सेवा, इ. अनेक खास सोयी उपलब्ध आहेत. त्याचबरोबर शैक्षणिक संशोधन, अपंग शिक्षण केंद्रे, शिक्षणविषयक कल्याणकारी सेवा (Education welfare) अशा

सोयीही उपलब्ध आहेत. १९४४ च्या कायद्याने अशा विविध प्रकारच्या सोयींची काटेकोर आणि तपशीलवार व्यवस्था सूचित केलेली आहे.

वैद्यकीय व आरोग्य सेवा

वैद्यकीय अधिकारी नेमून मुलांची तपासणी करण्याचा उपक्रम १८९० साली लंडन येथे व १८९३ साली ब्रॅडफर्ड येथे करण्यात आला. बोअर वॉर नंतर (Boer War–1899 to 1902) पाहाणीत आढळले की मुलांची शारीरिक तपासणी करणे अगत्याचे आहे. १९०७ मध्ये कायद्याने प्राथमिक शाळातींल मुलांची वैद्यकोय तपासणी करण्याची आवश्यक व्यवस्था केली गेली. तदनुरूप १९०८ मध्ये नॅशनल कंपल्सरी सिस्टिम ऑफ् मेडिकल इन्स्पेक्शन सुरू झाली. १९१८ च्या कायद्यान्वये ही योजना नॉर्मल शाळा व माध्यमिक शाळांना लागू करण्यात आली. १९२१ च्या कायद्याने प्राथमिक शाळात तपासणीवरोबर औषधपाण्याची व्यवस्था करण्यात आली. १९४४ च्या कायद्याने मोफत तपासणी व उपचार व्यवस्था अमलात आली. लोकल अँथॉरिटीजचा मुख्य आरोग्याधिकारी शाळातील या कामाची जबाबदारी पार पाडतो. त्याला अनेक आवश्यक मदतनिसांचे साहाय्य होते. आरोग्य मंत्रालयाचा आरोग्याधिकारी हा शाळांचाही मुख्य अधिकारी असतो. खासगी डॉक्टर्सचे संपूर्ण सहकार्य या कामी मिळते.

मधल्या वेळचे खाणे

विव्हरिज अहवालानुसार (Beveridge report) सर्व शाळातून खाणे पुरविले जाते. पूर्वी मुलांच्या मातांना भत्ता देण्याची प्रथा होती. त्याऐवजी प्रत्यक्ष खाणे पुरविण्यात येते. शाळेत त्यासाठी स्वयंपाकघराची तरतूद केली जाते. सरकार या कामी निधी उपलब्ध करून देते. स्कूल मील्स् ऑरगनायझर, मुख्य शिक्षणाधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाने व आपल्या अनेक सहकाऱ्यांच्या वतीने ही योजना राबवितो. या योजनेचे चांगले परिणाम दिसून येत आहेत.

अपंग मुलांचे शिक्षण

१९४४ च्या कायद्यानुसार शारीरिक व मानसिक दृष्ट्या अपंग मुलांची सोय अधिक काटेकोरपणे होऊ लागली. या मुलांच्यासाठी खास शाळा चालविण्याची जबाबदारी लोकल ॲथॉरिटीजवर टाकण्यात आली आहे. अंध, मूक-बधिर, अशक्त, मधुमेहपीडित, बुद्धीने मागासलेले, झटके येणारे, तोतरे, अशा सर्व प्रकारच्या उणीवांनी ग्रस्त झालेल्या मुलांची खास शाळांतून देखभाल व शिक्षण केले जाते. बाल गुन्हेगारांना सुधारण्याचे काम बाल-सुधारघरे करतात. बाल-गुन्हेगार-कोर्ट, चर्चेस, सामाजिक संस्था इ. अनेक संघटना या कार्याशी निगडित आहेत. खास मानसोपचार तज्ज्ञ नेमून त्यांच्या द्वारे विविध मानसिक उणीवांवर उपाय केले जातात. त्यासाठी खास बाल-उपचार-मार्गदर्शन केले. (Child guidance. Clinic) काम करतात.

संशोधन प्रकल्प

नॅशनल फौंडेशन फॉर एज्युकेशन रिसर्च ही संघटना विद्यापीठे, लोकल ॲथॉरिटीज व शिक्षक यांच्या प्रतिनिधीद्वारे काम करते. या संलग्न संस्था संयुक्तपणे खर्चाचा भार उचलतात. या संस्थेचा मुख्य निर्देशक (Director) संशोधन प्रकल्पांची आखणी करतो. अनेक पातळींवरून या कामी साहाय्य मिळते.

युवक रोजगार योजना

शिक्षण मंत्रालय व श्रम मंत्रालय संयुक्तपणे युवकांना रोजगार मिळवून देणाऱ्या योजना अमलात आणतात. सेंट्रल यूथ एम्प्लॉयमेंट एक्सिक्यूटीव्ह या संघटनेद्वारे देशभरचे काम चालते. प्रत्येक क्षेत्रात यूथ एम्प्लॉयमेंट ऑफिसर असून तो युवकांना मार्गदर्शन करतो.

सुविहीत शिक्षण योजना

घर आणि शाळा यांच्यातील संबंध या संघटनेद्वारे जोपासले जातात. पालकांच्या आणि मुलांच्या अनेक समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. मुलांचे पुनर्वसनही या संघटनेमार्फत केले जाते.

० ० ०

अमेरिका

१. इतिहास व परंपरा

२. शैक्षणिक प्रशासन

३. पूर्व–प्राथमिक व प्राथमिक शिक्षण

४. माध्यमिक शिक्षण

५. विद्यापीठास उच्च शिक्षण

६. शिक्षकांचे प्रशिक्षण

७. व्यवसाय मार्गदर्शन

८. प्रौढ, कामगार आणि युवक शिक्षण

९. आंतराष्ट्रीय सामंजस्य शिक्षण

१०. प्रमाणीकरण आणि मूल्यमापन पद्धती



१ इतिहास व परंपरा

पार्श्वभूमी :

जगात आज जी दोन प्रचंड सामर्थ्यशाली राष्ट्रे आहेत त्यांपैकी संयुक्त संस्थाने (युनायटेड स्टेट्स ऑफ् अमेरिका) हे एक आहे. मानवाची वैज्ञानिक प्रगती केवढी होऊ शकते याचे प्रत्यंतर अनेक विक्रम करून या देशाने सिद्ध केले आहे. जगातील लोकशाही परंपरेचा श्रेष्ठ पाठीराखा म्हणून साऱ्या जगाचे आशास्थान हा देश झालेला आहे. केवळ दोनशे वर्षांची परंपरा लाभलेली असूनही जीवनाच्या सर्व क्षत्रात या देशाने अभूतपूर्व पराक्रम केलेले आहेत. सुवत्ता किती आणि केवढी असू शकते याचे प्रत्यंतर क्षणोक्षणी इथे घडते. अमेरिका म्हणजे मूर्तिमंत आधुनिकता. अशा या संपन्न राष्ट्रात शिक्षणाच्या काही लोकशाही परंपरा दृढमूल झालेल्या आहेत शिक्षण प्रणालीचे ठळक विशेष असे (१) या देशाची घटना–संघटना (Fedaeral) स्वरूपाची असूनही शिक्षणाचे केंद्रीकरण केले गेलेले नाही. शिक्षण ही घटक राज्यांनी आपल्या स्थानिक संस्थांच्याकडे सोपविलेली बाब आहे. संपूर्ण विकेंद्रीकरण आणि लोकशाही मनोवृत्तीचे संगोपन, प्रयोगशील वृत्ती यांचे रक्षण (२) दक्षिणेकडील राज्यात आणि एकूण सर्व राज्यांतच ज्या विविध धार्मिक परंपरा जोपासल्या गेल्या आहेत त्यांना मध्यवर्ति सत्तेबद्दल सतत आशंका वाटत असल्याने, आपल्या स्वायत्ततेला (Autonomy) जपण्याची धडपड सर्वत्र दिसते. शिक्षणाची स्वायत्तता जपण्याची काटेकोर वृत्ती प्रमुख लक्षण. (३) कॅथोलिक, प्युरिटन आणि इतर पंथांनीही, आपल्याला योग्य वाटेल असे शिक्षक नेमण्याचा अधिकार. स्वातंत्र्य, प्राणपणाने जपले आहे. स्थानिक प्रशासन हे वैशिष्ट्य जाणवते.

आरंभीचे शिक्षण

३,०२२,३८७ चौरस मैलाचे क्षेत्र असलेला हा देश कोलंबसाने शोधून काढला. भारताच्या शोधासाठी निघालेल्या कोलंबसाने या देशाचे अस्तित्व उघडकीस आणले. तेव्हापासून युरोपमधील लोकांनी येथे वसाहती स्थापण्यास प्रारंभ केला. सहाजीकच येथील समाजजीवनाला आणि संस्कृतीला युरोपीय

वळण मिळाले. आर्थिक दुरावस्थेमुळे सर्वांना शिक्षण घेणे शक्य नव्हते. सुखवस्तू लोक थोडे फार शिकत आणि काहींनी तर आपली मुले युरोपात शिक्षणासाठी धाडली. १७ व्या शतकात खासगी मालकी असलेल्या संस्था निघाल्या. वुल्यम कॉलेज, मेरी कॉलेज इ. काही संस्था प्रसिद्ध आहेत. पण सुखवस्तू लोकांनाच त्या ठिकाणी शिक्षण घेणे परवडत असे. कालांतराने समता आणि लोकशाही या तत्त्वानुसार शिक्षण द्यायला सुरुवात झाली. धर्म, वर्ण, गरीब, श्रीमंत असा कोणताही भेदाभेद न करता मुलामुलींना प्रारंभीचे शिक्षण मिळू लागले. पण खरा जाणवण्यासारखा बदल १९ व्या शतकाच्या प्रारंभापासून होऊ लागला. दुसरे स्वातंत्र्य युद्ध या काळात झाले आणि त्याच्या मुख्य प्रेरणा समता व लोकशाही समाज निर्मिती या होत्या. शिक्षणाच्या नव्हे तर सर्व क्षेत्रात प्रचंड घडामोडी सुरू झाल्या. अनेक राज्यांनी शिक्षण विषयक योजना हाती घेतल्या आणि आर्थिक साहाय्य देण्यास सुरुवात केली. १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत युरोपीय तत्त्वज्ञान, भाषा, वाङ्मय, हे शिकविण्यावर भर होता. देशाची अर्थ-व्यवस्थाही कमकुवत होती. शास्त्र आणि तंत्र विद्या उपेक्षित होती. या रूढ शिक्षणाचा दैनंदिन जीवनाच्या विकासासाठी आणि सुबत्ता निर्माण करण्या-उपयोग होत नाही या जाणिवेने शिक्षणाला नवे वळण मिळाले. शास्त्र, तंत्रविद्या आणि संशोधन यांवर भर देऊन नवा अभ्यासक्रम तयार करण्यात आला. नव्या संस्था स्थापन करण्यात आल्या. इंग्लंड, फ्रान्स यांसारख्या देशांत औद्योगिक क्रांतीने घडवून आणलेल्या बदलाचा या देशावर खोल परिणाम झाला. अमेरिकेतील शिक्षणात आमूलाग्र बदल घडवून आणला खरा पण काही मूलभूत सूत्रे सदैव पाळली गेली. ही सूत्रे म्हणजे अमेरिकन शिक्षणाची तात्त्विक बैठक होय. समता आणि लोकशाही यांच्या बळकट पायावर ही सूत्रे तयार करण्यात आली आहेत.

शिक्षणामागील भूमिका

(१) जीवनात प्रत्येक व्यक्तीला अत्युच्च यश मिळवून अधिकाधिक विकास करता यावा यासाठी त्याची ज्ञानविषयक ओढ सतत जागृत ठेवणे, व सतत नवे ज्ञान देण्याची व्यवस्था करणे. (२) मानवता आणि मानवाचे

कल्याण साधायचे असेल तर खासगीं आणि सार्वजनिक कार्यात सहकार्याने काम करण्याची वृत्ती वाढविणे. मानवता, समता आणि सहकार्य या गुणांच्या विकासावरच लोकशाहीचे यश अवलंबून आहे. (३) वैयक्तिक सुबत्ता आणि सामाजिक प्रगती यासाठी विविध व्यवसायांचे तांत्रिक आणि औद्योगिक शिक्षण रावविणे. व्यक्तिगत जीवन आणि सामाजिक जीवन संपन्न करण्यासाठी, महत्त्वाकांक्षा सफल करण्यासाठी भरपूर परिश्रम आणि कष्ट करण्याच्या वृत्तीची जोपासना करणे. (४) नीतिमान, कष्टाळू, सहकार्य करणारा असा नागरिक निर्माण करण्याचे शिक्षण देणे. आपले कर्तव्य पूर्ण पार पाडण्याच्या वृत्तीच्या विकासावर सामाजिक यश अवलंबून आहे याची जाणीव. (५) शाळेतील शिक्षणाला पूरक अशा व्यापक लोकशाही वृत्तीच्या संगोपनासाठी अनेक उपक्रमांचा वापर करणे व त्याचा लाभ सर्वांना देणे. (६) लोकशाहीस शिक्षणाचे केंद्रीकरण उपयोगी ठरत नाही म्हणून संपूर्ण विकेंद्रीकरण करून स्थानिक पातळीवर शिक्षणाचा विकास घडवून आणण्याचे धोरण. (७) धर्मशिक्षण संकुचित दृष्टीने देण्यात येत नाही. धर्मातीत स्वरूपच शिक्षणाचे आहे. ज्या कोणाला विशिष्ट धर्म–शिक्षण हवे असेल त्यांनी तशा संस्थात जाण्याची मुभा. पण धर्मातीत वृत्तीला प्राधान्य देण्याचे धोरण, (८) लोकशाही सुदृढ आणि मजबूत करण्यासाठी सार्वत्रिक शिक्षणाची सोय. ७ ते १६ वर्षांपर्यंत सर्व मुलामुलींना सक्तीचे शिक्षण. काही राज्यांतून–ही कमाल वयोमर्यादा १७ किंवा १८ ही आहे. अनेक राज्यांतून मधल्या वेळचे खाणे, वैद्यकीय मदत, जाण्या–येण्याची सोय, गणवेष इत्यादी सोयी विनामूल्य केलेल्या आहेत.

या तात्त्विक भूमिकेमागे समता, बंधुता आणि स्वातंत्र्य ही मूलभूत मार्गदर्शक तत्त्वे अनुसरली जातात. प्रत्येक राज्यात सर्व प्रकारचे शिक्षण देणाऱ्या संस्थांचे जाळे विणलेले आहे. प्रचंड औद्योगीकरण आणि तंत्र-ज्ञानाचा विकास यांमुळे सर्व आधुनिक साधनांचा वापर मुक्त हस्ताने केला जातो. प्रयोगशीलतेची वृत्ती मुरल्यामुळे सर्व थरांतील शिक्षणाच्या पातळीवर असंख्य प्रयोग सुरू असतात. मूल्यमापन, चाचण्या, विविध कसोट्या यांचा सतत वापर करून मुलाचे यथार्थ मूल्यमापन केले जाते.

अपंग, मूक–बधीर, अंध, बौद्धिकदृष्टचा मागासलेले, अशा सर्व प्रकारच्या मुलांच्यासाठी शिक्षणाच्या सोयी असून त्यांचे–पुनर्वसन (Rehabilitation) करण्याचे सतत प्रयत्न सुरू असतात. प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र, निर्भय, प्रयोगशील वृत्तीची, साहसी, सहकार्यास उत्सुक आणि स्वतंत्र्य लोकशाहीसाठी वाटेल तो त्याग करण्यास तयार व्हावी हाच मुख्य उद्देश येथील शिक्षणप्रणालीचा प्राण आहे.

० ० ०

२ शैक्षणिक प्रशासन

घटनेचे स्वरूप :

१७८९ मध्ये जी घटना देशासाठी तयार करण्यात आली, त्यात राज्ये आणि मध्यवर्ती सरकार (Federal Government) यांच्या अधिकार-कक्षा ठरवून दिल्या. सर्व राज्यांत रूढ असलेल्या शिक्षणप्रणालीत फरक पुष्कळच दिसून येतो. शिक्षणाबाबत राज्ये आपले धोरण आखून अंमल-बजावणी करतात. मध्यवर्ती शासनाचे नियंत्रण त्यावर नसते. असे असले तरी सर्व राज्यांतील अमलात आणल्या जाणाऱ्या शिक्षणामागील प्रेरणा आणि भूमिका सारखीच आहे. त्यामुळेच आपण या देशातील शिक्षणाचे वर्णन राष्ट्रीय शिक्षण प्रणाली असे करतो. सर्वत्र फरक दिसतो ती जिवंत लोकशाहीची, प्रयोगशीलतेची खूण आहे. फेडरल शासन शिक्षणाच्या विकासाच्या कामी नेहमी दक्ष असते. १८ व्या शतकात जी मोकळी जमीन मध्यवर्ती शासनाच्या ताब्यात होती, ती शाळांना देण्यात आली. हेतू असा की शिक्षणाचा प्रसार व्हावा व मोफत शिक्षण देता यावे. अमेरिकेत ही योजना लँड् ग्रँट (जमिनीच्या रूपाने अनुदान, Land Grant) या नावाने प्रसिद्ध आहे. १९ व्या शतकाच्या शेवटी, यादवी युद्ध चालू असताना (Civil War) मॉरील कायदा (The Morril Aet) स्वीकारण्यात येऊन शेती आणि तंत्रज्ञान शिकविणाऱ्या शाळांना जमिनींचे अनुदान देण्यात आले.

तसेच १९ व्या शतकातील दुसऱ्या दशकात स्मिथ ह्यूग कायद्यान्वये (The Smith Hugue's Act) मध्यवर्ती शासनाने तांत्रीक. व्यावसायिक, शेती हे विषय उच्च माध्यमिक शिक्षणात यावेत म्हणून आर्थिक साहाय्य दिले. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी (१९३९ ते १९४५) जमीन अनुदानाचा अधिकार मध्यवर्ती केंद्राकडून राज्यांना देण्यात आला.

फेडरल सरकारचे उपक्रम :

निरनिराळे शैक्षणिक उपक्रम हाती घेण्यासाठी मध्यवर्ती शासनाने स्वतंत्र शिक्षण खाते निर्माण केले. १९३९ साली हे खाते मध्यवर्ती सुरक्षा विभागाशी (Federal Security Ageney) जोडण्यात आले. मध्यवर्ती व्यावसायिक शिक्षण मंडळ (The Central Board of Vocational Education) १९१७ साली स्थापन करण्यात आले. शेती खाते शेतीच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत देऊ लागले. १९२० पासून ही आर्थिक मदत देण्याचा अधिकार राज्यांच्याकडे सोपविण्यात आला. १९१२ मध्ये मध्यवर्ती व्यापार आणि मजूर खात्यांनी मुलांच्या खास शिक्षणासाठी एक मंडळ स्थापन केले (Children's Bureau of Education) बालकल्याण, पिके; जमिनीची मशागत या कामाकडे या मंडळाने लक्ष पुरविले. मध्यवर्ति केंद्र अनेक खासगी व सरकारी संस्थांना शिक्षण प्रसारासाठी भरपूर आर्थिक साहाय्य देत असते. १९३३ मध्ये नागरी संरक्षण संघटना (Civilian Conservation Corps) स्थापन करण्यात येऊन बेकार युवकांना व्यावसायिक शिक्षण देणे व त्यांना नोकऱ्या मिळवून देणे यासाठी स्थापन करण्यात आली. १९३५ मध्ये राष्ट्रीय युवक सेवा प्रशासन (National Youth Administration) ही संघटना स्थापन करण्यात येऊन, शिक्षण चालू असताना विद्यार्थ्यांना अर्ध-वेळ काम देण्याची योजना या संघटने-मार्फत आखण्यात आली. परंतु लोकांचे सहकार्य जसे लाभावे तसे न मिळाल्याने आठ ते नऊ वर्षांतच ही संघटना बंद करण्यात आली.दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सुव्यवस्था व संरक्षण यांचे शिक्षण देण्यासाठी सार्वजनिक प्रशासन व नागरी हवाई अधिकार मंडळ (Public Works Administralion व Civil Aeronautics Authority) या दोन संघटना स्थापन करून

त्यांच्या वतीने चांगले शिक्षण सर्व नागरिकांना देण्यात आले. दुसऱ्या महायुद्धानंतर नोकरीतून मुक्त झाले त्यांच्यासाठी उपयुक्त काम, युद्धात नोकरी करणाऱ्यांच्या पुनर्वसनाचे कामाचा कायदा (Servicemen's Readjustment Aet, 1944) १९४४ करून करण्यात आले. बेकार व्यक्तींना विविध व्यवसायाचे शिक्षण देण्यात आले.

मध्यवर्ती सरकारचे शैक्षणिक उपक्रम

फेडरल शासनाने अनेक शैक्षणिक उपक्रम हाती घेतलेले आहे. त्यातील काही प्रमुख– (१) आर्थिक दृष्टीने राज्यांना साहाय्य करण्यात येते. काही अनुदानाचे प्रकार असे– कर्ज पुरवठा, शेकडा प्रमाणात शिक्षणासाठी; अनुदान रकमा, उद्योग–व्यवसाय–पुनर्वसन अनुदान, फॉरेस्ट रिझर्व्ह व मिनरल अनुदान. शेती, तंत्रविद्या जमिनीचे अनुदान, सॅलीन ग्रँट, सेक्शन ग्रँट, स्वॅम्प लँड् ग्रँट, ही अनुदाने राज्यांच्या मार्फत शाळा, महाविद्यालयांना मिळतात. (२) ज्या ठिकाणी फेडरल शासन शैक्षणिक उपक्रम हाती घेते अशा ठिकाणी 'एरिया ग्रँट' दिली जाते. मध्यवर्ती अधिकारी, खासगी संस्था, व राज्यांच्या प्रतिनिधीमार्फत अनुदान देण्याची व्यवस्था. (३) अमेरिकेतील रेड इंडियन्सना शिक्षणाच्या सर्व सोयी केल्या जातात. (४) मध्यवर्ती नोकरांना प्रशिक्षण देण्याची योजना राबविली जाते. (५) इतर राष्ट्रांच्या सहकार्याने शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. (६) सर्व राज्यांतील शिक्षणविषयक माहिती प्रकाशित करून त्याचा प्रसार करणे. मध्यवर्ती शासन काही वेळा विशिष्ट अटी घालून तर काही वेळा मुक्त अनुदाने देते. सर्वत्र एकसूत्रीपणा राखण्याचा प्रयत्न केला जातो.

शिक्षण कार्यालय–(Education office)

१९ व्या शतकाच्या मध्यास शिक्षणात सुधारणा करण्यासाठी मध्यवर्ती शासनाने एक शिक्षण कार्यालय स्थापन केले. १८६७ साली स्थापन केलेल्या या विभागास शिक्षणखाते (Education Department) हे नाव होते. पुढे १९३० मध्ये त्यास शिक्षण कार्यालय हे नाव दिले गेले. हेन्री बर्नार्ड यास पहिले शिक्षण आयुक्त (Education Commissioner) नेमण्यात

आले. आधी स्वतंत्र असलेले हे कार्यालय मग संरक्षण विभागाशी जोडले गेले आयुक्ताची नेमणूक राष्ट्राध्यक्ष करीत आणि त्या नेमणुकीला ठराविक मुदत नव्हती. निग्रो, रेडइंडियन्स यांच्या शिक्षणाची व्यवस्था या कार्यालयावर सोपविली होती. कोलंबिया, हवाई बेटे, अलास्का इ. राज्यांतील शिक्षण व्यवस्था पाहिली जाई. आंतर–राज्य शिक्षणाच्या सोयीकडे लक्ष पुरविले जात असे. शिक्षणात, शिक्षकांच्या प्रशिक्षणात सर्व तऱ्हेच्या सुधारणा करणे, आकडेवारी प्रकाशित करणे इ. कामे सोपविली गेली, दुसऱ्या महायुद्धात मध्यवर्ती संरक्षण शिक्षणाची योजना सोपविली गेली. युद्धविषयक प्रशिक्षण, व्यावसायिक शिक्षण योजनांचा प्रसार, बेकारांना कामे मिळवून देणे, राष्ट्रीय युवक संघटनेची निर्मिती, नागरी संरक्षण इ. कामे सोपविली गेली. आपल्या शैक्षणिक कारभारावर नियंत्रणे येतात या शंकेने राज्यांनी सरळ मध्यवर्ती केंद्राशी व्यवहार सुरू केला. त्याचा परिणाम हे कार्यालय फक्त देखरेख करणारे व माहिती, आकडेवारी प्रकाशित करणारे झाले.

राज्य शिक्षण मंडळ (The State Education Board)

प्रत्येक राज्यात एक राज्य शिक्षण मंडळ असते. घटनेने राज्यांच्याकडे शिक्षणविषयक सर्व जबाबदारी सोपविली आहे. राज्यांनी आपल्या अधिकारात ही जबाबदारी स्थानिक मंडळांच्याकडे (Local Baords) सोपविली आहे. ह्या स्थानिक मंडळांच्या कारभाराबाबत लोकांच्यात असंतोष आहे. म्हणून राज्यसरकारे शिक्षणासंबंधीचे सर्वसाधारण नियम तयार करतात, अभ्यासक्रमाचा आराखडा सुचवितात आणि शिक्षणविषयक सुधारणा घडवून आणण्यास मार्गदर्शन करतात. या स्थानिक मंडळामार्फत शिक्षणाचा कारभार पाहिला जातो. शिक्षण आयुक्त (कमिशनर) हा ण्मंडळाचा अध्यक्ष असतो. राज्य शिक्षण खाते त्याला सर्व साहाय्य करते.

ेल जिल्हा पातळीवर, कौंटी मंडळे (County Boards) असतात.
ॉफ स्कूल्स हा या कौंटी बोर्डचा चेअरमन असतो. याच्या
शिप्स, स्कूल बोर्डे व लोकल बोर्डे शिक्षणाचे काम पाहातात.

स्थानिक शाळा मंडळ (The Local School Board)

पब्लिक स्कूल्स् या प्रकारच्या शाळांना अमेरिकेत फार महत्त्व आहे. ते दोन मुख्य कारणासाठी. बाहेरून आलेल्या लोकांनी या पब्लिक स्कूल्स स्थापन केल्या. त्यामागे हेतू असा होता की विशिष्ट परंपरा, हक्क धर्म भावना यांचे रक्षण व्हावे. या शाळा प्रारंभी मिशनरी आणि इतर धार्मिक नेते यांच्या देखरेखीखाली चालत असत. या शाळांचा सर्व खर्च हे संबंधित लोक करीत. पुढे मग स्थानिक मंडळे (Local Boards) स्थापन करण्यात आली व ही मंडळे या शाळांचा कारभार पाहू लागली. लोक मंडळाच्या सभासदांची निवड करीत. हे सभासद आपल्यातून एक स्थानिक मुख्याधिकारी (Local Superintendent) निवडीत व तो मुख्य अधिकारी या नात्याने सर्व कारभार पाही. फक्त नऊ सभासद घेण्याची अट या मंडळावर आहे. सर्व राज्यातून सुमारे दीड लाख स्थानिक मंडळे हा शाळांचा कारभार पाहातात. अभ्यासक्रम इच्छेनुसार मंडळे ठरवितात. व्यावसायिक शिक्षणाचे विषय आणि शिक्षणाचा दर्जा सर्वत्र सारखे राहावेत यापुरते राज्य शिक्षण प्रशासनाचे नियंत्रण आहे. वैकल्पिक विषय, धर्मशिक्षण, अभ्यासानुवर्ती उपक्रम इ. बाबतीत पूर्ण स्वातंत्र्य आहे. काही राज्यात धर्मशिक्षणाची सक्ती आहे तर काही राज्यात बंदी आहे. राष्ट्राबद्दल अभिमान वाढवितील असे विषय आवर्जून अंतर्भूत केले जातात. प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास हे येथील शिक्षणाचे सूत्र आहे. त्यासाठी सर्वत्र पूर्ण स्वातंत्र्याचे वातावरण निर्माण केले जाते. एक विशिष्ट राजकीय मतप्रणाली सर्वत्र सक्तीने शिकविली जात नाही हे फार महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. (१) शिक्षणाची बोध भाषा (Medium) सर्वत्र इंग्रजी. (२) सर्वत्र समान दर्जाचे शिक्षण साहित्य. (३) लोकशाहीचे संगोपन, संवर्धन हे मुख्य उद्दिष्ट. प्राथमिक, माध्यमिक, विद्यापीठीय आणि व्यावसायिक अशा पातळ्यांवर शिक्षण दिले जाते. तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाची सोय माध्यमिक व [illegible] शिक्षण पातळीवर आहे. राज्य आणि मध्यवर्ती शासन स्वतंत्र [illegible] व्यावसायिक शिक्षण देण्याची सोय करतात. शिक्षणावर कर [illegible] नियंत्रण नसल्याने, सर्व राज्यांतून शिक्षणाचे विविध प्रकार

शिक्षणाच्या सर्व क्षेत्रात प्रयोगशीलतेला फार महत्त्व दिले जाते. स्थानिक लोक शिक्षणावरील खर्चाचा वाटा मुख्यत्वे करून उचलतात. राज्य वा मध्यवर्ती शासन पूरक सहाय्य देतात. बहुतांश पब्लिक शाळांतून शिक्षण मोफत, सर्वसामान्य प्रकारचे आणि धर्मातीत वृत्तीने दिले जात. शिक्षणासाठी प्रवेश देताना जात–पात, रंग, सामाजिक दर्जा असा कसलाही भेद केला जात नाही.

राज्यातील शिक्षणाचे प्रशासन

अमेरिकेत प्रत्येक राज्यात एक मुख्य शाळाधिकारी (Chief school officer) असतो. याच अधिकाऱ्यास निरनिराळचा नावाने–ओळखले जाते. स्टेट कमिशनर ऑफ् एज्युकेशन, स्टेट कमिशनर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन असेही म्हणण्याची प्रथा आहे. या अधिकाऱ्याची नेमणूक निरनिराळचा रीतीने होते, काही राज्यात गव्हर्नर नेमतो तर इतरत्र स्टेट बोर्ड ऑफ् एज्युकेशनचे सभासद त्यांची निवड करतात. काही ठिकाणी निवड करून नेमणूक केली जाते. २५ राज्यांतून ४ वर्षे नेमणूक, तर उरलेल्या ५ राज्यातून १ ते ६ वर्ष अशा फरकाच्या मुदतीने नेमणूक केली जाते. बहुतेक राज्यात हाच अधिकारी कार्यकारी अधिकारी (Fxecutive officer) असतो, तर पन्नास टक्के राज्यांत हा बोर्ड आंफ् एज्युकेशनचा सेक्रेटरी असतो. राज्यातील शिक्षण खात्यामार्फत शिक्षणाचा कारभार पाहिला जातो. काही राज्यांत कारभार चांगला चालावा म्हणून विभागीय अधिकारी (Divisional officers) असतात. या सर्व अधिकाऱ्यांच्या साहाय्याने शिक्षणाचा कारभार चोख पाहिला जातो.

व्यवसाय शिक्षण मंडळ (Board of Vocational Education)

व्यावसायिक शिक्षणाचा योग्य विकास व्हावा म्हणून सात सभासदांचे हे मंडळ प्रत्येक राज्यात असते. सभासद संख्या क्वचित ३ किंवा १२ ही असू शकते. काही राज्यात गव्हर्नर नेमतात तर इतरत्र कायदेमंडळ हे सभासद निवडते. लोकमताचा कौल घेऊन पुष्कळ राज्यात हे सभासद

आले. आधी स्वतंत्र असलेले हे कार्यालय मग संरक्षण विभागाशी जोडले गेले आयुक्ताची नेमणूक राष्ट्राध्यक्ष करीत आणि त्या नेमणुकीला ठराविक मुदत नव्हती. निग्रो, रेडइंडियन्स यांच्या शिक्षणाची व्यवस्था या कार्यालयावर सोपविली होती. कोलंबिया, हवाई बेटे, अलास्का इ. राज्यांतील शिक्षण व्यवस्था पाहिली जाई. आंतर–राज्य शिक्षणाच्या सोयीकडे लक्ष पुरविले जात असे. शिक्षणात, शिक्षकांच्या प्रशिक्षणात सर्व तऱ्हेच्या सुधारणा करणे, आकडेवारी प्रकाशित करणे इ. कामे सोपविली गेली, दुसऱ्या महायुद्धात मध्यवर्ती संरक्षण शिक्षणाची योजना सोपविली गेली. युद्धविषयक प्रशिक्षण, व्यावसायिक शिक्षण योजनांचा प्रसार, बेकारांना कामे मिळवून देणे, राष्ट्रीय युवक संघटनेची निर्मिती, नागरी संरक्षण इ. कामे सोपविली गेली. आपल्या शैक्षणिक कारभारावर नियंत्रणे येतात या शंकेने राज्यांनी सरळ मध्यवर्ती केंद्राशी व्यवहार सुरू केला. त्याचा परिणाम हे कार्यालय फक्त देखरेख करणारे व माहिती, आकडेवारी प्रकाशित करणारे झाले.

राज्य शिक्षण मंडळ (The State Education Board)

प्रत्येक राज्यात एक राज्य शिक्षण मंडळ असते. घटनेने राज्यांच्याकडे शिक्षणविषयक सर्व जबाबदारी सोपविली आहे. राज्यांनी आपल्या अधिकारात ही जबाबदारी स्थानिक मंडळांच्याकडे (Local Baords) सोपविली आहे. ह्या स्थानिक मंडळांच्या कारभाराबाबत लोकांच्यात असंतोष आहे. म्हणून राज्यसरकारे शिक्षणासंबंधीचे सर्वसाधारण नियम तयार करतात, अभ्यासक्रमाचा आराखडा सुचवितात आणि शिक्षणविषयक सुधारणा घडवून आणण्यास मार्गदर्शन करतात. या स्थानिक मंडळामार्फत शिक्षणाचा कारभार पाहिला जातो. शिक्षण आयुक्त (कमिशनर) हा मंडळाचा अध्यक्ष असतो. राज्य शिक्षण खाते त्याला सर्व साहाय्य करते. व्यावसा... जिल्हा पातळीवर, कौंटी मंडळे (County Boards) असतात. मंडळ प्रत्येक ...ॅफ स्कूल्स हा या कौंटी बोर्डचा चेअरमन असतो. याच्या असू शकते. का... शिप्स, स्कूल बोर्डे व लोकल बोर्डे शिक्षणाचे काम पाहातात. सभासद निवडले

निवडले जातात. या मंडळावर शिक्षण क्षेत्रातील मंडळींना नेमण्याची प्रथा आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या मुख्याधिकाऱ्याची कामे पुढील स्वरूपाची असतात.

(१) अनुदानाचे वाटप व दर्जावर नियंत्रण. (२) संस्थांच्यासाठी किमान दर्जा ठरवून देणे, आकडेवारी व माहिती प्रसिद्ध करणे. (३) अभ्यासक्रम तयार करणे (४) शिक्षण-प्रशिक्षण महाविद्यालयांचा अभ्यासक्रम तयार करणे व प्रशस्तीपत्रे देणे. (५) अल्पसंख्याकांच्या शिक्षण सोयीकडे लक्ष देणे. (६) सार्वत्रिक, मोफत शिक्षणाच्या प्रसारासाठी गरजानुसार शाळा स्थापन करणे (७) काही राज्यात हा अधिकारी पाठ्यपुस्तके नेमतो. स्टेट बोर्डाचे अंदाजपत्रक व शिक्षणविषयक कार्यक्रम तयार करणे. (८) स्टेट बोर्डाचे कामकाजावर देखरेख, नियंत्रण. नोकर भरती या अधिकाऱ्याचे नावाने केली जाते. (९) कौंटी बोर्डस्, एज्युकेशनल टाऊनशिप्स्, स्कूल डिस्ट्रिक्टस् अशा संघटनांना मार्गदर्शन करणे, शिक्षण सुधारणेवर चर्चा. (१०) सर्वत्र समान शिक्षणाचा दर्जा राखणे ही महत्त्वाची जबाबदारी. ही व्यापक जबाबदारी पेलण्यास समर्थ अनुभव-संपन्न अशी व्यक्ती नेमणे हे आवश्यक असते व तशी ती नेमली जाते. स्टेट बोर्ड, एज्युकेशन ऑफिसर व एज्युकेशन डिपार्टमेंट यांच्यावर शिक्षणाची सर्व जबाबदारी असते.

स्वातंत्र्य, शिक्षणाचा समान, उच्च दर्जा, लोकांची सर्वांगीण प्रगती, सक्तीच्या शिक्षणाचे समान नियम, विविधतापूर्ण शिक्षण, असे काही समान घटक सर्व शैक्षणिक प्रशासनात आढळून येतात. स्थानिक मंडळांना सर्वाधिकार देण्यात आलेले असले तरी राज्य शिक्षण खाते आपल्या अधिकारात प्रगतीसाठी नियंत्रण करू शकते. केंद्रीकरण आणि विकेंद्रीकरण अशा योग्य संगमातून. योग्य दृष्टीतून, प्रगतीसाठी प्रशासन चालविणारा अमेरिका हा प्रयोगशील देश आहे.

० ० ०

३ पूर्व-प्राथमिक व प्राथमिक शिक्षण

शिशुजीवन महत्त्वाचे

रूसो, पेस्टॉलॉझी, फ्रोबेल यांच्यासारख्या शिक्षण तज्ज्ञांनी मुलाचे शिशुपण केवढे महत्त्वाचे असते व त्यावर पुढील जीवन कसे अवलंबून असते हे जगाला पटविले. अमेरिकेसारखा संपन्न देश या पूर्व-प्राथमिक क्षेत्रात आघाडीवर राहिला तर आश्चर्य नाही. प्राथमिक शिक्षण सुरू होण्याचे वय (रशियात ८, इंग्लंडमधे ५, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इटलीमध्ये ६) देशपरत्वे वेगवेगळे आहे. तीच गोष्ट पूर्व-प्राथमिक क्षेत्राची आहे. फ्रान्समधे ऑबरलीन (Oberlin) येथे १७६९ मध्ये पहिली नर्सरी शाळा उघडली गेली. स्कॉटलंडमध्ये रॉबर्ट ओवेनने १७९० मध्ये लानार्क येथे शिशुशाळा उघडली. युरोपात मग अशा शाळा स्थापन होऊ लागल्या. अमेरिकेत १८५६ साली निसकॉनसिन येथे पहिली नर्सरी स्थापन झाली. पण या क्षेत्राची खरी प्रगती व वाढ विसाव्या शतकात झाली. १९१९ मधे न्यूयॉर्कला पहिली शाळा निघाली व १९२० मध्ये कोलंबिया विद्यापीठात, शिशुशाळा शिक्षकासाठी प्रशिक्षण देण्याची सोय केली गेली. १९२० ते १९३० या कालखंडात, देशातील मंदीचे वातावरण व या शिक्षणाला विरोध. यामुळे फारशी प्रगती झाली नाही. नव्या डीन कायद्यामुळे (New dean Act) कायद्याने या क्षेत्राला चालना मिळाली व फेडरल शासन आर्थिक मदत दऊ लागले. १९४० च्या सुमारास ३ लाखाहून अधिक शाळा स्थापन झाल्या. झपाट्याने होणाऱ्या औद्योगीकरणाबरोबर या शाळांची गरज वाढून संख्या वाढली. यात स्त्री-कामगारांची फार मोठी सोय होती. पाळणाघरांनी स्त्रियांना निर्वेध काम करता येऊ लागले.

पूर्व-प्राथमिक व्यवस्था

अमेरिकेत मुलांची काळजी घेण्याचे कार्य तीन टप्प्यांत केले जाते. (१) गर्भावस्थेपासून १ वर्ष वयापर्यंत. (२) २ ते ३ वर्षे वयोमानापर्यंत. (३) ३ ते ५ किंवा ६ वर्षे पूर्ण होईतोपर्यंत. अगदी प्रारंभीच्या अवस्थेत

पालकांचे, विशेषत: स्त्रियांचे शिक्षण आधुनिक सर्व साधनांच्या द्वारे केले जाते. संगोपन, आरोग्यरक्षण, औषधोपचार, खेळ, स्वच्छता अशा विविध पैलूंची माहिती दिली जाते. शिक्षण आणि आरोग्य खात्यामार्फत मार्गदर्शक केंद्रावर हे शिक्षण दिले जाते.

सुधारलेल्या, औद्योगिक देशात आई–वडील दोघेही कामावर जातात. या दृष्टीने बाल संगोपनगृहात (Nursery) त्यांना चांगल्या सवयी, वृत्ती, यांचे संगोपन काळजीपूर्वक केले जाते. या बालगृहात संपूर्ण घराचे वातावरण निर्माण केले जाते. खाणे, पिणे, खेळ, विश्रांती यांची फार उत्तम सोय येथे असते मुले जणू आपल्या घरातच वाढत असतात. अमेरिकेत २ किंवा ३ वर्षापूर्वी खऱ्या अर्थात पूर्वप्राथमिक शिक्षण दिले जात नाही. १ किंवा १८ महिन्यापासून ४ वर्षेपर्यंत नर्सरीत ठेवण्याची व्यवस्था आहे. २५०० हून अधिक शाळा अमेरिकेत या प्रकारच्या आहेत. तीन प्रकारांनी ही बालगृहे किंवा बालोद्याने चालविली जातात. (१) स्थानिक संघटना, राज्य किंवा फेडरल शासनातर्फे. (२) खाजगी संस्था. (३) मिशनऱ्यांनी चालविली बालोद्याने. काही या प्रकारच्या शाळा सरकारी पद्धतीने चालविल्या जातात. जणू काही घरकुल (House System) पद्धतीच हीय. या शाळांतून मुलांना निरनिराळ्या प्रेक्षणीय ठिकाणी भेटीसाठी नेण्यात येते. या शाळांचा आर्थिक व्यवहार, दैनंदिन कारभार पालकांच्या सहकार्याने चालविला जातो. पैशाच्या मदतीबरोबर, पालक शाळांना वारंवार भेटी देऊन अनेक प्रकारे सहकार्य करतात. पालकांच्या मासिक सभेत मुलांच्या शिक्षणावर चर्चा होते. स्त्रियांचा या कार्यात मोठा वाटा असतो.

बालोद्यान (Kindergarten)

अगदी पहिली शैशवाची बाल संगोपनाची वर्षे संपल्यानंतर बालोद्याने शिक्षणाला सुरुवात होते. ३ ऱ्या वर्षानंतर प्रवेश दिला जातो व ५ किंवा ६ वर्षापर्यंत हे किंडर गार्टनचे शिक्षण दिले जाते. या ठिकाणी अनेक शैक्षणिक साधनांचा खेळांच्या रूपाने उपयोग केला जातो. हस्तव्यवसाय, सांघिक कामे, गाणी, खेळ, सहली अशा अनेक साधनांचा उपयोग करून

विविध विषयांची ओळख करून दिली जाते. मुलांच्या सर्जनशक्तीचा विकास करण्याचे प्रयत्न केले जातात. मुलांच्या शारीरिक आणि मानसिक बाढीसाठी उपाय केले जातात. आरोग्य रक्षणाची उत्तम व्यवस्था असते. १९ व्या शतकात सुरू झालेल्या बालोद्यान शाळांची चालू शतकात वेगानें वाढ झाली. या अवस्थेतील शिक्षण सक्तीचे नसले तरी ते फार लोकप्रिय व गरजेचे झाले आहे. अनेक खासगी संघटनांनी या प्रकारच्या शाळा चालविलेल्या आहेत. काही राज्यांतून या शाळांना स्थानिक आर्थिक मदतीबरोबर, राज्य शासनही अनुदान देते. सार्वजनिक बालोद्यान शाळांना राज्यशासन सर्व मार्गदर्शन करते.

साहाय्यक उपक्रम

घरातच मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक शासकीय व सामाजिक संस्था मार्गदर्शकाचे काम करतात. (१) शिक्षक–पालक संघ (२) आरोग्य खाते (३) संशोधन व आरोग्य उपचार केंद्रे अशा संघटनांमार्फत उपयुक्त काम केले जाते. फ्रोबेल, माँटेसरी या सुविख्यात पद्धतीबरोबरच काही पारंपारिक पद्धतीने (Conservative type) शाळा चालविल्या जातात· संपन्न औद्योगीक जीवनाने पूर्व–प्राथमिक शिक्षणाला अमेरिकेत फार मोठे स्थान मिळाले असून हा टप्पा प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा व उपयुक्त असा ठरला आहे.

प्राथमिक शिक्षण मूलभूत तत्त्वे

अमेरिकेत प्राथमिक शाळा आणि वर ज्यांचे विवेचन केले त्या बालोद्यान शाळा यांचा अतूट संबंध राखलेला आहे. येथे प्राथमिक शिक्षणाची काही मूलभूत उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून कार्य केले जाते. ही व्यापक उद्दिष्टे अशी : (१) मुलांना नागरिकत्वाचे पायाभूत शिक्षण. त्यासाठी चांगल्या सवयी रुजविण्याचे डोळस प्रयत्न. (२) मुलांच्यात सामाजिक प्रवृत्ती, समाजोपयोगी कामे करण्याची आवड, सहकार्य भावना, सहकार्याने काम करण्याची वृत्ती इ. गुण रुजविणे–म्हणजेच पर्यायाने मुलांचे सामाजीकरण (Soclalisatton) करणे यावर भर. (३) चांगल्या वर्तनाचे आदर्शभूत

दंडक पाळण्याची सवय, त्यासाठी लागणारी अनुकूल मनोवृत्ती तयार करणे, आणि ज्ञानविषयक मूलतत्त्वांची अत्यंत सोप्या भाषेत ओळख : जसे अवलोकन (Observation), पृथःकरण (Analysis), निवड (Selection) आणि उपयोजन (Application) या तत्त्वांची अनुभवांच्या द्वारा ओळख. (४) फावला वेळ आवडत्या छंदात खर्च करण्याची सवय. (५) एकमेकांशी चर्चा करून गोष्टी ठरवून अंमलात आणण्याची सवय रूजविणे. (६) आरोग्यविषयक आचार आणि नियम यांचे पालन (७) विविध खेळांपैकी एकाची निवड करून त्या खेळाची संपूर्ण माहिती मिळवून तो खेळ आनंदासाठी खेळण्याच्या भावनेचे संगोपन. (८) स्वतंतत्रपणे चर्चा, मतप्रदर्शन करण्याच्या स्वतंत्र वृत्तीचे संगोपन (The Spirit of freedom). (९) आपल्या वैयक्तिक विकास, सामाजिक विकास म्हणजे पर्यायाने राष्ट्रीय विकास यांच्यातील घनिष्ट संबंधाची जाणीव अंगी मुरविणे. त्यासाठी विधायक कामे (Constructive work) करण्याची सवय. (१०) दृक्–श्राव्य साधने, ध्वनिमुद्रण, चित्रपण, दूरदर्शन, इ. साधने हाताळणे, या साधनांच्याद्वारे माहिती मिळविणे इ. दैनंदिन कार्यक्रमावर भर. यावरून हे स्पष्ट होईल की लोकशाहीचे शिक्षणावर, आधुनिक दृष्टिकोण निर्माण करण्यावर आणि स्वातंत्र्य कल्पनेवर भर देऊन सारे प्राथमिक शिक्षण दिले जाते. ६ ते ८ व्या वर्गासाठी देण्यात येणारे शिक्षण प्राथमिक शिक्षण समजले जाते. यानंतर मुले सरळ माध्यमिक वर्गात जातात. या माध्यमिक शाळांना ग्रेड शाळा (Grade schools) आणि ग्रामर शाळा (Grammar sehools) असे म्हटले जाते. वर्षभराच्या अभ्यासावर वर्ग तयार केले जातात म्हणून ग्रेड शाळा व इंग्रजीचे व्याकरण, लेखन, वाचन, गणित या बरोबर शिकविण्यास सुरुवात होते म्हणून ग्रामर शाळा असे म्हटले जाते.

वर्ग रचना : कार्य पद्धती

अमेरिकेत प्राथमिक शिक्षणाचे वर्गात देण्यात येणारे शिक्षण वैशिष्टयपूर्ण असते. स्थानिक कल्पना आणि विचारप्रवाह यांचा फार मोठा प्रभाव

शिक्षणावर दिसून येतो. म्हणून येथे सातत्याने नवनवीन प्रयोग सतत सुरू असतात. सर्वांना समान अशी राष्ट्रीय प्रणाली जरी सांगता आली नाही, विविधतेला भरपूर वाव दिलेला आढळला तरी प्रारंभी दिलेली मूलभूत तत्त्वे सर्वत्र पाळली जातात. ६ ते ८ वर्षापर्यंतची मुले प्राथमिक कक्षेत प्रवेश घेतात व १२ ते १४ वयोमानापर्यंत हा टप्पा पूर्ण करतात. काही राज्यांतून प्राथमिक कक्षेतील वरचे दोन वर्ग माध्यमिक कक्षेत सामावलेले आहेत. पारंपारिक आणि नव्या धर्तीच्या अशा दोन्ही प्रकारच्या प्राथमिक शाळा येथे काम करतात. पारंपारिक शाळात ८ वर्ग असून ६ ते १४ वयोमानापर्यंत येथे शिक्षण मिळते. काही ठिकाणी हे वर्ग ३, ३ आणि २ अशा टप्प्यांत विभागून काम चालते. पहिले ३ वर्ग बालोद्यान, दुसरे ३ (म्हणजे ४, ५, ६) प्राथमिक व उरलेले २ (सात व आठ) ज्युनियर माध्यमिक असे मानले जाते. दुसऱ्या प्रकारच्या प्राथमिक शाळात ६ ते ८ वयोगटाची मुले येतात. ६ वर्ग (१ ते ६) या ठिकाणी असतात. ७ व ८ हे पुढचे वर्ग माध्यमिक शाळेशी जोडलेले असतात.

शाळांच्या वेळा व एकूण कामाचे दिवस यात भिन्नता दिसून येते ५ ते ५½ तासांचे कामकाज रोजचे, सोमवार ते शुक्रवारपर्यंत, चालते. सकाळी ९ ते दुपारी ३·३० वाजेपर्यंत शाळा चालतात. १२ ते १ मधली सुट्टी. खालच्या वर्गासाठी कामाच्या वेळा कमी असतात. ४ ते ५ तास काम या वर्गाचे रोज चालते. एकूण वर्षाचे कामकाज १५२ ते १८७ दिवस असे सर्वसाधारण दिसून येते. १२ ते ३० मिनिटांच्या तासिका (Periods), आठवड्याचे २५ ते ३० तास काम, आणि वर्षाचे काम १७१ सर्वत्र असावे असा प्रयत्न राज्य शिक्षण खात्याने १९५३ साली केला. ग्रामीण विभागात वर्षाचे कामाचे दिवस शहरापेक्षा कमी असतात.

सक्तीचे, सार्वत्रिक शिक्षण

अमेरिकेत प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक, मोफत आणि सक्तीचे आहे. १९१० पासूनच हे धोरण स्वीकारण्यात आले व त्याची अमलबजावणीही काटेकोरपणे केली जाऊ लागली. शाळेत येणाऱ्या मुलांच्या संख्येबाबत

जुने उपलब्ध आकडे उपयोगी ठरतील. १९३० साली, ६६·३% टक्के मुले ६ वयोगटाची व ७ ते १३ वयोगटाची ९५·३% टक्के मुले शाळेत दाखल झाली होती. १९३० ते १९३६ या काळात हा आकडा कमी झाला कारण मुलांचे जनन प्रमाण कमी झाले. जवळ जवळ ४·२% टक्के घट झाली. याचा परिणाम प्राथमिक कक्षेतील खालच्या सुरुवातीच्या वर्गावर झाला. पण दुसऱ्या महायुद्धाच्या काळात (१९३९ ते १९४५) जनन प्रमाण एकदम वाढले व मुलांच्या शाळेत येणाऱ्या संख्येतही वाढ झाली. इतकी की अनेक एकशिक्षकी शाळांचे पूर्ण शाळात रूपांतर करून हा प्रश्न सोडवावा लागला. त्या वेळेपासून आजतागायत पूर्व–प्राथमिक कक्षेतील मुलांना शाळेत वाहनाने ने आण करण्याच्या सोयीत खूप वाढ करून दक्षता घेतली जात आहे. सर्व राज्यांतून देण्यात येणारे हे सक्तीचे शिक्षण ९ ते १० वर्ष चालते. ७ ते १६ वयोगटातील मुलांना बहुतेक राज्यांतून सक्तीचे शिक्षण देण्याची सोय केलेली आहे. दक्षिणेकडील राज्यातून ७ वयोमर्यादेपर्यंत तर पूर्वेकडील राज्यात ९ वयोमर्यादेपर्यंत सक्ती आहे. दक्षिणेकडे वर्णभेद केला जात असे. गोरे व काळे अशा वेगळ्या शाळा होत्या. पण सुप्रीम कोर्टाने हा भेद बेकायदेशीर ठरविला आहे.

अभ्यासक्रम आणि इतर उपक्रम

मुलाला लोकशाहीचा कर्तबगार नागरिक बनविणे हे प्राथमिक शिक्षणाचे मुख्य सूत्र होय. प्रत्येक राज्यात उपलब्ध साधनांचा विचार करून हे शिक्षण दिले जाते. १९ व्या शतकात लेखन, वाचन व सोपे गणित आणि काही कौशल्ये शिकविणे यावर भर होता. पुढे गरजेनुसार नवे विषय अंतर्भूत करण्यात आले. पुढे ३ R'S ऐवजी ५ R'S म्हणजे वाचन, लेखन, सोपे गणित, मनोविनोदन (Recreation) आणि परस्पर संबंध (Relationship) यावर भर देऊन चारित्र्य निर्मितीवर लक्ष केंद्रित करण्यात आले. राज्यांची शिक्षणखाती व स्थानिक मंडळे यांनी अभ्यासक्रम तयार करावा अशी घटनेने जबाबदारी टाकलेली आहे. शहरी विभागाला तज्ज्ञ शिक्षक, साधनांची उपलब्धता याने अधिक फायदा मिळतो. ग्रामीण भागात मुख्यतः राज्य शिक्षण खात्याने तयार केलेला अभ्यासक्रम राबविला जातो.

संशोधनावर आधारित अशा अनेक नव्या पद्धतींचा वापर केला जातो. या नव्या संशोधनानुसार पाठ्यपुस्तकात बदल केला. जातो व त्यामुळे अमेरिकेत शिक्षणाची सुधारणा करण्याच्या कार्यात प्रकाशकांनी मोठा वाटा उचलला आहे. धार्मिक शिक्षणाचा अंतर्भाव अभ्यासक्रमात नसावा असे लोकमत आहे. सारा भर चारित्र्य निर्मितीवर दिला जातो. काही शाळांतून धार्मिक व नीतिशिक्षणाचे पाठ दिले जातात. फेडरल किंवा राज्ये या शाळा चालवीत नाहीत तर स्थानिक मंडळे सर्व कारभार पाहातात.

अध्यापन व्यवस्था

मोठ्या प्रगत शाळातून ७, ८ त ९ या प्राथमिक कक्षेतील वरच्या वर्गासाठी विषयावर विभाग असून तिथे तज्ज्ञ शिक्षक बसतात. मुले त्या त्या विभागात जाऊन अभ्यास करतात. शिक्षकाला वर्गावर जावे लागत नाही. हे विषय विभाग सुसज्ज असतात. एका वर्गात चालणारी एक शिक्षकी शाळा दूरवरच्या प्रदेशात अजूनही पारंपारिक पद्धतीने काम करीत आहे. इमारत आणि आर्थिक प्रश्न यामुळे एका खोलीत एक वर्ग विशिष्ट विषयाचा अभ्यास करतो तर इतर वर्ग ग्रंथालय, क्रीडांगण, अशा ठिकाणी काम करतात. तासाप्रमाणे मुले निरनिराळ्या ठिकाणी जातात. ही पद्धती लोकप्रिय अशी आढळून येते. विशेषत: मोठ्या इमारतीच्या व आर्थिक पाठबळाच्या अभावी या रीतीने–शाळा चालविली तर सोयीचे होते. व्यक्तिगत विद्यार्थ्यावर लक्ष पुरविण्यासही ही सोय उपयोगी पडते असा अनुभव आहे. या प्रकारच्या व्यवस्थेला Plantoon type म्हणतात.

नियंत्रण व अर्थव्यवस्था

पब्लिक स्कूल्स् आणि नॉन् पब्लिक स्कूल्स (खासगी शाळा) असे दोन विभाग शाळांचे करता येतात. या ज्या खासगी शाळा आहेत त्यातील काही धार्मिक संघटनांनी (चर्च) चालविल्या आहेत. त्यात धर्मशिक्षण, प्रार्थना, इ.वर भर असतो. तर काही काही शाळा या धार्मिक वर्चस्वापासून मुक्त असतात. या शाळांचा खर्च देणग्या व शुल्क यावर चालतो. पण पब्लिक स्कूल्स या शाळा खऱ्या महत्त्वाच्या. सार्वजनिक करातून या

शाळांचा खर्च चालविला जातो. सार्वजनिक प्रतिनिधी त्यांचा कारभार पाहातात. पालकांचे शाळेशी नित्याचे व घनिष्ठ संबंध असतात हे वैशिष्ट्य आहे. अद्यावत् साधने, सर्व सोयी, आरोग्य नियंत्रण, वाहन योजना, अशा सोयींचा वापर आता होत आहे. उत्तम इमारती, उत्तम वातावरण अशांकडे लक्ष पुरविण्यात येते. पालक शिक्षणात लक्ष घालतात व त्यामुळे प्राथमिक शिक्षणाचे कार्य फलदायी होत आहे. या पब्लिक स्कूल्सचे जाळे सर्वत्र पसरलेले आहे. प्रयोगशीलता हा या देशातील सर्व शिक्षणाचा विशेष आहे. सतत नवे प्रयोग, सुधारणा, नवी रचना, नवी पाठ्यपुस्तके अशी घडामोड सतत चालू असते. प्राथमिक क्षेत्र याला अपवाद नाही.

० ० ०

४. माध्यमिक शिक्षण

ऐतिहासिक पार्श्वभूमी

अमेरिकेतील माध्यमिक शिक्षणाचा इतिहास संगतवार असा सांगणे अवघडच नव्हे तर अशक्य आहे. काही थोड्या व्यक्तींच्या अविरत प्रिश्रमामुळे माध्यमिक शिक्षण सर्वांसाठी मोफत असे करण्यात यश आले. लोकशाहीवरील निष्ठा हा एकमेव आधार त्याला होता. अडचणी अनंत होत्या. पण यंत्रयुगाचा विकास व मुलांना मजूर म्हणून राबविण्यावर घातलेली बंदी यामुळे माध्यमिक शिक्षणाचा विकास वेगाने झाला. शिवाय सक्तीच्या शिक्षणाचे वय जसे वाढविले गेले. तशी या कक्षेतील संख्याही वाढत गेली. बोस्टन येथे १६३५ मध्ये पहिली माध्यमिक शाळा सुरू केली गेली. लॅटीन ग्रामर स्कूल हे नाव या शाळेला दिले गेले. लॅटीन भाषा आणि वाङमयाचे शिक्षण दिले जात असे. फी देऊ शकणाऱ्या. वरच्या वर्गातील मुलांना फक्त प्रवेश मिळत असे. फी आणि देणग्यावर खर्च भागविला जाई. स्थानिक धर्मप्रचारक शाळेची व्यवस्था पहात. परंतु १९ व्या शतकाच्या प्रारंभाला या धर्मप्रचारकांचे वर्चस्व संपले. संकुचित धार्मिक

शिक्षण नकोसे वाटू लागले. यातूनच व्यापक अशा नव्या शाळांची ॲकॅडिमीज (Academies) स्थापना झाली. १८ व्या शतकात औद्योगिक वाढ व यंत्रयुग वेगाने येऊ लागले तसे या शाळा निष्प्रभ होऊ लागल्या. आधुनिक गरजाप्रमाणे शिक्षण हवे या मागणीनुसार सारे चित्र बदलले. बेंजामिन फ्रँकलीनचेही मत असे होते की विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने उपयुक्त शिक्षण द्यावे. त्याने उच्च माध्यमिक शाळांचा अभ्यासक्रम तयार केला. बेंजामिन फ्रँकलीन ॲकॅडमीज स्थापन झाल्या व १८३० पर्यंत त्यांची संख्या पाचशेच्यावर गेली. खलाशी काम, राजकारण, तत्त्वज्ञान याशी निगडीत असे विषय अभ्यासक्रमात आले. मुलींनाही प्रवेश मिळू लागला. एकूण पूर्वीच्या लॅटीन ग्रामर शाळापेक्षा या शाळा व्यापक भूमिकेवरून काम करू लागल्या. या शाळांचा खर्च फी व देणग्यावर चाले. उच्च शिक्षणात प्रवेश मिळण्यासाठीही तयारी करवून घेतली जाई. त्यासाठी भूगोल, शास्त्र, इंग्रजी राजकारण इ. विषय आणण्यात आले. सर्वांना मुक्त प्रवेश या शाळांतून मिळे. या खासगी प्रयत्नातून पुढे सार्वजनिक माध्यमिक शाळा निघाल्या.

पब्लिक सेकंडरी स्कूल

१८२१ मध्ये बोस्टन येथे अशा प्रकारची पहिली शाळा निघाली. पूर्वी खासगी संस्था शाळा चालवीत व तेथील फी परवडणारी नव्हती. लोकांच्याकडे शाळांची व्यवस्था असावी असा कलही वाढू लागला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात उच्च माध्यमिक शाळा संख्येने वाढू लागल्या. पुढे उच्च शिक्षणाचा प्रसार वाढला तशी या शाळांची लोकप्रियता कमी होऊ लागली. १८२७ मध्ये मॅसॅसिच्युएट राज्यात कायद्याने सर्वांना उच्च माध्यमिक शिक्षण देण्याची सोय झाली. १८७४ मध्ये कालामाझू (Kalamazoo) शहरातील लोकांनी आपल्या मिशीगन राज्यात मोफत माध्यमिक शिक्षण देण्यासाठी बसविण्यात आलेल्या कराविरुद्ध दावा लावला. स्थानिक कोर्टाने लोकांच्या बाजूने निकाल मिळाला की असा कर बसविता येत नाही. त्यावर शहराच्या अधिकाऱ्यांनी सुप्रीम कोर्टाकडे अपील केले. सुप्रीम कोर्टाने निकाल दिला. त्याने अमेरिकेतील माध्यमिक शिक्षणाच्या इतिहासात क्रांती केली. जर सर्व लोकांना मान्य असेल तर प्राथमिक

शिक्षणानंतर कर बसविण्यास हरकत नाही ! हा निर्णय सर्वार्थाने क्रांतिकारक होता. त्यायोगे मोफत सार्वजनिक माध्यमिक शाळा स्थापन झाल्या व खर्चासाठी करही बसविला गेला. घटनेने अशा कराला पाठिंबा दिला.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात माध्यमिक शिक्षणात भरपूर विविधता आली व अनेक प्रकारचे उपक्रम सुरू झाले. लॅटीन ग्रामर शाळा, ॲकॅडॅमीज व नवे अभ्यासक्रम यांनी माध्यमिक शिक्षण संपन्न झाले. समाजातील विविध थरांतील व्यक्तींना गरजेप्रमाणे शिक्षण मिळण्याची सोय झाली. व्यक्तिगत निवडीला प्राधान्य मिळाले. धर्म, सुधारणा, उपयुक्तता, नवेशोध, यांचे सुंदर मिश्रण अभ्यासक्रमात दिसून येऊ लागले. लोकशाहीत विविधतेला महत्त्व व व्यक्तिविकासाला भरपूर संधी लागते. या दोन्ही गोष्टी साध्य होऊ लागल्या. १८९२ मधील दहा जणांच्या समितीने (The Committee of Ten) शिफारस केली की ज्या पालकांना आपल्या मुलांना उच्च शिक्षण देण्याची इच्छा असेल त्यांना १८ वर्षेपर्यंत सर्व सवलती देण्यात याव्यात. या महत्त्वाच्या शिफारसीमुळे वयाच्या १६ वर्षांपर्यंत शिक्षण सक्तीचे केले गेले. अमेरिकेतील माध्यमिक शिक्षणाला अनुकूल वळण लागले ते यामुळेच.

विसावे शतक

विसाव्या शतकाच्या प्रारंभीच येथील लोकांच्या सामाजिक, राजकीय औद्योगीक जीवनात फार मोठे बदल झाले. औद्योगिक प्रगती, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, राहाणीमानाचा उच्च दर्जा यामुळे माध्यमिक शिक्षण ही आवश्यक गरज व्यक्ती आणि राष्ट्र या दोन्ही दृष्टीने भासू लागली. विद्यार्थ्यांची संख्या वाढली. शिक्षणात स्वातंत्र्य हवे या कल्पनेचा विकास होऊन लोक त्याचा भरपूर फायदा घेऊ लागले. उत्पादन क्षमता, आरोग्य नागरिकत्व, देशप्रेम, लोकशाही, गरजेनुरूप, व्यवसाय, क्रीडावृत्ती, धाडस प्रयोगशीलता, यांचा प्रभाव माध्यमिक शिक्षणाच्या आशयावर व रचनेवर झाला. तांत्रिक शिक्षणाची गरज वाढून विद्यार्थ्यांची संख्याही वाढू लागली. तंत्रज्ञान आणि तात्त्विक अभ्यास यांचा जोडीने विकास होऊ

लागला. याच सुमारास माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना आणि उद्दिष्टांचे स्पष्ट स्वरूप पुढे ठेवण्याचे प्रयत्न सुरू झाले.

नवी रचना

सर्वसामान्यपणे प्राथमिक शिक्षणानंतरचे ९ ते १२ इयत्तांचे वर्ग माध्यमिक कक्षेत येतात. १४ ते १८ वयोमानाची मुले या वर्गात प्रवेश घेतात. प्राथमिक ८ वर्षांचा अभ्यासक्रम फार दीर्घ वाटल्यामुळे शेवटले दोन वर्ग, ७ व ८ माध्यमिक समजले जाऊ लागले. म्हणजे ७ ते १२ अशा वर्गाचा माध्यमिक अभ्यासक्रम झाला. व त्यात १२ ते १८ वयोमानाची मुले जाऊ लागली. पुढे महाविद्यालयाची पहिली २ वर्षे माध्यमिकला जोडण्यात आली. म्हणजे १२ ते २० वयोमानासाठी ८ वर्षांचा अभ्यासक्रम करण्यात आला. प्राथमिक पासून ते पदवीकक्षेपर्यंत एकूण १६ वर्षांचा अभ्यासक्रम, (६ प्रायमरी, ३ ज्युनियर सेकंडरी, ३ सीनियर सेकंडरी व २ वर्षे उच्च माध्यमिक) असा रचण्यात आला. हा ८ वर्षांचा माध्यमिक अभ्यासक्रम २ किंवा ३ वर्गात विभागण्याची कल्पना पुढे येत आहे. पहिल्या दोन विभागांत, प्रत्येक विभागाला ४ वर्ग आणि तीन विभागांत, पहिल्या २ विभागाला ३ वर्ग व उरलेल्या विभागासाठी १ ते २ वर्ग अशी रचना होईल. ४ वर्ग ज्युनियर व ४ वर्ग सीनियर वर्ग अशी विभागणी होईल. दुसऱ्या विभागणीत ३ वर्ग ज्युनियर, ३ वर्ग सीनियर व उरलेले २ वर्ग ज्युनियर कॉलेज अशी विभागणी होईल. या रचनेप्रमाणे १९०२ मध्ये इलिनॉसमध्ये पहिले ज्युनियर कॉलेज स्थापन करण्यात आले.

उद्दिष्टांची वाटचाल

माध्यमिक शिक्षणाच्या उद्दिष्टामध्ये कालानुरूप फरक होत गेला. अगदी सुरुवातीस म्हणजे १८९२ च्या सुमारास महाविद्यालयीन उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी तयार करणे हेच मुख्य उद्दिष्ट होते. अनेक समित्यांनी वेळोवेळी शिफारशी करून ही उद्दिष्टे व्यापक केली. १९११ साली नेमलेल्या समितीने उच्च माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये यांच्या अभ्यासक्रमात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांना जीवनोपयोगी ठरावेत असे

अनेक तांत्रिक विषय (Vocational Subject) अंर्तभूत करण्यात आले. १९१८ सालच्या एका आयोगाने माध्यमिक शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षण अर्थपूर्ण करण्यासाठी सात तत्त्वे निश्चित केली. ती तत्त्वे अशी.

१) आरोग्यविषयक शिक्षण २) लेखन, वाचन आणि सोपे गणित यापेक्षा अधिक व्यापक व उपयुक्त मूलभूत प्रक्रियांचे ज्ञान ३) घरातील एक जबाबदार घटक बनविणे ४) औद्योगिक कामाची आवड व तदनुरूप निवड ५) नागरिकत्वाचे शिक्षण ६) फावल्या वेळेचा सदुपयोग करण्याची क्षमता ७) नैतिक गुणांच्या आधारे चारित्र्य संवर्धन. अमेरिकेतील बदलते सामाजिक, औद्योगिक व आर्थिक आणि सांस्कृतिक जीवन डोळ्यासमोर ठेवून काही निश्चित ध्येय विकसित करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. ही ध्येये म्हणजे अमेरिकेतील नागरिकांची पूर्वतयारीच होय. १) शरीरसामर्थ्य २) समान संधी ३) आर्थिक सुरक्षितता ४) स्वातंत्र्य ५) मानसिक समतोलपणा ६) नीतिमार्गाने वागणे ७) योग्य व्यवसाय ८) कार्यक्षम, जुळवून घेणारे व्यक्तित्त्व ९) आनुवंशिक शक्तीचे पाठबळ १०) नवी संस्कृती घडविण्याची क्षमता.

या सर्व बदलांचा परिणाम असा झाला की अमेरिकेतील माध्यमिक शिक्षण सर्वस्पर्शी, व्यापक आणि जीवनाला उपयुक्त असे ठरले. इथे आपल्याला जाणवते ती आपल्या देशातील माध्यमिक शिक्षणाची परिस्थिती. केवळ महाविद्यालयासाठीच विद्यार्थी तयार करण्यात आपले माध्यमिक शिक्षण सत्वहीन, संकुचित आणि एकांगी बनले. तांत्रिक शिक्षण आणि मानव्य विद्या (Humanities) यांचा योग्य समतोल आपण निर्माण करू शकलो नाही. बहुव्यवसायी (Multipurpose) शाळादेखील यशस्वी होऊ शकल्या नाहीत. म्हणूनच आपल्या माध्यमिक शिक्षणाला एकूण शिक्षण प्रणालीतील सर्वांत कच्चा दुवा असे म्हणतात. तसे अमेरिकेत घडले नाही. म्हणून सर्वांसाठी माध्यमिक शिक्षण तेथे गरजेचे वाटू लागले. देशातील वाढते औद्योगीकरण, बदलती संस्कृती, नवी जीवनमूल्ये, स्वातंत्र्य आणि लोकशाही परंपरा या सर्वांना तेथील माध्यमिक शिक्षणाने सतत नवजीवन पुरविले. प्रत्यक्ष जीवनाला सामोरे

जाऊन परिस्थितीशी जुळवून घेण्याचे सामर्थ्य व्यक्तीच्या अंगी यावे (Life adjustment process) या सूत्रानुसार माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना सतत करण्यात आली. आपल्या आवडीनुसार, क्षमतेनुसार, गरजेनुसार विषय आणि व्यवसाय निवडण्याचे भरपूर स्वातंत्र्य ठेवल्यामुळे अमेरिकेतील माध्यमिक शिक्षण गतिमान उपयुक्त ठरले. विषयाची साचेबंद वाटणी टाळल्यामुळे सर्वांना मुक्त विकासाची संधी मिळाली. त्याचबरोबर माध्यमिक शिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्ता उच्च पातळीवर ठेवली गेली. माध्यमिक शिक्षण पूर्ण करताक्षणी व्यक्ती संपूर्ण बनली व चरितार्थक्षम झाली. आपल्याला महाविद्यालयीन शिक्षण नाही हा गंडही निर्माण होऊ शकला नाही. सोय आणि सवडीनुसार उच्च शिक्षण व्यक्ती घेऊ लागल्या. आता या माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था आणि प्रकार पाहू.

रचना आणि संघटन

अमेरिकेत माध्यमिक शाळांचे विविध प्रकार रूढ आहेत. काही सर्वसामान्य (General) आणि इतर उपयुक्त कला शाळा, वाणिज्य शाळा तांत्रिक शिक्षण शाळा, हस्त कौशल्य शिक्षण शाळा (manual Schools) असे प्रकार आढळतात. सर्वाधिक लोकप्रिय सर्व सामान्य शाळा (वर्ग ९ ते १२,४ वर्ष) आहेत. दुसऱ्या शाळात ७ ते १२ असे ६ वर्ग असतात. हे ६ वर्ग प्रत्येकी ३ अशा दोन गटात विभागलेले आहेत. पहिल्या तीन वर्गांना मिळून ज्युनियर हायस्कूल व दुसऱ्या तीन वर्गांना उच्च माध्यमिक म्हटले जाते. या शाळात गेल्या तीस वर्षात अनेक नवे उपक्रम राबविले गेले. पण जवळ जवळ ७० टक्के शाळा ४ वर्गाच्या पद्धतीने चालू राहिल्या. संख्येचा विचार केला तर विद्यार्थी सम प्रमाणात या दोन ढोबळ प्रकारात विभागलेले दिसतात. वर्गाच्या विभागणीत कोठेही साचेबंदपणा नाही. ६ वर्षे प्राथमिक, ४ वर्षे माध्यमिक व ४ वर्षे महाविद्यालय असा एक प्रकार अन्यत्र ६ वर्षे प्राथमिक ६ वर्षे माध्यमिक आणि २ वर्षे महाविद्यालयीन अशी रचना आढळते. काही ठिकाणी ६ वर्षे प्राथमिक, ३ वर्षे ज्युनियर माध्यमिक, ३ वर्षे हायर माध्यमिक आणि २ वर्षे ज्युनियर कॉलेज अशी व्यवस्था आहे. ही विभागणी

बहुतेक ठिकाणी आढळते. मोठ्या शहरात मोठी संख्या व अपुऱ्या इमारती यामुळे ज्युनियर व सीनियर माध्यमिक शाळा वेगवेगळ्या ठिकाणी, वेगळ्या संस्थाकडून चालविल्या जातात. पण त्यांचे काम एकमेकाला पूरक असते. ज्युनियर कॉलेजचे दोन वर्ग (१३ व १४ इयत्ता) कोठे ज्युनियर तर कोठे सीनियर शाळांच्या बरोबरीने चालविले जातात. काही ठिकाणी आणखी एक प्रकार रूढ आहे. ६ वर्षे प्राथमिक, ४ वर्षे ज्युनियर व ४ वर्षे सेकंडरी ही ती व्यवस्था होय. हे संघटन अनुभव आणि गरज याप्रमाणे केले जाते हे वैशिष्ट्य. एका अर्थाने या देशातील माध्यमिक शिक्षण प्रायोगिक अवस्थेत आहे. ही फार चांगली गोष्ट आहे. माध्यमिक शिक्षणाचा निर्जीव साचा तयार झालेला नाही. या विविध प्रकारची ठळक वैशिष्ट्ये अशी :

(१) ज्युनियर हायस्कूल

प्राथमिक शिक्षणातील शेवटली २ वर्षे व माध्यमिकचे १ वर्षे मिळून तयार झालेली शाळा. परिणामकारक शिक्षण होण्याच्या दृष्टीने सरासरी वयोमानानुसार वर्गरचना केली जाते. विद्यार्थ्यांची विकास पावणारी मने आणि शरीरे यांचा समतोल विकास घडविणे हे मुख्य उद्दिष्ट. समंजस आणि अर्धविकसित, थोडे मागासलेले अशी विद्यार्थ्यांची विभागणी करून शिक्षण देण्याची व्यवस्था मुद्दाम केली जाते. पुष्कळ ठिकाणी या शाळा स्वतंत्रपणे, स्वतंत्र व्यवस्थेखाली काम करतात. अन्यत्र त्या हायस्कूलशी जोडलेल्या असतात.

(२) हायस्कूल्स्

१० ते १२ अशा ३ वर्षांच्या कालखंडाची ही शाळा ज्युनियर कॉलेजला पूरक असे काम करते. परिपक्व विद्यार्थ्यांना त्यांच्या मानसिक गरजानुसार शिक्षण देणे व योग्य व्यवसाय मिळण्याच्या दृष्टीने तयारी करून घेणे हे उद्दिष्ट. सर्वसामान्य विषयावरोबर खास विषय, वाणिज्य आणि औद्योगिक विषय शिकविण्याची सोय.

(३) कॉंप्रीहेन्सीव शाळा

चार वर्षांचा अभ्यासक्रम शिकविणारी पारंपारिक शाळा. या शाळा आकाराने मोठ्या असून अनेक विषय शिकविण्याची सोय येथे असते.

लिंग, वर्ण, प्रतिष्ठा असा कसलाही भेद न करता मोफत शिक्षण दिले जाते. क्वचित २०० विषय शिकविण्याची सोय असलेल्या शाळाही आहेत. अनागरी विभागात या शाळा आर्थिक दृष्टचा अधिक परवडणाऱ्या ठरल्या आहेत.

(४) लिमिटेड स्कूल्स्

आपल्या आवडीच्या खास विषयाचे सर्वांगीण शिक्षण ध्यायचे असेल किंवा आपल्या निवडीच्या व्यवसायाचे खास शिक्षण द्यायचे असेल तर तशी सोय या शाळातून केली जाते. सारा भर विशिष्ट शिक्षण परिपूर्णपणे देण्यावर असतो. स्थानिक लोकांच्या मदतीने आशा शाळा चालविल्या जातात.

(५) स्पेशलाईज्ड शाळा

व्यवसायाचे प्रारंभिक शिक्षण देण्यावर शाळात भर दिला जातो. ही व्यावसायिक शिक्षणाची सुरुवात थोडी अकाली होते अशी टीका या शाळेवर करण्यात येते. इतर विषयांना त्या मानाने दुय्यम स्थान दिले जाते. पण आत्यंतिक गरजेच्या पोटी विद्यार्थी या शाळेत येतात.

(६) व्यावसायिक व तंत्रविज्ञान शाळा

मोठ्या औद्योगिक शहरातून या शाळा आढळतात. वरच्या प्रकाराप्रमाणे येथेही आवड आणि गरज यानुसार येथे व्यवसायाचे शिक्षण दिले जाते.

(७) अर्ध वेळ शाळा

विशेषतः प्रौढ व्यक्ती या शाळांचा लाभ अधिक घेतात. व्यवसायावर आधारलेले विषय शिकविण्याची सोय.

(८) कंटचूनिएशन शाळा

आठवड्याला ३ ते ४ तास शिकण्याची सोय येथे असते. सांस्कृतिक आणि व्यावसायिक अशा दोन्ही प्रकारचे विषय शिकविण्याची सोय. प्रौढ शिक्षण व्यवस्थेचा हा एक प्रकार होय.

(९) संध्याकाळचे प्रौढ शिक्षण वर्ग

या संध्याकाळी भरणाऱ्या वर्गात गरजेप्रमाणे शिक्षण देण्याची व्यवस्था नोकरी करून शिकणारे या वर्गाचा लाभ घेतात.

ज्युनियर महाविद्यालये

महाविद्यालयीन अभ्यासक्रमातील पहिली दोन वर्षे (इयत्ता १३ व १४) म्हणजे ज्युनियर कॉलेज होय. काहीजण या दोन वर्गांना महाविद्यालयीन शिक्षणाचा अविभाज्य भाग मानतात तर इतर काहींचे मत हा विभाग माध्यमिक शिक्षणाचाच भाग आहे. हा फरक अभ्यासक्रमातील विषयामुळे केला जातो. शिवाय स्थानिक मंडळे हे वर्ग चालवितात. म्हणूनही हा विभाग माध्यमिकचा आहे असे म्हटले जाते. १९०२ साली जेव्हा पहिले ज्युनियर कॉलेज स्थापन करण्यात आले तेव्हा हा विभाग माध्यमिक कक्षेतील आहे. हीच भावना दृढमूल होती. १९५० पर्यंत सर्व राज्यातून ही कनिष्ठ महाविद्यालये चालू झाली. हा प्रसार फार वेगाने झाला. ही महाविद्यालये सार्वजनिक (Public) खासगी (Private) अशा दोन्ही प्रकारची आहेत सर्वसामान्य विषयाच्या जोडीने व्यवसायांचे प्रारंभिक शिक्षण दोन वर्षे दिले जाते. अनेकविध प्रकारचे आणि आर्थिक स्वावलंबनाला पोषक असे शिक्षण दिले जाते. हे या प्रकारच्या महाविद्यालयांच्या लोकप्रियतेचे खरे कारण आहे. या ठिकाणचे अभ्यासक्रम उदारमतवादी (Liberal) परंपरेशी फार जुळते आहेत.

मॉडर्न हायस्कूलचे विविध उपक्रम

माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात विषयांचे विभागवार तीन गट केलेले असतात. एका गटात सर्व विषय सक्तीचे असतात. दुसऱ्या गटात काही विषय सक्तीचे व इतर विषयातून दुसरे विषय निवडून घ्यायचे. तिसऱ्या गटात, विषयांचे गट असून त्यातून काही मर्यादित विषय प्रत्येक गटातून निवडायचे. विषय व त्यांची संख्या प्रत्येक शाळेत वेगवेगळी असू शकते. ९ व १० व्या वर्गात नव्याने पुनर्रचना केलेल्या शाळात व ९ व्या वर्गात माध्यमिक शाळात विद्यार्थांना विषयांची निवड करता येते. विषयांच्या बरोबरीने व्यावसायिक विषयही निवडता येतात. फावला वेळ चांगला उपयोगात आणता यावा या साठी अनेक अभ्यासानुवर्ती उपक्रम हाती घेतले जातात. खेळ, छंद, करमणूक यांचा विकास घडवून आणण्या-

साठी अद्ययावत् सोयी उपलब्ध असतात. संपन्न वातावरणामुळे शाळा प्रभावीपणे काम करू शकतात. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अनेक संघ मंडळे काम करीत असतात.

याचा अर्थ या सर्व प्रकारच्या शाळा पुढे काहीच अडचणी नाहीत असा नाही. विशेषत: काँप्रीहेन्सीव शाळांच्या समोर या शाळांच्या व्यापक स्वरूपामुळे पुष्कळ अडचणी आहेत. या शाळात अनेक विषय व त्याचे अनेक विभाग असल्याने त्या त्या विषयासाठी शिक्षक मिळत नाहीत. भरमसाठ संख्येमुळे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या जवळचा संबंध राहात नाही. जुन्या पद्धतीने शिकविले जात असल्याने ज्ञानग्रहणास अडथळे, मुले–मुली एकत्र शिकण्याने बेशिस्त वातावरण, सारा भर तात्त्विक शिक्षणावर असे अनेक दोष आढळतात. अनेक ठिकाणी असेही दिसून येते की जेथे माध्यमिक शाळांच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना (त्यालाच Re-orientation of secondary schools असे म्हटले जाते) केलेली आहे. तेथे पुरेशी विद्यार्थ्यांची संख्या नसल्याने या शाळावर आर्थिक भार फार पडतो. काँप्रीहेन्सीव्ह शाळात जाण्याचा विद्यार्थ्यांचा कलही या अवस्थेला थोडाफार कारणीभूत आहे.

अमेरिकेइतकी माध्यमिक शिक्षणातील विविधता अन्य देशांत आढळून येत नाही. १२ ते २० या विद्यार्थ्यांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या कालखंडासाठी ही सारी धडपड जिद्दीने केली जात आहे हे लक्षात ठेवणे आवश्यक. जीवनाची पूर्वतयारी या दृष्टीने या कालखंडाला अत्यंत महत्त्व आहे हे विस्ताराने सांगण्याची आवश्यकता नाही. आपल्या देशासाठी या अनेक उपक्रमांपैकी निवड करून उपयोग करून घेता येईल. आपल्या देशात माध्यमिक कक्षेत अनेक प्रकारचे व प्रवृत्तीचे विद्यार्थी आहेत. अन्य मार्ग व सोयी उपलब्ध नसल्याने ते विद्यापीठाकडे वळतात. पर्यायाने आपल्या माध्यमिक आणि विद्यापीठीय शिक्षणाच्या दर्जावर त्याचा विपरीत परिणाम झालेला आहे. बदल घडवून पुनर्रचना करण्याचे स्वातंत्र्यही आपल्याकडे नाही. माध्यमिक कक्षेतील साचेबंदपणा त्याशिवाय नाहीसा होणार नाही. आपल्या देशात खासगी संस्थांनी माध्यमिक क्षेत्र

विकसित केले. त्या संस्थानीच आता नव्या दिशेने पाऊल टाकायला हवे. पण माध्यमिक शिक्षण आता संपूर्ण सरकारी झाल्यामुळे हा प्रश्न अधिक बिकट झाला आहे या कक्षेला आणि त्यात काम करणाऱ्या शिक्षकांना जी सुरक्षितता प्राप्त झाली आहे. त्या मोहातून कोण बाहेर पडणार हाच प्रश्न आहे. राज्य सासनाने जवळ जवळ संपूर्ण आर्थिक जबाबदारी स्वीकारली याचा अर्थ पुनर्रचना, प्रयोग करण्याचे स्वातंत्र्य गेले असा होऊन बसला आहे. याचा परिणाम व्यापक वैफल्य निर्माण होण्यात झाला आहे. नव्या दिशेने पाऊल टाकले नाही तर सारे औपचारिक शिक्षण कोसळून पडेल ही भीती व्यक्ती केली जात आहे.

० ० ०

५. विद्यापीठीय उच्च शिक्षण

ऐतिहासिक पार्श्वभूमी

भारत, ग्रीस, चीन, इजिप्त या जगातील प्राचीन संस्कृतीप्रमाणे अमेरिका हा प्राचीन संस्कृती असलेला देश नाही. इतकेच नव्हे तर इंग्लंड, फ्रान्स, इटली, जर्मनी, रशिया यांसारखे अमेरिका हे फार मोठा इतिहास असलेले राष्ट्र नाही. सहाजिकच वरील प्राचीन संस्कृती किंवा राष्ट्रे यात आढळणारी उच्च शिक्षणाची दीर्घ परंपरा येथे नसणे स्वाभाविक आहे. १६३६ मध्ये जॉन हारवर्ड या दानशूर धनिकाने दिलेल्या देणगीतून आणि प्रचंड जमिनीच्या दानामुळे, हारवर्ड कॉलेज स्थापन झाले. हे कॉलेज स्थापण्यामागे चर्चचा फार मोठा वाटा होता. या देशात उच्च शिक्षणाच्या वाढीत चर्चचा फार मोठा वाटा प्रारंभापासून आहे. १७६९ पर्यंत कनेक्टीकट, न्यू इंग्लंड, व्होड, न्यूयॉर्क, न्यूजर्सी, पेन्सील्व्हानिया या ठिकाणी हारवर्डच्या धर्तीवर महाविद्यालये निघाली. परंतु इंग्लंडप्रमाणे येथे ऑक्सफर्ड आणि केंब्रीजच्या धर्तीवर वसतिगृह युक्त (Residential) संस्था स्थापन झाल्या नाहीत. या स्थापन झालेल्या संस्थांच्या परीक्षा, दर्जा वेगवेगळे होते. ख्रिस्तीधर्म प्रचारासाठी तयारी करून घेणे हे व्यापक अंतिम उद्दिष्ट होते. स्वातंत्र्य युद्धानंतर उच्च शिक्षणाला नवे वळण लागले. ऑक्सफर्ड आणि केंम्ब्रीज

या विद्यापीठांचे अनुकरण न करता स्वतंत्र दिशेने उच्च शिक्षण वाढू लागले. १७८० मध्ये हारवर्ड कॉलेजला विद्यापीठाचा दर्जा मिळाला. याच धर्तीवर अनेक संस्थांचे विद्यापीठात रूपांतर झाले. पेन्सील्व्हानिया (१७६१) न्होड आयलंड येथील महाविद्यालयाचे रूपांतर ब्राऊन विद्यापीठात (१८०४) झाले. कनेक्टिकट येथील संस्था येल विद्यापीठ या नावाने ओळखली जाऊ लागली. पुढे धार्मिक वर्चस्वातून मुक्त होऊन ही विद्यापीठे धर्मातीत (Secular) वृत्तीने काम करू लागली.

काही संस्थांनी सरकारी मदत न घेता कार्य चालू ठेवले तर काही महाविद्यालयांनी आपले विद्यापीठात रूपांतर होण्यासाठी (जॉर्जिया १७८५) नॉर्थ कॅरोलिना–१७८९, व्हरमाँट–१७९१) शासनाची आर्थिक मदत घेतली. ही सर्व विद्यापीठे पुढे शासकीय विद्यापीठे (State Universities) झाली. अपवाद फक्त पेन्सिल्व्हानिया विद्यापीठाचा. शासनाची मदत घेऊनही ते स्वतंत्र राहिले. न्यूयॉर्कमधील किंग्ज कॉलेज १९१२ मध्ये कोलंबिया विद्यापीठ म्हणून ओळखले जाऊ लागले, तर न्यू जर्सी येथील कॉलेज १८९६ मध्ये प्रिस्टन विद्यापीठ बनले. सुरुवातीस ही महाविद्यालये आपल्या पदव्या आणि पदविका देत असत तीच प्रथा विद्यापीठात रूपांतर झाल्यावर कायम राहिली. याचे मुख्य कारण म्हणजे अध्यापनाचा उच्च दर्जा व ज्ञानाची मोठी परंपरा त्यांनी राखली होती.

१७८० ते यादवी युद्ध (Civil war) होण्यापर्यंतच्या काळात सुमारे १८२ महाविद्यालये स्थापन झाली. त्यातील निम्मी पश्चिम विभागात होती पूर्व विभागात सुमारे ४८ महाविद्यालये स्थापन झाली. बाहेर पडणारे पदवीधर, धर्म प्रसारासाठी नवी महाविद्यालये स्थापन करीत. १७६५ मध्ये फिलाडेल्फिया येथे वैद्यकीय अभ्यासाला प्रारंभ झाला. अनेक विद्यापीठांतून कालांतराने वैद्यक शाखा निघाल्या. १७८४ मध्ये पहिली कायद्याच्या अभ्यासाची शाळा (Law School) निघाली. १८१६ मध्ये मेरीलँड व १८१७ मध्ये हारवर्ड विद्यापीठाने विधीशाखा (Law faculty) स्थापन केली. १८०२ मध्ये जगप्रसिद्ध लष्करी तांत्रिक शिक्षण संस्था वेस्ट पॉईंट येथे स्थापन झाली. १८३९ मध्ये शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी लेक्सीग्टंन या मॅसॅसिच्युएट राज्यात संस्था निर्माण करण्यात आली.

स्त्री शिक्षणाचा प्रारंभ

स्त्री शिक्षण कार्याची सुरुवात अमेरिकेत उशिरानेच झाली. स्त्रियासाठी खास संस्था एकोणिसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात स्थापन झाल्या. या शतकाच्या मध्यानंतर सहशिक्षण देण्याची प्रथा रूढ झाली. माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात सहशिक्षणाला प्रारंभ झाला. १८३७ मध्ये मॅसॅसिच्युएट राज्यात मुलींच्यासाठी स्वतंत्र माध्यमिक शाळा निर्माण झाली. १८३६ मध्ये जॉर्जिया फिमेल कॉलेज स्थापन झाले. १८४९ मध्ये रॉकफोर्ड फीमेल कॉलेज स्थापन करण्यात आले. १८३७ मध्ये ऑबरलीन कॉलेजात सहशिक्षण देण्यास प्रारंभ झाला. मुलांनाच केवळ उच्च शिक्षण देणाऱ्या सुमारे २३० व मुलींनाच केवळ उच्च शिक्षण देणाऱ्या २७० संस्था अमेरिकेत आहेत. या संख्येत सतत भर पडत आहे. पण सहशिक्षण देणाऱ्या संस्था जवळ जवळ १८०० आहेत. १८६० नंतर अनेक नगरपालिकांनी मागणीवरून महाविद्यालये स्थापन केली. राज्य शासनाने उच्च शिक्षण प्रसारात भाग घेण्यास या सुमारास प्रारंभ केला. व्हर्जिनिया, नॉर्थ कॅरोलिना साऊथ कॅरोलिना जॉर्जिया, इंडियाना, मिशिगन या राज्यांत शासनाने नवी विद्यापीठे स्थापन केली.

लँड ग्रँट कॉलेज

अमेरिकेत लोकांनी पश्चिमेकडे स्थलांतर करायला जेव्हा सुरुवात केली तेव्हा नव्याने स्थापन होणाऱ्या पश्चिमेकडील राज्यांना दोन छोटी गावे बसतील एवढी जमीन महाविद्यालय स्थापन करण्यासाठी देण्यात आली. या महाविद्यालयांनी शेतीचे आणि व्यवसायाचे शिक्षणच दिले पाहिजे अशी अट होती. यातूनच राज्य विद्यापीठे निर्माण झाली. कॅनसास, मिनोसोटा, नेब्रास्का, विस्कॉनसिन इ. विद्यापीठे यातूनच निर्माण झाली. यादवी युद्धाच्या अखेरीस २१ राज्य विद्यापीठे स्थापन झाली. यांपैकी पुष्कळशी लँड् ग्रँट् योजनेतील होती. याच सुमारास २२५ खाजगी संस्थांनी चालविलेली विद्यापीठे अस्तित्वात होती.

बहुतेक विद्यापीठे पदवीपर्यंतचे शिक्षण देत असत. १८२५ मध्ये हारवर्ड

पदव्युत्तर अभ्यासाची सोय करण्यात आली. पुढे अनेक विद्यापीठांतून पदवीनंतरचे शिक्षण देण्यास प्रारंभ केला. काही संस्था तर केवळ पदव्युत्तर वर्ग व संशोधन येवढेच काम करतात. उच्च शिक्षणाचा प्रसार आता खूप झालेला आहे. १९ संस्थांतून लष्करी शिक्षण देण्याची सोय आहे.

नियंत्रण आणि व्यवस्थापन

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात तीन प्रकारच्या संस्था आढळून येतात. (१) फेडरल व्यवस्थापनाखाली चालविलेल्या संस्था. (२) सार्वजनिक संस्था व राज्यसरकारने चालविलेल्या संस्था. (३) खासगी धर्मसंस्थांनी चालविलेल्या संस्था. ज्या संस्था फेडरल किंवा राज्य चालविते तेथे संपूर्ण नियंत्रण सरकारचे हाती असते. खासगी किंवा धार्मिक संस्थांना देणग्याच्या रूपाने मदत मिळते. व कारभार स्वतंत्रपणे पाहिला जातो. फेडरल शासनातर्फे दिले जाणारे अनुदान राज्य शासनामार्फत वाटले जाते. राज्यांनी चालविलेल्या संस्थांची आर्थिक जबाबदारी राज्यशासन उचलते. खासगी संस्थांना जेव्हा अनुदान दिले जाते तेव्हा नियंत्रणाचे अधिकार शासनाकडे येतात. दैनंदिन कारभार पाहाण्यासाठी प्रत्येक उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थेत पुढील प्रकारे व्यवस्था केलेली असते.

(१) बोर्ड ऑफ ट्रस्टीज किंवा ॲडमिनीस्ट्रेटिव्ह कौन्सील या मंडळातील काही सभासद निवडून दिलेले असतात तर काहींची नेमणूक केली जाते. (२) चीफ एक्सिक्युटिव्ह ऑफिसर. त्याला कुलगुरू किंवा अध्यक्ष (President) म्हटले जाते. याची निवड ट्रस्टी करतात. (३) सल्लागार मंडळ शिक्षक या मंडळावर काम करतात. आपल्याकडील विद्वत्सभेसारखे (ॲकॅडेमिक कौन्सील) हे मंडळ नियम, कायदे, शिक्षण व्यवस्था, इ. कामे करते. (४) विद्याशाखा. निरनिराळचा विषयांचे अभ्यासक्रम तयार करणे, पुस्तके नेमणे इ. कामे हे नेमलेले अधिकारी (त्यांना प्रशासन अधिकारी म्हणतात) करतात. (५) विद्याशाखा प्रमुख (Dean) याला कॉलेज डीन असेही म्हटले जाते. दैनंदिन महाविद्यालयाचा कारभार पाहाण्याचे काम या व्यक्तीचे असते. (६) विद्यार्थी प्रमुख (Dean of the students) सर्व अभ्यासपूरक उपक्रमांची व्यवस्था पाहातो. विद्यार्थीनीसाठी

स्वतंत्र डीन म्हणून विद्यार्थीनी काम पहाते. (७) बिझिनेस मॅनेजर हा रजिस्ट्रारची कोषाध्यक्षाची कामे पाहातो. आर्थिक व्यवहार पाहाणे हे मुख्य काम. (८) रजिस्ट्रार-कुलसचिव. महाविद्यालय किंवा विद्यापीठाच्या कार्यालयीन कामाची व्यवस्था पाहाणारा. (९) पब्लिक रिलेशन्स ऑफिसर. लोकांशी संबंध प्रस्थापित करणारा अधिकारी, संस्थेच्या विकासाची कामे पाहातो. सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालये यात वरील प्रकारे व्यवस्थापन चालते.

प्रवेश, प्रशस्तिपत्र, पदवी व्यवस्था

संस्थेत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची वेगवेगळी पद्धत आहे. बहुतेक ठिकाणी चाचणी घेऊन प्रवेश दिला जातो. खुली प्रवेश परीक्षा अशी नाही. काही परीक्षा, चाचण्या घेऊन विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रके देण्याची प्रथा आहे. त्याचा विद्यार्थ्यांना भावी जीवनात फार उपयोग होतो. विद्यार्थ्यांनाही आपली प्रगती करण्यास उत्तेजन मिळते. विद्यापीठ किंवा उच्च शिक्षण संस्था स्थापन करण्यापूर्वी शासनाची परवानगी घ्यावी लागत. नाही. आपल्याकडे शासनाने कायदा केल्यावर विद्यापीठ अस्तित्वात येते. प्रत्येक संस्थेचा स्वतःचा अभ्यासक्रम आणि स्वतंत्र पदवी देण्याची प्रथा आहे. संस्थेच्या भरघोस यशावर या पदवीची प्रतिष्ठा अवलंबून असते. राज्य शासनाने चालविलेल्या विद्यापीठांच्या पदव्यांना जगात महत्त्व दिले गेलेले आढळते. अनेक ठिकाणी पत्रव्यवहाराच्या द्वारे, रेडिओ आणि टेलेव्हिजनच्याद्वारे शिक्षण घेण्याची सोय आहे. संपन्न ग्रंथालये, प्रयोगशाळा, सर्व आधुनिक सोयी, संशोधनावर भर यांमुळे विद्यापीठांना आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळालेली आहे. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अनेक उपक्रम हाती घेतले जातात. आपल्या विद्यापीठाचे सर्व प्रकारचे स्वातंत्र्य रक्षण करण्याचा आणि लोकशाही मूल्ये रुजविण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. आधुनिक नव्या जगाशी संपर्क, कार्यक्षम व्यक्तिमत्त्व, सामाजिक आणि नैतिक मूल्यावर निष्ठा, लोकशाही जीवनमूल्यांचे परिपालन, आंतरराष्ट्रीय वृत्तीचा विकास, या ट्रुमन कमिशनने सूचित केलेल्या उच्चशिक्षणाच्या उद्दिष्टानुसार संस्था चालविल्या

जातात. दैनंदिन काम, व्यवस्थापन, अभ्यासक्रम, संशोधन, अध्यापन पद्धती, सर्व उपक्रम, परस्पर संबंध यांचे सतत मूल्यमापन येथे चालल्याने संस्था गतिमान, प्रवाही, जिवंत आणि उपयुक्त राहातात. शिक्षक आणि विद्यार्थी यांना खूप कष्ट करावे लागतात. सर्वत्र निर्मय आणि अनौपचारिक वातावरण असल्याने विद्यार्जन हा आनंदाचा ठेवा होतो. विचार स्वातंत्र्य (Academic freedom) रक्षण करणे हे मूलभूत कार्य सर्वस्व पणाला लावून केले जाते. आर्थिक अडचणी या क्षेत्रातही तीव्रतेने जाणवू लागल्या आहेत. पण त्यांचा दर्जावर, कार्यक्षमतेवर परिणाम न होऊ देण्याचे प्रयत्नही जोरात चालू आहेत.

२ वर्षे ज्युनियर कॉलेज, २ वर्षे सीनियर कॉलेज किंवा सलग ४ वर्षे कॉलेज अभ्यासक्रम अशी वर्गरचना आहे. १ वर्षाने पदव्युत्तर व ३ वर्षाने डॉक्टरेट पदवी घेण्याची व्यवस्था. दैनंदिन चाचण्या, चर्चासत्रे (Seminars), अभ्यासाचे उन्हाळी वर्ग, अर्ध–वेळ शिक्षण योजना याचा लाभ व्यवसाय करणाऱ्या विद्यार्थ्यांना होतो. देशातील अनेक सामाजिक चळवळीशी विद्यापीठे सक्रीय सहकार्य करतात. राष्ट्र पुढील अनेक प्रश्नांचा विचार, त्याबद्दलच्या पहाण्या, संशोधन–विद्यापीठे हाती घेतात. त्यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रातील संस्थांना राष्ट्रीय जीवनात फार मोठे स्थान प्राप्त झाले आहे. बौद्धिक स्वातंत्र्याचे रक्षण करणारे देवदूत हे वर्णन सार्थपणे विद्यापीठांना लागू पडते. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता (विशेषत: काळा, गोरा) प्रवेश मिळणे आता सुलभ झाले आहे.

संस्थांची विविधता

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची विविधता आश्चर्यजनक आहे. लोकशाही वृत्तीचा परिपोष यामुळे प्रत्ययास येतो. प्रमुख संस्था अशा आहेत. (१) **जनरल कॉलेजेस**–सर्वसामान्य शिक्षणावर भर. पहिल्या दोन वर्षांनंतर विषय निवडून पदवीचा अभ्यास करण्याची सोय. (२) **कॉलेजेस**–४ वर्षांच्या अभ्यासक्रमात मानव्यविद्या आणि विज्ञान विषयांची सोय. पहिली २ वर्षे ज्युनियर कॉलेजप्रमाणे काम चालते. पुढील दोन वर्षे पदवी किंवा

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तयारी करवून घेतली जाते. (३) **लिबरल आर्ट कॉलेजेस**–खासगी संस्थांनी चालविलेली लोकप्रिय महाविद्यालये. अभ्यासक्रम सुटसुटीत म्हणून लोकप्रिय. (४) **टेक्निकल अँड कम्युनिटी कॉलेजेस**– खासगी संस्थांनी चालविलेली व तांत्रिक, व्यावसायिक अभ्यासक्रमावर भर. प्रौढ शिक्षणाचेही कार्य केले जाते. (५) **लँड ग्रँट कॉलेजेस**– शेती आणि इंजीनियरिंग महाविद्यालये मुख्यतः सहशिक्षण, शिक्षण-विस्तार योजना, संशोधन इ. कामे चालतात. (६) **स्कूल डिस्ट्रिक्ट कॉलेजेस**–स्थानिक संस्थांनी चालविलेली, ४ वर्षांचा सर्वसामान्य शिक्षणाचा अभ्यासक्रम असणारी महाविद्यालये. विधार्थी संख्या फार मोठ्या प्रमाणावर इथे असते. (७) **विद्यापीठ**–खासगी व राज्यशासनाने चालविलेली असे दोन प्रकार. (८) **ग्रॅज्युएट कॉलेजेस**– ४ वर्ष पदवीचा अभ्यास पूर्ण केल्यानंतर पुदव्युत्तर अभ्यास व संशोधन करणाऱ्या संस्था. (९) **हायर टेक्निकलसंस्था**– तांत्रिक व शिक्षकांचे प्रशिक्षणाची सोय असलेल्या संस्था.

उच्च शिक्षणाचे आपले प्रश्न

उच्च शिक्षण क्षेत्रातील अमेरिकेतील विविधता, प्रयोगशीलता आणि स्वातंत्र्य हे पाहिल्यानंतर आपल्या देशातील या क्षेत्रातील मर्यादा अपरिहार्यपणे समोर येतात. आपल्या या मर्यादांचे स्वरूप मागे पाहिले आहे. आणखी काही महत्त्वाचे प्रश्न ही नोंदवून ठेवणे आवश्यक आहे. (१) राष्ट्रीय जीवन, समस्या यांचा व विद्यापीठांचा संबंध. (२) संशोधन क्षेत्रातील मागासलेपणा. (३) विषयांची व अध्यापनाची साचेबंद पद्धती (४) स्वातंत्र्य, धैर्य, मनमोकळेपणा, सहकार्यवृती, सहिष्णुता, बुद्धिवादी दृष्टिकोण यांचा खुंटलेला विकास. (५) अध्ययन आणि नोकरी यांच्या परस्पर संबंधातून निर्माण झालेली मानसिक गोंधळाची परिस्थिती. अमेरिकेतील परंपरापासून पुष्कळ स्वीकारण्यासारखे आहे हे निश्चित.

० ० ०

६ शिक्षकांचे प्रशिक्षण

१९ व्या शतकाचा प्रारंभ काळ :

जगाच्या इतिहासात जे घडले तेच अमेरिकेत शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत घडले. शिकविणे हा नित्याचा व्यवसाय मानला गेलेला नव्हता आणि त्यासाठी खास संस्थाही निर्माण करण्यात आलेल्या नव्हत्या. या व्यवसायाला सामाजिक प्रतिष्ठाही नव्हती. वेतन तर अत्यंत कनिष्ठ पातळीवरचे होते. आवड आणि थोडे बहुत ज्ञान असणारी व्यक्तीं शिक्षकाचे काम करी. धर्मगुरू, धर्मप्रचारक हे प्रामुख्याने या व्यवसायात होते. अध्यापनाच्या कल्पनाही साचेबंद होत्या. कठोर शिक्षा आणि ठराविक यमनियम यांचे प्राबल्य होते. शाळेतील वातावरणही आकर्षक नव्हते. ही परिस्थिती हळूहळू बदलली. मॅसॅसिच्युएट राज्यात १८३९ मध्ये पहिली नॉर्मल शाळा शिक्षकांना एक वर्षाचे प्रशिक्षण देण्यासाठी स्थापन करण्यात आली. पुढे इतर राज्यात अशा नॉर्मल शाळा निघाल्या. १८५७ मध्ये इलीनॉस राज्यात, राज्य नॉर्मल विद्यापीठ (State Normal University) स्थापन झाली. वरच्या दर्जाचे प्राथामिक आणि माध्यामिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला. या ठिकाणी प्रवेश घेण्यास विशिष्ट अटी अशा नव्हत्या. विद्यापीठांनी अनेक वर्षे या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. १८७३ मध्ये आयोवा विद्यापीठात अर्धवेळ प्रशिक्षणाची सोय करण्यात आली. १८७९ मध्ये मिशिगन विद्यापीठात पूर्ण वेळ प्रशिक्षणाची सोय उपलब्ध झाली. १८८७ न्यूयॉर्कमध्ये कोलंबिया विद्यापीठ स्थापन झाले व त्यात केवळ शिक्षकांना नव्हे तर शाळेच्या कार्यकारी मंडळावर असणाऱ्या व्यक्तींनाही प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. परंतु सर्वार्थाने तंत्रशुद्ध आणि प्रगत अशा प्रशिक्षणाचा प्रारंभ विसाव्या शतकात झाला. प्राथमिक शिक्षण आणि माध्यमिक दोन वर्षाचे शिक्षण पूर्ण करणाऱ्या व्यक्तींना प्रशिक्षणासाठी प्रवेश दिला जात असे. १९२० पर्यंत हीच परिस्थिती होती. पुढे मात्र प्रशिक्षणाचा कालावधी ४ वर्षांचा केला गेला तेव्हा ही परिस्थिती बदलली. १९२२ मध्ये कोलंबिया विद्यापीठात विद्यार्थी-शिक्षक योजना (Pupil teacher) सुरू

केली. वरच्या दर्जाचे आणि शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यास प्रारंभ झाला. अमेरिकन ॲसोसिएशन ऑफ टीचर्स कॉलेजेसच्या ठरावानुसार प्रवेशासाठी लागणारी गुणवत्ता वाढविण्यात आली व दर्जाही वाढविण्यात आला. हा व्यवसाय स्वीकारणाऱ्यांची संख्याही या वेळेपावेतो खूप वाढली.

कालांतराने प्रवेशासाठी चाचण्या, प्रत्यक्ष मुलाखत, व्यवसायाची कितपत आवड आहे याची तपासणी, मुख्याध्यापकांचे शिफारस पत्र, चांगल्या वर्तनाचा दाखला या गोष्टी आवश्यक करण्यात आल्या. प्रत्येक राज्यात यासाठी वेगवेगळचा कसोटचा आणि अपेक्षा असतात. बहुधा सर्वत्र माध्यमिक प्रशिक्षणासाठी पदव्युत्तर शिक्षण व चार वर्षांचा अध्यापनाचा अनुभव प्रशिक्षणासाठी आवश्यक लागतो. प्राथमिक प्रशिक्षणासाठी महाविद्यालयीन दोन किंवा तीन वर्षांचे शिक्षण व चार वर्षे प्रत्यक्ष शिकविण्याचा अनुभव लागतो. काही राज्यांतून माध्यामिक प्रशिक्षण घेण्यासाठी डॉक्टरेट पदवीही आवश्यक असते.

नवी दिशा :

प्रशिक्षणाचे महत्त्व सर्वमान्य झाल्याने आणि या व्यवसायाला प्रतिष्ठा मिळाल्याने प्रशिक्षण कार्यक्रमाकडे अधिक बारकाईने आता लक्ष पुरविले जाऊ लागले आहे. नॅशनल एज्युकेशन ॲसोसिएशन ऑफ अमेरिका या संघटनेने १९३८ साली फ्यूचर टीचर्स ऑफ अमेरिका हे मंडळ स्थापन केले. त्याच्या जोडीने माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये यासाठी मंडळे, छोटे संघ (Clubs and Chapters) स्थापन केले. या क्षेत्रातही खासगी संस्थांनी आणि व्यक्तींनी सहकार्य केलेले आहे. १८२६ मध्ये व्हरमाँट येथे स्थापन झालेली नॉर्मल शाळा खासगी प्रयत्नातून निघाली होती. या प्रशिक्षण संस्थांच्या स्वरूपावर युरोपमधील प्रशिक्षण संस्थांचा फार मोठा प्रभाव पडणे नैसर्गिक होते. पण पुढे प्रशिक्षण कार्याला अमेरिकेत नवी दिशा मिळाली. आता या संस्थांना फार मोठा दर्जा व प्रतिष्ठा मिळालेली आहे. या प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचे चार विभाग पडतात. (१) नॉर्मल स्कूल (२) टीचर्स ट्रेनिंग कॉलेज (३) स्कूल ऑफ एज्युकेशन (४) डिपार्टमेंट ऑफ एज्युकेशन. या संस्थांचा परिचय आता करून घेऊ.

नॉर्मल स्कूल :

अगदी प्रारंभी ही संस्था सर्वसामान्य शाळा होती. शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी खास विषय शिकवले जात नव्हते. पण शिक्षक होण्यासाठी या शाळेत यावे लागे. कालांतराने ही प्रशिक्षण संस्था बनली. पूर्वी एक वर्षाचा अभ्यासक्रम होता तो आता दोन वर्षांचा प्रशिक्षणासाठी केलेला आहे. १९२५ नंतर या संस्थेत खऱ्या अर्थाने प्रशिक्षण मिळू लागले. प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या सर्व सोयी व नवे अभ्यासक्रम आता उपलब्ध आहेत. अमेरिकेतील शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या कार्यात या संस्थांनी फार मोठा वाटा जबाबदारीने उचलला.

(२) टीचर्स ट्रेनिंग कॉलेजेस :

इलिनॉस राज्यात १८५७ साली या संस्थेचे बीज पेरले गेले. राज्य शासनाने स्थापन केलेले हे पहिले महाविद्यालय. यादवी युद्धापर्यंत या प्रशिक्षण संस्थेने मोठी कामगिरी केली. १८८८ मध्ये निकोलस मरे बटलर याने न्यूयॉर्क टीचर्स कॉलेज स्थापन केले. १८९८ मध्ये हे प्रशिक्षण महाविद्यालय कोलंबिया विद्यापीठाचा एक घटक बनले. प्राथमिक व माध्यमिक अशा दोन्ही प्रकारच्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था आहे. शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर पदवी मिळते. पाच वर्षांचा अभ्यासक्रम रूढ आहे. यासारख्या इतर संस्थांतून पदव्युत्तर शिक्षणाची सोय आहे. अमेरिकेच्या शैक्षणिक जीवनात या महाविद्यालयांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

(३) स्कूल्स् ऑफ एज्युकेशन :

अशा संस्थांना प्रशिक्षण शाळा किंवा टीचर्स कॉलेजेस असेही म्हटले जाते. कोणत्यातरी विद्यापीठाशी ही संस्था संलग्न असते. १८७९ मध्ये मिशिगन विद्यापीठात अशी संस्था स्थापन केली गेली. त्यापूर्वी या विद्यापीठात अर्ध वेळ प्रशिक्षणाची सोय होती. पदवीधरांसाठी प्रशिक्षण देण्यास प्रथम सुरुवात या विद्यापीठाने केली. आता या महाविद्यालयांना विद्यापीठाचा एक स्वतंत्र विभाग (Department) म्हणून दर्जा मिळालेला आहे. महाविद्यालयाची

दोन वर्षे पूर्ण करणाऱ्यांना येथे प्रवेश दिला जातो. शिक्षणशास्त्र, भाषा, संस्कृती इ. विषय शिकविण्याची सोय. पदवी देण्याची व्यवस्था इथेही आहे.

(४) युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ एज्युकेशन

बऱ्याच काळानंतर अमेरिकेतील विद्यापीठांनी शिक्षण आणि शास्त्र या विषयांना मान्यता देऊन त्यांचे शिक्षण सुरू केले. पदवीच्या अभ्यासक्रमात शिक्षण विषयाला स्वतंत्र स्थान मिळाले. बहुतेक सर्व विद्यापीठांतून आता या विभागातर्फे प्रशिक्षणाची सोय उपलब्ध आहे. अनेक विद्यापीठांतील या विभागाद्वारे मौलिक संशोधन आणि प्रयोग करून जागतिक लौकिक मिळविला आहे. चालू शतकात शिक्षणशास्त्राच्या जोडीने इतर विषयही शिकविण्याची प्रथा रूढ झाली आहे.

अभ्यासक्रम

अध्यापन तंत्र, शिक्षण शास्त्र आणि सर्वसामान्य शिक्षण अशी अभ्यासक्रमाची विभागणी केलेली असते. जेथे चार वर्षांचा अभ्यासक्रम आहे तेथे पहिली दोन वर्षे सर्वसामान्य विषय व नंतरची दोन वर्षे प्रशिक्षणास आवश्यक असे व्यावसायिक विषय शिकविले जातात. काही ठिकाणी प्रशिक्षणाचे विषय आणि नेहमीचे विषय सरमिसळ करून शिकवले जातात. अमेरिकेतील एकूण ५० राज्यांपैकी ४१ राज्यांत चार वर्षांचा अभ्यासक्रम रूढ आहे. क्वचित् पाच वर्षांचाही अभ्यासक्रम राबविला जातो.

जवळजवळ ३०० हून अधिक संस्था अमेरिकेत आहेत की जेथे पदव्युत्तर प्रगत अभ्यासक्रम, शिक्षण विषयाचा, शिकविण्याची सोय आहे.

विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक शिकविण्याचा अनुभव घेण्याची चांगली व्यवस्था उपलब्ध असते. प्राथमिक आणि माध्यमिक अशा दोन्ही प्रकारच्या वर्गांना शिकविण्याची सोय आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक अभ्यासानुवर्ती उपक्रम राबविले जातात. पदवी किंवा पदविका घेतल्याशिवाय शिक्षकाची नोकरी मिळू शकत नाही ही जाणीव असल्याने प्रशिक्षणासाठी आलेले विद्यार्थी भरपूर श्रम करतात. नियंत्रण करण्याची क्षमता, सामाजिक जबाबदारीची जाणीव, उत्तम विनोदबुद्धी, सर्वांगीण

जीवनात रस घेण्याची वृत्ती, विषयावर प्रभुत्व इत्यादीकडे विशेष लक्ष पुरवून शिक्षकांची निवड केली जाते. त्यामुळे या सर्व बाबींचे शिक्षण आणि विकास प्रशिक्षणाच्या काळात केला जातो. माध्यमिक शाळेत शिक्षक होण्यासाठी पदवी आणि चार वर्षांचा ट्रेनिंग कार्यक्रम पूर्ण करणे आवश्यक असते. प्राथमिक शिक्षकासाटी दोन वर्षांचा महाविद्यालयीन अभ्यासक्रम आणि दोन वर्षांचा नॉर्मल स्कूल किंवा ट्रेनिंग कॉलेजचा अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक असते. तर काही राज्यांत पदवी किंवा चार वर्षांची प्रशिक्षणाची पदविका मिळविणे आवश्यक. या बाबतीत प्रत्येक राज्याचे शिक्षक निवडण्याचे निकष वेगवेगळे आहेत. खास विषयांचे प्रशिक्षण घेतलेल्यांना फार मागणी नेहमीच असते. अशा विषयांचे अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर प्रशस्तिपत्र देण्याची प्रथा रूढ आहे. अगदी पूर्व प्राथमिक कक्षेपासून तो उच्च माध्यमिक शाळेपर्यंत खास शिक्षण घेतलेल्या शिक्षकांना नेहमीच मागणी असते.

बहुतेक सर्व राज्यांत शिक्षण विभाग प्रमुख आवश्यक ती चाचणी घेऊन पदविका देतो. या प्रशस्तिपत्राला त्या राज्यात किंवा क्वचित् अन्य राज्यातही मान्यता मिळू शकते. विद्यापीठातर्फे परीक्षा घेऊन नेहमीप्रमाणे पदव्या देण्याची सोय आहे. या देशातील प्रशिक्षण संस्थांचे वैशिष्ट्य हे आहे की प्राथमिक, माध्यमिक आणि पूर्व प्राथमिक संस्थांतून त्या त्या कक्षेला अनुकूल असे संशोधन करण्याचे शिक्षण दिले जाते. यामुळे शिक्षण क्षेत्रात या देशात जेवढे संशोधन झाले आहे व होत आहे तेवढे जगात इतरत्र होत नाही. प्रत्येक गोष्टीचे सतत मूल्यमापन केले जात असल्याने उपयुक्त गोष्टींचाच फक्त स्वीकार केला जातो आणि अनावश्यक गोष्टी टाळल्या जातात. या दृष्टीने आणखी एका वैशिष्ट्य पूर्ण संस्थेचा उल्लेख करणे आवश्यक आहे. ओहिओ या औद्योगिक शहरात विविध प्रकारचे व्यवसाय आणि उद्योग शिकविणारे अँटीऑश् (Antioch College) महाविद्यालय ही ती संस्था होय. शिक्षण विषयक संशोधनही येथे चालते. विविध प्रकारच्या संशोधन क्षेत्रात हारवर्ड विज्ञापीठ अग्रगण्य आहे. हे सर्वश्रुत आहे.

कामाचे तास, पगार, नोकरीतील नियम इत्यादी

प्रारंभीच्या काळात शिक्षकाचे जीवन खडतर असे होते. अपुरा पगार, नोकरीतील अशाश्वतता, सामाजिक उपेक्षा, काटकसरीने राहाण्याची सक्ती इ. अनेक मर्यादा या व्यवसायाला पडलेल्या होत्या. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून परिस्थिती बदलत गेली. स्थानिक संस्थांनी दीर्घ मुदतीच्या करारावर शिक्षक नेमण्यास प्रारंभ केला. कालांतराने नोकरीची शाश्वती, पेन्शन, वैद्यकीय मदत, विचारस्वातंत्र्य, सुरक्षित जीवनाची हमी यांचा लाभ झाला. नॅशनल एज्युकेशन असोसिएशन ऑफ अमेरिका या राष्ट्रव्यापी संस्थेचे सभासदत्व बहुतेक शिक्षकांनी स्वीकारले आहे. शिक्षकांच्या सर्व हितसंबंधांचे रक्षण ही संस्था करते. अमेरिकन फेडरेशन ऑफ टीचर्स या नावाची दुसरी संघटना इतर कामगार संघटनांशी सहकार्य करून या क्षेत्रात काम करते. या व्यवसायाला आता पुष्कळच स्थैर्य प्राप्त झालेले आहे.

प्रत्येक राज्यात नेमणूक, पाळण्याचे नियम, नोकरीची शाश्वती, रजा, सुट्ट्या इ. संबंधीचे नियम थोड्या फार फरकाने सारखेच आहेत. स्टेट एम्प्लॉमेंट एजन्सी मार्फत शिक्षकांच्या नेमणुका केल्या जातात. निरनिराळ्या संस्थांच्या गरजेप्रमाणे शिक्षक त्या त्या ठिकाणी नेमले जातात. नागरी आणि ग्रामीण भाग यातील शिक्षकांच्या वेतनात तफावत आहे. राज्याचे उत्पन्न आणि शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या यांच्या प्रमाणात शिक्षकाचे वेतन ठरविले जाते. काही राज्यांतून प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांना विशिष्ट ठरलेल्या मर्यादेपेक्षा कमी पगार दिला जात नाही. शिक्षकांना निवृत्तीवेतन देण्याची व्यवस्था आहे. राष्ट्रीय उत्पन्न, वाढते जीवनमान, यांच्या संदर्भात पगारात वाढ केली जाते. शनिवार–रविवार सुट्टीचे सोडून आठवड्याचे ३५ तासिका (Periods) एवढे काम शिक्षकाला करावे लागते. १६० पासून २०० दिवस वर्षाचे काम चालते. ९ महिने शाळेचे काम चालते. प्रत्येक वर्गात सरासरीने २५ ते ३० विद्यार्थी असतात. शिक्षकाच्या कामाचे स्वरूप, दर्जा, जवाबदारी व त्याची गुणवत्ता याला नेहमी महत्त्व देण्यात येते. अगदी अपवादात्मक परिस्थिती असेल तरच तडकाफडकी नोकरीवरून कमी केले जाते. शिक्षकाची बाजू ऐकल्याशिवाय अंतिम निर्णय घेतला जात

नाही. सर्वसामान्य पालक शिक्षकाच्या सल्ल्याचा मान राखतात. शिक्षक हा महत्त्वाचा सामाजिक घटक आहे हे सर्वमान्य आलेले दिसते,

भारतीय परिस्थती

भारतातली या क्षेत्रातील परिस्थती समाधानकारक नाही हे सर्वांना माहीत आहे. विषय ज्ञान, प्रयोगशीलता, प्रभावी अध्यापन याबाबत सर्वत्र असमाधान आहे. आपली प्रशिक्षण महाविद्यालये संशोधनाच्या क्षेत्रात फार मागासलेली आहेत. केवळ अध्यापन तंत्रावर भर देण्याची प्रवृत्ती दिसून येते. आपल्याकडे शिक्षकाला कसलेही स्वातंत्र्य नाही. नोकरीची शाश्वती, निवृत्ती वेतन इ. सोयी अलीकडे उपलब्ध झाल्या आहेत. पण शिक्षक नेमणुकीची चांगली यंत्रणा नाही. प्राथमिक शिक्षकांच्या संघटना आहेत. पण त्यांना संशोधन कार्यात, शिक्षण कार्यात रस नाही. त्यामुळे त्यांचे कार्य एकांगी ठरत आहे. राज्य सरकारचा संपूर्ण शिक्षणावर इतके नियंत्रण आहे की कोणताही प्रयोग, नवा उपक्रम हाती घेणे जवळजवळ अशक्य होऊन बसले आहे. विद्यापीठ क्षेत्रातील शिक्षकांना प्रशिक्षण नसले तरी चालेल असा गैरसमज रूढ आहे. प्राथमिक, माध्यमिक आणि विद्यापीठीय शिक्षकात तरतमभाव करण्याची वृत्ती स्पष्ट दिसून येते. प्राथमिक शिक्षकांची गुणवत्ता सर्वांनाच अस्वस्थ करून टाकीत आहे. राज्यशासन, नगरपालिका, महापालिका, जिल्हा परिषदा, खासगीसंस्था यांचे नियंत्रण प्रकारात कोठेही एकसूत्रता नाही. राजकारणाचे प्राथमिक क्षेत्रावर विपरीत परिणाम झाल्याचे चित्र सर्वासमोर आहे. आमच्या सर्व थरावरील प्रशिक्षण संस्था रूढ चाकोरी आणि कालबाह्य दृष्टिकोन सोडायला तयार नाहीत. देशातील भयानक दारिद्र्य, ग्रामीण भाग, सर्वदूर निरक्षरता आणि अज्ञान, पारंपारिक वृत्ती, या अनेक घटकांचा परिणाम या व्यवसायावर अपरिहार्यपणे झाला असला तर नवल नाही. पर्यायाने शिक्षणाचा दर्जा खालावणे, शिक्षकाला सामाजिक मान्यता न मिळणे, व्यावसायिक वैफल्य निर्माण होणे इत्यादी आपत्ती समोर ठाकल्या आहेत. कालबाह्य ठरलेली परीक्षा पद्धतीही यात भर टाकीत आहे. नव्या, पुरोगामी, वैचारिक क्रांतीची गरज प्रशिक्षण क्षेत्राला तीव्रतेने भासू लागली

तर नवल नाही. स्त्री शिक्षकांची वाण भासत आहे. शिक्षणाच्या विस्ताराच्या जोडीने या प्रश्नाकडे लक्ष न पुरविल्याने फार गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. बहुतेक संस्था अत्यंत बिकट आर्थिक पेचात सापडलेल्या आहेत. पर्यायाने हा राष्ट्रीय प्रश्न झाला असून त्यावर तातडीने उपाय करणे आता अटळ झाले आहे.

० ० ०

७ व्यवसाय मार्गदर्शन

काळाची गरज

चरितार्थासाठी उद्योग करणे हा मानवी संस्कृतीचा एक विशेष मानावा लागेल. प्राचीनकाळी घरातील वडील मंडळी आपला व्यवसाय मुलांना शिकवीत. व्यावसायिक शिक्षणाची ही प्राचीन परंपरा. आजही या परंपरेत खंड पडलेला नाही. आपल्या मुलाने आपला व्यवसाय करावा ही भावना आजही प्रबल राहिलेली दिसते. सुरक्षितेची भावना या मागे असते हे उघड आहे. परंतु संस्कृतीच्या विकासाबरोबर जीवन व्यवहार गुंतागुंतीचे झाले. प्राचीन सरळ, एकमार्गी जीवन संपले. जीवनात केवळ टिकून राहाण्यासाठी स्पर्धा करणे अटळ झाले. शास्त्रीय शोधामुळे नवी औद्योगिक संस्कृती निर्माण झाली. यंत्रयुगाने पारंपारिक व्यवसायांना नष्ट केले, मागणी आणि पुरवठा या न्यायानुसार प्रचंड प्रमाणात उत्पादन ही गरज झाली. सहाजीकच व्यवसायाचे शेकडो नवे प्रकार, उद्योगाची नवी क्षेत्रे निर्माण झाली. सर्वसामान्य शिक्षणाच्या जोडीने व्यवसायाचे शिक्षण द्यावे हा विचार पुढे आला. मग कोणता व्यवसाय करावा, त्याचे शिक्षण कसे असावे, कोणत्या गुणांची, क्षमतेची गरज कोणत्या व्यवसायाचा आहे. या संबंधीच्या विचारातून व्यवसाय मार्गदर्शन या कल्पनेचा उदय झाला आणि कोणत्याही देशाच्या शिक्षणप्रणालीचे हे एक अविभाज्य अंग बनून गेले. Vocation या शब्दाचा खरा अर्थ आवडीप्रमाणे व्यवसायाची निवड असा होतो. व्यवसातूनच धंदा (Profession) तयार होतो. जगात अत्यंत पुढारलेल्या देशांत व्यवसाय मार्गदर्शन ही आवश्यक गरज झाली आहे. कारण मुले सारख्या कुवतीची

क्षमतेची, बुद्धिमत्तेची, समान सांस्कृतिक वारसा असलेली नसतात ही वस्तुस्थिती झाली. व्यवसाय केल्याशिवाय अनेकांना शिक्षण घेणे शक्य होत नाही. अशा सर्व परिस्थितीतून प्रत्येकाचा विकासाचा, प्रगतीचा, स्वावलंबनाचा मार्ग मोकळा व्हावा या दृष्टीने व्यावसायिक मार्गदर्शनाचे तंत्र निर्माण झाले. मानसशास्त्र, अर्थशास्त्र, यांचाही विचार मार्गदर्शन करण्यासाठी करावा लागतो. व्यवसाय मार्गदर्शनाचे आता सुप्रतिष्ठित शास्त्र तयार झाले आहे. औद्योगिक क्रांतीमुळे युरोपात या नव्या क्षेत्राचे काम सुरू झाले. आता जगात सर्वत्र या क्षेत्राचा विकास होऊन काम चालत आहे. कोणतेही काम हलके नसते. कामाला व्यक्तीमुळे प्रतिष्ठा येते हा विचारही आता दृढमूल झाला आहे. शरीरश्रम आणि बौद्धिकश्रम अशी साचेबंद वाटणी नव्या जगाने नामंजूर केली आहे. व्यवसायाने व्यक्तित्वाचा विकास होण्यास साहाय्य होते असाच सर्वत्र अनुभव आहे. आतातर व्यवसाय हेच शिक्षणाचे माध्यम (Medium of instruction) करून शिक्षण देण्याचे प्रयत्न होताना दिसतात.

पहिले प्रयत्न

अमेरिकेत या दृष्टीने १८७६ साली कसबी कारागीर कसे निर्माण करावेत याची चर्चा करण्यासाठी फिलाडेल्फिया येथे सभा झाली. विसाव्या शतकात या क्षेत्रात खरी प्रगती होऊ लागली. करींक्युलम संस्था (Curriculum institutions) स्थापन करण्यात आल्या व त्यात अनेक व्यापारी विषय आणि व्यवसाय यांचे शिक्षक द्यायला सुरुवात झाली. या संस्थांच्या गरजा आणि एकूण पहाणी करण्यासाठी एक कमिशन नेमण्यात आले. १९१७ च्या स्मिथ ह्यूग (Smith Hughe) च्या कायद्यानुसार फेडरल बोर्ड ऑफ् व्होकेशनल एज्युकेशन स्थापन करण्यात आले. १९२९ मध्ये जॉर्ज रीड (George Reed) च्या कायद्यानुसार या संस्थांना अधिक अनुदान देण्याची व्यवस्था झाली. अधिक वाढ जॉर्ज एलिझे (१९३४) आणि जॉर्ज डीन (१९३६) यांच्या कायद्याने मिळू लागली. दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभीच व्यावसायिक शिक्षणाला फार मोठा वेग प्राप्त झाला. कुशल

तंत्रज्ञ, कारागीर यांना प्रचंड मागणी वाढली. सर्व सामान्यपणे दोन विभाग (१) अर्धवेळ (२) पूर्ण वेळ व्यावसायिक शिक्षण देण्याची सोय असे करता येतील. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात फेडरल शासनाने या प्रकारच्या शिक्षणासाठी विद्यापीठे आणि महाविद्यालये यांना ५००० कोटी डॉलर्सचे अनुदान दिले. कारण राष्ट्रीय संरक्षणाचा फार मोठा प्रश्न देशासमोर होता. १९४६ मध्ये जॉर्ज बारडेन (Gorge Barden) कायद्यामुळे अधिक अनुदान संस्थांना मिळू लागले. व्यावसायिक शिक्षण हा माध्यमिक शिक्षणाचा एक भाग बनलेला आहे. इतर विषयांच्यासारखा एक विषय समजून व्यावसायिक शिक्षण दिले जाते. स्थानिक मार्गाने जेवढी आर्थिक मदत उपलब्ध होते तितकीच रक्कम फेडरल शासन या संस्थांना देते. स्थानिक गरजाप्रमाणे संस्था आपले व्यावसायिक विषय निवडतात. खासगी आणि राज्यपातळीवर अशा दोन्ही प्रकारच्या संस्था या क्षेत्रात आहेत.

सक्तीच्या शिक्षणाचे वय ओलांडून गेलेले पण नोकरीत गुंतलेल्या युवकांना अर्धवेळ व्यवसाय शिकविण्याची सोय आहे. त्याचप्रमाणे सर्वसामान्य अभ्यासक्रमात या शिक्षणाचा अंतर्भाव करूनही हे शिक्षण दिले जाते. काही संस्थात विद्यार्थी काम करतात व त्यासाठी त्यांना मोबदला मिळतो. येथे त्यांना त्या मोबदल्यात व्यावसायिक शिक्षण दिले जाते. व्यवसाय शिक्षण देण्याची योजनापूर्वक सोय या देशात आहे. त्यांपैकी प्रकार असे :

(१) उमेदवारी पद्धती (Apprentice System)

पूर्ण वेळ किंवा अर्धवेळ शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कामाचा मोबदला देऊन व्यवसाय शिकविले जातात. ही पद्धती रूढ झालेली पूर्वीपासून असून देशभर अशा संस्था आहेत.

(२) सर्वसामान्य व्यावसायिक शिक्षण कार्यक्रम (General Vocational Programme)

अनेक शाळा–विद्यापीठांतून हे उपक्रम राबविले जातात. (१) औद्योगिक (Industrial) शिक्षण. (२) व्यापार–उद्योग (Business and Commerce) शिक्षण. (३) शेती व्यवसाय शिक्षण (४) गृह–अर्थ

व्यवस्था (Home Economics) शिक्षण असे या प्रकारचे विभाग करून शिक्षण दिले जाते. औद्योगिक शिक्षण विभागात इंग्रजी, इतिहास, शास्त्र, गणित, कला इ. विषयाबरोबर निरनिराळी यांत्रिक कामे, सुतारकी, रेडिओ, मोटार दुरुस्ती, धातूकाम इ. विषय शिकविले जातात. खाजगी संस्थाही या क्षेत्रात आहेत. त्यांना ट्रेड सेंटर्स म्हणतात. टाईपिंग, स्टेनोग्रॅफी, व्यापारशास्त्र यांचे शिक्षण दुसऱ्या विभागात दिले जाते. शेतीला अत्यंत महत्त्व याही देशात आहे. कमवा आणि शिका या योजनेमार्फत शेतीचे सर्वांगीण शिक्षण देण्याची व्यवस्था तिसऱ्या विभागात आहे. चौथ्या विभागात घरगुती जीवनाशी निगडित असलेले दैनंदिन गरजेचे विषय शिकविले जातात. गृहरचना आणि सजावट, लहान मुलांची काळजी घेणे, आरोग्य काळजी, अन्न–पदार्थ व्यवस्था, कपड्यांची काळजी, कौटुंबिक अर्थव्यवस्था, कुटुंब नियोजन इ. उपयुक्त विषय शिकविले जातात. मुलींना हे शिक्षण देणाऱ्या स्वतंत्र संस्थाही आहेत. नोकरी करीत असताना आपले कौशल्य आणि व्यावसायिक दर्जा वाढविण्यासाठी शिक्षण देण्याच्या योजना पूर्णवेळ किंवा अर्ध–वेळ स्वरूपाच्या सर्वत्र उपलब्ध आहेत. व्यवसाय शिक्षणाला आर्थिक मदतीच्या अभावी अडचणी येऊ नयेत यासाठी देशभर सर्व स्तरावर सोयी उपलब्ध आहेत.

लँड् ग्रँट कॉलेजची योजना तांत्रिका आणि व्यावसायिक शिक्षणाचा विकास व्हावा या हेतूने सुरू करण्यात आली. खासगी व्यक्ती आणि संस्था अशा दोन्ही पातळीवर हा उपक्रम राबविण्यात येत आहे. १८६२ च्या कायद्यानुसार प्रत्येक सीनेटरला ३० एकर जमीन देऊन या प्रकारचे महाविद्यालय सुरू करण्यास उत्तेजन देण्यात आले. १९१४ च्या स्मिथलेव्हर कायद्यानुसार हे कार्य समाजकेंद्र विस्तार योजनेशी (Community Extension Service) निगडित करण्यात आले. या संस्थांच्यावतीने शेती, यांत्रिक व्यवसाय करणारे, इंजीनीयर्स, विविध प्रकारचे संशोधन, इ. कामे विकसित करण्यात आली. विस्तार सेवा योजना प्रकल्प हाती घेऊन समाजाच्या सर्व थरांत नवे ज्ञान आणि कौशल्य पोचविण्याची व्यवस्था करण्यात आली.

व्यवसाय मार्गदर्शन

विद्यार्थ्यांना आपली उपजत आवड, क्षमता, गरज या नुसार मार्गदर्शन करण्याची प्रथा या देशात फार पूर्वीपासून रूढ होती. १८६२ मध्ये अध्यक्ष अॅब्राहम लिंकन याने औद्योगिक, व्यापारी आणि शेती शिक्षणाला फेडरल शासनाने आर्थिक मदत द्यावी अशी योजना अमलात आणली. १९०८ मध्ये या दृष्टीने काम करण्यासाठी समाज कल्याण केंद्र (Social welfare Agency) स्थापन करण्यात आले. बेकारांना योग्य काम मिळवून देणे हे या संस्थेचे मुख्य कार्य होते. पण हे काम व्यवसायाचे मार्गदर्शन करून साधण्यावर भर होता. १९१३ मध्ये या उपक्रमातूनच नॅशनल व्होकेशनल गायडन्स अॅसोसिएशन ही संस्था निर्माण झाली. १९३९ मध्ये व्होकेशनल इन्फरमेशन अँड गायडन्स सर्व्हिस ही संस्था स्थापन झाली. फेडरल शासन, फेडरल व्होकेशनल अॅक्टप्रमाणे या संस्थांना आर्थिक मदत पुरविते. अमेरिकेत व्यवसाय मार्गदर्शन शास्त्रशुद्ध पायावर स्थिर झाले असून त्याचे कार्य पुढीलप्रमाणे चालविले जाते.

(१) परीक्षा आणि चाचण्यांच्याद्वारे विद्यार्थ्यांची आवड–निवड, क्षमता यांचा शोध. (२) ही पहिली अवस्था पूर्ण झाल्यावर निवडावयाच्या व्यवसायासंबंधी मार्गदर्शन. (३) गायडन्स कौन्सील सर्व चाचण्या शास्त्रीय पद्धतीने करण्याची व्यवस्था करते. (४) परीक्षा व चाचण्या घेणारी अनेक केंद्रे उपलब्ध करून सोय. (५) व्यवसाय मार्गदर्शन कार्यावर देखरेख करणारा खास अधिकारी (६) नोकरीची व्यवस्था पाहाणारी केंद्रे. या मार्फत पुनः परीक्षा व चाचण्या घेण्याची सोय. आपला व्यवसाय कार्य-क्षमतेने करणाऱ्या कामगारांना उत्तेजन देण्यासाठी पारितोषिक योजना.

विद्यार्थी सेवा (Students Personal Service)

शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे यांमध्ये विद्यार्थ्यांना या संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी खास व्यवस्था असते. शारीरिक, मानसिक दृष्ट्या संपूर्ण तपासणी करून विद्यार्थ्यांच्या विकासाला साहाय्य केले जाते. शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर व्यावसायिक मार्गदर्शन मिळण्याची व्यवस्था केलेली आहे.

विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती नोंदवून ती वेळोवेळी योग्य ठिकाणी पाठविण्याची सोय. याचा फायदा विद्यार्थी, पालक म्हणजे पर्यायाने राष्ट्राला होतो.

अमेरिकेच्या यशाची कारणे :

व्यावसायिक शिक्षणाचा प्रश्न आपल्या देशात अर्धवट स्थितीत पडलेला दिसून येतो. याला काही ऐतिहासिक कारणे असली तरी स्वातंत्र्यानंतर या क्षेत्रात पुष्कळ करता येण्यासारखे होते. त्या दृष्टीने शिक्षणाचे नियोजन न झाल्याने हा प्रश्न अत्यंत मूलभूत असून उपेक्षित राहिला ही वस्तुस्थिती आहे. अमेरिकेचा शोध लागल्यानंतर जे युरोपीय लोक वस्ती करण्यास गेले त्यांसी देशाची भौगोलिक परिस्थिती आणि गरजा यांचा विचार प्रधान मानून व्यावसायिक शिक्षणाला एकूण शिक्षण प्रणालीत अग्रस्थान दिले. फेडरल, राज्यशासन आणि स्थानिक लोक यांनी या शिक्षणासाठी भरपूर आर्थिक साहाय्य उपलब्ध केले. सर्वसाधारण शिक्षणाच्या बरोबरीने व्यावसायिक शिक्षणाचा अंतर्भाव करून रचना केली. माध्यमिक, महाविद्यालय आणि विद्यापीठ क्षेत्रात या शिक्षणाला स्थान देऊन त्याचे महत्त्व आणि प्रसार सिद्ध केले. अनेक प्रकारच्या खासगी आणि शासकीय संस्थांच्याबरोबर उद्योग धंद्यांनीही या शिक्षणाला गती मिळाली. विसाव्या शतकात व्यवसाय मार्गदर्शनाचे शास्त्रशुद्ध तंत्र प्रस्थापित करून त्यासाठी भरपूर संशोधन केले. याचा परिणाम असा झाला की सर्वसामान्य शिक्षण (General Education) आणि व्यावसायिक शिक्षण यांच्या दर्जात भेदभाव, उच्चनीचपणा निर्माण झाला नाही. सामान्य लोकांच्या मनोवृत्तीवर याचा फार चांगला परिणाम झाला. श्रमप्रतिष्ठेला योग्य स्थान मिळाले. अर्धवेळ, पूर्णवेळ, अभ्यासवृत्तीची सोय, उमेदवारी, कमवा आणि शिका यांसारख्या योजनांनी कोणाचीही कुचंबणा झाली नाही. शेती शिक्षणाचा तांत्रिक शिक्षणाच्या जोडीने विकास केल्याने उत्पादन वाढून आर्थिक सामर्थ्यात भर पडली. सारे माध्यमिक शिक्षण व्यवसायाभिमुख झाले. तीच गोष्ट विद्यापीठ शिक्षणाची. व्यवसाय प्रशिक्षण संस्था निघाल्याने शिक्षकही उपलब्ध झाले. आमच्याकडे मात्र ज्या खासगी शिक्षण संस्थांनी माध्यमिक आणि विद्यापीठीय शिक्षणाचा प्रसार केवळ शहरांतून केला त्यांनी व्यावसायिक शिक्षण, शेती यांची उपेक्षा केली.

केवळ सरकारी प्रयत्न अपुरे पडले. व्यवसाय मार्गदर्शनाची सोय झाली नाही. पर्यायाने पांढरपेशा नोकरदारांची संख्या वाढली. दारिद्र्यात बुडालेल्या देशात श्रमप्रतिष्ठा सांगावी लागली. पदवीला अवास्तव महत्त्व मिळाले. सारे शिक्षण निरुपयोगी आहे असा सामान्य लोकांचा ग्रह झाला. आर्थिक अपुरी मदत, पुरोगामी शैक्षणिक नियोजनाचा अभाव, यांमुळे तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाचा विकास झाला नाही. गांधीजींची वर्धा शिक्षण योजना, विविधलक्ष्यी शाळा (Multipurpose) उद्योग शाळा यशस्वी होऊ शकल्या नाहीत या मागे ही पारंपारिक मनोवृत्ती होती. याचा परिणाम समग्र राष्ट्रीय विकास आणि उत्पादन यांवर झाला. आपल्या एकूण आर्थिक दुरवस्थेची आणि मागासलेपणाची बीजे या वास्तव परिस्थितीत सापडतील. कोठारी आयोगाने सूचित केलेली श्रमानुभवाची कल्पनाही पूर्ण सफल होत नाही त्याला हीच मनोवृत्ती कारण आहे. व्यवसाय हे शिक्षणाचे माध्यम म्हणून आपल्या देशात उपयोजिले गेले नाही. व्यावसायिक शिक्षणाचे क्षेत्र धडाडीने विकसित करणे ही निकडीची गरज आहे. त्याशिवाय शिक्षण क्षेत्रातील वैफल्य नाहीसे होणार नाही.

° ° °

८. प्रौढ कामगार आणि युवक शिक्षण

जबाबदार घटक

आजच्या नव्या तंत्र–विज्ञानावर अधिष्ठित झालेल्या जगात प्रत्येक व्यक्तीला तिच्या गरजेप्रमाणे शिक्षण हवे हे सर्वमान्य झालेले आहे. लिहिता–वाचता न येणारा प्रौढ, कामगार किंवा युवक समाजात अडचणी निर्माण करतो हे आता जाणवू लागले आहे. अमेरिकेसारख्या संपन्न आणि विज्ञानात प्रचंड प्रगती केलेल्या देशात या तीनही घटकांना सामाजिक दृष्ट्या जबाबदार मानून त्यांच्या शिक्षणाची सोय विविध मार्गांनी केलेली आहे. अर्थात् या तीन घटकांच्या मूलभूत अपेक्षात फरक असता तरी सर्वांना एक समान उद्दिष्ट आहे. आणि ते म्हणजे कार्यक्षमतेने, आनंदीवृत्तीने, सहकार्याने आपले जीवन यशस्वी करून आपल्या कुटुंबाला,

समाजाला आणि पर्यायाने राष्ट्राला अग्रभागी ठेवणे. या सर्वांना शिक्षण देताना प्रौढाला आपले उर्वरित जीवन अधिक यशस्वी करणे, कामगाराने अधिक कार्यक्षमतेने, कौशल्याने काम करून उत्पादन वाढविणे आणि युवकाने आपल्या भावी जीवनात आपली भूमिका यशस्वीपणे करणे यांसाठी शिक्षणाच्या साहाय्याने तयारी करून घ्यावी लागते. या तीनही घटकांसाठी अमेरिकेत उत्कृष्ट योजना राबविल्या जातात. आपण आता क्रमाने एकेका घटकाचा विचार करू.

प्रौढ व कामगार शिक्षण

प्रौढ शिक्षणाच्या व्याख्येत आणि संकल्पनेत अनेक बदल काळानुरूप झाले. सक्तीच्या शिक्षणाच्या कालखंडावाहेर जे स्त्रीपुरुष-निरक्षर राहिले आहेत अशा सर्वांचा समावेश प्रौढ म्हणून केला जातो. त्यात निरक्षर युवक-युवती, उद्योगधंद्यातील कामगार आणि बेकार व्यक्ती यांचाही समावेश केला जातो. अशांना शिक्षण देण्याचे कार्य अमेरिकेत अठराव्या शतकाच्या प्रारंभी सुरू झाले. खासगी संघटनांनी केलेल्या या प्रयत्नांना एकोणीसाव्या शतकात सुसंघटित स्वरूप आले. व्याख्यानमालेच्या द्वारा प्रौढ शिक्षण देण्याचा प्रयत्न १८२० मध्ये लॅसेम्स (Lyceums) याने केला. १८२६ मध्ये या उपक्रमाला शैक्षणिक चळवळीचे स्परूप प्राप्त झाले व ती लॅसेम लेक्चर एज्युकेशन मुव्हमेंट या नावाने सुरू झाली. १८७४ मध्ये पहिली प्रौढ शिक्षण संस्था चॅटचूका (Chautaqua) येथे स्थापन झाली. हे शहर-गाव न्यूयॉर्क मध्ये वसले होते. या संस्थेद्वारे व्याख्याने, चर्चासत्रे, करमणुकीचे कार्यक्रम असा उपक्रम हाती घेतला गेला. ही चळवळ सर्वत्र पसरली. १८९० मध्ये शिकागो विद्यापीठाने या धर्तीवर प्रथम उपक्रम सुरू केला. नंतर अनेक विद्यापीठांनी पत्रव्यवहाराद्वारा शिक्षण देण्याची सोय केली. पहिल्या महायुद्धानंतर या चळवळीला व्यवस्थित व शास्त्रशुद्ध स्वरूप देण्यास प्रारंभ झाला. आता या चळवळीला राष्ट्रव्यापी जनचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

फेडरल आणि राज्य शासन प्रौढ शिक्षणाला आर्थिक साहाय्य देतात. प्रौढ शिक्षणाची शेकडो केंद्रे आता कार्य करीत आहेत. बहुतेक राज्यांतून

अनुदान देऊन या कार्यास मदत देण्यात येते. स्कूल फॉर ॲडल्टस्, इन्स्टिटचूट ऑफ् ॲडल्ट एज्युकेशन, न्यू स्कूल्स फॉर सोशल रिसर्च इ. संस्था हे कार्य करतात. व्याख्यानमाला, आकाशवाणी, दूरदर्शन, वस्तु-संग्रहालये, खासगी मंडळे इ. संस्थाच्याद्वारे प्रौढ शिक्षणाची व्यवस्था आज उपलब्ध आहे. सिटिझन्स कमिटी, ॲग्रिकल्चरल एजंटस्, लेबर युनियन, कमर्शियल बिझिनेस फार्म्स इ. संस्था या क्षेत्रात कार्य करीत आहेत. त्याच-बरोबर विद्यापीठांचे खास विभाग, ज्युनियर कॉलेजे, नाइट स्कूल्स्, कम्युनिटी सेंटर्स इ. अनेक संस्थांच्याद्वारे सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय केलेली आहे.

केवळ लेखन आणि वाचन येवढीच मर्यादा प्रौढ शिक्षणाला राहिली नसून इंग्रजी वाङ्मय, इतिहास, शास्त्र, भूगोल इ. विषय शिकविले जातात. अपुरे शिक्षण राहिलेल्यांना आपले शिक्षण पूर्ण करण्याची संधी आता सर्वत्र उपलब्ध आहे. कामगारांचे शिक्षण या क्षेत्राला विसाव्या शतकात अत्यंत महत्त्व प्राप्त होणे अपरिहार्य आहे. आपल्या व्यवसायाचे प्रगत शिक्षण, फावला वेळ सत्कारणी लावण्यास छंदाचा विकास, औद्योगिक क्षेत्राची माहिती, उत्पादन तंत्रांचा परिचय, नागरिक जबाबदाऱ्यांची जाणीव, इ. अनेकांगांनी कामगारांचे शिक्षण करण्याची सोय आहे. अशा प्रकारचे कार्य करणाऱ्या संस्था पुढील आहेत.

कामगार शिक्षण कार्य संस्था

(१) सर्वांत मोठी अशी युनायटेड ऑटोमोबाईल वर्कर्स युनियन, इंटर नॅशनल लेडीज गारमेंट वर्कर्स युनियन, क्लोथिंग वर्कर्स युनियन, फार्मर्स युनियन किंवा अन्य विविध संघटना कामगार शिक्षणाचे काम शेकडो उपक्रम हाती घेऊन करतात. न्यू डील कायद्यानुसार १९३३ मध्ये बेकारी दूर करण्याच्या योजनेसाठी प्रयत्न करण्यात आले. पुढे कामगार शिक्षणाचे अनेक उपक्रम या कायद्यानुसार राज्यांनी हाती घेतले. लेबर एज्युकेशन सेंटर (१९२१), अमेरिकन फेडरेशन ऑफ् लेबर, स्कूल फॉर वर्कर्स या संस्था कामगार शिक्षणाचे कार्य विविध प्रकारे करतात. १०,००० हजारा-हून अधिक ग्रंथालयांचे जाळे सर्व प्रकारच्या अनौपचारिक शिक्षणाच्या

उपक्रमात सहभागी होऊन कार्य करतात. कामगार शिक्षणात, व्यावसायिक शिक्षण आणि प्रौढ शिक्षण असे दोन्ही प्रवाह एकजीव झालेले दिसतात. वर्कर्स एज्युकेशन ब्यूरो, ट्रेड युनियन कॉलेज, लेबर कॉलेज, ब्रॅन मायर समर स्कूल ही स्त्रीकामगारासाठी चालविलेली संस्था. सर्व औपचारिक शिक्षण देणाऱ्या संस्था या उपक्रमांना साधने, मनुष्यबळ, सल्ला व मार्गदर्शन पुरवून सतत मदत करतात. प्रौढ शिक्षणाच्या क्षेत्रात पत्रद्वारे अभ्यासवर्ग चालविणाऱ्या संस्था एक हजाराहून अधिक आहेत. प्रौढ आणि कामगार शिक्षणावर कित्येक कोटी डॉलर्स या देशात खर्च होतात. जनरल एज्युकेशन घेण्याची याही घटकांना संधी मिळते म्हणून ते सर्वाधिक लोकप्रिय आहे. निरनिराळ्या राज्यातील स्थानिक संस्था ही मर्यादित आर्थिक सहाय्य करतात. क्वचित नाममात्र शुल्कही आकारण्याची प्रथा आढळून येते. देशातील नागरिकाची सर्वांगीण उन्नती हे राष्ट्रीय उद्दिष्ट असल्याने समाजातील सर्व व्यक्ती या कामातील आपली जबाबदारी आनंदाने उचलतात.

युवक शिक्षण

विकसित, संपन्न राष्ट्रांत आणि अविकसित, मागासलेल्या राष्ट्रांत युवकांच्या संदर्भातील प्रश्न अतिशय बिकट झालेले आहेत. हुकूमशाही राष्ट्रांनी आपल्या पद्धतीने युवकांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. अमेरिकेसारख्या अग्रगण्य धनाढ्य राष्ट्रात युवकांच्या अनेक समस्या आहेत हे प्रथमदर्शनी न पटणारे वाटते. पण ही वस्तुस्थिती आहे. घर, शाळा–महाविद्यालये, बेकारी, व्यसनाधीनता, स्वैराचार, वाढती बेशिस्त, अमर्याद स्वातंत्र्याचे दुरूपयोग, वैफल्य, असे अनेक गुंते आणि भोवरे युवकांच्या प्रश्नात निर्माण झालेले आहेत. या क्षेत्रातील युवकांच्याकडे पाहिले तर त्यातही अनेक प्रकार सापडतात. शाळा–महाविद्यालये अर्धवट सोडलेले, शिक्षण पूर्ण कलेले पण नोकरी नसलेले बेकार, ग्रामीण विभागातले, अत्यंत औद्योगिक अशा आधुनिक शहरातले, फार लौकर लग्न केलेले, असे अनेक नमुने आढळतात. १९३० च्या सुमारास जी प्रचंड आर्थिक मंदी जगावर आली त्या तडाख्यात कित्येक कोटी युवक सापडले. १९४८ साली एक

पहाणी करण्यात आली व युवक मध्येच शिक्षण का सोडतात याचा शोध घेण्यात आला. शिक्षणाच्या सोयी अपुऱ्या म्हणून असे घडले नाही. तर व्यवसायाच्या दृष्टीने युवकांची तयारी करून घेण्याची सोय व तसा अभ्यासक्रम नव्हता हे कारण आढळले. यावरोबरच घरातले वातावरण, आर्थिक दूरवस्था इ. कारणे होतीच. १६ ते २५ गटातील युवक बेकार राहिल्याचा पुरावा जेव्हा हाती आला तेव्हा सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रात ही आपत्ती दूर करण्यासाठी जारीने प्रयत्न सुरू झाले.

युवकांच्या आणि अनेक योजना फेडरल शासन राबविते. न्यू डील व्यवस्थेप्रमाणे १९३३ साली सिव्हिल कॉन्झर्वेशन कोअर (C. C. C.) स्थापन करण्यात आले. या संघटनेमार्फत युवकांना जंगल सुधारणा, जमीन सुधारणा या क्षेत्रात व्यवसाय मिळवून दिले गेले. या पहाणीनुसार संपूर्ण अभ्यासक्रमात बदल करण्यात आला. माध्यमिक कक्षेपर्यंत शिक्षण सक्तीचे असूनही ही गळती व्हावी याचे आश्चर्य सर्वांना वाटले तर नवल नाही. १९३५ मध्ये नॅशनल यूथ ॲडमिनिस्ट्रेशन ही संघटना स्थापन करण्यात येऊन युवकांना अर्ध–वेळ नोकऱ्या देण्याची योजना आखण्यात आली. दुसऱ्या महायुद्धानंतर नॅशनल सिक्युरिटी ऑरगनायझेशन स्थापन करण्यात आली. फेडरल शासनाच्या संरक्षण खात्यामार्फत बेकारीवर उपाय करण्यासाठी केलेला या प्रयत्न होता. मजूर आणि शेतकी खात्यामार्फतही या बाबतीत प्रयत्न सुरू केले गेले.

अमेरिकन कौन्सील ऑफ् एज्युकेशन मार्फत १९३५ साली अमेरिकन यूथ कमिशन नेमण्यात आले. या आयोगाने योग्य शिक्षणाचा अभाव हाच निष्कर्ष काढला. त्यानुसार अनेक सार्वजनिक आणि खासगी संस्थांनी युवकांना मार्गदर्शन करणारी अनेक केंद्रे स्थापन केली. अनेक केंद्रामार्फत युवकांचे शिक्षण, खेळ, आरोग्य, व्यवसाय मार्गदर्शन इ. योजना हाती घेऊन राबविल्या जात आहेत. उमेदवारी योजना सर्वत्र हाती घेण्यात आली. शिक्षण खात्यातर्फे व्होकेशन डिव्हिजनच्या वतीने मार्गदर्शन व अर्ध–वेळ नोकऱ्या देण्याचे प्रयत्न करण्यात आले. युवकांच्या पुनर्वसनासाठी अनेकविध कार्यक्रम राबविले जातात. (१) व्यावसायिक अनुभव देणे

(३) उमेदवारी योजना (४) अर्ध–वेळ व्यवसाय पुरविणे इ. प्रकार युवकांना साहाय्य करण्यात येते. कोऑपरेटिव्ह शाळा व महाविद्यालये यांच्या तर्फेही या क्षेत्रात काम चालते. या कार्यक्रमांचा फायदा युवक–युवती घेतात.

अमेरिकेतील वैज्ञानिक प्रगती व त्यामुळे एकूण जीवनाला आलेला भयानक वेग, तीव्र स्पर्धा, विस्कळित कुटुंबव्यवस्था, अमर्याद व्यक्ति-स्वातंत्र्य, जगात प्रभुत्व ठेवण्यासाठी चाललेले राष्ट्रीय प्रयत्न सर्व थरात चाललेली चैन यांशिवाय अनेक कारणांमुळे युवक–युवतींचे जीवन अस्थिर झाले आहे. शिक्षणाच्या सर्व सोयी उपलब्ध असूनही युवकांचे प्रश्न न सुटता विकट झाले आहे. निग्रो समाजामुळे सर्व सामाजिक आणि राजकीय जीवनात विलक्षण गुंतागुंत निर्माण झाले आहेत. पराकोटीची समृद्धी असूनही जीवन अस्थिर झाले आहे. समाजात एक भयानक मानसिक पोकळी निर्माण झाली आहे. समाज, संपत्ती, राजकीय स्पर्धा, व्यक्ति– व्यक्तीतील संवाद यासंबंधीचे मूलभूत प्रश्न अमेरिकेसमोर उभे राहिले आहेत.

० ० ०

९. आंतरराष्ट्रीय सामंजस्य शिक्षण

नवे जग

आंतरराष्ट्रीय सामंजस्य शिक्षण (International Education) हा नव्या जगाच्या महत्त्वाचा केंद्रबिंदू शिक्षण क्षेत्रात महत्त्वाचा मानला जातो. अठराव्या–एकोणीसाव्या शतकात राष्ट्रवादाची (Nationalism) प्रेरणा अत्यंत प्रबल होती. सर्व जगभर देशादेशांत युद्धे चालू होती. आपल्या देशाचे साम्राज्य सर्वत्र व्हावे या भावनेने राष्ट्रे भारून गेली होती. साम्राज्यवाद, राजघराण्यांची वंशपरंपरागत सत्ता, आर्थिक शोषण, भयानक दारिद्र्य आणि संपन्नता यात झालेली जगाची वाटणी, वंश, रक्त, वर्ण, जाती, धर्म यांच्या भेदाभेदांनी पोखरलेले जग, अशा अवस्थेत पहिले महायुद्ध पेटले. त्यातून सर्व राष्ट्रांनी लीग ऑफ् नेशन्स ही जागतिक संघटना सर्वत्र शांती नांदावी म्हणून स्थापन केली. नंतरच्या काळात विध्वंसक शस्त्रास्त्रांची

अपरिमित वाढ झाली. हेवेदावे, सामाज्यतृष्णा शमली नव्हती. १९३९ साली दुसरे महायुद्ध पेटले आणि सारी मानवजात, संस्कृती विनाशाच्या कडचावर येऊन ठेपली. पुन: एकदा जागतिक शांतता, मानवता, व्यक्ति-स्वातंत्र्य, लोकशाही निर्भय जीवनाची पुनर्स्थापना, परस्पर सद्भाव आणि सहकार्य, अण्वस्त्रापासून जगाचे संरक्षण यासाठी सर्व राष्ट्रांची युनायटेड नेशन्स ही संघटना स्थापन केली. या घडामोडीतून आंतरराष्ट्रीय सामंजस्य शिक्षण विचाराचा जन्म झाला. संयुक्त राष्ट्रसंघामार्फत या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी आर्थिक मदत, साधने, परिषदा, चर्चासत्रे, तज्ज्ञांची घेवाण-देवाण, रोगमुक्ती योजना, बालकल्याण योजना, आंतरराष्ट्रीय कला प्रदर्शने, असे शेकडो मानवतावादी मूल्यांचे रक्षण करणारे उपक्रम हाती घेतले गेले. याचा परिणाम शिक्षणाच्या अंतिम उद्दिष्टावर अपरिहार्यपणे झाला. विज्ञानाने सारे जग एकात्म बनले आहे ही जाणीव दृढ मूल झाली. प्रत्येक व्यक्ती ही जगाची नागरिक झाली असून त्या दृष्टीने शिक्षण दिले गेले पाहिजे ही जाणीव आणि गरज निर्माण झाली. अमेरिकेने या बाबतीत अग्रगण्य भूमिका घेतली. कारण नव्या जगाच्या निर्मितीत, संयुक्त राष्ट्र संघाच्या निर्मितीत या देशाने नेतृत्व केले होते. या नव्या दृष्टिकोनाचा परिणाम पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साधने, अध्यापन पद्धती, अभ्यासानुवर्ती उपक्रम अशा सर्वांगावर झाला.

प्रयत्नांची दिशा

अमेरिकेत या दृष्टीने १७ व्या शतकात प्रयत्नांना सुरुवात होऊन एक आंतरराष्ट्रीय संस्था स्थापन करण्यात आली. १९ व्या शतकाच्या प्रारंभी फेंच पंडित मार्क ऑटोने (Marc Autoine) याने आंतरराष्ट्रीय महा-विद्यालय स्थापन करण्याचा असफल प्रयत्न केला. पहिल्या महायुद्धाच्या काळात लेडी एफ्. एफ्. अँड्रयूज या बाईंनी एक आंतरराष्ट्रीयत्वाचे शिक्षण देणारी संस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या उपक्रमामागे प्रेरणा होती ती १९१४ साली हेग येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेची. पहिले महायुद्ध संपल्यावर या हेतूने प्रेरित झालेल्या अनेक संस्था निघाल्या. १९२१ साली लीग ऑफ् नेशन्सने शैक्षणिक सहकार्यासाठी शास्त्रज्ञ आणि शिक्षण

तज्ज्ञ यांची एक समिती नेमली. १९२६ साली या संघटनेने बौद्धिक सहकार्यासाठी (Intellectual Co-operation) एक समिती नेमली. आकाशवाणी, वृत्तपत्रे, दूरदर्शन, पुस्तके यांच्या साहाय्याने जगात सामंजस्याचा विचार प्रभावी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. १९२५ मध्ये जिनेवा येथे इंटरनॅशनल ब्यूरो ऑफ् एज्युकेशन स्थापन करण्यात आला. १९३९ साली अमेरिकेतील फेडरल शासनाने आपल्या अधिकार कक्षेत या नव्या चळवळीचा समावेश केला.

१९१९ मध्ये न्यूयॉर्कमध्ये इंटर नॅशनल इन्स्टिटचूट स्थापन झाली होती. पुढे इंटर नॅशनल हाऊस अशी एक संस्था निघाली व अनेक ठिकाणी या धर्तीवर केंद्रे (Houses) स्थापन करण्यात आली. पॅरीस येथेही असे केंद्र स्थापन करण्यात आले. खुद्द अमेरिकेत अनेक विद्यापीठांतून ही योजना स्वीकारली नली. कालांतराने सर्व राज्यांनी या योजनेचा स्वीकार केला. या केंद्राचा लाभ जगातल्या हजारो विद्यार्थ्यांनी घेतला.

नॅशनल एज्युकेशन असोसिएशन या संस्थेत प्रामुख्याने शिक्षणाधिकारी आणि शिक्षक असतात. या संस्थेमार्फत १९२० मध्ये इंटरनॅशनल रिलेशन कमिटी स्थापन केली. १९४५ साली या समितीच्या भरीव कार्यातून युनायटेड नेशन्स एज्युकॅशनल, सायंटिफिक अँड् कल्चरल ऑरगनायझेशन (Unesco) स्थापन झाली. ग्रंथ, भाषांतरे, परिषदा, शिष्टमंडळे, चित्रपट, तज्ज्ञांची देवाण-घेवाण, व्याख्यान माला, प्रवास योजना, पारतोषिके, शिष्य-वृत्त्या, ग्रंथालये अशा शेकडो उपक्रमांचे द्वारे आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्माण करण्याचा प्रयत्न ही संघटना करते. बालक कल्याण, आरोग्य अपंगांचे पुनर्वसन, सत्त्वयुक्त आहार वाटप, मुलांच्या विविध स्पर्धा, प्रदर्शने, इ. अनेक उपक्रमांच्याद्वारे जगाची सेवा मानवतावादी भूमिकेतून केली जाते. या संघटनेचा विस्तार जगभर पसरलेला आहे. अनेक देशांतील विद्यार्थी, शिक्षक, शास्त्रज्ञ निरनिराळ्या शाळा विद्यापीठांतून अमेरिकेत शिकून गेले व शिकत आहेत. तसेच अमेरिकन नागरिकही जगभर अभ्यास करण्यासाठी नित्य जातात. १९४६ साली फुलब्राईट कायदा झाला व

विद्यार्थी विनिमयाचा (Exchange Proqramme उपक्रम सुरू झाला. त्याचा फायदा हुषार आणि कर्तबगार विद्यार्थ्यांना मिळाला.

एकमेकांच्या संस्कृतींचा. परंपरांचा, सवयींचा, ज्ञानाचा, संशोधनाचा परिचय व त्यातून, नव्या जगाची संस्कृती निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. मागासलेल्या देशांची सर्वांगीण पहाणी, सर्वांगीण मदत योजना, नव्या प्रकल्पांची उभारणी आणि बौद्धिक स्वातंत्र्याचे रक्षण या द्वारे हे आंतरराष्ट्रीय शिक्षणाचे कार्य चालू राहाणे ही आजची सर्वांत मोठी निकड आहे.

० ० ०

१० प्रमाणीकरण आणि मूल्यमापन पद्धती

जुनी परीक्षा :

आपल्या देशात जी परीक्षा पद्धती चालू घडीला रूढ आहे तिच्यातील दोष, मर्यादा सर्वांना परिचित आहेत. या परीक्षेचा व्यक्तिगत विद्यार्थ्यावर, पालकावर आणि समाजावर होणारा अनिष्ट परिणाम सर्वांनी कमी-अधिक प्रमाणात अनुभवलेला आहे. तरीही आपण ही परीक्षा पद्धती टाकून देत नाही. सुधारणा करण्याचा प्रयत्न फार तोकडा होत आहे. याचा परिणाम आपल्या विद्यार्थ्यांचा दर्जा खालावण्यात झाला तर नवल नाही. प्रचंड प्रमाणावर घेतल्या जाणाऱ्या सार्वजनिक परीक्षाही बंद झालेल्या नाहीत. विद्यापीठातून नव्याने सुरू करण्यात आलेल्या सत्र (Semister System) परीक्षेची अंमलबजावणीही जशी व्हावी तशी होत नाही. पाठ्य पुस्तकावर अवास्तव भर, ठराविक उत्तरांचे पाठांतर, सांचेबंद प्रश्न–पत्रिका, मार्गदर्शकांचा (Guides) सर्रास वापर हे दुष्टचक्र थांबलेले नाही. एक प्रकरची अगतिकता आणि निराशा शिक्षण क्षेत्रात निर्मण होण्याचे हे एक प्रमुख कारण आहे. इतर सर्व देशाप्रमाणे अमेरिकेतही हाच अनूभव आला होता. पण लिबरल एज्युकेशन बोर्डस् आणि शिक्षक यांनी रूढ परीक्षेविषयी असंतोष प्रकट केला आणि परीक्षा पद्धतीचीच परीक्षा घेऊन, संशोधन

करून मूल्यमापनाचा नवा विचार कृतीने रूढ केला. विद्यार्थ्यांची क्षमता, विषय ज्ञानाचे आकलन, ज्ञानाचा उपयोग करून घेण्याची शक्ती, आवड–निवड, प्रकटन क्षमता, प्रभुत्व इ. अनेकांगांनी संपूर्ण व्यक्तित्वाचे परीक्षण विविध चाचण्यांच्या द्वारे करण्यात येते.

व्यक्तित्व मापन (Personality test), मूळची आवड, कल मापन (Aptitude and interest test), बुद्धिमापन (Intelligence test), संपादन शक्ति मापन (Achievement test), इ. चाचण्या सर्व शिक्षण क्षेत्रात, व्यवसायात रूढ झाल्या आहेत. गेली तीस–चाळीस वर्षे त्यांचा प्रत्यक्ष वापर होत असून संशोधन करून हे तंत्र निर्दोष करण्याचे प्रयत्न आजही चालू आहेत.

परीक्षा व्यवस्था

अमेरिकेत कोठेही साचेबंद असे परीक्षांचे वेळापत्रक नाही. प्रत्येक शाळा, महाविद्यालय, त्यातील वर्ग केव्हा व किती परीक्षा घ्याव्यात या बाबतीत पूर्ण स्वतंत्र आहेत. विद्यार्थ्याची तयारी पाहून त्या त्या विषयाच्या परीक्षेची सूटही देण्याची प्रथा रूढ आहे. याचा अनेक दृष्टीने फार फायदा होतो. वेळेची आणि श्रमांची बचत, अपयशाचे प्रमाण घटते, तयारीला भरपूर अवधी, स्वतः श्रम करून तयारी करण्याच्या वृत्तीचा विकास, वस्तुनिष्ठ मूल्यमापन, शिक्षणाच्या शक्तीवर अढळ विश्वास असे अनेक फायदे होतात. मुख्यतः शाळेवर, शिक्षकावर समाजाचा विश्वास बसतो आणि विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाचे मार्गदर्शन अचूक करता येते. मुख्यतः परीक्षा की नित्याची बाब होऊन विद्यार्थी आनंदाने परीक्षा द्यायला तयार होतो. पास–नापास असा प्रकार नसल्याने वैफल्य निर्माण होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. शिक्षकाला यासाठी भरपूर तयारी करावी लागते, निःपक्षपाती शास्त्रीय वृत्तीने काम करावे लागते. विद्यार्जन पुस्तकी न होता खरेखुरे उपयुक्त होते. या संस्थेच्या वेगवेगळ्या परंपरातून एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो तो प्रमाणीकरणाचा (Standardization) हे प्रमाणीकरण कसे राखले जाते ते पाहू.

प्रमाणीकरण : (Standardisation).

प्रत्येक शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ, व्यवसायशिक्षण संस्था आपापला अभ्यासक्रम, परीक्षा पध्दती, अपेक्षा, दर्जा वेगेवेगळचा प्रकारे ठरवीत असल्यामुळे काहीतरी प्रमाणित दर्जा सर्वत्र राखणे अपरिहार्य झाले. या-संबंधीचे प्रयत्न फार वर्षांपासून या देशात सुरू झाले. मिशिगन विद्यापीठाने १८७१ मध्ये प्रमाणीकरणाचा प्रारंभ केला. इंडियाना राज्याने १८७३, नॅशनल एज्युकेशन असोसिएशन १८९८, मेडिकल ॲसोसिएशन ऑफ अमेरिका १९०७, कार्नेजी फौंडेशन १९०८, अमेरिकेत युनिव्हर्सिटी ॲसोसिएशन १९१४, अमेरिकन टीचर्स ॲसोसिएशन १९२५, अ.णि १९४४ पासून सर्व राज्यांत प्रमाणीकरण योजना स्वीकारली गेली. नॉर्थ सेंट्रल ॲसोसिएशन या विभागीय, स्वेच्छेने निर्माण झालेल्या संस्थेने हे काम वीस राज्यांत सुरू केले. या संघटनेच्या कामाचा दर्जा फार मोठा असून त्याला सर्वमान्यता लाभली आहे. सेंट्रल स्टेट ॲसोसिएशन हे काम १९२१ मध्ये सुरू केले. साऊथ रीजनल ॲसोसिएशनने हे काम १९३० मध्ये चालू केले. माध्यमिक शिक्षण आणि उच्च शिक्षण संस्था यातील शिक्षणाचा दर्जा प्रथम उंचावला गेला. शाळांच्या बाबतीत विद्यार्थ्यांची संख्या, स्थानिक परिस्थिती, साधनांची उपलब्धता, शिक्षकांची संख्या व त्यांची गुणवत्ता, अन्य सर्व सोयी विचारात घेऊन दर्जाचे प्रमाणीकरण केले. माध्यमिक शाळांच्या संपूर्ण अहवालाचा, प्रगतीचा अभ्यास करून मंजुरी देण्याची प्रथा आहे. राज्य शिक्षण खाते आणि विद्यापीठे आपापल्या क्षेत्रात हे काम करतात. अनुदानासाठी किमान अपेक्षा ठरवून दिल्या जातात. दर्जाप्रमाणे अनुदान देण्याची परंपरा आहे. निवडक संस्थांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याचे काम राष्ट्रीय पातळीवर होते.

संस्थेतील प्रवेशाच्या अटी, शिक्षकांची गुणवत्ता, अभ्यासक्रम सोयी, इमारती, ग्रंथालय, प्रयोगशाळा, सर्व कामकाजाचे दप्तर, (Record) आर्थिक व्यवस्था इ . संबंधी पहाणी करून मार्गदर्शन केले जाते. प्रमाणी-करणाचा मुख्य हेतू सर्वत्र साचेबंद शिक्षण द्यावे असा नसून विविधता आणि समान दर्जा सर्वत्र राखला जावा हा आहे. यामुळे अमेरिकेतील एकूण

शिक्षणाचा दर्जा विशिष्ट दर्जाचा राहण्यास मदत होतेच. पण संस्था, तेथील शिक्षक आणि चालक कार्यक्षम आणि तत्पर राहातात.पालकांच्यावरही याचा इष्ट परिणाम होतो व त्यांना आपल्या पाल्यांचे भवितव्य सुरक्षित असल्याची ग्वाही मिळते.

भारतासारख्या प्रचंड देशात अशा तऱ्हेची संघटना व कार्य चालू होणे अत्यंत निकडीचे आहे. मंजुरीचे सरकारी नियम आणि विद्यापीठांचे महाविद्यालयासाठी निकष आहेत. पण सर्वत्र एकसाची शिक्षण निर्माण झाले आहे व ही उणीव सर्वांनाच जाणवते आहे. कार्यक्षम आणि सामान्य संस्था एकाच मापाने मोजण्याची व अनुदान देण्याची प्रथाही बदलणे आवश्यक आहे. त्याशिवाय निकोप स्पर्धा, दर्जा आणि गुणवत्ता यांची वाढ होणार नाही. राज्य पातळीवर आणि अखिलभारतीय पातळीवर ही तपासणी वस्तुनिष्ठ करून शिक्षणाला प्रगतीची नवी दिशा दाखविणे अटळ झाले आहे.

• ० ०

फ्रान्स

१) इतिहास, परंपरा व प्रशासन

२) पूर्व–प्राथमिक व प्राथमिक शिक्षण

३) माध्यमिक शिक्षण

४) विद्यापीठीय उच्च शिक्षण

५) शिक्षकांचे प्रशिक्षण

६) व्यवसाय–शिक्षण

१. इतिहास, परंपरा व प्रशासन

स्वाभाविक रचना

भूगोलार्धाच्या उत्तरेकडे दोन लक्ष चौरस मैल व्यापून राहिलेला फ्रान्स हा देश कला, साहित्य, संस्कृती, शौर्य यांसाठी सर्वज्ञात असा भूभाग आहे. दोन हजार मैल लांबीचा किनारा लाभूनही म्हणावी तशी बंदरे उपलब्ध नाहीत. ऱ्होन (Rhone) नदीने आल्प्स पर्वतापासून विभाजन केलेले पठार दक्षिणेकडे मध्यावर आहे. सेन (Seine) नदी व्यापारी दृष्टीने महत्त्वाची. पॅरिस ही राजधानी या नदीच्या काठावर आहे. दोन्ही बाजूंना समुद्र असल्याने हवामान सम आहे. सरासरी पाऊस वर्षाला ३० इंच पडतो. मुख्यत: फ्रान्स हा शेतीप्रधान देश आहे. गहू, दाक्षे आणि ऑईलसीड्स ही मुख्य पिके. मद्यनिर्मितीचा जगप्रसिद्ध धंदा. खनिज साधन संपत्ती म्हणावी तशी नाही. उद्योगधंदे प्रभावी नाहीत. अलंकार निर्मिती, हस्तकौशल्य कला, रेशमी वस्त्र व्यापार इ. व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतात.

राजकीय व्यवस्था

राजकीय प्रशासनात काळाच्या ओघात बदल झाले कारण अनेक राजकीय पक्ष अस्तित्वात होते. पण फ्रान्समधील लोकांची निष्ठा आपल्या देशावर असलेली नेहमी प्रत्ययास येते. पहिले प्रजासत्ताक १७९३ साली स्थापन झाले. १८४८ मध्ये घटनेत बदल करून दुसरे प्रजासत्ताक निर्माण करण्यात आले. १८७५ मध्ये घटनेत पुनः बदल करण्यात आला. कालांतराने देशाच्या अध्यक्षाला सर्वाधिक सत्ता देऊन नवे प्रजासत्ताक स्थापन करण्यात आले. देशात राजकीय विभाग निर्माण करण्यात आला असून त्यावर प्रशासनाधिकारी नेमलेला असतो. त्याला Prefect म्हणतात. त्याला सल्ला देण्यासाठी एक समिती असते. या सर्व विभागावर मध्यवर्ती नियंत्रण असते.

शिक्षणाचा विकास

शिक्षण देण्यासाठी शाळा सुरू करण्याचा उपक्रम धार्मिक संस्थांनी फ्रान्स-मध्येही केल्याचे इतिहासावरून दिसून येते. १६८४ मध्ये ख्रिश्चन ब्रदर्स

ही शाळा सुरू करण्यात आली. जीन सॅले (Jean Salle) याने प्राथमिक, माध्यमिक, व्यावसायिक आणि शिक्षकांना प्रशिक्षण देणारी शाळा असा बहुविध उपक्रम सुरू केला. यापूर्वीही दहाव्या शतकात देशभर कॅथीड्रल शाळा स्थापन झाल्या होत्या. सरकारने या क्षेत्रात प्रयत्न केलेले नव्हते. १८२५ मध्ये माँट् पेलीयर (Moutpeliar) येथे पहिले विद्यापीठ स्थापन झाले. क्रांतिकारी पक्षांनी या धार्मिक संस्थांनी चालविलेल्या शाळांना विरोध केला. त्यातूनच पब्लिक स्कूल्स निघाली. या शाळा लोकशाही विरोधी असल्याने त्यांना क्रांतिकारकांचा विरोध होता. राष्ट्राला उपकारक शिक्षण धर्मशिक्षण संस्था देऊ शकत नाहीत असा दावा केल्यामुळे शिक्षण क्षेत्रात मतमतांतरे निर्माण झाली. पब्लिक स्कूलचे शिक्षण, संचालक यांनी शिक्षणापेक्षा लोकशाही, राष्ट्रवाद, समाजवादी समाज यांच्यावर भर दिला. धार्मिक गट आणि क्रांतिकारक यांच्या तेढीतून नवी शिक्षण व्यवस्था निर्माण झाली. पुढे या गटांतील मतभेद मिटले. सर्वसाधारण जनतेला मात्र हे शिक्षण संकुचित आणि सामान्याला उपयुक्त नव्हते असे वाटू लागले. १७८९ मध्ये शिक्षणाचे केंद्रीकरण व्हावे आणि शिक्षण शासनाने द्यावे हा सूर प्रबल झाला. अशा रीतीने शासनाचा प्रवेश या क्षेत्रात झाला. पण पैशाअभावी नवी व्यवस्था निर्माण होऊ शकली नाही. १७६३ मध्ये ला शॅलोलटेस (La Chaloltais) याने केंद्रीकरणाचा आग्रह धरला. त्याला पाठीराखे मिळाले. परिणामी १८०८ मध्ये नेपोलीयनने युनिव्हर्सिटी द फ्रान्स स्थापन केली, व संपूर्ण शैक्षणिक प्रशासनाच्या दृष्टीने देशात २७ विभागात अॅकॅडमीज स्थापन केल्या. एका रेक्टरच्या हाताखाली त्या त्या ठिकाणचा सर्व शैक्षणिक संस्थांचा कारभार चाले. या सर्व अॅकॅडमीज ग्रँड मेत्र दल युनिव्हर्सिटी (Grand Maitred l university) या संस्थेच्या नियंत्रणाखाली काम करू लागल्या. पण ही व्यवस्था फक्त माध्यमिक शिक्षणापुरतीच लागू होती. प्राथमिक शाळा या कक्षेबाहेर होत्या. १८३३ पूर्वी प्राथमिक शिक्षणाला शासनाचे साहाय्य मिळत नव्हते. स्थानिक मंडळावर या शाळा अवलंबून होत्या. ग्यूझॉ (Guizot) ने प्रथम या शाळांना अनुदान मिळवून दिले. कालांतराने अनुदानात वाढ होऊन ७० टक्के प्राथमिक शाळांचा खर्च

शासन करू लागले. याचवेळी शाळा तपासणी करण्यास आरंभ झाला. स्थानिक संस्थांच्या व धार्मिक संस्थांच्या शाळावरही शासनाचे नियंत्रण हलके हलके येऊ लागले. १८८२ च्या शिक्षण कायद्याने पालकांना कोणत्याही प्राथमिक शाळेत मुले धाडण्याचे स्वातंत्र्य मिळाले पण वार्षिक परीक्षांना मात्र शासनाने चालविलेल्या धोरणानुसार बसणे सक्तीचे करण्यात आले. प्रशस्तिपत्रे आणि पदव्या शासनातर्फे देण्यात येत असत. १९०४ च्या शिक्षण कायद्याने नियंत्रण अधिक वाढले. धार्मिक संस्थांना शिक्षण क्षेत्रात ढवळा-ढवळ करण्यास बंदी करण्यात आली. याचा परिणाम सार्वजनिक शाळातील संख्या वाढण्यात झाला. माध्यमिक शिक्षणाची मात्र इतकी वाढ न होता. ते मात्र समाजातील उच्च वर्गीयापुरते मर्यादित राहिले. खालच्या थरातील मुले प्राथमिक शिक्षणानंतर हायर एलेमेंटरी शाळात व वरच्या थरातील मुले माध्यमिक शाळांना जोडलेल्या प्रिपरेटरी वर्गात जात असत. या शाळांना लॅसे (Lycees) आणि कॉलेजेस् म्हणत. समाजातील खालच्या थरांतील मुलांना उच्च शिक्षण घेणे अशक्य होते. शिक्षणविषयक संधीची समानता नावापुरतीच होती. सामाजिक थरातील भेदाभेद शिक्षण क्षेत्रातही उतरला होता. पहिल्या महायुद्धानंतर नॅशनल सिस्टिम ऑफ् एज्युकेशन स्वीकारूनही हा फरक कमी झाला नाही.

इकॉल युनिक

शिक्षणाची बोधभाषा म्हणून प्रांतीय भाषा वापरावी हा आग्रह पूर्वी पासून प्रांतांच्याकडून धरला जात होता. पण प्राथमिक शिक्षणाच्या केंद्रीकरणाला बाध येईल म्हणून शासनाने ही मागणी फेटाळली. या अवधीत काही तरुण शिक्षकांनी एक सुधारणावादी (Reformist) संस्था स्थापन केली. तिला ला कॉंपाग्नान (Les Compagnon) द ल (de L) युनव्हर्सिटी नॉवेल्ो (Nouvelle) (The Advocate of a new Education System) असे नाव होते. सर्व थरांतील लोकांना समान शिक्षण मिळावे हा संस्थेचा आग्रह होता. त्याचा प्रचार भरपूर करण्यात आला. कोणालाही आवडीचे शिक्षण घेता यावे, शाळा बदलण्यास अडचण पडू नये, सर्वत्र ही योजना सक्तीने स्वीकारली जावी अशा हेतूने हे काम

सुरू झाले. या प्रगतीवादी शिक्षण कल्पनेला इकॉल युनिक (Ecoel Unique) म्हटले जाते. या चळवळीचा परिणाम म्हणून फ्रान्समधील अभ्यासक्रम, प्रशासन, तपासणी पद्धती इत्यादीत खूप परिवर्तन घडून आले. सामान्य माणसाच्या आवाक्यात शिक्षण आणण्याचा प्रयत्न झाला. खालच्या थरातील मुलांना माध्यमिक शिक्षण मोफत करण्यात आले. ६ ते १२, १२ ते १८ आणि १८ वर्षांवरील अशी शिक्षणाची विभागणी तीन पातळ्यांवर करण्यात आली. सर्व पातळीवर सर्वांना प्रवेश देण्याचीसोय झाली. पहिल्या महायुद्धानंतर फ्रान्समधील सर्वांगीण जीवनात जे परिवर्तन झाले त्याचा परिणाम शिक्षण क्षेत्रावरही झाला. आजवर जे केवळ शेतीकडे लक्ष पुरविले जात होते त्याहून आता उद्योगधंद्यांच्याकडे अधिक लक्ष देण्यात येऊ लागले. परीक्षांचा दर्जा उंचावण्यात आला आणि अभ्यासक्रमास उपयुक्त अशा नव्या पुस्तकांना मंजुरी देण्यात आली. शिक्षकांच्या प्रशिक्षणावर आता भर देण्यात आला. विद्यापीठाचे एक वर्ष पूर्ण झाल्यावर शिक्षकांना नॉर्मल स्कूलमध्ये प्रवेश द्यावा, माध्यमिक शाळातून प्रशिक्षणाचे मूलभूत शिक्षण द्यावे व नंतर एक वर्ष अध्यापन व्यवसायाचे शिक्षण द्यावे अशा दोन गोष्टींवर भर देण्यात आला. दुसऱ्या महायुद्धात फ्रान्सला दारुण पराभवाचे अनेक परिणाम भोगावे लागले. १९४० मध्ये देश स्वतंत्र झाल्यावर अल्जीर्यस येथे एम. कॅप्टन याच्या अध्यक्षतेखाली शिक्षणाचा पुनर्विचार करण्यासाठी एक कमिशन नेमण्यात आले. या कमिशनने शिक्षणात आमुलाग्र बदल सुचविला विज्ञान आणि तंत्रविज्ञानावर भर हवा अशी मुख्य शिफारस केली गेली. पण या शिफारशी अमलात न येऊ शकल्याने पॉल लँजेव्हिन (Paul Langevin) यांच्या नेतृत्वाने नवा आयोग नेमण्यात आला. हा अहवाल लँजेव्हिन प्लॅन या नावाने ओळखला जातो. शिक्षणाचा सर्वांगीण विचार करणारा हा प्रचंड अहवाल आहे. पॉल हे आयोगाच्या नेमणुकीनंतर निधन पावले आणि त्यांच्या जागी हेन्री वॅलन यांची नेमणूक करण्यात आली. या लँजेव्हिन योजनेला इंग्लंडमधील १९४४ च्या कायद्याप्रमाणे मुलभूत महत्त्व प्राप्त झाले.

लॅंजेव्हिन प्लॅन

या योजनेतील प्रमुख शिफारशी अशा आहेत. (१) शिक्षणाची प्रत्येक नागरिकाला समान संधी. (२) सर्वांसाठी समान शिक्षण प्रणाली. तदनुसार प्रचलित शाळांच्या व्यवस्थेत बदल करणे. (३) १८ वर्षापर्यंत पूर्ण वेळ सक्तीचे शिक्षण. (४) शाखा आणि तंत्र विज्ञानावर भर. (५) सांस्कृतिक इतिहासाचा प्रत्येक विद्यार्थ्यास उत्तम परिचय, शाखाभ्यासाच्या जोडीने हवा. (६) ग्रेट हायर स्कूल्स् व्यतिरिक्त संस्थातून सार्वजनिक सेवा प्रशिक्षण देण्याची सोय करावी. (७) व्यावसायिक, तांत्रिक व प्रशिक्षण संस्थांतून शिष्यवृत्यांची सोय. (८) १९४४ च्या ब्रिटनमधील कायद्यानुसार प्राथमिक, उच्च व तांत्रिक शिक्षणाचे योग्य वर्गीकरण. फ्रान्समध्ये शिक्षणाच्या प्रशासनात केंद्रीकरणाला प्राधान्य आहे. पार्लमेंट शैक्षणिक प्रशासनाची जबाबदारी पार्लमेंटची (ज्यात सेनेट आणि चेंबर ऑफ् डेप्युटीज असे घटक आहेत) आहे. पार्लमेंट या संदर्भातले कायदे करते व कॅबिनेट त्यांची अंमलबजावणी करते. पुढील जबाबदाऱ्या केंद्र प्रशासनाच्या आहेत. (१) शिक्षक आणि प्रशासनाधिकारी यांच्या पगाराची व्यवस्था. (२) सर्व प्रकारच्या शाळा स्थापन करणे व त्या चालवणाऱ्या संचालकासाठी नियमावली तयार करणे. (३) शिक्षणाची उद्दिष्टे ठरवून त्याला पूरक अशा अभ्यासक्रमांची रचना करणे. (४) परीक्षा पद्धती ठरवून ती घेण्याची पद्धती निश्चित करणे. (५) शिक्षक व शिक्षण खात्यातील अधिकाऱ्यांच्या नोकरीचे नियम, वेतनश्रेणी, वाढ इ. नियम करणे (६) शिष्यवृत्त्या व अनुदान यांची व्यवस्था. (७) शालेय इमारतीसाठी स्थानिक मंडळाला सहाय्य देणे. शिक्षणमंत्री हा कॅबिनेटचा सभासद असून त्याची महत्त्वाची जबाबदारी पुढीलप्रमाणे आहे. (१) प्राध्यापकांची उच्च शाळांतून (Great Higher Schools) नेमणूक. (२) शिष्यवृत्त्या आणि अनुदान यांचे योग्य वाटप. (३) शिक्षणविषयक कायद्यांना मंजुरी व शिक्षणावरील अंदाजपत्रक, खर्च यांना मंजुरी. (४) परीक्षा आणि पदवी या संबंधीचे नियम तयार करून त्यांची अंमलबजावणी. (५) खासगी शाळांची तपासणी, विद्यापीठ कौन्सीलने घेतलेल्या

प्रशासनविषयक निर्णयांचा फेरविचार, त्याचप्रमाणे स्कूलबोर्ड, शिक्षण खात्याच्या प्राथमिक शिक्षणाच्या कौन्सीलने घेतलेल्या निर्णयांचा फेरविचार करून अखेरचा निर्णय घेणे (६) शिक्षणप्रणाली, अभ्यासक्रम, शिस्त इ. विषयक नियम तयार करणे. शिक्षणमंत्र्याला साहाय्य करण्यासाठी अनेक मंडळे, समित्या नेमण्यात येतात. त्यांपैकी सुपीरीयर कौन्सील ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन आणि कन्सलटिंग कमिटी ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन या दोन फार महत्त्वाच्या समित्या. याशिवाय एक हायर एज्युकेशन बोर्ड असते. अध्यक्ष काही तज्ज्ञ, अनुभवी लोकांची या बोर्डावर सभासद म्हणून नेमणूक करतात. इन्स्टिटचूट द फ्रान्स, द प्रिन्सिपल ऑफ कॉलेज द फ्रान्स म्युझियम्स, प्राथमिक व उच्च शाळा यांनी निवडून दिलेले इतर सभासद असतात. प्रशासन नियम, चांगल्या पाठ्यपुस्तकांना मंजुरी, परकीय देशातील मंडळांनी स्थापन केलेल्या संस्थांना मंजुरी इ. कामात शिक्षण मंत्र्यास सल्ला देतात.

दी कन्सलटिंग कमिटी ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनचे सभासद, शिक्षक, इन्स्पेक्टर जनरल, संबंधित मंडळे, विद्यापीठाचे अध्यक्ष यांचे प्रतिनिधी असतात. शिक्षणाच्या प्रकारानुसार अनेक समित्या विविध कामे पाहातात. सुपीरीयर कौन्सील ऑफ फाईन आर्टस्, एज्युकेशन इन फाईन आर्टस्, नॅशनल म्युझियम, कमिशन ऑफ हिस्टॉरिकल मॉन्युमेंट्स्, सुपीरीयर कौन्सील ऑफ नॅशनल कॉंझरव्हेटरी ऑफ म्युझिक आणि ओरेटरी अशी विविध मंडळे आपापल्या क्षेत्राचे काम पाहातात. या विविध विभागाच्या कामाची पहाणी, नोकरवर्गाची बढती, नव्या जागा निर्माण करणे किंवा रद्द करणे, शाळा तपासणी (माध्यमिक कक्षा सोडून), शैक्षणिक साधने पुरविणे इ. कामे केली जातात. १४ तपासनीस प्राथमिक कक्षेसाठी व ४ पूर्व-प्राथमिक असे अधिकारी असतात. गरजेप्रमाणे संस्थेत वाढ केली जाते.

विभागीय प्रशासन व्यवस्था

फ्रान्स देशाची प्रशासनाच्या दृष्टीने ९० विभागांत (Regions) आखणी केलेली असून त्या त्या विभागातील विद्यापीठाच्या रेक्टर (Rector) मुख्य म्हणून काम पाहातो. विद्यापीठ प्रशासनाबरोबरच पूर्व-प्राथमिकच

प्रशासनही त्याचीच जबाबदारी असते. माध्यमिक शिक्षणाबाबत सल्ला देणारी एक विभागीय समिती असते. खाजगी माध्यमिक शाळातील वादग्रस्त प्रश्नही हीच समिती हाताळते. शाळा तपासनीस, विद्यापीठचे डीन्स, खाजगी माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक या समितीचे सभासद असतात त्यांचो नेमणूक शिक्षण मंत्री करतात. वर दिलेल्या सुमारे ९० शैक्षणिक विभागांचे ९३ प्रादेशिक विभागात प्रशासनाच्या सोयीसाठी विभाग केलेले असतात. मुख्य प्रशासन अधिकाऱ्यास प्रिफेक्ट (Prefect) म्हणतात. शासनाचा प्रतिनिधी म्हणून तो काम पहातो कामाच्या सोयीसाठी उपविभाग केलेले असतात त्याला Arrondissements (ॲरॉंडिस मेंट्स्), उपविभाग म्हणतात. या उपविभागीय अधिकाऱ्याची (Sub-Prefect) नेमणूक केंद्रशासन करते. या उपविभागांचे कॅन्टॉन्स (Contons) व त्यांचेच पुढे कॉम्यून्स (Communes) असे आणखी उप-विभाग निर्माण केलेले असतात. माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था आपल्या हाताखालच्या विभागामार्फत रेक्टर पाहातो. शाळा तपासनीस रेक्टरला सर्व प्रशासन कार्यात मदत करतात. हे शाळा तपासनीस इमारती, शिक्षकांच्या कामावर देखरेख, प्रौढ शिक्षण इ. व्यवस्था पाहातात. शिक्षणमंत्री शेतीशाळा, प्राथमिक शाळा, तांत्रिक शाळा यांसाठी तपासनीस नेमतो. प्रत्येक विभागासाठी जनरल कौन्सील ऑफ् डिपार्टमेंट, कौन्सील ऑफ् प्रायमरी एज्युकेशन, कमिटी फॉर टेक्निकल एज्युकेशन, कमिशन फॉर ॲग्रीकल्चर असे नेमले जातात व प्रशासनाचे काम चालविले जाते म्युनिसिपल बोर्डाची व्यवस्था म्युनिसिपल ऑफिसर पाहातात परंतु य. सर्व विभागांवर केंद्र शासनाचे नियंत्रण असते.

शाळांचे प्रकार

फ्रान्समध्ये प्राथमिक, पूर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळा एकमेकाशी निगडीत नसून आपापल्या परीने स्वयंपूर्ण आहेत. प्रत्येक थरावरच्या अध्यापन पद्धतीही वेगवेगळचा आहेत. सहाजिकच प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक कक्षेत प्रवेश करण्यास विद्यार्थ्यांना अडचण पडते. जिथे प्राथमिक व माध्यमिक कक्षेत एकाच पातळीवरचे शिक्षण आहे तेथेच प्रवेश घ्यावा

लागतो. प्राथमिक शिक्षणाचे टप्पे पुढीलप्रमाणे आहेत. १) किंडर गार्टन शाळा– ३ ते ६ वयोमानासाठी. २) चिल्ड्रन क्लासेस– ३ ते ६ वयोमानासाठी. ३) प्राथमिक शिक्षण शाळा. हे वर्ग काही ठिकाणी माध्यमिक शाळेतही भरविले जातात. ४) अपंगासाठी स्वतंत्र शाळा. उच्च माध्यमिक शाळा (Superior Primary Education) मधून १३ ते ११ वयोमानाच्या मुलांना व्यापार, उद्योग, शेती, अर्थव्यवस्था इ. शिक्षण देण्याची सोय. पूर्व प्राथमिक नंतर शिक्षण देणाऱ्या चार प्रकारच्या प्राथमिक शाळा आहेत. १) इकोल कॉम्युनेल (Ecole Communale) २) विशिष्ट उच्च वर्गीयासाठी लॅसीज (Lycess) आणि कॉलेजेस ३) खाजगी प्राथमिक शाळा. ४) एनसेनमेंटल मेसन (Enseignmentale Maison) श्रीमंत वर्गातील मुलांना त्यांच्या घरी शिक्षण देणारी संघटना. याशिवाय अर्धवेळ शिक्षण देणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शाळाही आहेत. माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर सरकारी लष्करी, नौकानयन, इंजीनियरिंग आणि नॉर्मल शाळांतून व्यावसायिक शिक्षणाची सोय. लॅसी आणि कॉलेजेस या संस्थातून १० किंवा ११ वे वर्षी प्रवेश देण्यात येतो व सात ते आठ वर्षात अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्यांची सोय असते. लॉसेच्या शैक्षणिक दर्जा कॉलेजेसपेक्षा वरच्या प्रतीचा असतो. विद्यार्थी संख्या बेताची असेल तर मुले व मुली एकत्र शिकतात. मोठ्या संख्येसाठी वेगवेगळी सोय असते. लॅसे शाळांना संपूर्ण सरकारी मदत तर कॉलेजेसना कॉम्यून, म्युनिसिपल बोर्डस, आणि राज्य सरकार मदत करतात.

प्राथमिक आणि माध्यमिक शाळात वर्ग-पद्धती (Class system) चा स्वीकार १९२७ मध्ये प्रथम केला. माध्यमिक कक्षेपर्यंत तीन विभागात वर्ग पाडले होते. शिक्षणमंत्री हॅरीऑट यांनी १९२८ मध्ये लॅसे आणि कॉलेजेसमध्ये विनामूल्य शिक्षण सुरू केले. मुलींना मुलांच्या शाळेत प्रवेश मिळू लागला. १९३६ नंतर फ्रान्समधील शिक्षण व्यवस्थेत मोठे बदल झाले. १९३७ च्या कायद्यानुसार खासगी शाळा रद्द करण्यात आल्या व ज्यांना माध्यमिक कक्षेत प्रवेश हवा असेल त्यांनी सात वर्षांच्या एलेमेंटरी अभ्यासक्रमाची निदान सहा वर्षे तरी पूर्ण करण्याचे बंधन आले. प्राथमिक

शिक्षणाचे एलेमेंटरी, रेज्ड एलेमेंटरी व कंटिन्यूएशन शाळा असे तीन घटक करण्यात आले. हा अभ्यासक्रम ७ वर्षांचा करण्यात येऊन ६ व्या वर्षाच्या शेवटी परीक्षा ठेवण्यात आली. ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यांना रेज्ड एलेमेंटरी व माध्यमिक शाळात प्रवेश देण्यात येई. ज्यांना प्रवेश मिळू शकला नाही ते कंटीन्यूएशन शाळात शिकत.

माध्यमिक अभ्यासक्रम ७ वर्षांचा असून त्याचे लिटररी (वाङ्मयीन) मॉर्डन (आधुनिक) आणि तांत्रिक असे तीन घटक करण्यात आले. पहिला घटक ४ वर्षाच्या अवधीचा असून नंतर एक परीक्षा न ३ वर्षानंतर दुसरी परीक्षा होते. १९३७ च्या कायद्याने सक्तीच्या शिक्षणाचे वय १३ चे १४ करण्यात आले. माध्यमिक कक्षेतले पहिले वर्ष विद्यार्थ्याच्या आवडी–निवडी ठरविण्यात खर्चिले जाते व मग तीनपैकी एका विभागात विद्यार्थी प्रवेश घतो. कामगार कायद्यात सक्तीच्या शिक्षणाचे वय वाढविल्याने बदल करण्यात आले. माध्यमिक कक्षेत शारीरिक शिक्षण आणि अभ्यासपूरक उपक्रम यांचेकडे लक्ष पुरविण्यात येते.

या सर्व घडामोडीत १८८२ चा सक्तीच्या क्षिक्षणाचा कायदा, १९०४ चा राज्याचे शिक्षणावरील नियंत्रण वाढविणारा कायदा, दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम, (१९४४ मध्ये फ्रान्स नाझी जर्मनीच्या वर्चस्वातून मुक्त झाला. मध्यंतरी पारतंत्र्याच्या काळात अध्यक्ष द गॉल यांनी अल्जीअर्स येथे स्वतंत्र फ्रान्सचे सरकार स्थापन करून मुक्ततेचे प्रयत्न चालविले होते.) या सर्व घटनांचा शिक्षण व्यवस्थेवर झाला.

केंद्रीय नियंत्रण

केंद्र शासनाचा फार मोठा अधिकार शिक्षणावर कसा आहे व शिक्षणमंत्री महत्त्वाचे निर्णय घेण्याचे कार्य करतो हे आपण पाहिले. त्यांचा उल्लेख ऐतिहासिक परंपरा सांगताना अपरिहार्य होता. फ्रान्समध्ये अध्यक्षीय शासन व्यवस्था (Presidential Government) आहे व शिक्षणमंत्री शिक्षण प्रशासनाचा कारभार पाहातो. त्याला साहाय्य करणाऱ्या मंडळांचा उल्लेख मागे केलेला आहेच. त्याशिवाय जी काही मंडळे

प्रशासनविषयक काम करतात त्यांचे स्वरूप पाहू. (१) बोर्ड ऑफ् हायर एज्युकेशन–उच्च शिक्षणविषयक मंत्र्याला सल्ला देणारे मंडळ. निवडक शिक्षण तज्ज्ञ या मंडळाचे सभासद असतात.

९० विभागात प्रशासनाच्या सोयीसाठी देशाचे भाग कल्पिलेले आहेत व त्या त्या विभागातील विद्यापीठाचा रेक्टर विभागीय प्रमुख म्हणून काम पाहतो. व खाजगी संस्थावरही रेक्टर नियंत्रण करतो. ९३ शिक्षण विभाग (Departments of Education) असून प्रिफेक्ट हा मुख्य कार्यकारी अधिकारी काम पाहातो. केंद्र शासनाचे प्रतिनिधित्व तो करतो व अध्यक्ष या नात्याने अनेक दुय्यम मंडळावर काम पहातो. त्याच्या मदतीस तपासनीस असतात.

० ० ०

२. पूर्व–प्राथमिक व प्राथमिक शिक्षण

पूर्व प्राथमिक शिक्षण

६ ते १४ वयोमानाच्या विद्यार्थ्यांचे सक्तीच्या शिक्षण व्यवस्थेखाली शिक्षण होते. तत्पूर्वीच्या कक्षेत म्हणजे पूर्व-प्राथमिक कक्षेत, तीन प्रकारच्या संस्था काम करतात. १) किंडर गार्टन २) चिल्डन्स क्लासेस ३) स्पेशल प्री प्रायमरी शिक्षण. या क्षेत्रात जुन्या व आधुनिक अशा दोन्ही प्रकारच्या संस्था आहेत. लॅसे (Lycees) आणि कॉलेजेस या जुन्या संस्था व येथे प्राथमिक शिक्षणदेखील पूर्ण केले जाते. सॅले द सिले (Salles D'asile) यादेखील जुन्या संस्था असून २ ते ५ वयोमानाचे विद्यार्थी येथे घेतले जातात. रशियातील क्रेशे (Creches) आणि नर्सरी धर्तीवरच्या या शाळा असतात. क्लासे एन्फॅंटाईन (Classe Enfaptine) यांना शिक्षण व्यवस्थेत फार महत्त्वाचे स्थान आहे. प्राथमिक शाळांना जोडलेले जादा वर्ग म्हणून या संस्था पूर्वी असत व मुख्याध्यापक या वर्गांची व्यवस्था पाहात. ३ ते ८ वयोमानाची मुले या वर्गात शिकतात. प्राथमिक शाळेचे हे जणू उपविभागच

आहेत. जगातील इतर शाळाप्रमाणेच किंडरगार्टन शाळा चालतात. ३ ते ६ वयोमानाच्या मुलामुलींना प्रारंभी हस्तव्यवसाय व कला शिकविली जाते. मानसिक आणि शारीरिक विकासाकडे लक्ष कटाक्षाने पुरवितात. शासनाच्या व खाजगी अशा दोन्ही प्रकारच्या संस्था या क्षेत्रात काम करतात. मुख्यतः खाजगी प्रयत्नाने या क्षेत्रात काम चालते व शासन आर्थिक मदत देते. खेळ आणि आधुनिक शास्त्रीय उपकरणे यांच्या साहाय्याने शिक्षण दिले जाते. दुसऱ्या महायुद्धानंतर आर्थिक परिस्थितीमुळे स्त्रियांना चरितार्थासाठी नोकरी करावी लागते व मुलांना संभाळण्याची जबाबदारी पाळणाघरे घेतात. माँटेसरी पद्धतीही या क्षेत्रात लोकप्रिय आहे. सरकारी अनुदानास दहा वर्षे काम करणारी संस्थाच पात्र ठरते. या शाळांची शासनातर्फे वार्षिक तपासणी केली जाते.

प्राथमिक शिक्षण

मोफत, सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना १८८१ मध्ये जाहीर करण्यात आली व ते ६ ते १४ वयोगटातील मुलांना लागू करण्यात आले. सरकारी आणि खाजगी संस्था या क्षेत्रात काम करतात व मुलामुलींसाठी स्वतंत्र शाळांची सोय असते. संख्या फारच कमी असेल तर एकत्र शिकविण्याची सोय आहे. तीन पातळ्यांवर प्राथमिक शिक्षण दिले जाते. १) प्राथमिक शिक्षण २) प्राथमिक माध्यामिक शिक्षण व ३) उच्च प्राथमिक शिक्षण. ही व्यवस्था अमलात येण्यापूर्वी माध्यामिक शाळांना जोडलेले प्रिप्ररेटरी शाळांचे वर्ग अस्तित्वात होते. मध्यवर्ती शासनात प्राथमिक शिक्षणाचा खास विभाग आहे. सकाळी ८ ते ११ व १ ते ४ अशा सहा तास शाळा चालतात व ११ ते १ मधली सुटी असते. गुरुवार आणि रविवार सुट्टी व ३० तास आठवड्याचा अभ्यास. अडीच तास शारीरिक शिक्षणासाठी राखून ठेवलेले असतात. फ्रेंच ही शिक्षणाची बोध भाषा आहे. अंकगणित, हस्तव्यवसाय आणि गृहविज्ञान (Home Scicmce) या विषयाबरोबर शारीरिक शिक्षणालाही प्राधान्य दिले जाते. शेती आणि व्यापारी विषयांचा अंतर्भावही गरजेप्रमाणे केला जातो. अभ्यासक्रम ठरविताना स्थानिक

गरजांना महत्त्व दिले जाते. सरकारी शाळा तपासनीस पाठ्यपुस्तकांची निवड करतात, पण शासन पाठ्यपुस्तके तयार करीत नाही. सर्वसामान्य परीक्षा अभ्यासक्रमाचे अखेरीस घेण्यात येऊन पदविका देण्यात येते. खासगी रीतीने अभ्यास करणाऱ्यांना परीक्षा मंडळाची परीक्षा देऊन शाळेत प्रवेश मिळवता येतो. लेखी परीक्षाही घेतली जाते.

उच्च प्राथमिक शिक्षण : (Superior Primary Education)

नेहमीच्या प्राथमिक शिक्षणापेक्षा ही वरच्या दर्जाची परीक्षा आहे. हा तीन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सरकारी नोकऱ्यात किंवा अध्यापन व्यवसायात प्रवेश करता येतो. याशिवाय पूरक अभ्यासक्रमाची (Complementary Courses) सोय असून अवघी दोन वर्षांचा आहे. शारीरिक शिक्षण, शेतीचे विषय, औद्योगिक विषय, हस्तव्यवसाय इतर महत्त्वाचे विषय शिकविण्याची सोय. मुलींच्यासाठी उपयुक्त विषय शिकविले जातात.

कारभार व्यवस्था

प्रत्येक शाळेला एक व्यवस्थापक समिती असते तिला Comite de Patronage असे म्हणतात. शाळेच्या मुख्याध्यापकाची नेमणूक शिक्षण-मंत्री करतात. विषय आणि अभ्यासक्रम निवडीस तो जबाबदार असतो. ज्याना सुपीरीयर लायसेन्स (Superior Licence) मिळाले आहे अशांनाच शिक्षक म्हणून नेमले जाते. अशी व्यक्ती पंचवीस वयावरची व ५ वर्षे अनुभव असलेली हवी. सुपीरीअर प्रायमरी शिक्षणात नैतिक शिक्षणाला फार महत्त्व आहे. नागरिकत्त्वाचे शिक्षण देण्यावर भर असतो. सुपीरीयर प्राथमिक शिक्षणानंतर तोंडी, लेखी व प्रत्यक्ष कामाची परीक्षा घेऊन पदविका दिली जाते. १५ ते १८ वयोगटातील मुलांना या परीक्षेस बसता येते.

उच्च प्राथमिक शिक्षण देण्यासाठी दोन प्रकारचे अभ्यासक्रम, सुपीरीयर प्रायमरी स्कूल्स आणि दुसरा काँप्लीमेंटरी कोर्सेस या शाळामार्फत चालविले जात. पहिला अभ्यासक्रम ३ वर्षाचा व दुसरा २ वर्षांचा असतो.

वेगवेगळ्या अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र खोल्या असतात व उत्तम ग्रंथालय व्यवस्था, खेळ इत्यादी सोयी असतात.

० ० ०

३. माध्यमिक शिक्षण

परंपरा

फ्रान्समध्ये माध्यमिक शिक्षणाला पद्धतशीर वळण आणि महत्त्व देण्याचे श्रेय नेपोलीयनला द्यावे लागेल. सत्तेवर येणाऱ्या राजघराण्यातील व्यक्तीला विशिष्ट प्रकारचे, दर्जाचे शिक्षण हवे असा त्याचा आग्रह होता. उच्च दर्जाचे अधिकारी आणि उमराव तयार व्हावेत यासाठी हे शिक्षण सुरू करण्यात आले. त्याच्या जोडीने व्यावसायिक शिक्षणावरही माध्यमिक कक्षेत भर देण्यात आला. लॅसे (Lycees) या माध्यमिक शिक्षण देणाऱ्या जुन्या संस्था. उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी तयार करणे हे ध्येय होते. नॅशनल मितिस्ट्री ऑफ एज्युकेशन या संस्थांचे व्यवस्थापन पाही. ७ वर्षांचा अभ्यासक्रम असून गणितावर भर दिला जात असे. शुल्कही फार असल्याने सामान्यांना परवडत नसे. म्हणून नगरपालिकांनी कॉलेजेस नावाच्या संस्था १८१२ मध्ये काढल्या. लोकल बोर्डस् या संस्थांचा संपूर्ण कारभार पाहात. लॅसे मधून उच्च दर्जाचे शिक्षक नेमले जात. कॉलेजेस मधून थोडे कमी दर्जाचे शिक्षक असत. हा फरक दोन संस्थांत राहिला. पुढे नव्या योजनेनुसार हे शिक्षण विस्तारले व ते मोफत करण्यात आले. लॅसेमधील शिक्षकाला ॲग्रगेशन (Aggregation) ही वरच्या श्रेणीची पदवी मिळवावी लागे तर कॉलेजेसमध्ये कमी दर्जाची पदवी किंवा परवाना (Licence) चालत असे.

कॉलेज मॉडर्न (College Moderne) या महत्त्वाच्या संस्था दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन करण्यात आल्या. उच्च प्राथमिक शाळांचा दर्जा उंचावून त्याद्वारा माध्यमिक शिक्षण देण्यात येऊ लागले. या नव्या संस्थाचे प्रशासन लॅसे व कॉलेजेस पाहात असत. या नव्या महाविद्यालयातून शास्त्र

आणि आधुनिक भाषा शिकवण्यावर भर होता लॅसे आणि कॉलेजेसमधून मळणाऱ्या बॅकॅलियुरिट (Baccalaureat) पदवीसाठी मॉडर्न कॉलेजेसमधून तयारी करवून घेतली जात असे. पूरक वर्ग (Complementary Classes) या संस्थांतून ग्रामीण विभागासाठी उपयुक्त कामगिरी केली जाई. प्राथमिक शाळातून हे वर्ग भरविले जात. कारण स्वतंत्र लॅसे किंवा कॉलेजे स्थापन करणे परवडणारे नव्हते. ११ वे वर्षी या पूरक वर्गातून परीक्षा पास झाल्यानंतर त्यांना माध्यमिक शिक्षण देण्यात येई. ही परीक्षा देणाऱ्यांना इलेंमेटरी किंवा लोअर सेकंडरी सर्टिफिकेट देण्यात येई. मग गरजेप्रमाणे विद्यार्थी माध्यमिक शाळेत किंवा प्रवेश परीक्षा देऊन नॉर्मल शाळांत जात. स्थानिक गरजानुसार अभ्यासक्रमात बदल केला जाई. तांत्रिक शिक्षण देण्यासाठी माध्यमिक शाळा निघाल्या. त्यांना कॉलेज टेक्निक (College Technique) असे म्हणत. अपुरी विद्यार्थी संख्या असेल तर मॉडर्न कॉलेजात तांत्रिक शिक्षण दिले जाई.

अनेक विषय व त्यांची योग्य निवड करण्याची व्यवस्था नसल्याने विद्यार्थ्यांवर फार भार पडला जात असे. यातून मार्ग काढण्यासाठी १९३७ मध्ये ओरिएंटेशन वर्ग (Orientation classes) प्रयोगादाखल चालू करण्यात आले. या दिशेने प्रसार करण्यासाठी १९४५ मध्ये एक परिषद घेण्यात आली. लॅसे आणि कॉलेजेस या संस्थातून या पद्धतीला माध्यमिक कक्षेच्या पूर्वार्धापुरता स्वीकार करण्यात आला. मुख्य भर शिक्षण आकर्षक व उपयुक्त व्हावे यावर होता. या पद्धतीचा प्रस्तर आणि लोकप्रियता वाढली पण लोकांना जुनी विशिष्ट थरांतील विद्यार्थ्यांसाठी रूढ असलेली पद्धतीच मनातून आवडत होती.

मुलींचे शिक्षण

१८८० पूर्वी मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था खासगी किंवा धार्मिक संस्थामार्फत केली जाई. १८८० च्या शिक्षण कायद्याने मुले आणि मुली यासाठी स्वतंत्र लॅसे आणि कॉलेजे असत. मुलींची संख्या कमी असेल तर त्या मुलांच्या शाळेत जात. मुलींची परीक्षा स्वतंत्र कौन्सील घेई. गृहविज्ञान, शिवणकाम, चित्रकला, संगीत, गृहअर्थशास्त्र असे विषय असत. परीक्षा

दिल्यानंतर शिक्षक, तपासनीस अशा जागासाठी त्यांची निवड होऊ शकत होती. आता मुलींना बॅकॅलियुरिअर ही पदवी देण्याची सोय झालेली आहे. माध्यमिक परीक्षा दिल्यानंतर मुली उच्च शिक्षणाकडे जाऊ शकतात.

प्रशासन व्यवस्था

लॅसे, कॉलेज व अन्य माध्यमिक शाळांचे प्रशासन एकाच प्रकारचे आहे. लॅसेच्या मुख्यास प्रोव्हिसर (Provisor) आणि कॉलेजच्या प्रमुखास प्रिन्सिपल म्हणतात. मुलींच्या शाळेच्या मुख्याध्यापिकेस डॉक्ट्रइस (Doctrice) म्हणतात. शिक्षकांना प्रोफेसर्स म्हणतात. प्रिफेक्ट प्रिन्सिपल, ॲकॅडमीचा रेक्टर, व पालकांचे प्रतिनिधी यांची व्यवस्थापक समिती असते. आर्थिक बाजू, व इमारती बांधणे, तपासनीसांची निवड इ. कामे समिती करते. दुसऱ्या एका अशाच समितीत सर्वसामान्य लोकांचे प्रतिनिधी, आरोग्याधिकारी असतात व ती समिती प्रमुखास साहाय्य करते. ॲल्युम्नी ॲसोसिएशन (Alumni Association) या नावाची आणखी एक समिती शिष्यवृत्त्यांचे वाटप करते. आणखी दोन समित्या (क्लास कौन्सील व एज्युकेशन कौन्सील) असून पहिल्याचे सभासद सर्व शिक्षक असून शिकविण्यात येणाऱ्या विषयात तोल व सुसुत्रता राखणे व मुलांच्या गृह-पाठांची व्यवस्था पहाणे ही कामे या समितीकडे असतात. एकच विषय अनेक वर्गांना शिकविणारे शिक्षक एज्युकेशन कौन्सीलचे सभासद असतात, समान दर्जाचे अध्यापन राखणे हे या दोन समित्यांचे प्रमुख कार्य होय.

विषयांचे अध्यापन

लॅसे आणि कॉलेजे यांमध्ये शिकविण्यात येणा-या विषयांचे दोन विभाग पडतात. लॅसेमध्ये चार वर्षे व कॉलेजेस मधून तीन वर्षे विषय शिक-विण्याची सोय आहे. चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था. या प्राथमिक कक्षेत लॅटीन भाषा सक्तीची व ग्रीक वैकल्पिक आहे. माध्यमिक कक्षेत या भाषा शिकविल्या जात नाहीत. त्या ऐवजी विस्तारित अभ्यासक्रम पेंटिंग, शाखा आणि फ्रेंच भाषा यांचा असतो. वैकल्पिक विषय संख्येने कमी आहेत. फ्रेंच भाषा, अलजिब्रा,

केमिस्ट्री, फिजिक्स, भूविज्ञान, पेंटिंग इतिहास, आणि भूगोल हे विषय दोन्ही विभागात शिकविले जातात. माध्यमिक कक्षेच्या शेवटल्या वर्षात तत्त्वज्ञान आणि इतर विषय यांच्या खास शिक्षणावर भर असतो. वर्गांना नावे उलटचा क्रमाने दिली जातात हे वैशिष्टय आहे. माध्यमिकच्या पहिल्या वर्गाला ६ वा वर्ग म्हणतात. ६, ५, ४ आणि ३ अशा उलटचा क्रमाने वर्ग ओळखले जातात. सर्व शाळांतून समान अभ्यासक्रम असतो. तीन वर्षाच्या अभ्यासक्रमात चार विषय असून त्यांपैकी आवडीच्या एका विषयाची निवड विद्यार्थी करू शकतो. बॅकॅलियुरिअट ही माध्यमिक कक्षेतील सर्वोच्च पदवी होय. ती मिळविल्यानंतर विद्यापीठ परीक्षेस बसता येते. विद्यापीठ प्रवेश परीक्षेस सोयीचे पडावे म्हणून काही शाळा खास वर्ग चालवितात. मुलींच्या शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था माध्यमिक कक्षेत आहे.

भाषाविषय काळजीपूर्वक आणि दक्षतेने शिकविले जातात. बौद्धिक शक्ती वाढावी म्हणून लॅटीन व ग्रीक भाषा काटेकोरपणे शिकविल्या जातात. फ्रेंच राष्ट्र व इतर देश यांचा इतिहास शिकविला जातो. वरच्या वर्गातून आर्थिक भूगोल शिकविण्यावर भर असतो. सर्व वर्गात क्रमवार शास्त्र संशोधन पद्धतीने शिकविले जाते. तत्त्वज्ञान शिकविण्यामागे विविध प्रश्न सोडविण्याची तात्त्विक भूमिका अंगी यावी हा उद्देश आहे. जीवनाकडे योग्य दृष्टीने पहाण्याचे सामर्थ्य यावे हाही प्रधान हेतू आहे. त्यासाठी सॉक्रेटिक पद्धती (संवाद पद्धती) वापरण्यात येते.

० ० ०

४. विद्यापीठीय उच्च शिक्षण

मूलभूत उद्दिष्ट

स्वत: चिंतन–मनन करून ज्ञानाची साधना करणारे विद्यार्थी तयार करणे व राष्ट्राच्या बौद्धिक विकासाला वळण देणे हे उच्च शिक्षणाचे वैशिष्टय आणि मूलभूत उद्दिष्ट मानलेले आहे. फ्रेंच लोकांना आपली

संस्कृती, कलाप्रेम, भाषा, परंपरा, रीती रिवाज आणि इतिहास यांचा फार अभिमान वाटतो. मागे आपण पाहिले की विविध कला आणि फ्रेंच भाषा यांच्या संगोपनासाठी प्राथमिक कक्षेपासून पद्धतशीर प्रयत्न करण्यात येतो. विद्यापीठीय कक्षेतही त्याची संपूर्ण सोय आहे. अर्थात केवळ पदवीसाठी धडपडणारे विद्यार्थी जसे जगातल्या विद्यापीठात आहेत तसे येथेही आहेत.

आपल्या कार्यक्षेत्रात विद्यापीठाचा अधिकार मोठा असतो व तेथील अधिकारी आणि जबाबदार व्यक्ती यांना आपल्या विभागातील सर्व प्रकारच्या शिक्षणावर देखरेख करावी लागते. आपल्या विभागाच्या प्रतिनिधित्वाचे कामही विद्यापीठाला करावे लागते. उच्च शिक्षण ही राज्यशासनाची जबाबदारी मानली जाते. पण केंद्रशासन प्रत्यक्ष विद्यापीठांचे नियंत्रण करते. उच्च व्यावसायिक दर्जा मिळविण्याची सोय येथे आहे वत्याचे नियंत्रण केंद्र शासनातील इतर मंत्री करतात. औद्योगिक आणि व्यावसायिक उच्च शिक्षण देणाऱ्या वेगळ्या संस्था येथे आहेत. या विद्यापीठातील पदव्या आणि प्रमाणपत्रे युरोपात वरच्या दर्जाची मानली जातात. हा दर्जा टिकविण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यात येतो. फ्रान्समधील माध्यमिक शिक्षणाचा दर्जा युरोपातील काही देशांतील विद्यापीठाच्या पदवीइतका मोठा मानला जातो.

विद्यापीठांची रचना इतर देशासारखी असून प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र विद्याशाखा आहे. ॲकॅडमी या संस्थांना विद्यापीपेक्षाही मोठा दर्जा या देशात दिला जातो. विविध विषयांच्या ॲकॅडमी उच्च शिक्षणाचे कार्य करतात. या संस्थांची परंपराही मोठी आहे. उच्च पातळीवरचे व्यावसायिक शिक्षण या संस्थातून दिले जाते. विद्यापीठाशी जोडलेली सुमारे १५० शिक्षणकेंद्रे धंदे शिक्षण, व्यवसाय शिक्षण देतात. तेथे प्रारंभीच्या शिक्षणापासून तो संशोधनापर्यंत शिक्षणाची सोय असते.

शिक्षण व्यवस्था

विद्याशाखा (Faculties) हा एकूण प्रशासनातील शेवटला टप्पा असून त्यात अभ्यासक्रम व इतर नियोजनाचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. प्रत्येक विद्या-

शाखा अलगपणे काम करते. प्रत्येक विद्याशाखेचे स्वतंत्र ग्रंथालय आणि प्रयोगशाळा असते. केंद्रीय शिक्षण मंत्रालय विद्यापीठावर नियंत्रण करते हे आपण पाहिले. विद्यापीठाचा अंतर्गत कारभार विद्याशाखा प्रमुख (Deans) असलेली समिती पाहाते. केंद्रीय शिक्षण मंत्रालय रेक्टरची विद्यापीठ प्रमुख म्हणून नेमणूक करते. हा रेक्टर वरील समितीचा अध्यक्ष असतो. सलग्न संस्थांच्यावर या समित्यांचा अधिकार चालतो. पदव्यांच्या संदर्भात एकात्म असे राष्ट्रीय धोरण नाही पदव्या म्हणजे विशिष्ट मुदतीपर्यंत व्यक्तीला त्याच्या दर्जाचे निदर्शक असे परवाने (Licences) असतात. इतकेच नव्हे तर एकाच विद्यापीठाच्या अनेक विद्याशाखा मार्फत देणाऱ्या पदव्यात फरक असतो. विद्यापीठामार्फत देण्यात येणारी व अगदी खालची पदवी म्हणजे बॅकॅलिरीएट (Baccalaureat) होय. मॅट्रिक्युलिशनच्या दर्जाची ही पदवी असते. सर्वात उच्च पदवी डॉक्टरेट ही आहे. या दोन टोकात अनेक पदविका (Diploma) आणि परवाने (Licences) असतात. या पातळीवरच्या समान परीक्षा केंद्रशासन घेऊन प्रमाणपत्रे देते.

उच्च व्यावसायिक शिक्षण केंद्र

वरच्या दर्जाची व्यवसायिक गुणवत्ता सरकारी व खासगी क्षेत्रात सदैव लागते. त्यासाठी शिक्षण देणाऱ्या खास केंद्रे आहेत त्यांना ग्रँडेस इकोल्स् (Grandes Ecoles) म्हणतात. या विविध व्यवसायाचे शिक्षण देणाऱ्या संस्थांचे नियंत्रण संबंधित मंत्रालये करतात. जनरल शिक्षण मात्र मध्यवर्ती शिक्षण मंत्रालयातर्फे नियंत्रित केलें जाते. मध्यवर्ती शिक्षण मंत्रालय शिक्षकांना प्रशिक्षण देणारी केंद्रे स्थापन करते. लष्करी शिक्षण, तांत्रिक शिक्षण, शेती शिक्षण इ. खास शिक्षण त्या त्या मंत्रालयामार्फत दिले जाते. संस्था स्थापून त्या नियंत्रित करण्याची त्यांची जबाबदारी असते. ही शिक्षण केंद्रे विद्यापीठाहून वेगळी असतात. यातूनच मतभेद व वाद विवाद झाले. विद्यापीठाशी ही केंद्रे निगडित असावीत असा प्रश्न मांडला या योजनेमुळे वर्ग भावना वाढीला लागते अशीही टीका झाली. पण इतके होऊन ही व्यवस्था प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली आहे. या खास शिक्षण केंद्रातून अनेक चांगले प्रशासक, नेते, तज्ञ बाहेर पडले. १९५१

मध्ये देशात अशी १२५ खास शिक्षण केंद्रे होती. स्पर्धा परीक्षा घेऊन या संस्थातून प्रवेश दिला जातो. उमेदवाराने विद्यापीठाची दोन वर्षे तरी पुरी केलेली असावीत अशी अट आहे. वय कमीतकमी २० असावे लागते, प्रवेश परीक्षेचा दर्जा वरच्या राखला जातो. शिक्षण पूर्ण झाल्यावर प्रमाण-पत्र दिले जाते. आपल्या नोकऱ्यात प्रवेश देताना केंद्रशासन पुनः वेगळी परीक्षा घेते. प्रशासनाचा विशिष्ट उच्च दर्जा राखण्यासाठी विद्यापीठे व ही ख.स शिक्षण केंद्रे सदैव कार्यमग्न असतात.

० ० ०

५. शिक्षकांचे प्रशिक्षण

विविधस्तर

फ्रान्समध्ये शिकविणाऱ्या व्यक्तींना शिक्षक आणि प्राध्यापक (Professor) अशा दोन नावांनी ओळखले जाते. हा फरक गुणवत्ता आणि दर्जा यांना अनुसरून केला जातो. पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि उच्च प्राथमिक वर्गांना शिकविणारे ते शिक्षक होत. इतरांना प्रोफेसर म्हणण्यात येते. हा फरक लक्षात घेऊन पुढील विवेचन पाहिले पाहिजे. या पहिल्या विभागातील शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सुरुवात १८२० साली झाली. अशा सुमारे ३० संस्था होत्या व त्यांना प्रायमरी नॉर्मल स्कूल्स म्हणत. १८३३ व १८७९ मध्ये या संस्थात आणखी वाढ झाली. केंद्र सरकार ५० टक्के खर्चाच्या प्रमाणात अनुदान देते व त्यातून इमारत, पगार आणि विद्यार्थी-शिक्षक (Pupil–teachers) यांचा खर्च भागविला जातो. विद्यापीठाचा रेक्टर या संस्थांचे नियंत्रण करतो व व्यवस्थापनासाठी कौन्सील ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन नेमतो. तपासनीसाना रेक्टर दैनंदिन कामावर देखरेख करण्याचे अधिकार देतो. हे तपासनीस विद्यार्थ्यांना प्रवेश देतात व प्रोफेसरांची बदली करू शकतात. रेक्टर प्रशासन पाहाण्यासाठी कौन्सील ऑफ ॲडमिनिस्ट्रेशनवर एक डायरेक्टर नेमतो व त्याच्याकरवी कारभार पाहिला जातो. अभ्यासक्रम ३ वर्षांचा असून आठवड्याचे ३०

तास काम चालते. ५० अर्धे दिवस पाठासाठी राखून ठेवलेले असतात. हे पाठ देण्याचे काम संलग्न प्राथमिक शाळात चालते. विद्यार्थ्यांना सर्व सामान्य व व्यवसायाचे असे दोन्ही तऱ्हेचे शिक्षण देण्यात येते. अध्यापन-शास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, विज्ञान, शेती, पेंटिंग, संगीत, शारीरिक शिक्षण, इतिहास, भूगोल, गणित, फ्रेंच भाषा व वाङ्मय, आणि एक परकी भाषा अशा व इतर मिळून वीस विषयांचे शिक्षण दिले जाते. शेती व मोजमापांचे शिक्षण फक्त मुलांनाच दिले जाते. तिसऱ्या शेवटच्या वर्षात विद्यार्थ्यावर सर्व जवाबदारी टाकून अनुभव दिला जातो. परीक्षा दरवर्षी घेतली जाते. तिसऱ्या वर्षी तोंडी व लेखी परीक्षा अध्यापनाविषयी घेतली जाते. या नॉर्मल शाळेत प्रवेशासाठी एक स्पर्धा परीक्षा घेतली जाते. १५ ते १६ वयोमानाचे व ब्रेव्हेट (Brevet Superior) प्रमाण पत्र व तत्सम दाखला मिळविणाऱ्यांनाच या परीक्षेस बसता येते. वसतिगृहाची सोय असून तेथे राहाणे आवश्यक असते. जागा नसेल तरच इतरत्र राहाण्याची मुभा असते. प्रवेशापूर्वी वैद्यकीय परीक्षा आणि करारपत्र द्यावी लागतात १० वर्षे पब्लिक प्रायमरी शाळेत काम करण्याची अट करारपत्रात असते. ही अट मोडली तर प्रशिक्षण काळातील सर्व खर्च भरून द्यावा लागतो. वसतिगृहात पाळावयाचे नियम व शिस्त फार कडक असते. हा सर्व अभ्यासक्रम जड आहे हे उघड आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना फार परिश्रम करावे लागतात. अभ्यासपूरक उपक्रमही हाती घेतले जातात.

सुपीरिअर नॉर्मल स्कूल्स

प्रायमरी नॉर्मल शाळा व उच्च प्राथमिक शाळांसाठी शिक्षक तयार करण्यासाठी दोन सुपीरियर नॉर्मल शाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. सेंट क्लाऊड (Saint Cloud) येथे मुलांच्यासाठी व फाँटेने ॲक्स रोझेस (Fontenay–Aux–Roses) येथे मुलींच्यासाठी या त्या शाळा होत. स्पर्धा परीक्षा घेऊन येथे प्रवेश मिळतो. ही परीक्षा कठीण असून केवळ १० टक्के विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होता येते. या परीक्षेच्या तयारीसाठी प्रायमरी नॉर्मल शाळा जादा वर्ग भरविते. प्रवेशासाठी १९ वय आणि

हायर प्रायमरीचे प्रमाण पत्र किंवा माध्यमिक कक्षेची बॅकॅलिरीयट पदवी आवश्यक आहे. वैद्यकीय परीक्षा आणि वसतिगृहात रहाणे सक्तीचे आहे. अभ्यासक्रम २ वर्षांचा असून वाङ्मय आणि विज्ञान अशी त्याची विभागणी असते. यापैकी एकाची निवड करता येते. अध्यापन शास्त्र आणि मानसशास्त्र सर्वांना आवश्यक शिकावी लागतात. वाङ्मय विभागात इतिहास, भूगोल, फ्रेंच भाषा व वाङ्मय हे उपविभाग असतात. विज्ञान विभागात नैसर्गिक शास्त्रे, रसायन, शरीरशास्त्र, गणित, शुद्ध विज्ञान हे उपविभाग असतात. उत्तीर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र दिले जाते ते संपूर्ण अभ्यासक्रमाचे.

माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण

माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षण घेण्याचे दोन मार्ग उपलब्ध असतात. बॅकॅलिरियट डिग्री मिळवून आणि विद्यापीठाचे शिक्षण पूर्ण करून माध्यमिक शाळेत शिकवता येते किंवा इकॉल नॉर्मल सुपीरिअर (Ecole Normal Superior) ग्रँड इकॉल्स (Grandes Ecoles) मध्ये प्रशिक्षण घेऊन माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून काम करता येते हे ते दोन मार्ग होत. इकॉल नॉर्मलमध्ये स्पर्धा परीक्षेस बसल्यानंतर प्रवेश मिळतो. बॅकॅलिरीयट डिग्री मिळवून लॅसेमध्ये तयारी केल्यानंतर या स्पर्धा परीक्षेस बसता येते. इकॉल नॉर्मलमधील चार वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या अवधीत तीन प्रमाणपत्रे मिळवावी लागतात. दोन वर्षांनंतर परवाना (Licence) मिळतो व तीन वर्षांनंतर डि ल्यूड सुपीरिअरस (d' eludes Superieures) ही पदविका मिळते. चौथ्या म्हणजे शेवटल्या वर्षी राज्य सरकार मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेस संपूर्ण तयारी करून बसावे लागते. सेव्हर्स (Severs) या ठिकाणी मुलींच्यासाठी अशाच प्रशिक्षणाची सोय केलेली असते. स्पर्धा परीक्षेत वरचा दर्जा मिळवणाऱ्यांना वसतिगृह इ. साठी शिष्यवृत्त्या देण्यात येतात. अशा हुषार विद्यार्थ्यांना प्रांतिक विद्यापीठातून मोफत शिक्षणाची सोय केली जाते. १७९५ मध्ये पहिले एकमेव इकॉल नॉर्मल स्थापन करण्यात आले. इतर विद्यापीठेही परवाने देतात. खास शारीरिक शिक्षणाचे प्रशिक्षण देणारी केंद्रेही फ्रान्समध्ये आहेत.

सर्वसामान्य परिस्थिती

कोणत्या कक्षेत शिक्षक काम करतो त्यानुसार गुणवत्ता अपेक्षित असते. शिक्षकांचे वर्गीकरण चार प्रकारात करता येते. १) प्रशिक्षणाच्या काळातले उमेदवार (Probationers), २) दुसऱ्या कोणाच्या जागी दीर्घकाळ काय करणारे पण कायम नसलेले, ३) कायमचे नसलेले पण तात्पुरते नियमित घेतलेले, ४) अल्पावधीसाठी नेमलेले असे प्रकार होत. पब्लिक शाळातील शिक्षक सरकारी नोकर समजले जातात. राज्यशासन त्यांच्या नेमणुका करते. प्राथमिक शिक्षकांच्या नेमणुका विभागीय प्रिफेक्ट करतात. शिक्षण मंत्री प्रोफेसर नेमतात ते औद्योगिक, व्यावसायिक आणि तांत्रिक शाळातले. शिक्षण मंत्रीच उच्च प्राथमिक शाळा आणि माध्यमिक शाळातील शिक्षकांच्या नेमणुका करतात. विद्यापीठातील प्राध्यापकांच्या नेमणुका स्वत: राष्ट्राध्यक्ष करतात. स्पेशल स्कूल्समधील नेमणुका त्या त्या विभागातील एक्सिक्यूटिव्ह कौन्सील करते. साठाव्या वर्षी शिक्षक निवृत्त होते. प्रगती, गुणवत्ता व अनुभव यानुसार बढती देण्यात येते. शिक्षकाला निवृत्तीवेतन (Pension) मिळते. मोठे कुटुंब असेलतर कुटुंबभत्ता मिळण्याची सोय. जादा कामाचे जादा वेतन देण्याची प्रथा आहे. वेशिस्त अगर गुन्ह्याबद्दल शिक्षा करण्याचे काम निरनिराळी मंडळे करतात. काही स्थानिक समित्या आणि संघटना शिक्षकांच्या गाऱ्हाण्यांचे, अडचणींचे व इतर प्रश्न समाजासमोर मांडतात. Federation General Del Enseignement या संघटनेमार्फत शिक्षकांची संघटना बांधण्याचे कार्य सुरू आहे. विविध स्तरांवरील शिक्षकांच्या वेतनातील फरकामुळे असंतोष आढळतो. शिक्षकांचा तुटवटा यामुळे जाणवतो.

काही विद्यापीठांतून शैक्षणिक प्रशासनाधिशारी तयार करण्याची सोय आहे.

० ० ०

६. व्यवसाय शिक्षण

मनोवृत्तीचे वैशिष्ट्य

अनुकूल भौगोलिक परिस्थिती लाभूनही फ्रान्समध्ये व्यावसायिक आणि औद्योगिक शिक्षणाचा जसा व्हावा तसा विकास झाला नाही. याचे मूळ फ्रेंच लोकांच्या मनोवृत्तीत सापडते. कला, संस्कृती, फ्रेंच वाङ्मय आणि भाषा, रीतिरिवाज यांचे संगोपन करून उच्च दर्जाचे आरामी जीवन जगणे ही लोकांची मनोवृत्ती आहे. याचा परिणाम आर्थिक आणि म्हणून सामाजिक जीवनावर विपरीत झाला. राजकीय अस्थिरतेने या हलाखीत भर टाकली. याची जाणीव अठराव्या शतकात फार झाली. व्यावसायिक उमेदवारी पूर्वी आवश्यक लागणारे शिक्षण देण्याची सुरुवात व्हायला १८७५ साल उजाडले. पहिल्या महायुद्धानंतर या उणीवांची जाणीव तीव्र होऊन अनेक शाळांनी व्यावसायिक शिक्षणाच्या योजना सुरू केल्या. १९३६ च्या कायद्याने सक्तीच्या शिक्षणाचे वय वाढवून या योजनांना गती दिली. १८९२ नंतर औद्योगिक शिक्षणाला चालना मिळाली त्याचे प्रत्यंतर १८९३ च्या मजुरी विषयक कायद्याने येते. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या मुलांची वयोमर्यादा कमीत कमी १३ करण्यात आली. शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्राशिवाय काम देण्यात येत नसे. औद्योगिक तपासनीस १६ वर्षाच्या आतील मुलांना कारखान्यातून काढून टाकीत व ज्यांना शारीरीक श्रम झेपत नसत अशांनाही काढून टाकीत, याच सुमारास उच्च प्राथमिक शाळेत औद्योगिक शिक्षणाचे वर्ग उघडण्यात आले. मॉडर्न कॉलेजच्या विषयात तांत्रिक विषयांचा अंतर्भाव करण्यात आला. चांगल्या प्राथमिक शाळांचे रूपांतर कॉलेज टेक्नीक्समध्ये करण्यात आले.

विकासाचा मार्ग

१९०० च्या मजूरविषयक कायद्याचा उमेदवारी पद्धतीवर फार परिणाम झाला. अठरा वर्षे वयाचे आतील मुलांचे कामाचे तास दहा करण्यात आले. उमेदवार नेमून कुशल कामगारांना काढून टाकण्याच्या कारखानदारांच्या धोरणामुळे कारखानदारीवर उलटा वाईट परिणाम

झाला. १९१९ च्या कायद्याने नवी तांत्रिक शिक्षणाची व्यवस्था केंद्र सरकारने चालू केली. शिक्षण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाने औद्योगिक शिक्षणाचा विकास होऊ लागला. लँगेव्हिन कमिशनच्या अहवालाने औद्योगिक शिक्षणाला गती मिळाली. शेती, उद्योग, संरक्षण, मजूर, आरोग्य इ. केंद्रीय मंत्रालयांचा औद्योगिक शिक्षणाशी सरळ संबंध प्रस्थापित झाला व त्यांच्यावर विकासांची जबाबदारी टाकण्यात आली. हायर कौन्सील फॉर टेक्निकल एज्युकेशन स्थापन करण्यात आले. शेतीविषक शिक्षणाच्या विकासही याच धर्तीवर होऊ लागला. सरकारी इतर अशा दोन्ही प्रकारच्या संघटनाकडून औद्योगिक शिक्षण देण्याचे प्रयत्न केले जातात. औद्योगिक व तंत्र शिक्षण देणाऱ्या संघटना पुढीलप्रमाणे आहेत.

(१) नॅशनल गव्हर्मेंटने स्थापन केलेल्या संस्था. (२) औद्योगिक, व्यापारी संघटनांच्या संस्था. नॅशनल इंडस्ट्रीज शाळा, डिपार्टमेंटल शाळा, व्यापारी शाळा, या विविध शिक्षण संस्था असून त्यांचा कारभार मिनिस्ट्री ऑफ् नॅशनल एज्युकेशन पाहाते. ही मिनिस्ट्री पुढील संस्था चालविते. (१) औद्योगिक क्षेत्रातील वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यासाठी शाळा. (२) प्रशासन अधिकाऱ्यासाठी शाळा. (३) कला आणि व्यापारी शाळा. (४) नॉर्मल स्कूल्स फॉर व्होकेशनल गायडन्स. (५) प्रिपरेटरी स्कूल्स फॉर आर्टस अँड ट्रेड एक्झॅमिनिशन्स. या शिवाय दुसऱ्या संघटनामार्फत पुढील संस्था चालविल्या जातात. (१) प्रॅक्टिकल स्कूल्स फॉर कॉमर्स अँड इंडस्ट्रीज (२) होम क्रॅफ्ट स्कूल्स. (३) व्होकेशनल स्कूल्स (४) व्होकेशनल क्लासेस. याशिवाय उमेदवारांना प्रात्यक्षिक शिक्षण देणारी केंद्रे रशियातील फॅक्टरी शाळांच्या धर्तीवर चालविली जातात. यात काम करणाऱ्या शिक्षकांना इंडस्ट्रीयल कॉलेजे प्रशिक्षण देतात.

उच्च औद्योगिक शिक्षण व प्रशिक्षण

इंग्लंडमध्ये ज्याप्रमाणे पुढील प्रगत शिक्षणाची (Further Education) किंवा रशियात उच्च प्रशिक्षणाची व्यवस्था आहे त्या धर्तीवर या संस्था फ्रान्समध्ये काम करतात. नॅशनल इंजीनियरिंग शाळा व हायर कमर्शियल

शाळा उच्च दर्जाचे कौसल्य ज्ञान देणारे वर्ग चालवितात. व्यापारी संस्था कारागिरीचे शिक्षण देणारे वर्ग चालवितात. त्यांना सरकार अनुदान देते. राष्ट्रीय सरकार औद्योगिक आणि शेतीविषयक शिक्षणावर बव्हंशी सर्व खर्च करते. या सर्व संस्थातील शिक्षक, प्राध्यापक, प्रशासक व इतर सेवक यांचा पगार राष्ट्रीय सरकार देते. सरकारमार्फत शिष्यवृत्त्याही देण्याची योजना राबविली जाते. प्रत्येक जिल्हा विभागात तांत्रिक व औद्योगिक शिक्षण समिती असते ती प्रशासन व दैनंदिन कारभार औद्योगिक, तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांचा पाहाते. कॉम्यून्स आणि विभाग रचना (Communes and Departments) यांचाही प्रशासन व्यवस्थेत भोठा वाटा असतो. लोकल इंडस्ट्रियल बोर्डस् विविध कारखानदाराकडून कर वसूल करतात व शिष्यवृत्त्या, अभ्यास वेतन देण्याचे कामही करतात.

शेती उद्योग शिक्षण

लोकांच्या उपजीविकेचा शेती हा महत्त्वाचा उद्योग आहे. राष्ट्रीय सरकारने अनेक शेतीशाळा स्थापन करून या शिक्षणाला चालना दिलेली आहे. या शाळा विविध दर्जाच्या असून काही प्राथमिक, काही ज्युनियर सेकंडरी, तर काही उच्च शिक्षण देण्याचे कार्य करतात. शेती विषयाचे उच्च शिक्षण देणाऱ्या चार संस्था असून त्या अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर पदव्याही देतात. त्यांचा अभ्यासक्रम चार वर्षांचा असून माध्यमिक शिक्षण झालेल्यांना तेथे प्रवेश मिळतो. औद्योगिक व शेती शिक्षण देणाऱ्या फ्रान्समधील संस्थात जनरल एज्युकेशन देण्याचीही सोय आहे. नॅशनल स्कूल्स ऑफ ॲग्रीकल्चरल इंडस्ट्रीज अशा संस्था असून त्यात उत्पादन, बाजारपेठ इत्यादी बरोबर शेतीचे तांत्रिक शिक्षणही दिले जाते. नॅशनल स्कूल्स ऑफ् ॲग्रीकल्चर या संस्था याच प्रकारचे काम करतात. पोल्ट्रीफार्मिंग आणि आणि ॲनिमल हजबंड्री या संबंधातील शिक्षण देणाऱ्या अनेक शाळा फ्रान्समध्ये आहेत. सरकारने अनेक व्हेटरनरी शाळा चालविल्या आहेत. शेती तंत्राचे शिक्षण देणाऱ्या (Agronomic Institutes) तीन वर्षे अभ्यास क्रम चालवून दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी रूरल इंजीनियरिंग, फॉरेस्ट्री किवा व्हेटरनरी या क्षेत्रात विद्यार्थ्यांना तयार करतात. पदव्या आणि पदविका

देण्याची व्यवस्था आहे. प्रत्यक्ष कामाच्या अनुभवाला प्राधान्य देण्यात येते. व शिक्षणाचा दर्जाही उच्च राखला जातो.

इतर प्रगत देशांसारखी प्रौढ शिक्षणाची सुविहीत यंत्रणा आणि राष्ट्रीय धोरण अस्तित्वात नसल्याने काही तुरळक प्रयत्नावरच भागवून ध्यावे लागते अशी फ्रान्सची आवश्यकता आहे. काही कारखानदार कामगारासाठी वाचन, करमणुकीची सोय करतात. उपयुक्त व्याख्यानमालाही आयोजित केल्या जातात. पॉप्युलर एज्युकेशन असा कार्यक्रम मोठ्या शहरात आखला जातो व स्थानिक मंडळे त्याचा खर्च चालवितात. औद्योगिक आणि शेती व्यवसायाच्या मोठ्या ठिकाणी शेतकरी व कामगार कल्याण योजना नैमित्तिक स्वरूपाच्या आखल्या जातात. स्त्री कामगारांना गृहविज्ञान व आर्थिक व्यवहाराचे शिक्षण देण्याचे प्रयत्नही केले जातात. आर्थिक पाठबळ नसल्याने या योजना प्रभावी ठरत नाहीत. या सर्व उपक्रमांचा प्रसार पद्धतशीर होत नाही ही उणीव भासते.

० ० ०

रशिया (U. S. S. R.)

१) इतिहास, परंपरा व प्रशासन

२) शैक्षणिक प्रशासन

३) पूर्व–प्राथमिक व प्राथमिक शिक्षण

४) माध्यमिक शिक्षण

५) विद्यापीठीय उच्च शिक्षण

६) शिक्षकांचे प्रशिक्षण

७) प्रौढ शिक्षण

१. इतिहास व परंपरा

स्वाभाविक रचना

अधुनिक जगातील विस्ताराने, सामर्थ्याने, वैज्ञानिक प्रगतीने आणि एकूण कर्तृत्वाने अत्यंत प्रबळ असे राष्ट्र म्हणजे रशिया (Union of the Soviet Socialist Republics) होय. या देशाचा भूभाग आधिकांशाने आशियाखंडात येत असला तरी हे एक पाश्चिमात्त्य प्रगत राष्ट्र असेच मानले जाते. नेपोलियन बोनापार्टच्या उदयाबरोबर या देशाचा उल्लेख जगात होऊ लागला. नेपोलियनने रशियावर अनेक स्वाऱ्या केल्या. रशियाने इंग्लंड व इतर देशांच्या साहाय्याने नेपोलियनचा पाडाव केला काळाच्या ओघात एके काळी बलाढ्य असलेले फ्रान्स हे राष्ट्र मागे पडले व रशिया अमेरिकेच्या बरोबरीने तुल्यबल देश ठरला. इतकेच नव्हे तर साऱ्या जगावर त्याचा प्रभाव पडत आहे. पश्चिमेकडे बाल्टिक समुद्र, पूर्वेकडे पॅसिफिक महासागर, दक्षिणेकडे काळासमुद्र व गोबीचे वाळवंट आणि उत्तरेकडे आर्कटिक समुद्र अशी नैसर्गिक रचना असून ६५०० मैल लांब व १५०० मैल रुंद असा देशाचा विस्तार आहे. ८१,४५००० चौरस मैल क्षेत्र देशाचे असून १८२ भिन्नवंशीय, जातीय लोकांची वस्ती आहे. लोकवस्ती सुमारे तेवीस दशकोटी इतकी आहे. अंदाजे १५० निरनिराळ्या भाषा अस्तित्वात आहेत. पण आज रशियन या एकमेव भाषेचा वापर शिक्षण आणि व्यवहार यांसाठी केला जातो. अगदी अलीकडे शंभर टक्के साक्षरता निर्माण करण्यात या देशाने यश मिळविले आहे. अतिशय उष्ण हवामान वगळता सर्व तऱ्हेचे हवामान प्रकार येथे आढळतात. नैसर्गिक संपत्तीही भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. देशाचा युरोपाकडील आणि आशियातील भाग उरल पर्वत आणि उरलनदी यांनी विभागलेला आहे. लोखंड, कोळसा विपुल सापडतो व जगाच्या सुमारे एकतृतीयांश प्रमाणात तेल उपलब्ध होते. जंगलात चांगल्या दर्जाचे लाकूड मिळू शकते.

सामाजिक जीवन

१९१७ साली झालेल्या समग्र क्रांतीपूर्वी रशियातील एकूण जीवन म्हणजे श्रीमंत सत्ताधारी उमराव आणि दारिद्र्यात, अज्ञानात खितपत पडलेल्या जनतेमधील सततचा संघर्ष होता. सर्व जीवन मागासलेले, आर्थिक दुरावस्थेने ग्रासलेले होते. श्रीमंत जमीनदार आणि गरीब शेतकरी यांचे झगडे सुरू होते. शेती हाच मुख्य व्यवसाय होता. दैवी शक्तीला घाबरणारे, श्रम करणारे आणि सत्ताधाऱ्यांच्या जुलमाखाली जगणारे असेच चित्र रूढ होते. उत्पादनक्षमता अत्यंत निकृष्ट दर्जाची होती. गरीब जनतेची पिळवणूक करून श्रीमंत जमीनदार चैनीत राहात होते. अशा परिस्थितीत अत्त्याचार न झाले तरच नवल. धर्मगुरूंचा वरचष्मा सामान्य लोकावर असणे हे स्वाभाविक होते. निसर्ग संपत्तीचा पुरेपूर उपयोग करून घेतला जात नव्हता. दैववाद, अंधश्रद्धा, जुलूम, दारिद्र्य यात सामान्य जनता पिचून गेली होती.

प्रारंभीचे शिक्षण

झारची अनियंत्रित सत्ता व धर्मगुरूंचे वर्चस्व यांच्या दबाबाखाली शिक्षणाचे प्रारंभीचे प्रयत्न झाले. जुन्या परंपरावादी चर्चच्या अधिसत्तेखाली धर्मशिक्षण आणि मामुली व्यापारशिक्षण दिले जाई. ज्याला खऱ्या अर्थाने शिक्षण म्हणता येईल ते श्रीमंत अमीर–उमराव यांच्यापुरते मर्यादित होते. तुरळक ठिकाणी संगीत, संशोधन भाषा यांचा अभ्यास होई पण सर्वत्र झार आणि धर्मसत्ता यांचे कडक नियंत्रण असे. १६८९ ते १७२५ या कालखंडात राज्य करणारा पीटर दी ग्रेट या उदार वृत्तीच्या राजाकडे शिक्षणाची व्याप्ती वाढविण्याचे श्रेय जाते. शिक्षणप्रणालीचा जनक असे पीटर दी ग्रेटला म्हटले जाते. ज्ञानावर त्याची निष्ठा होती. आपल्या राजमुद्रेवर त्याने तो विचार कोरलेला होता. १६३३ मध्ये कीव्ह येथे ॲकॅडमी स्थापन झालेली होती. सुमारे ५० शाळाही स्थापन झालेल्या होत्या. पण त्यात धर्मगुरूंची ३००० मुले शिकत होती. प्राथमिक आणि माध्यमिक शाळाही सुरू होत्या. १७२६ मध्ये स्थापन झालेल्या

रशियन ॲकॅडमी ऑफ् सायन्सेसला काही विद्यापीठे व प्रिपरेटरी शाळा संलग्न केल्या होत्या. १७६२ ते १७९६ या काळात राज्यावर आलेल्या दुसऱ्या कॅथरीन राणीने राष्ट्रीय शिक्षणप्रणाली अमलात आणली. रूसो व व्हॉल्टेअरप्रमाणे स्वतःची मते आणि तत्त्वे तिने प्रसृत केली. जिल्ह्याच्या ठिकाणी दोन वर्षांचा व प्रांताच्या शहर विभागात पाच वर्षांचा अभ्यासक्रम असलेल्या शाळा स्थापन करण्यात आल्या. शिक्षण प्रसारासाठी १७६४ मध्ये वसतिगृहयुक्त शाळा स्थापन करण्यात आल्या. मुलींच्यासाठी स्वतंत्र संस्था होत्या. १८०१ ते १८२५ या काळात राज्य करणाऱ्या पहिल्या ॲलेक्झांडरने प्रथमच शिक्षण मंत्रालय स्थापन केले, १८०२ मध्ये त्याने मोफत शिक्षणाची व्यवस्था केली. १८०४ मध्ये सहा विद्यापीठे व खेडे गावात एक वर्षाचा अभ्यासक्रम असलेल्या शाळा स्थापन करण्यात आल्या. १८२५ ते १८५५ या काळात राज्य करणाऱ्या पहिल्या निकोल्सने शिक्षण प्रसाराचे कामात लक्ष घातले. मुलींच्यासाठी वेगळ्या शाळा व सरदारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खास संस्था स्थापन करण्यात आल्या. फी आकारण्याचा प्रारंभ याच काळात झाला. शिक्षकांचे प्रशिक्षण, तांत्रिक शिक्षण, लष्करी शिक्षण यांसाठी संस्था स्थापन करण्यांत आल्या. राष्ट्राभिमान, प्राचीन परंपरांचे रक्षण आणि एकछत्री राजाची सत्ता या मूलतत्त्वावर शिक्षणाचा विचार केला जात होता. तर्कशास्त्र हा हानिकारक विषय म्हणून विद्यापीठातून त्याला बंदी करण्यात आली. कोणत्याही स्तरावरील शिक्षणात स्वातंत्र्य नव्हते. कडक लष्करी शिस्त सर्वत्र स्वीकारलेली होती.

दुसरा ॲलेक्झांडर राज्यावर आला व शिक्षणक्षेत्रात सुधारणापर्व सुरू झाले. विद्यापीठावरील सर्व नियंत्रणे काढून टाकण्यात आली, अनेक प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या व माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना करण्यात आली. १८६३ साली स्त्रीशिक्षकासाठी प्रशिक्षण देणारी शाळा सुरू झाली. ग्रामीण भागात शिक्षण प्रसार, शाखा शिकण्यावर भर, १८६४ च्या प्राथमिक कायद्यानुसार सर्व थरांतील मुलांना सरकारी शाळात प्रवेश मिळू लागला. वैद्यक महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. १८८१

मध्ये दुसऱ्या अॅलेक्झांडरचा खून झाला व हे सुधारणा युग अचानक संपले.

या तीन–चार वर्षांच्या काळात नियंत्रणामुळे असंतोष निर्माण होऊन तो विद्यार्थ्यांच्या संपाच्या रूपाने १८८४ च्या सुमारास व्यक्त झाला. विद्यार्थ्यांना तुरुंगात घातले गेले. धार्मिक संस्थांच्या धर्तीवर नव्या संस्था संघटित करण्यात आल्या व त्यांना चर्च पॅरॉकिअल शाळा (Church Parochial Schools) असे नाव देण्यात आले. आणि लहान संस्थांना अल्फाबेट स्कूल्स (Alphabet Schools) असे नाव मिळाले. झेमस्टोव्ह (Zemstov) याने अनेक नव्या संस्था काढल्या. इमारती, शिक्षक, अभ्यासक्रम इत्यादी दृष्टीने चांगल्या असूनही त्यांना अनुदान मिळत नसे. फक्त अल्फाबेट शाळांना अनुदान मिळे. चर्चच्या शाळांच्या कार्याला १९०२ नंतर उतरती कळा लागली. १९०५ मध्ये असंतोष भडकला व क्रांतीच्या उठावाने झारचे अधिकार मर्यादित करण्यात आले. पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस इटली, जर्मनी आणि रशियासारख्या देशात हुकूमशाहीचे नवे अवतार सत्तेवर आले. ऑक्टोबर १९१७ त रशियात अॅलेक्झांडर केरेन्स्की याच्या नेतृत्वाने बोलशेव्हिक सत्ता स्थापन झाली. लेनिन आणि ट्रॉट्स्की यांचे मार्गदर्शन या क्रांतीला होते. तेव्हापासून एका पक्षाचे सरकार, कम्युनिस्ट सरकार रशियात सत्तेवर आहे. विविध भागांत पसरलेला प्रदेश, अनेक भाषा, निरक्षरता ह्या अडचणींवर मात करण्यासाठी नव्या सरकारने अनेक उपक्रम हाती घेतले. शब्दकोश, प्रांतांचे एकीकरण, व्याकरण व भाषेची पुस्तके, सर्वत्र प्राथमिक शाळा उघडणे, भाषांतरित पुस्तके, रशियन भाषेचा विकास, असे अनेक सर्वांगीण उपक्रम हाती घेतले गेले. लेनिन आणि मार्क्स यांच्या तत्त्वज्ञानाचा शिक्षणाद्वारे प्रसार हे मुख्य उद्दिष्ट शिक्षण–प्रसारामागे होते. पंचवार्षिक योजना आखून शेती, उद्योगधंदे, कारखाने यांच्याद्वारे सर्वांगीण प्रगतीचे प्रयत्न सुरू झाले.

शिक्षण मंत्रालय व धार्मिक गुरू यांच्या नियंत्रणाखाली शिक्षण पूर्वी होते. सर्व देशाचे पंधरा शैक्षणिक विभाग पाडलेले होते व प्रत्येक विभागाला क्युरेटर हा अधिकारी तेथील शिक्षणाची व्यवस्था पाहात असे.

स्कूलकौन्सील जिल्ह्याच्या तपासनीस यांना माध्यमिक शिक्षणाचे प्रशासनात साहाय्य करीत असे. शिक्षकांच्या नेमणुका, अभ्यासक्रम इ. सारा कारभार प्राथमिक कक्षेपासून तो विद्यापीठापर्यंत क्युरेटर पहात असे. चर्चच्या नियंत्रणाखाली त्यांच्या शाळा होत्या.

नवी सत्ता

कम्युनिस्ट पक्षाने सत्ता हाती येताच शिक्षणाच्या क्षेत्रावर नियंत्रण ठेवण्यास प्रारंभ केला. झेमस्टोव्ह आणि म्युनिसिपल बोर्ड यांच्यातर्फे चालविण्यात येणाऱ्या शाळांनीही आपल्या शाळावर व विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रणे आणली. ज्या अनेक बोलीतून निरनिराळ्या प्रदेशात शिक्षण दिले जाई ते बंद होऊन रशियन ही बोधभाषा सर्वत्र वापरण्यात येऊ लागली. पोलंड आणि लिथ्यूआनियासारख्या प्रदेशाची परंपरा, रीतिरिवाज, भाषा इ. अनेक गोष्टी वेगळ्या होत्या. तेथेही मुलांना रशियन शाळात घालण सक्तीचे करण्यात आले. विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या संप चळवळीमुळे अस्वस्थता होती. काही काळ विद्यापीठे बंद करण्यात आली व मग त्यांच्यावर ही नियंत्रणे बसविली गेली. चार वर्षांचा प्राथमिक शाळांचा अभ्यासक्रम सर्वत्र करण्यात येऊन सक्तीच्या शिक्षणाची योजना अमलात आली. क्रांती होण्यापर्यंतच्या काळात सुमारे अडीच लक्ष प्राथमिक शाळा, तीन हजार माध्यमिक शाळा व शंभर विद्यापीठे काम करीत होती. १९१७ ते १९२१ चा काळ अंतर्गत यादवी युद्धामुळे अशांततेत गेला. १९१८ पासून धार्मिक शिक्षण देण्याचे बंद करण्यात आले व सर्व शाळा डिपार्टमेंट ऑफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन खाली काम करू लागल्या. क्युरेटर, डायरेक्टर ऑफ् प्रायमरी एज्युकेशन, प्रायमरी एज्युकेशन कौन्सील इ. सर्व पदे रद्द करण्यात आली. १९१८ च्या कायद्यानुसार ८ ते १३ वयोमानासाठी ५ वर्षांचा प्रारंभीचा अभ्यासक्रम व १३ ते १७ वयोमानासाठी ४ वर्षांचा अभ्यासक्रम असे सुरू करण्यात आले. ८ ते १७ वयोमर्यादपर्यंत शिक्षण सक्तीचे करण्यात येऊन माध्यमिक शिक्षण मोफत करण्यात आले. बाल-गृहे (Children's Homes) स्थापन करण्यात आली. कारण मुलांच्यावर कौटुंबिक संस्कारापेक्षा वेगळे संस्कार करायचे होते. विद्यार्थी, शिक्षक आणि नवे

स्कूल कौन्सील मिळून शाळेचा कारभार पाहू लागले. प्रत्येक शाळेला नव्या तंत्राने काम कसे करावे हे विद्यार्थ्यांना कळावे म्हणून तांत्रिक वर्ग (Polytechnic) जोडण्यात आले. १९२१ ते १९२७ हा कालखंड अनेक दृष्टीने नवे बदल घडवून आणणारा ठरला. एकूण शिक्षणाच्या कामाबद्दल संतोष नव्हता. वेगवेगळे विषय प्राथमिक शाळेत शिकविण्याचे बंद करण्यात आले व व्यवसाय शिक्षण (Vocational Education) सर्वत्र मूलभूत मानून शिक्षण देण्यात येऊ लागले. उच्च शिक्षणाची पुनर्रचना करण्यात आली- स्टेट सायंटिफिक कौन्सीलने तयार केलेला अभ्यासक्रम रावविण्यात येऊ लागला. मध्यवर्ती आणि राज्य सरकारे शिक्षणाचा सर्व खर्च करू लागली. ४ वर्षांचा प्राथमिक आणि ७ ते ९ वर्षांचा माध्यमिक अभ्यासक्रम सर्वत्र समान असा रावविला जाऊ लागला. क्रांतीचा इतिहास व कम्मुनिझमची तत्त्वे सर्वांना शिकविण्यात येऊ लागली. वाचण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पुस्तकातील विषयांचे मजूर, समाज आणि निसर्ग असे तीन विभाग मानून अध्ययन सुरू झाले. इमारतींच्या अभावामुळे पाळी पद्धतीने शाळा भरू लागल्या. सामान्य जनतेची मुले मोठ्या संख्येनें शाळेत येऊ लागली. स्टालीनने १९२८ ते १९३३ या पहिल्या पंचवार्षिक योजनेत ८ वर्षांवरील ग्रामीण भागातील मुलांसाठी ४ वर्षांचा सक्तीचा अभ्यासक्रम व याच वयोमानाचे पण औद्योगिक शहरात राहाणाऱ्या साठी ७ वर्षांचा अभ्यासक्रम सक्तीचा करण्यात आला. गरीब विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व सोयी देण्यात आल्या. हुषार मुलांना उच्च शिक्षण घेता यावे म्हणून एक स्पर्धा परीक्षा घेण्यात येऊ लागली. शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी नव्या संस्था निघाल्या.

या काळात माध्यमिक शाळांचे रूपांतर व्यावसायिक शाळात केले गेले. पण काही वर्षांतच हे धोरण उपयुक्त नाही असा अनुभव आल्याने पुनः माध्यमिक शाळा नेहमीचे विषय शिकवू लागल्या. नवी पाठ्यपुस्तके, शिक्षकांना नवी वेतनश्रेणी व दर्जा, विषयांची पुनर्रचना इ. गोष्टी घडल्या हे होईपर्यंत दुसरे महायुद्ध भडकले. अनेक विद्यार्थी आणि शिक्षक यांना युद्धकार्यात भाग घ्यावा लागला. तरी शिक्षणाचे कार्य मंदावले नाही.

विद्यापीठातील संशोधन कार्य, परीक्षा, पारितोषिके, सक्तीचे शिक्षण, खेळ इ. सर्व नित्य गोष्टी चालू होत्या. मास्को, लेनिनग्राड आणि रोस्टोव्ह या विद्यापीठांतून नव्या सुधारणा आणि योजना हाती घेण्यात आल्या. १९४६ ते १९५० या पंचवार्षिक योजनेच्या काळात अनेक नवे प्रश्न निर्माण झालेले होते. शास्त्रीय आणि तांत्रिक शिक्षण देणाऱ्या खास संस्था, लोकांचे पुनर्वसन, उत्पादनवाढ या राष्ट्रीय कामासाठी दीड लक्ष माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेले आणि सात लक्ष तांत्रिक शिक्षण घेतलेले तज्ज्ञ देशाच्या सर्व भागांत धाडण्यात आले. शिक्षणावरील खर्च वाढविण्यात आला. पाचव्या पंचवार्षिक योजनेत १९५१ ते १९५५ या काळात संशोधन करणाऱ्यांच्या संख्येत व उच्च शिक्षणाशी निगडीत असलेल्या शिक्षकांच्या संख्येत शंभर टक्के वाढ होईल असा अंदाज करून कार्यक्रम आखण्यात आला. माध्यमिक शिक्षणाचा प्रसार सर्व लहान मोठ्या शहरांतून होईल अशी अपेक्षा होती. त्यासाठी लागणाऱ्या प्रशिक्षित शिक्षकांची संख्याही वाढणार होती. याच, वेळी अर्धवेळ शिक्षण योजना, पत्रव्यवहाराद्वारे शिक्षण, तांत्रिक शिक्षण प्रौढशिक्षण योजना इ. अनेक उपक्रम योजनेत अंतर्भूत होते.

कम्युनिस्ट शिक्षणाचा गाभा

कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा प्रसार शिक्षणाद्वारे रशियात केला जातो. शिक्षणाच्या सर्व स्तरांतील प्रत्येक उपक्रमाचा या दृष्टीने उपयोग करून घेतला जातो. वर्गविरहित समाज आणि राष्ट्र निर्माण करण्याचा जिद्दीचा प्रयत्न या राष्ट्रात सुरू आहे. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य या देशात नाही. लोकशाहीच्या या दोन प्राणभूत तत्त्वासाठी अनेक कलावंत लेखक, विचारवंत, नेते यांनी रशियात आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव जगात सर्वत्र विशेषतः मागासलेला. अविकसित दरिद्री देशात पाडण्यासाठी सतत प्रयत्न केले जातात. एका बाजूला अमेरिका आणि दुसऱ्या बाजूला रशिया अशी सत्तेसाठी रस्सीखेच सुरू आहे. श्रमाचा अनुभव आणि श्रमशक्तीचा सामाजिक आणि राष्ट्रीय विकासासाठी उपयोग व्हावा असे प्रयत्न सर्व स्तरावरील शिक्षणात केले

जातात. १) राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षण मिळण्याच्या भरपूर सोयी उपलब्ध करणे २) धर्मातीत, सार्वत्रिक, मोफत सक्तीचे शिक्षण. आणि ३) यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची निर्मिती. ही तीन सूत्रे क्रांतीनंतरच्या नव्या लोकसत्तेने स्वीकारली. शिक्षण हे राजकीय सत्तेचे नैसर्गिक अंग म्हणून विकसित केले जाते. सहाजिकच संघटन, व्यवस्थापन, अभ्यास क्रम, पाठ्यपुस्तके, पद्धती इ. सर्व तपशीलावर कडक नियंत्रण ठेवले जाते. प्रत्येक व्यक्तीच्या सर्व मानसिक आणि शारीरिक शक्ती राष्ट्राच्या विकासासाठी राबवून घेतल्या जातात. मोफत सर्व शिक्षण हा व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क मानलेला आहे. अनेक वेळा शिक्षणाच्या स्वरूपावद्दल विचारमंथन होऊन बदल करण्यात आला. पण लोकसत्ताक, धर्मातीत, समाजवादी, वर्गविरहित सामाजिक, राजकीय जीवनाची निर्मिती हे उद्दिष्ट ध्रुवतारा मानून सुधारणा करण्यात आली. शिक्षणाची अंतिम उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील. १) सभोवतालच्या नैसर्गिक परिस्थितीचा सखोल अभ्यास. २) जडवादी (Materialistic) दृष्टिकोनाचा विकास. धर्म, अध्यात्म, मुक्ती इ. गोष्टींना फाटा. ३) चारित्र्य, संगोपनावर भर. ४) सामाजिक जीवन, संस्था, राष्ट्र रचना, अर्थव्यवस्था इ. सर्वांची दाट ओळख. ५) सर्व प्रकारच्या श्रमासाठी व्यक्तीला तयार करणे. व त्यायोगे सामाजिक समता स्थापन करणे. ६) संपूर्ण समांजासाठी कार्य करत रहाण्याची व्यापक वृत्ती रुजविणे. ७) शास्त्रीय दृष्टिकोन स्वीकारून प्रत्येक घटनेची मीमांसा करण्याची शवती अंगी बाणविणे. ८) सर्व प्रकारच्या उत्पादन प्रक्रियेशी परिचय व अर्थविषयक घडामोडींचे ज्ञान करून देणं.

सर्व थरांतील विद्यार्थ्यांना समाजातील सर्व प्रकारच्या घडामोडींशी निगडीत ठेवण्याचे सूत्र अनेक दृष्टीने स्वीकारणीय आहे.

० ० ०

२. शैक्षणिक प्रशासन

राष्ट्रीय पक्षाची भूमिका

सोव्हिएट संघराज्यात १५ गणराज्ये (Republics) असून, संघराज्याचे मध्यवर्ती सरकार आणि गणराज्यांचो सरकारे मिळून कारभार चालविला जातो. युक्रेन प्रांतात फक्त उच्च शिक्षणासाठी मंत्रालय आहे. इतर गणराज्यात नाही. सर्व विद्यापीठे आणि तंत्रविज्ञानाची महाविद्यालये मध्यवर्ती शासनाखाली काम करतात. ॲकॅडमी ऑफ सायन्सेस ही फार महत्त्वाची संस्था मंत्र्यांच्या नियंत्रणाखाली काम करते. संघराज्यांचे स्वतंत्र सांस्कृतिक मंत्रालय असून त्याद्वारे वाङमय आणि कला यांच्या विकासाचे प्रयत्न केले जातात. प्रत्येक गणराज्याला स्वतंत्र शिक्षण मंत्रालय असले तरी सर्व धोरणे, अभ्यासक्रम व तात्विक दृष्टिकोन या-संबंधीचे अखेरचे निर्णय केंद्रीय शासन घेते. कॉम्युनिस्ट पार्टीची मध्यवर्ती समिती सर्व निर्णय घेते. राष्ट्राच्या गरजा शोधून त्यानुसार शिक्षणाची उद्दिष्टे ठरवून ती कठोर परिश्रमाच्या द्वारा पार पाडली जातात.

विकेंद्रीकरण

शिक्षण विषयक ध्येय–धोरणे, उद्दिष्टे आणि कार्यक्रम यांची आखणी मध्यवर्ती सत्ता करीत असली तरी वैयक्तिक बुद्धिमत्तेच्या विकासाला भरपूर वाव सर्व क्षेत्रांत ठेवला जातो. त्यामुळे कोणतीही व्यक्ती आपल्या बुद्धिमत्तेने आवडत्या क्षेत्रात उच्च दर्जाचे प्राविण्य मिळवू शकते. समाज परिवर्तनाची आणि राष्ट्रीय सामर्थ्य वाढविण्याची शक्ती शिक्षणात असल्याने, शिक्षणाला असामान्य महत्त्व रशियात दिले जाते. शिक्षण मंत्रा-लयाच्या जोडीने इतर मंत्रालयेदेखील, संरक्षण, शेती, औद्योगिक विकास, संस्कृतिवर्धन इत्यादी मंत्रालये संबंधित बाबींच्या शिक्षणासाठी खर्च करतात. ६० ते ७० टक्के इतका प्रचंड खर्च शिक्षणावर होत असल्याने शिक्षण बव्हंशी मोफत आहे. सहाजीकच शैक्षणिक नियोजनाला असाधारण महत्त्व दिले जाते. नियोजन विभागात शिक्षण आणि संस्कृती यासाठी

स्वतंत्र खाते असून त्यामार्फत योजना आखल्या जातात. 'गॉसप्लॅन' (Gosplan) या नावाची स्वतंत्र संघटना, आपल्याकडील नियोजन मंडळासारखी (Planning Commission) आहे. पंचवार्षिक शिक्षण योजना ही संघटना आखते. या मंडळाच्या सर्व पातळीवर शाखा असून, गणराज्याच्या प्रशासनाच्या साहाय्याने त्या योजनाची अंमलबजावणी करतात. त्याच्या जोडीने स्थानिक घटक असून निरनिराळ्या व्यक्ती योजना राबविण्यास साहाय्य करतात. प्रत्येक गणराज्य स्वतंत्र राज्य आहे. अशा रीतीने योजना अंमलबजावणी विकेंद्रित पद्धतीने राबविली जात असल्याने सर्व पातळ्यांवर सर्वांचा सहभाग नियोजनात असतो. प्रत्येक शिक्षक, शिक्षकसंघटना, प्रौढ विद्यार्थी, पालक नियोजनाच्या व्यापक प्रक्रियेशी निगडित राहातात.

सर्वसामान्य प्रशासन

उच्च शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी आणि प्रशासन केंद्र म्हणजे मध्यवर्ती शासन याकडे आहे. युनियन मिनिस्ट्री फॉर हायर एज्युकेशन असे स्वतंत्र मंत्रालय आहे. सर्व विद्यापीठे, तंत्र विज्ञान संस्था आणि उच्च शिक्षण-विषयक काम करणाऱ्या संस्था मध्यवर्ती मंत्रालयाच्या मार्गदर्शनाने काम करतात. खास मंत्री हे काम पाहातो. एक खास संस्कृती मंत्रालय, कौन्सील फॉर एस्थेटिक एज्युकेशन, कौन्सील फॉर फिजिकल एज्युकेशन, तांत्रिक व औद्योगिक शिक्षणाची व्यवस्था पाहणारी यंत्रणा अशी स्वतंत्र खाती वाङ्मय, कला, शारीरिक शिक्षण, तांत्रिक शिक्षण यांची अनुक्रमे व्यवस्था पाहातात. प्रत्येक गणराज्यात प्रमुख उच्च शिक्षण मंत्रालयाच्या निर्देशाखाली काम करतो.

माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था गणराज्ये पाहातात. गणराज्यातील शिक्षण मंत्रालय पूर्व-प्राथमिक, प्राथमिक, प्रौढ व समाज शिक्षण यांची व्यवस्था पाहातात. कामगार मुलांच्या शाळा, बालगृहे, अभ्यासानुवर्ती कार्यक्रम, पाठ्यपुस्तके, शिक्षकांचे प्रशिक्षण, पूरक वाचनमाला, इ. कडे लक्ष पुरविले जाते. नियोजन, इमारती, प्रयोगशाळा, शैक्षणिक वाङ्मय, इ.

साठी स्वतंत्र खाती असतात व ही खाती सर्व आपापली जबाबदारी संभाळतात, उपमंत्री आपापल्या खात्याचा कारभार पाहातात.

गणराज्यातील (Republic) शिक्षण खाते

प्रत्येक गणराज्य जिल्हावार विभागलेले असते. प्रत्येक जिल्ह्याचे उपविभाग पाडलेले असतात. उपविभाग हा प्रशासनातील सर्वांत लहान घटक. रशिया हा बहुभाषिक देश असल्याने भाषिक विभाग आणि भाषिक घटक (linguistic Regions and units) निर्माण केलेले आहेत. हे प्रशासनाच्या सोयीसाठी निर्माण केलेले आहेत. लहान मोठ्या आकाराप्रमाणे व स्थानिक भाषेच्या व्याप्तीप्रमाणे, रशियन भाषेसाठी व स्थानिक भाषेसाठी किती वेळ शिक्षणात द्यायचा हे ठरविले जाते. त्यामुळे भाषिक वाद निर्माण होत नाहीत व स्थानिक भाषेच्या विकासाला वाव मिळतो. एकूण देशाच्या नियोजनाशी सुसंगत असे धोरण शिक्षणमंत्री आखून अमलात आणतो. प्रत्येक जिल्ह्याचे प्रशासन जिल्हा मंडळ (District Council) पहाते. शिक्षण मंत्रालय पाठ्यपुस्तके, पूरक वाचन माला, अभ्यासक्रम तयार करते.

कर आणि उद्योगधंद्याचे उत्पन्नातून शिक्षणावरील खर्च भागविला जातो. मागे नमूद केल्याप्रमाणे इतर मंत्रालयातील खातीही शिक्षणासाठी पैसा देतात. गरजेप्रमाणे संस्थांना अनुदान दिले जाते. संस्थाचा मुख्य खर्चाच्या बाबतीत स्वतंत्र असतो. संस्था देणग्या जमा करू शकतात. उत्पन्न आणि खर्च यांच्या जमाखर्चावर कडक नियंत्रण ठेवले जाते. योग्य अधिकारी तपासणी करून मार्गदर्शन करतात. मुख्य संस्था संचालक शिक्षक नेमतो व त्यांच्या कामाचे वाटप करतो. खासगी शिक्षण संस्था या देशात नाहीत. शिक्षणाचे संपूर्ण राष्ट्रीयकरण केले गेलेले आहे. रशियन क्रांतीपूर्वी झारची सत्ता हे काम करीत असे. क्रांतीनंतर वेगवेगळी राज्ये बारा - तेरा वर्षे आपापला शिक्षणविषयक कारभार पहात असत. १९३० मध्ये राज्यांचे एका संघात रूपांतर झाल्यावर सर्व शिक्षण विषयक कारभार केंद्रीय झाला. या बाबतीतले धोरण आणि उद्दिष्टे ठरविण्याचे अखेरचे अधिकार पक्षाचे, कॉम्युनिस्ट पार्टीचे आहेत. १९३६ मध्ये तयार केलेल्या

घटनेनुसार हे अधिकार मध्यवर्ती शासनाने स्वत:कडे घेतले. त्यानुसार पुढील उद्दिष्टे प्रशासनाने निश्चित केली.

प्रशासन उद्दिष्टे

(१) सर्व राज्यांत सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत. सर्व विद्यार्थ्यांना उत्कर्षाची समान संधी. (२) ७ ते १५ वयोमान कालावधीचे सक्तीचे शिक्षण. (३) धर्मातीत वृत्तीचे संगोपन. (४) माध्यमिक आणि उच्च शिक्षण क्षेत्रात मुले आणि मुली यांना समान सोयी आणि संधी (५) प्राथमिक शिक्षण स्थानिक भाषेतून मिळण्याची सोय. (६) खासगी संस्थांना स्थान नाही.

नियोजन आणि त्याची प्रशासनविषयक अंमलबजावणी एका सूत्रात या पद्धतीने केली जाते.

० ० ०

३. पूर्व–प्राथमिक आणि प्राथमिक शिक्षण

क्रांतीनंतर

रशियन नेत्यांनी क्रांतीनंतर शिक्षणाच्या पुनर्रचनेस प्रारंभ केला. वयाच्या तिसऱ्या वर्षापासून सातव्या वर्षापर्यंत पूर्व प्राथमिक, सात ते दहा प्राथमिक आणि दहा ते सोळा किंवा सतरा वयापर्यंत कनिष्ठ आणि उच्च अशा दोन पातळ्यांत विभागलेले माध्यमिक शिक्षण हा स्थूल आराखडा ठरविण्यात आला. या देशातील पूर्व–प्राथमिक शिक्षण हे जगात इतरत्र चाललेल्या माँटेसरी किंवा फ्रोबेल यांचा पद्धतीवर आधारलेले नाही असे म्हटले जाते. कारण माँटेसरी व फ्रोबेल पद्धतीने फक्त पंचेंद्रियावर फार भर दिला जातो व ते खरे शिक्षण नाही असे म्हटले जाते. देशाची प्रगती व आर्थिक उन्नती होईपर्यंत स्त्रियांना कामासाठी बाहेर पडावे लागणार म्हणून मुलांची काळजी घेणे हे या पातळीवरचे मुख्य कार्य होय. पूर्व–

प्राथमिक कक्षेची जबाबदारी आरोग्य मंत्रालयाकडे सोपविण्यात आली आहे. महत्त्वाच्या औद्योगिक क्षेत्रातही पूर्व–प्राथमिक शाळा स्थापन करण्यात आल्या. या शाळांची जबाबदारी संबंधित मंत्रालयाकडे (उदाहरणार्थ उद्योग, मजूर, इ.) सोपविण्यात आली. या शाळावरचा खर्च उद्योगधंदे, काही प्रमाणात पालक आणि मध्यवर्ती किंवा राज्य शासन चालविते.

शिशुशाळा (Nursary)

कोणत्याही मुलाला अगदी लहानपणापासून एखाद्या विशिष्ट विचारसरणीत वाढवायचे असेल तर सभोवताली विशिष्ट वातावरण हवे. या दृष्टीने शिशुशाळेपासून दक्षता घेतली जाते. या वातावरणाला फार महत्त्व या ठिकाणी दिले जाते. मूल चारपाच महिन्यांचे झाल्यापासून आरोग्य निरीक्षकाच्या मार्गदर्शनाखाली त्याला योग्य असे व्यायाम दिले जातात. त्यांच्या सवयी आणि वृत्ती यांना विशिष्ट वळण दिले जाते. तज्ज्ञ डॉक्टरांचे साहाय्य या कामी घेतले जाते. मुलाच्या आरोग्याला सर्व प्रथम महत्त्व व त्यासाठी सर्व प्रकारची साधने, उपचार उपलब्ध करून देण्यात येतात. आरोग्य निरीक्षक (Health Visitor) सर्व कार्यक्रम आखून पार पाडतो. प्रत्येक शाळेला तो स्वतंत्रपणे निगडित केलेला असतो. वयानुरूप परिश्रम, सहकार्य आणि शरीर सामर्थ्यात वाढ करणे या गोष्टी या कार्यक्रमात असतात. अनेकांनी मिळून खेळायची साधने असतात. घरगुती वातावरण निर्माण केले जाते व मुलांच्या मातांना त्याचे शिक्षण देण्यात येते. या शाळात दूध–वाटप केंद्रेही असतात. या शाळेतील शिक्षक अधूनमधून मुलांच्या घरी जातात व मोठ्या माणसांना मार्गदर्शन करतात. निरनिराळ्या विभागात शिशुशाळा स्थापन करण्यास उत्तेजन दिले जाते. ही लहान मुलेच राष्ट्राचे खरे भावी आधारस्तंभ आहेत. या जाणिवेने वर्गविहीन, धर्मातीत, राष्ट्रनिष्ठ अशा वृत्ती अंगी बाणविण्यात येतात. सर्व तऱ्हेच्या कला, मनोरंजन, खेळ, यांनी वातावरण समृद्ध केले जाते. सर्व थरांतील मुलांना सारखेच वाढविले जाते. मुलांचे योग्य संगोपन हे राष्ट्रकार्य मानून सर्व योजना राबविल्या जातात.

बालक–मंदिरे (Kindergartens)

या शाळा थोडचा विकसित झालेल्या मुलांच्यासाठी आहेत. कामगार स्त्री–पुरुषांच्या कामाच्या वेळाप्रमाणे शाळांची वेळ ठरविली जाते.पिकांच्या खास हंगामांच्या वेळात ग्रामीण विभागात उन्हाळचात अशा शाळा मुद्दाम भरविल्या जातात. विविध उद्योगधंदे, व्यवसाय, सामुदायिक शेती केंद्रे या शाळांचा खर्च भागवितात. ज्यांना शक्य आहे असे पालक वर्गणीच्या रूपाने खर्चात सहभागी होतात. कुटुंबाचे उत्पन्न आणि मुलांची संख्या यावर वर्गणीचा आकार ठरतो. या शाळांतील शिक्षक मुलांच्या घरी व शिशुशाळात जाऊन प्रवेशासाठी कशी तयारी करवून ध्यावी याचे मार्गदर्शन करतात. साधारण आठवडाभर शिशुशाळांचे शिक्षक बालक मंदिरात मुलांच्याबरोबर येतात व त्यांना नव्या वातावरणात रुळवतात. नृत्य, संगीत, व्यायाम, खेळ, यांच्याद्वारे सहकारीवृत्ती, बंधुभाव, श्रमाची तयारी यांचे संगोपन केले जाते.

शेती केंद्रे, उद्योग केंद्रे, बागा इतर रमणीय स्थळे यांच्या भेटीसाठी सहली नेण्यात येतात. जे पाहिले, अनुभवले, त्याचे वर्णन करवून घेतले जाते. थोर लेखक, कलावंत शाळांत बोलावून त्यांच्याकडून कथा-कथन, गायन–वादन–करून मुलांच्या वृत्ती फुलविल्या जातात. प्रत्यक्ष विषय शिकविण्यावर भर दिला जात नाही. अक्षर ओळख, सोपे गणित, वाचन अगदी सहजगत्या शिकविले जाते. खास प्रशिक्षण घेतलेले शिक्षक नेमले जातात व त्यांना कामाचा फार मोठा बोजा दिला जात नाही. प्रत्येक मुलाकडे वैयक्तिक लक्ष पुरविणे हे शिक्षकांचे महत्त्वाचे काम असते. देशाच्या सर्वांगीण विकासाशी निगडित अशी ही पूर्व–प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था असल्याने तिला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. सर्व-साधारणपणे पंचवीस मुलांमागे एक शिक्षक असतो. मॉंटेसरी, फ्रोबेल यांच्या पद्धतीवर भर न देता, व्यक्ती आणि समाज यांचे नाते उत्तम आरोग्य आणि सवयी यांच्या बळावर निर्माण करणे व त्यासाठी आधुनिक मानसशास्त्रीय पद्धतीचा वापर करणे यावर सारा भर दिला जातो.

पूर्व–प्राथमिक शिक्षणाचा इतका प्रभावी उपयोग व तोही इतक्या यशस्वी रीतीने केलेला जगात क्वचितच आढळून येतो.

प्राथमिक शिक्षण

शिक्षण हा विकासाचा पाया मानल्यावर सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार हे सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट मानले गेले. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून याकडे सर्व लक्ष केंद्रित केल्यामुळे सुमारे पन्नास ते साठ वर्षांच्या अवधीत आज सारा देश संपूर्ण साक्षर झाल्याचे दिसून येत आहे. पहिल्या योजनेपासून सर्व शाळांच्या इमारती, शैक्षणिक साधने सर्वासाठी खुली करण्यात आली आणि चार इयत्तांच्या शाळा सुरू करण्यात आल्या. ८ ते १० वर्षांच्या मुलांच्यासाठी प्रथम ही योजना राबविण्यात आली. पुढे ७ त १२ असा कालखंड ठरविण्यात आला. क्रांतीनंतरच्या उद्दिष्टात सार्वत्रिक शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले व शिक्षण मंत्रालयावर त्याची जबाबदारी टाकण्यात आली. या राष्ट्रव्यापी प्रयत्नात अडथळा आला तो दुसऱ्या महायुद्धामुळे. सर्व शिक्षक, कामगार, प्रौढ विद्यार्थी युद्धकार्यात गुंतले. याचा परिणाम होणे अपरिहार्य होते. एक धोरण असे आखले होते होते की प्राथमिक शाळेचा शिकविण्याचा तास अर्ध्या तासापेक्षा मोठा नसावा आणि वैयक्तिक लक्ष देण्यावर भर न देता शिक्षण विस्ताराने अधिकाधिक विद्यार्थ्यांना देण्यात यावे. एकाच वर्गात, एकाच शिक्षकाच्या हाताखाली, चार वर्गाचे विद्यार्थी, अशा एक शिक्षकी शाळा निघाल्या. भटक्या जमातीसाठी तंबूतून अशा शाळा सुरू करण्यात आल्या.

शिस्तीला प्राधान्य

व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या सुसूत्र विकासासाठी शिस्तीला शिक्षण शाखाज्ञानी सर्वोच्च महत्त्व दिले. त्यासाठी १९४३ मध्ये विद्यार्थ्यांच्या एकंदर वागणुकीसाठी २० नियम तयार करण्यात येऊन त्यांचे काटेकोर पालन करण्यात आले. वर्गात या आचार संहितेवर चर्चा होऊ लागल्या व मुलांना नियमांचा गाढ परिचय करून देण्यात आला.

२७२९
दा. क्र. २२५७७
जिवंत

अभ्यासक्रम

प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट असे योजिले गेले की केवळ शब्द संपत्ती, अमूर्त ज्ञान यांवर भर न देता व्यावहारिक जगातील गोष्टींवर भर देण्यात आला. त्याच्या अनुरोधाने विषय आणि त्याचा आशय निश्चित करण्यात आले. सर्व विषय आवश्यक म्हणून ठेवण्यात आले. सर्व राज्यांतील शिक्षणमंत्र्यांनी एकत्र बसून अभ्यासक्रम ठरविल्याने सर्वत्र सूसूत्रता आली. भाषा, इतिहास, भूगोल, गणित, निसर्गशास्त्र, संगीत शारीरिक शिक्षण असे विषय निवडण्यात आले. देशाच्या आर्थिक परिस्थितीची ओळख करून देण्यावर भर देण्यात आला. शिक्षण मंत्रालयाने तयार केलेल्या पाठ्य–पुस्तकांची भाषांतरे स्थानिक भाषांतून उपलब्ध करून देण्यात आली. मुलांची आवड, गरजा आणि उपयुक्तता सतत तपासून ही पुस्तके तयार करण्यात येतात. शिक्षक स्थानिक माहिती, अडचणी, समस्या, गरजा यांची नोंद करतात व ती शिक्षण मंत्रालयाकडे पुस्तकात अंतर्भूत करण्यासाठी धाडतात. बहुधा एकच शिक्षक सर्व विषय शिकवितात. पुष्कळ ठिकाणी मधल्या वेळचे खाणे पुरविले जाते. आठवड्याचे सहा दिवस शाळेचे काम चालते. मोठ्या शहरात शाळांना उपहारगृहे जोडली आहेत.

परीक्षा पद्धती

प्राथमिक स्तरावर तोंडी परीक्षेला फार महत्त्व देण्यात येते. प्रत्येक शाळेत एक परीक्षा समिती असते व त्यात मुख्याध्यापक व त्याचे दोन सहकारी असतात. विभागीय शाळा तपासनीस या कामात मदत करतो. चौथी इयत्तेच्या परीक्षेला फार महत्त्व असते. कारण या परीक्षेतील यशावर त्याचे पुढचे माध्यमिक शिक्षण अवलंबून असते. शिक्षण मंत्रालय परीक्षेत काय विचारावे याच्या पत्रिका तयार करून सर्वत्र धाडतात. आवश्यकतेनुसार शिक्षक त्यात फरक करतात. प्रश्नाचे उत्तर विशिष्ट पद्धतीनेच का दिले हे सांगण्यास मुलांना उत्तेजन दिले जाते. परीक्षा उपयुक्त कशी होईल याची फार दक्षता घेतली जाते.

सातव्या वर्षी सक्तीचे शिक्षण सुरू होते. सकाळी ९ ते १ लहान मुलांना

व ९ ते २–३० पर्यंत तिसरी आणि चौथीला शाळा असते. पहिल्या दोन वर्गांना आठवड्याचे २४ व तिसरी–चौथीला २५ आणि २७ पाठ असतात. गृहपाठ करण्याची सवय आरंभापासून लावण्यात येते. त्याचा अवधी वयानुसार व इयत्तानुसार वाढता ठेवला जातो. शैक्षणिक सहलींना अभ्यासात फार महत्त्व आहे.

० ० ०

४. माध्यमिक शिक्षण

१० वर्ष-मुदत-शाळा

पहिल्या पंचवार्षिक योजनेत रशियात एक नवीन व्यवस्था स्वीकारली गेली. या योजनेनुसार ७ ते १७ वयाच्या मुलांचे शिक्षण एकाच इमारतीत करण्याचा प्रयत्न केला गेला. या व्यवस्थेचा मुख्य हेतू प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावरील संस्थांचे एकीकरण हा होता. पुढे दुसऱ्या महायुद्धानंतर या योजनेत बदल होऊन ती तीन विभागांत विभागली गेली. पहिली चार वर्षे प्राथमिक, पुढील तीन वर्षे (५, ६ व ७) कनिष्ठ माध्यमिक, आणि अखेरची तीन वर्षे (८, ९ व १०) माध्यमिक अशी विभागणी केली गेली. या रचनेतून ७ वर्षांच्या (पहिली ते सातवी) आणि ६ वर्षांच्या (पाचवी ते दहावी) अशा शाळा निर्माण झाल्या. ज्या ठिकाणी ७ वर्षांच्या शाळा आहेत तेथेच सोयीप्रमाणे ३ वर्षांच्या माध्यमिक शाळा (८वी ते १०वी) उघडण्यात आल्या आहेत. कनिष्ठ माध्यमिक शाळेत (५वी ते ७वी) १२ ते १४ वयोगटातील मुले आणि माध्यमिक शाळेत (८वी ते १०वी) १५ ते १७ किंवा १८ वयोगटाची मुले जातात, शहरी विभागात दहा वर्षांच्या शाळा काढण्यावर भर दिला जातो. माध्यमिक शिक्षणाच्या सुरुवातीस मुला–मुलींच्या सहशिक्षणावर भर होता. स्त्रियांना समानतेने वागविण्याची अपूर्वाई सांगितली जाई. पण पुढे १९४३ मध्ये प्रथम मोठ्या शहरात मुला-मुलींसाठी वेगवेगळ्या शाळा स्थापन करण्यात आल्या. खालच्या वर्गातही

असे विभाजन करण्यात आले. मग ग्रामीण विभागात व्यावसायिक माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा यातही हीच प्रथा स्वीकारण्यात आली. आता निवडक ठिकाणी सहशिक्षण देण्यात येते. रशियातील शासनाच्या दृष्टीने स्त्रियांना स्वतंत्र सामाजिक दर्जा प्राप्त झाल्याने त्यांची शिक्षणाची वेगळी व्यवस्था करण्यात आली. सहशिक्षणाचे तत्त्व सोडलेले नाही. माध्यमिक पातळीवर सहशिक्षण देण्यात यावे असा कल सर्वत्र दिसू लागला आहे.

अवधी

घटनेप्रमाणे शहर भागात सहा दिवसांचा आठवडा व शेवटल्या दिवशी सुट्टी तर ग्रामीण विभागात सात दिवसांचा आठवडा असतो. शालेय वर्ष १ सप्टेंबरला सुरू होऊन जून मध्ये संपते. परंतु प्रत्येक वर्गाचे वर्ष वेगवेगळ्या वेळी संपते. हिवाळा आणि उन्हाळ्याच्या मोठ्या सुट्ट्या असतात. पण त्यांचा कालावधी ऋतुमानाच्या तीव्रतेप्रमाणे बदलतो. ५ वी ला आठवड्याचे तास २६ आणि ६ वी ते १० ला २७ तास असतात. ग्रामीण भागात हेच प्रमाण अनुक्रमे ३१ आणि ३२ असते. सकाळी ८·३० किंवा ९ ला शाळा सुरू होते आणि दुपारी संपते. प्रत्येक तास ४५ मिनिटांचा असतो. इ. ५, ६ व ७ हे वर्ग कनिष्ठ माध्यमिक आणि इ. ८, ९ आणि १० ज्येष्ठ माध्यमिक अशी विभागणी केलेली आहे.

अभ्यासक्रम

कनिष्ठ माध्यमिक शाळेत (इ. ५, ६ आणि ७) रशियन भाषा, स्थानिक भाषेतील साहित्य, परकीय युरोपीय भाषा, बीजगणित, भूमिती, त्रिकोण मिती, रशियन राज्य घटना (१ वर्षापुरता अभ्यास) रसायन, पदार्थ विज्ञान. सातवी पास झाल्यानंतर विद्यार्थी विविध अभ्यासक्रम स्वीकारतात. ज्येष्ठ माध्यमिक शाळेत रशियन भाषा, साहित्य, रसायन, पदार्थ विज्ञान, शारीरिक शिक्षण, भूगोल इ. विषय असतात. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, नागरिकशास्त्र इ. सामाजिक शास्त्रांना विशेष महत्त्व अभ्यासक्रमात आहे. शाळेतील परीक्षा समिती परीक्षा घेते. नापास होणाऱ्यांना

ऑगस्ट महिन्यात पुनः परीक्षेस बसण्याची संधी दिली जाते. कनिष्ठ माध्यमिक पातळीवर शिक्षण मोफत आहे. वरच्या वर्गात, तांत्रिक आणि व्यावसायिक शाळात नाममात्र शुल्क आकारले जाते.

व्यावसायिक शिक्षण

१५ वर्षांचा मुलगा कोणत्याही व्यवसायात काम करू शकतो. मुलाला मिळणाऱ्या गुणाप्रमाणे त्याला विविध प्रकारच्या आणि विविध पातळीवरील शिक्षणात प्रवेश दिला जातो.

तांत्रिक शिक्षण

विविध दर्जाचे कारागीर तयार करण्यासाठी ३००० हून अधिक संस्था या क्षेत्रात काम करतात. हे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नेहमीचे विषय जादा तास घेऊन शिकविण्याची व्यवस्था केली जाते. कारखान्यांशी निगडित अशा (Factory Schools) शाळा विविध कारागिरांना शिक्षण देतात. हे शिक्षण विविध कालावधीचे असते. कामाच्या स्वरूपावर ते अवलंबून असते.

धर्मशिक्षण देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. कारण कॉम्युनिस्ट तत्त्वज्ञानाशी ते विसंगत आहे. शारीरिक शिक्षणावर मात्र पूर्ण भर दिला जातो व त्यासाठी सर्व प्रकारची साधने सर्वत्र उपलब्ध करून दिलेली असतात. विद्यार्थ्याची शारीरिक क्षमता, बौद्धिक कुवत, आवड–निवड यांच्या बरोबरच स्थानिक आणि राष्ट्रीय गरजा यांना महत्त्व दिले जाते. त्यामुळे माध्यमिक शिक्षण म्हणजे केवळ महाविद्यालयात जाण्याच्या तयारीचे शिक्षण असा अर्थ न होता विद्यार्थी स्वावलंबी करण्याचे शिक्षण असे त्याचे स्वरूप होते. या शिक्षणाचे काटेकोर नियोजन करण्यात येत असल्याने गळती, कुचंबणा, अपव्यय हे दोष निर्माण झालेली नाहीत. त्याचप्रमाणे भाषिक भांडणेही निर्माण झालेली दिसत नाहीत.

० ० ०

५. विद्यापीठीय उच्च शिक्षण

प्रशासन आणि नियंत्रण

रशियातील संपूर्ण शिक्षण पद्धती सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि विशिष्ट तत्त्वज्ञानाशी बांधली गेली आहे. हे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या स्वरूपावरून स्पष्ट होते. विद्यापीठे त्याला अपवाद नाहीत. जगातील विद्यापीठांचे स्वरूप याहून अनेक दृष्टीने अगदी भिन्न आहे. सर्वसाधारणपणे विद्यापीठ म्हटले की मुक्त विचारस्वातंत्र्य आणि व्यापक वृत्तीने जीवनाकडे पाहाण्याची वृत्ती, उदारमतवाद आणि वस्तुनिष्ठ संशोधन, ज्ञानाची मनमोकळी देवाण-घेवाण असे स्वरूप आपल्या डोळ्यासमोर येते. पण अशी अवस्था रशियात नाही. विद्यापीठे आणि सर्व प्रकारचे उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था शासन चालविते. प्रत्येक खास शिक्षणाधिकारी (Commissariat) खास अध्यापन-तज्ज्ञांना शिक्षण देणाऱ्या उच्च संस्थांचे नियंत्रण करतो आणि ऑल युनियन कमिटी फॉर हायर टेक्निकल एज्युकेशन तांत्रिक शाळावर देखरेख ठेवते. १९४६ पूर्वी निरनिराळी मंत्रालये त्यांना आवश्यक अशा व्यक्तींचे त्या त्या क्षेत्राचे शिक्षण करीत असे. पण या व्यवस्थेने अडचणी येऊ लागल्या. आता हे सर्व कार्य उच्च शिक्षण मंत्रालय, सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्याने पार पाडते.

१७ ते ३५ वयोगटातील कोणालाही उच्च शिक्षण संस्थेत प्रवेश घेता येतो. पण त्यासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागते. अर्थात् त्या व्यक्तीने माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेले असावे लागते. रशियात विविध प्रकारची विद्यापीठे आहेत. शेती, लष्करी शिक्षण, औद्योगिक आणि तांत्रिक शिक्षण सामाजिक–आर्थिक शिक्षण, शिक्षकांचे प्रशिक्षण, कला शिक्षण इत्यादी प्रकार. व्यवसायाच्या शिक्षणाबरोबरच सामाजिक आणि आर्थिक बाजूंचेही शिक्षण देण्यावर कटाक्ष असतो. एका खास विद्यापीठात कॉम्युनिस्ट तत्त्वज्ञान आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी याचे कार्यकर्त्यांना शिक्षण देण्याची सोय आहे. विद्यार्थी गरजेप्रमाणे अभ्यासक्रम निवडू शकत

असला तरी राष्ट्राच्या गरजेनुसार त्याला विशिष्ट अभ्यासक्रम निवडावा लागतो.

रेक्टर हा विद्यापीठातील सर्वोच्च अधिकारी होय. दोन अधिकाऱ्यांच्या सहाय्याने तो सर्व कारभार पाहातो. त्यांपैकी एक जण प्रशासन आणि अर्थव्यवस्था तर दुसरा शैक्षणिक बाजू संभाळतो. विद्यापीठात आणि उच्च शिक्षण संस्थात एक विधीसभा (Senate) असते. त्यात रेक्टर, त्याचे दोन साहाय्यक अधिकारी, विविधशाखांचे प्रमुख आणि विद्यार्थांचे प्रतिनिधी असतात.

अभ्यासक्रम

उच्च शिक्षण संस्थांचा अभ्यासक्रम सांस्कृतिक मंत्रालय मंजूर करते व नंतर तो अमलात येतो. त्यात प्रायोगिक काम, चर्चा, परिसंवाद, कारखान्यात करायचे काम इ. सर्व तपशील दिलेला असतो. १ सप्टेंबर ते २३ जानेवारी आणि ७ फेब्रुवारी ते १ जुलै या दोन सत्रात वर्षाची विभागणी केलेली असते. १५ दिवस हिवाळ्याची सुट्टी व २ महिने उन्हाळ्याची सुट्टी असते. उच्च शिक्षणाचा कालावधी चार ते सहा वर्षांचा विषयानुरूप असतो. पुरुष आणि स्त्रिया यांची पदवीधरांची संख्या किती असावी हे निरनिराळ्या नियोजन समित्या ठरवितात व सरकार शेवटी त्याला मान्यता देते. राष्ट्राच्या आर्थिक विकासाशी या संख्येचा अनुबंध सतत ठेवला जातो. शिक्षण संपल्यानंतर कोठे काम करावे लागेल याची कल्पना असल्यामुळे विद्यार्थी कोणते तरी व्यावहारिक कामातील कौशल्य शिकतात. विद्यापीठे आणि उद्योग व्यवसाय यांच्यात सतत संपर्क राहिल्याने शिक्षणातील अपव्यय नाहीसा होऊन विद्यार्थ्यांतील वैफल्य नाहीसे होण्यास सहाय्य होते. स्टेट सर्व्हिस कमिशन मार्फत नोकऱ्या देण्याची व्यवस्था होती. समृद्ध ग्रंथालये, अभ्यासाची सर्व साधने उपलब्ध करून देणे याकडे काळजीपूर्वक लक्ष पुरविले जाते. सरकार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या आणि अभ्यासवृत्त्या देते. त्यामुळे निष्काळजी मनाने विद्यार्थी परिश्रम करतात. ३०० ते ४०० रुबल्स शिक्षण फी असते. पण कोणत्या ना कोणत्या कारणाने प्रत्येकाला भरपूर सवलत देण्यात येते.

पत्रव्यवहारद्वारा शिक्षण

पत्रव्यवहारद्वारा शिक्षण देण्याची प्रथा लोकप्रिय झाली असून गेल्या वीस वर्षांहून अधिक काळ ती अस्तित्वात आहे. दूरवर राहणारे कामगार या योजनेद्वारे उच्च शिक्षणाचा फायदा घेतात. नेहमीचे विद्यार्थी आणि या योजनेद्वारे शिकणारे यांच्या अभ्यासक्रमात फरक नसतो. पदवीलाही समान दर्जा या योजनेत दिला जातो. माध्यमिक शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचे झाल्यामुळे उच्च शिक्षण संस्था व विद्यार्थी यांच्या संख्येत वाढ होत आहे.

शिस्त आणि अन्य सोयी

निरनिराळी विद्यार्थी मंडळे (Students councils) शिस्त राखण्याचे कामी महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यापीठातले प्राध्यापक निरनिराळी विषय मंडळे (Clubs) चालवितात आणि त्यात स्वतंत्रपणे अभ्यास करण्याचे शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाते. प्रत्येक विद्यापीठात पदव्युत्तर विभाग आणि संशोधन विभाग असतो. राष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने या विभागाला व त्यात काम करणाऱ्या प्राध्यापकांना आणि विद्यार्थ्यांना समाजात मानाचे स्थान असते. संशोधन कार्याला अग्रगण्य मानले जाते. त्यासाठी सर्व प्रकारच्या सोयी सरकारी खर्चाने पुरविल्या जातात. चर्चा-सत्रे, परिसंवाद, प्रात्यक्षिक कार्य यात भाग घेणे आणि रोज कमीत कमी चार तास अभ्यास प्रत्येक विद्यार्थ्याला करावयास लावणे यावर करडी नजर असते.

विद्यापीठ हे राष्ट्रीय विकासाचे अंग आहे आणि उच्च शिक्षण संस्था राष्ट्राच्या रक्तवाहिन्या आहेत असे मानून उच्च शिक्षणाचे कार्य चालते. रशियातील विद्यापीठांना आणि उच्च शिक्षण संस्थांना जगात फार मोठी प्रतिष्ठा आहे.

० ० ०

६. शिक्षकांचे प्रशिक्षण

प्रशिक्षित शिक्षक

समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन म्हणून शिक्षणाचा उपयोग व्हायचा असेल तर सर्व पातळ्यांवरील शिक्षकांना प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक असते हे सूत्र आधुनिक जगातील सर्व देशांनी आता स्वीकारले आहे. रशियातील प्रशिक्षण कार्यक्रमाचा विकास इतरत्र झाला तसाच झाला. क्रांतिपूर्वक काळात हा व्यवसाय खासगी व्यक्ती करीत. त्यात काही ज्ञान-संपन्न लोकही होते. पण बहुतांश शिक्षक अनुमानाने शिकवीत. परंतु क्रांती-नंतर शासनाने या प्रश्नाकडे लक्ष पुरविले. कारण विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली, शाळा निघाल्या आणि शिक्षकांची संख्या कमी पडू लागली. त्यासाठी तातडीचे दोन उपाय केले गेले. शाळांतून दोन किंवा तीन पाळ्यांची पद्धती सुरू केली. ज्यांना या व्यवसायाची आवड आहे त्यांना अल्पमुदतीचे शिक्षणक्रम पूर्ण करण्याचे आदेश दिले गेले. प्रशिक्षित नसलेले अनेक शिक्षक नेमले. कारण त्याशिवाय शाळा चालविणे शक्य नव्हते. परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या काळात या प्रशिक्षण कार्याला खीळ बसली. कारण बहुसंख्य व्यक्तींना युद्धकार्यात सहभागी व्हावे लागले. कालांतराने विविध पातळ्यांवरील शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला.

पूर्व–प्राथमिक शिक्षक

शिशुशाळा आणि बालकमंदिरे यातील शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची स्वतंत्र व्यवस्था आहे. तीन वर्षांचा अभ्यासक्रम सोळा विभागांचे शिक्षण देण्यासाठी सुरू केला गेला. हे विभाग ठराविक क्रमाने प्रतिवर्षी शिकविले जातात. १७० ते १८० तासांचे शिक्षण दिले जाते आणि रशियातील शिक्षणाचा इतिहास शिकविण्यावर भर दिला जातो. आरोग्य, शारीरिक शक्षण, मानसशास्त्र, वाचनपद्धती, कथानिवेदन, संगीत, निसर्ग अभ्यास,

चित्रकला, शिक्षणाचा इतिहास इ. विषय असतात. प्रत्यक्ष शिकविण्याचा भरपूर अनुभव दिला जातो.

प्राथमिक शिक्षक

तीन वर्षांच्या अभ्यासक्रमात वाङ्मय आणि सामान्यविज्ञान इतर विषयाच्या जोडीने शिकविले जाते. उच्च माध्यमिक कक्षेतील विषयही शिकविले जातात. विभागीय शिक्षणखाते या संस्थाच्यावर नियंत्रण ठवते. निम्न माध्यमिक कक्षेतील सातवी इयत्ता उत्तीर्ण होणाऱ्यांना प्रवेश दिला जातो. या संस्थांशी जोडलेल्या शाळातून शैक्षणिक प्रयोग केले जातात. प्रत्येक शिक्षकाला कोणते तरी एक वाद्य शिकावे लागते. स्वत:ची मातृभाषा रशियन भाषा, अंकगणित, भूगोल, इतिहास, कला, शारीरिक शिक्षण इ. विषय अभ्यासक्रमात आहेत.

कनिष्ठ माध्यमिक शिक्षक

इन्स्टिटचूट ऑफ् टीचिंग या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संस्थातून या पातळीवरील शिक्षकांचे प्रशिक्षण होते. उच्च माध्यमिक कक्षेतील दहावी इयत्ता उत्तीर्ण झाल्यावर प्रवेश देण्यात येतो. आरोग्य, शारीरिक शिक्षण, शिक्षणशास्त्र, मानसशास्त्र इ. विषय अभ्यासक्रमात आहेत. खास प्राविण्यासाठी प्रत्येकाला एक विषय निवडावा लागतो. कॉम्युनिझमचे तात्त्विक शिक्षण प्रत्येकाने घेणे आवश्यक असते. प्रत्येक संस्थेला पाठासाठी खास शाळा जोडलेली असते.

माध्यमिक शिक्षक

सर्वांत सुसंघटित अशी ही प्रशिक्षण देणारी संस्था आहे. उच्च माध्यमिक शिक्षकांचे प्रशिक्षण या संस्थातून केले जाते. १० वर्षे अभ्यासक्रमाची शाळा या संस्था मार्फत चालविली जाते. अभ्यासक्रम चार वर्षांचा असून तो पदवी पातळीच्या दर्जाचा समजला जातो. उच्च माध्यमिक कक्षा उत्तीर्ण होणाऱ्यांना प्रवेश दिला जातो. व्यवसायाचे शिक्षण, सामाजिक तत्त्वज्ञान हे विषय सक्तीचे आहेत. शिक्षणाचा इतिहास, राजकीय इतिहास, रशियन भाषा

च साहित्य आणि खास प्राविण्याचे विषय असे विषय असतात. शिक्षण शास्त्र, मानसशास्त्र, आरोग्य इ. विषयही अंतर्भूत केलेले असतात

सेवांतर्गत प्रशिक्षण

शिक्षकाच्या व्यवसायात प्रवेश केल्यानंतर माहिती व ज्ञान या दोन्ही दृष्टीने सर्वांना अद्ययावत् माहिती व्हावी म्हणून अल्प किंवा दीर्घ मुदतीचे अभ्यासक्रम आखले जातात. यात प्रशिक्षण न घेतलेल्या पण शिक्षक म्हणून काम करणाऱ्यांचाही समावेश केला जातो. आधुनिक पद्धती, संशोधन, नवे प्रयोग इत्यादींची ओळख करून दिली जाते. संपूर्ण देशाची योग्य विभागणी करून अशी केंद्रे चालविली जातात. त्या त्या जिल्ह्यातील विभागीय शिक्षण खाते या केंद्रांची व्यवस्था पाहातात.

प्रत्येक जिल्ह्यात अद्यावत् माहिती शिक्षण विषयाची देणारी केंद्रे असतात. त्यांना शिक्षणाची माहिती प्रसारण केंद्रे (Education Bureaus) असे म्हणतात. विशेषत: ग्रामीण विभागातील शिक्षकांना या माहिती केंद्राचा चांगला उपयोग होतो. या केंद्रामार्फत सभा, चर्चासत्रे, परिसंवाद, प्रदर्शने इ. आयोजित केली जातात व त्यांचा शिक्षक आणि सर्वसामान्य लोक यांना फार फायदा होतो. शहरी विभागातून या संस्थामार्फत दोन वर्षे कालावधीचे प्रशिक्षणाचे संध्याकाळचे वर्ग भरविले जाजात. त्याच-प्रमाणे पत्रव्यवहाराने शिकून आपली गुणवत्ता वाढविण्याची सोय कोणालाही उपलब्ध होऊ शकते.

वेतनश्रेणी संघटना इत्यादी

शिक्षकाचे वेतन शिक्षण, गुणवत्ता आणि अनुभव यांवर अवलंबून असते. सर्व साधारणपणे ४५० रूबल्स दर महिना अशी सुरुवात होऊन १००० रूबल्सपर्यंत वेतन वाढत जाते. विशिष्ट पात्रता मिळविणाऱ्यांना १०० रूबल्सची वाढही मिळू शकते. इतर व्यवसाय करणारे व कामगार यांच्या मानाने ही वेतनश्रेणी सामान्यच म्हणावी लागेल. शिक्षकांच्या तुटवड्या-मुळे जादा काम करणाऱ्या शिक्षकांना जादा वेतन मिळू शकते.

शिक्षकांच्या संघटना शैक्षणिक दर्जा, संस्था यानुसार वेगवेगळ्या आहेत.

पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक आणि उच्च माध्यमिक अशा तीन प्रमुख संघटना आहेत. प्रत्येक शिक्षक कोणत्या तरी संघटनेचा सभासद असतो. शाळांच्याही संघटना असतात व त्यात शिक्षक, व इतर सर्व प्रकारचे सेवक यांना सहभागी व्हावे लागते. या संघटनांच्या मार्फत सभा, संमेलने, चर्चा असे उपयुक्त कार्यक्रम आयोजित केले जातात. आपल्या पगारापैकी दोन टक्के भाग शिक्षक वर्गणीच्या रूपाने संघटनेला देतो. शिवाय निरनिराळे विषय शिकविणाऱ्यांच्याही संघटना आपापल्या क्षेत्रात काम करीत असतात. परकी भाषा शिकविणाऱ्या खास संस्था असून त्यात शिक्षकांना युरोपीय किंवा अन्य भाषा शिकविण्याची सोय असते. त्याचप्रमाणे शारीरिक शिक्षण, बालगृहे (Children's Homes), अपंग मुलांना शिकविणे, पायोनियर नेत्यांचे शिक्षण (Pioneer Leaders training) यांचे प्रशिक्षण देणाऱ्या खास संस्था आहेत. ॲकॅडमी ऑफ् एज्युकेशनल सायन्सेस ही संस्था शिक्षकांची गुणवत्ता आणि दर्जा सुधारण्यास सतत प्रयत्न करते. ग्रामीण विभागात काम करणाऱ्या शिक्षकांना अधिक सोयी उपलब्ध करून दिल्या जातात.

आपल्याकडे पूर्व-प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण संस्था समाधानकारक काम करतात असे म्हणता येत नाही. शिक्षणाचा विकास आणि नियोजन यात त्यांची भूमिका केवळ प्रेक्षकांची झाली आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक प्रयोग करण्यात या प्रशिक्षण संस्था मागासलेल्या राहिल्या आहेत. संपूर्ण प्रशिक्षणाची पुनर्रचना हा अत्यंत तातडीचा प्रश्न आजवर उपेक्षित राहिला आहे. याचा परिणाम सर्व थरांतील शिक्षकांच्या गुणवत्तेवर व दर्जावर झाला आहे. त्याचे परिणाम सर्व शिक्षण क्षेत्रात जाणवत आहेत.

० ० ०

७. प्रौढ शिक्षण

राष्ट्र विकासाचे साधन

क्रांतिपूर्व काळात, झारच्या अमदानीत निरक्षरता प्रचंड प्रमाणावर म्हणजे जवळ जवळ ८० ते ९० टक्के होती. दारिद्र्य आणि अज्ञान यात बहुजन समाज बुडून गेला होता. पण क्रांतीनंतर सतत वीस वर्षे निकराचे प्रयत्न केले गेले आणि आज तर रशियात जवळजवळ १०० टक्के लोक साक्षर झालेले आहेत. औद्योगिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्रांती एकावेळी घडवून आणण्याची किमया या राष्ट्राने घडवून आणली. शिक्षण हा जीवनातील अमोल ठेवा आहे ही जाणीव या भूमीत खोलवर रुजली आहे. ८ ते ५० वयोगटातील प्रत्येकाला रशियन किंवा अन्य सोयीची भाषा लिहिता वाचता येणे आणि सोपे अंकगणित एवढे आले पाहिजे यावर कटाक्ष होता. त्यासाठी चार मार्गांनी हे कार्य सुरू झाले. (१) निरक्षरता नाहीशी करण्याची मोहीम (२) प्रौढांच्यासाठी खास शाळा उघडणे. (३) तरुण कामगार शेतकरी यांच्यासाठी खास शाळा (४) शैक्षणिक आणि सांस्कृतिक उद्योगसंस्था सुरू करणे. याच्या जोडीने पत्रव्यवहार द्वारा शिकविण्याची सोय केली. शिक्षक किंवा संस्थेचा मुख्य प्रौढांच्या समक्ष भेटी घेऊन त्यांच्या अडचणींचे निवारण करीत. कारखान्यात आणि शेतावर यासंबंधीचे माहिती फलक लावण्याची व्यवस्था केली गेली. साक्षरता, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण देण्याची सोय पत्र-व्यवहाराने केली गेली. ३० जणांच्या गटासाठी आठवड्याचे ८ तास, इयत्ता ५ वी ते ७ वी साठी ६ तास, इयत्ता ८ वी ते १० वी साठीचे वेळापत्रक तयार केले गेले. प्रत्यक्ष भेटीद्वारा सामुदायिक आणि वैयक्तिक अडचणी सोडविण्यात येत असत. यासाठी नेमलेले शिक्षक प्रौढ शिक्षण कार्यातले अनुभवी असे नेमण्यात येत. प्रौढ विद्यार्थ्यांच्यासाठी खास माध्यमिक शाळा सुरू करण्यात आल्या. त्यांचा फार चांगला उपयोग तरुण कामगारांना झाला.

आपले भविष्य अधिक उज्ज्वल घडविण्यासाठी धडपडणाऱ्यांच्यासाठी

संध्याकाळची विद्यापीठे सुरू करण्यात आली. निरनिराळ्या मंत्रालयांनी आपल्या विषयाच्या क्षेत्राशी संबंधित अशी ही विद्यापीठे आहेत. त्याच्या जोडीने इंडस्ट्रीयल आणि ॲग्रीकल्चरल ॲकॅडमीज स्थापन करण्यात आल्या. ५ वर्षांचा अभ्यासक्रम या संस्थातून चालविला जाई. विविध कामगार आणि व्यावसायिक संघटना यांनीही प्रौढ शिक्षण मोहिमेत मोलाचा वाटा उचलला. ग्रामीण भागात वाचन कुटी (Reading Hut) सारखी केंद्रे स्थापन करून निरक्षरता निर्मूलन केली. आणखी या क्षेत्रात काम करणारी केंद्रे म्हणजे (१) सांस्कृतिक भवने (Houses of Culture) (२) मंडळे (३) वस्तु संग्रहालये (४) ग्रंथालये (५) सार्वजनिक उद्याने इत्यादी.

प्रौढांच्यासाठी विद्यार्थ्यांच्यासाठी ग्रंथालयांचे जाळे देशभर विणले गेले आहे. विविध प्रकारचे अगणित साहित्य प्रकाशित केले जाते. प्रौढ शिक्षण या विषयाला वाहिलेली खास नियतकालिके प्रसिद्ध होतात. मिळवलेली साक्षरता कायम आयुष्यभर टिकावी व व्यक्तीचे जीवन संपन्न व्हावे यासाठी सतत प्रयत्न केले जातात. चित्रपट, नाटके, आकाशवाणी, दूरदर्शन, भित्तीपत्रके, सभा, चर्चा यांचा भरपूर उपयोग या मोहिमेत करण्यात येतो.

प्रौढ शिक्षण हे सर्वांनी मिळून सतत करण्याचे राष्ट्रीय कार्य आहे ही सर्वांची धारणा आहे. यासाठी आर्थिक अडचणी कधीही निर्माण केल्या जात नाहीत. पायोनियरसारख्या युवक संघटना, विद्यापीठ, शाळातील प्रौढ विद्यार्थी या कामात आनंदाने सहभागी होतात. या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा राष्ट्रीय पातळीवर गौरव केला जातो. प्रौढ शिक्षण कार्यातील यशामुळे संपूर्ण राष्ट्राला एक नवीन अस्मिता लाभलेली आहे.

आपल्या देशात निरक्षरता आणि दारिद्र्य यांचे भयानक प्रश्न सर्वांना सतत आव्हान देत आहेत. त्यासाठी एक विराट राष्ट्रव्यापी मोहीम सुरू करण्याचा निश्चय नव्याने अधिकारपदावर आलेल्या सरकारने १९७७ मध्ये जाहीर केला आहे. हा कार्यक्रम म्हणजे निरक्षरतेविरुद्धचे एक युद्ध आहे. दारिद्र्य आणि निरक्षरता नष्ट केल्याशिवाय देशाला भवितव्य नाही.

ही सर्वांची खात्री झालेली आहे. सर्व भेदाभेद विसरून हे युद्ध जिंकणे अत्यंत आवश्यक आहे. कारण मगच भारतीय स्वातंत्र्याला खरा अर्थ प्राप्त होणार आहे. सर्व शाळा, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, विद्यार्थी, सुशिक्षित, स्त्री-पुरुष, जनसंपर्क साधने, साहित्य, प्रकाशन अशा प्रचंड साधन संपत्तीचा काटेकोर उपयोग या प्रचंड कार्यात करावा लागणार आहे. मग खऱ्या अर्थाने भारत समाजवादी, धर्मातीत राष्ट्र बनेल. आपले प्रचंड मनुष्य-बळच या मोहिमेतील आपले खरे सामर्थ्य आहे. या सामर्थ्याचा प्रत्यय घेणे आपल्या हाती आहे. त्यासाठी कोणत्याही वरदानाची वाट पहायला नको.

० ० ०


REFBK-0022577





आमचो शैक्षणिक प्रकाशने

एम्. एड्. साठी

शैक्षणिक संशोधन	डॉ. भा. गो. बापट	१५–००
शिक्षणाचा इतिहास भाग १	प्रा. ल. रा. गद्रे प्रा. सौ. गीता गद्रे	१५–००
शिक्षणाचा इतिहास भाग २	प्रा. ल. रा. गद्रे प्रा. सौ. गीता गद्रे	२४–००
शैक्षणिक प्रशासन व नियोजन	प्रा. श्री. दा. ताम्हनकर	२०–००
जपान, पाकिस्तान, चीन	प्रा. सौ. लिला गोखले	
इस्त्रायलची शिक्षण पद्धति	सौ. शीला काकडे	१५ ००
चार शिक्षण तज्ज्ञ	प्रा. शं. श्री. आवटी	

बी. एड्. साठी

अर्थशास्त्र अध्यापन पद्धति	प्रा. गाजरे, पुराणिक	५–००
वाणिज्य अध्यापन पद्धति	प्रा. गाजरे, नानकर	५–००
भूगोलाचे अध्यापन	प्रा. पोंक्षे	
साहित्याचे अध्यापन	प्रा. शं. श्री. आवटी	

इतर

आदर्श शिक्षक	गो. प्र सोहोनी	६–००
आदर्श विद्यामंदिर	प्र. द. पुराणिक	९–००
The Ideal Teacher	P. G. Sohani	10-00

नूतन प्रकाशन पुणे